म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १५१६
IRBK-0101516
...य, ठाणे.
मं ... वाचनालय शाखा.
विभाग ... दिनांक
नं.न.
IRBK-0101516

# प्रतिबिंबे

...ग्रंथ संग्रहालय ठाणे
पु. नं. ...
प्रगति वाचनालय

लेखक—

वि. कृ. नेरूरकर

IRBK-0101516
IRBK-0101516

... ९५९६ ...
३४।-

प्रकाशक—

धी बॉंबे बुक डेपो
बुकसेलर्स अँड पब्लिशर्स
गिरगांव मुंबई नं. ४

मुद्रक—
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यु भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई नं. ४.

किं. १॥ रुपया

प्रकाशक—
श्री. एस्. आर. देसाई
मॅनेजर बॉंबे बुक डेपो गिरगांव मुंबई

# प्रस्तावना.

‘ प्रतिबिंबें ’ या नांवानें महाराष्ट्रास सादर होत असलेल्या लघुकथासंग्रहाचे लेखक श्री. वि. कृ. नेरूरकर हे जवळ जवळ गेलीं दोन तपें महाराष्ट्राच्या परिचयाचे आहेत. त्यांनीं लघुकथा पुष्कळ लिहिल्या, परंतु लघुकथालेखकांच्या अहमहमिकेंत ते पडले नसल्यामुळें अशा लेखकांच्या वर्गांत त्यांचें स्थान कोणतें याबद्दल विचार करणारांना गूढ वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. हें गूढ उलगडीत बसण्याऐवजीं त्यांच्या कांहीं लघुकथांवरून सुचणारे विचार येथें नमूद करणें अधिक बरें. ललितवाङ्मयाचें जन्मस्थान लेखकाचा अनुभव असल्याचें सर्वांना माहीत आहेच आणि अनुभव म्हटला कीं त्यांत लेखकांच्या काळांतील परिस्थितीचा ठसा असणें अपरिहार्य आहे. यामुळें चालू जीवनकलहाचा निरनिराळा तपशील श्री. नेरूरकरांच्या प्रतिबिंबांतून उमटलेला दिसल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. निर्वाहाच्या साधनाचा अभाव, तसें साधन असल्यास त्याचा दुष्टांकडून होणारा अपहार; त्याचप्रमाणें स्त्रियांच्या व्यवहारांत कुटिल व क्रूर पुरुषांकडून होणारी निर्दय वंचना, धर्माच्या नांवाखालीं अस्पृश्य म्हणून हिंदु समाजांत होणारी एका विभागाची अक्षम्य पायमल्ली, दारिद्र्यानें समाजांतील होतकरूपणाचा होत असलेला भेसूर चुराडा, अशा तऱ्हेचे विषय घेऊन त्यावर श्री. नेरूरकरांनीं आपली लेखणी मोठ्या कुशलतेनें चालविलेली आहे. ‘ माजी जिमीन ’ ‘ मुलाची आई ’ ‘ देवीचा कौल ’ ‘ दिनकराचें विश्रांतिस्थान ’ या गोष्टी, वर केलेल्या विधानांची यथार्थता पटविण्याला पुरेशा आहेत. ‘ तो बुवाजी आला ’ या गोष्टींत लहान मुलांना भेवडावण्याचे भयंकर अनर्थ चित्रित करून बालसंगोपनांत आईबापांनीं बाळगावयाच्या सावधपणाचें एक अंग वाचकांसमोर ठेविलें आहे. स्त्रिया आणि रंगभूमि, दानधर्म यासारखेही कित्येक विषय श्री. नेरूरकरांनीं आपल्या कथांतून घातलेले आहेत.

सांप्रत माणसाच्या जीवनाची गति अतिशय वेगाची झाली असल्यानें थोडक्या अवधींत जास्तींत जास्त सुख लाभावें अशी इच्छा हा त्या वेगाचा एक परिणाम माणसांच्या स्वभावांत उत्पन्न झालेला आढळतो. त्यास अनुसरून अगदीं थोडक्या शब्दांत जो लेखक एखादा मानवी अनुभव त्याची गुंतागुंत व उत्कटता यांची हानि न होऊं देतां वाङ्मयांत आणील तो श्रेष्ठ मानण्याची प्रवृत्ति आजकाल सर्वत्र दिसते. श्री. नेरूरकरांनीं अशा हातोटी उत्तम प्रकारें कमावल्याची साक्ष त्यांच्या अनेक लघुकथांच्या रचनेकडे पाहिल्यावर पटल्याशिवाय रहात नाहीं. लघुकथेचा संक्षेप करावयाचा म्हटला कीं, त्या कथेंत व्यापक अर्थांची सूचना देणाऱ्या शब्दांची योजना असावयास पाहिजे हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. सूचक शब्दांचा उपयोग हा आणखी एक श्री. नेरूरकरांचा गुण येथें नमूद करणें अवश्य आहे. सूचक शब्द वापरल्यानें पुष्कळदां बहुतांच्या लिहिण्यांत दुर्बोधत्वाच्या दोषानें शिरकाव केल्याचें दृष्टीस पडतें. श्री. नेरूरकरांची भाषा सुबोध आणि हृदयंगम आहे. विषयांची विविधता वाचकांच्या मनोरंजनाला खळ पडूं देत नाहीं. कथेच्या मांडणीचेंही वैचित्र्य साधण्याचा यत्न श्री. नेरूरकरांनीं केला आहे. एका कथेची उभारणी त्यांनीं पत्रलेखनाच्या स्वरूपांत केलेली असून या पद्धतीच्या आद्यप्रवर्तकाचा मान श्री. नेरूरकरांना दिल्यास चुकीचा होणार नाहीं. याप्रमाणें विचार केल्यास मराठी वाङ्मयांत श्री. नेरूरकर फार वरचें स्थान पटकावतील यांत संशय नाहीं.

गिरगांव मुंबई,
ता. ७।३।३८.

न. र. फाटक.

श्री. मा. महाराणी रीजंट साहेब

संस्थान सावंतवाडी यांस—

लेखकाकडून—



त्यांच्या ठिकाणची कथावाङ्मयाची आवड, प्रजावात्सल्य, दीनदयाळुत्व,
कर्तव्यप्रियता इत्यादि गुणांविषयीं वाटणाऱ्या आदराप्रीत्यर्थ—
नम्रतापूर्वक सादर समर्पण.

—वि. कृ. नेरुरकर.

# प्रतिबिंबांचें अधिष्ठान.

जगाच्या व्यवहारांतील निरनिराळे देखावे भावनाशील मनावर विविध प्रतिमा उमटवितात व त्या प्रतिमांचे प्रकाशकिरण त्या भावनाशील मनावरून परिवर्तित होऊन वाङ्मयरूपानें प्रतिबिंबें निर्माण करतात. हीं वाङ्मयरूप प्रतिबिंबें म्हणजेच साहित्य होय; व तीं प्रतिबिंबें निर्माण करणारा तो साहित्यिक. हीं प्रतिबिंबें सर्व समान दर्जाचीं नसतात. "**छाया न मूर्च्छति मलोपहतप्रसादे। शुद्धे तु दर्पणतले सुलभावकाशा॥** या कविश्रेष्ठ भवभूतीच्या उक्तीप्रमाणें या प्रतिबिंबांत सरसनीरसपणा असणारच. प्रस्तुत प्रतिबिंबांची सरसनीरसता रसिक वाचकांनीं ठरवावयाची आहे.

मी जेव्हां लघुकथा लिहूं लागलों, तेव्हां लघुकथेच्या तंत्राचा गाजावाजा आजच्यासारखा झाला नव्हता. त्यामुळें माझ्या कथा कदाचित् तंत्राच्या चौकटींत बसत नाहींत असें चोखंदळ वाचकांनीं अगर टीकाकारांनीं म्हटल्यास मला फारसें आश्चर्य वाटणार नाहीं. जाणते लोक म्हणतात कीं, कला तंत्राच्या मागून न जातां ती तंत्राला आपल्या पाठीमागून फिरवते. मला देखलि वाटतें कीं खऱ्या व प्रभावशाली कलेचे पदनिक्षेप कालांतरानें मार्गदर्शकत्व पतकरितात. कलांवरील तंत्रांचीं शास्त्रें हे कलांच्या पदनिक्षेपांनीं आंखलेल्या मार्गांचे नकाशे होत. माझ्या लघुकथा म्हणजे तंत्राला दिग्दर्शक होण्याइतके प्रभावशाली कलेचे नमुने आहेत असें मला म्हणावयाचें नाहीं. मला सांगावयाचें इतकेंच कीं लघुकथेच्या तंत्राची चौकट समोर ठेवून मी कथा लिहिल्या नाहींत व लिहीतही नाहीं. तंत्राची चौकट समोर ठेवून त्या मुशींत कलेचा रस ओतणारा तो नवशिक्या, ओतारी म्हणावयाचा. आरंभीं असे प्रयत्न करणें इष्ट असले तरी तें कलेच्या उत्कृष्टतेचें लक्षण नव्हे. प्रतिभेच्या उन्मेषानें व स्फूर्तीच्या आवेशानें निर्माण झालेला वाङ्मयप्रवाह आपोआपच दुथडी भरून चालला असतांही जोंपर्यंत तो तीरांचे बांध उल्लंघित नाहीं, तोंपर्यंतच भव्य व शुद्ध राहतो; पण त्यानें तीरांचे बांध ओलांडले कीं तो निर्मळ प्रवाह न राहतां आसुरी व गढूळ असा ओढाळ लोंढा बनतो. शुद्ध कलेचा सुंदर व प्रसादपूर्ण नमुना निर्मळ प्रवाहांत सांपडेल, तो झिरपणाऱ्या धारेंत अथवा फोंफावणाऱ्या गढूळ लोंढ्यांत आढळणार नाहीं.

माझी पहिली कविता कधीं व कुठें प्रसिद्ध झाली हें मी 'उत्कंठे'च्या 'आविष्करणां'त सांगितलें आहे. तसें मला माझ्या कथेबद्दल सांगतां येणार नाहीं. माझी पहिली गोष्ट कधीं व कुठें प्रसिद्ध झाली याचें मला नीटसें स्मरण नाहीं. हायस्कूलमध्यें शिकत असतांनाच मी लिहूं लागलों. बरेंचसें काव्य लेखन झाल्यानंतर मी गद्यलेखनाकडे वळलों.

आरंभींच्या माझ्या गोष्टी नवयुग व मनोरंजन या मासिकांतून प्रसिद्ध झाल्या. आपल्या लेखनाचा संग्रह करण्याकडे माझा मूळपासून कल नव्हता. त्यामुळें माझ्या सर्वच लघुकथा आतां मला सांपडत नाहींत. माझ्या पत्ररूप लघुकथा या माझ्या स्वतःच्या आवडीच्या असूनहि त्या माझ्या संग्रहीं नव्हत्या. माझे मित्र श्रीयुत शिरवळकर यांच्या संग्रहीं त्या होत्या, म्हणूनच त्या मला पुनर्मुद्रित करतां आल्या. याबद्दल मी श्रीयुत आर. एस. शिरवळकर यांचा फार आभारी आहें.

माझ्या कविता संग्रहाप्रमाणेंच माझा हा पहिला लघुकथासंग्रह देखील दीर्घ कालावधीनें प्रसिद्ध होत. प्रकाशनाचें सर्व श्रेय बॉम्बे बुक डेपोचे मालक श्रीमंत **मोतीरामशेट टोपीवाले** यांना असून सदर कथासंग्रह प्रसिद्ध केल्या-बद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

पत्ररूप गोष्टी मराठी भाषेंत पहिल्या प्रथम मीच लिहून रूढ केल्या अशी माझी समजूत आहे. त्या एकामागून एक मनोरंजनांतून प्रसिद्ध झाल्यानंतर खि. वा. रे. टिळक हे मला एक अनुयायी मिळाले. पण त्यांनीं "इकुडल्या तिकुडल्या गोष्टी" अशी एकच कथा मनोरंजनांत माझ्या पाठोपाठ पत्ररूपांत लिहिली. नंतर माझे मित्र व सहाध्यायी श्री. द. बा. सावर्डेकर B. S. (Columbia) यांनीं 'प्रभात' मासिकांत "इंदुशेखर" या टोपण नांवानें एक पत्ररूप कथा लिहिली. त्यानंतर आतां आपल्याला अनेक लेखकांनीं लिहिलेल्या पत्ररूप कथा मधूनमधून वाचावयास मिळतात. शेवटीं पत्ररूप कादंबरी लिहिण्याचा माझा मानस होता. पण तें कार्य माझ्या आधींच प्रो. वा. म. जोशी यांच्यासारख्या लोकप्रिय व वजनदार ग्रंथकारानें केलेलें पाहून मला अतिशय आनंद झाला.

माझा हा लघुकथासंग्रह आज प्रसिद्ध होत असतांना त्यांतील कांहीं कथांच्या प्रसिद्धी प्रसंगींच्या आठवणी कशा झराझर मनाच्या पडद्यावरून सरकत आहेत. 'नवयुगांत' प्रसिद्ध झालेली माझी 'पुनर्मीलन' ही गोष्ट वाचून, माझे त्या

वेळचे गुरुवर्य कै. प्रिन्सिपाल वा. ब. पटवर्धन यांनीं माझें अभिनंदन करून मला प्रोत्साहन दिलें होतें. "माजी जिमीन" ही माझी लघुकथा यशवंत मासिकांत प्रसिद्ध झालेली वाचून, आज देवरूपास मिळालेले माझे देवतुल्य धनी परमपूज्य **कै. वा. श्रीमंत बापूसाहेब महाराज** यांनीं स्मित हास्य-पूर्वक प्रशंसोद्गार काढले होते. 'मुलाची आईच' या 'सकाळ' मधून प्रसिद्ध झालेल्या गोष्टीचे रसिक वाचक मला अनेक ठिकाणीं आढळले. कित्येक तर त्या गोष्टीवरूनच मला ओळखणारे भेटले.

पण 'माजी जिमीन' या गोष्टीबद्दलची आणखी एक गंमत आहे. सुप्रसिद्ध देशबंधु संगीत मंडळीचें 'माझी जमीन' हें उत्कृष्ट नाटक पुष्कळांनीं पाहिलें व ऐकिलें असेल. तें माझ्या गोष्टीवरूनच लिहिलें असेल काय ? अशी मला त्या वेळीं शंका आली होती; आणि ती खरी असल्याचें गुदस्तसालीं नाटककर्ते माझे मित्र श्रीयुत गणेशशास्त्री फाटक यांनीं स्वतःच बेळगांव येथील नगरवाचनालयांत ते व, मी इतर कांहीं मित्र मंडळीसह गप्पा मारीत बसलों असतां सागितलें. मात्र त्यांत त्यांनीं फरक करतां करतां मूळचें स्वरूप बरेंच पालटून टाकलें. पण ती सर्व हकीगत येथें देणें अप्रस्तुत होईल.

प्रस्तुत संग्रहांतील माझ्या लघुकथा यशवंत, सकाळ, नवयुग, वसंत, रण-गर्जना, मनोरंजन, प्रगति, ध्रुव, मकरंद इत्यादि नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यांतील जी नियतकालिकें आज अस्तित्वांत नाहींत, त्यांच्या अस्तामुळें मन विषण्ण बनतें.

माझ्या या कथासंग्रहाला माझे मित्र प्रो. न. र. फाटक यांनीं सुंदर व विवेचक अशी प्रस्तावना लिहून विशेष शोभा आणल्यामुळें मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

२४—२—३८
सावंतवाडी

**वि. कृ. नेरूरकर.**

# प्रतिबिंबें


| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | पृष्ठ |
| १ 'माजी जिमीन' | ... | ... | ... | १ |
| २ 'मुलाची आईच' | ... | ... | ... | १३ |
| ३ पुनर्मीलन | ... | ... | ... | २२ |
| ४ दुसरेपणाची ? | ... | ... | ... | ४५ |
| ५ असें कां बरें ? | ... | ... | ... | ५५ |
| ६ दुर्दैवी शेतकरी | ... | ... | ... | ५८ |
| ७ मोटरीचा नंबर | ... | ... | ... | ६६ |
| ८ टिपकागद | ... | ... | ... | ७६ |
| ९ भिकाऱ्यास दान | ... | ... | ... | ८६ |
| १० 'तो बुवाजी आला !' | ... | ... | ... | ९१ |
| ११ देवीचा कौल | ... | ... | ... | ९५ |
| १२ दिनकराचें विश्रांतिस्थान | ... | ... | ... | १०२ |
| १३ पतिविरहित सती ! | ... | ... | ... | १११ |
| १४ एकाच हाकेबरोबर | ... | ... | ... | ११७ |
| १५ 'नर्शी'ची सरशी | ... | ... | ... | १२२ |
| १६ 'लवकर निघून ये !' | ... | ... | ... | १३७ |
| १७ लग्नाच्या मंडपांत | ... | ... | ... | १४२ |
| १८ गृहिणी नटी | ... | ... | ... | १५४ |
| १९ रस्ता ओलांडतांना | ... | ... | ... | १६२ |
| २० जीवन—मरण | ... | ... | ... | १६५ |

# माजी जिमीन !

" नागू !"

" काय म्हनतोइस, दादा !"

" जातो रे !"

" का येड लागलय् का काय तुला ? ह्ये पाटीलबावा ओखाद देत्याइत न्हव काय ? होईल ताप कमी—जाईल निगूनशेनी ! ऱ्हातोय कशाला, पाटीलबावाचं ओखाद गेल्याउपर !"

पण एवढ्यांत आवरलेल्या हुंदक्याचा उमाळा उठल्याचा आवाज आसन्न-मरण पडलेल्या भागोजीच्या कानांवर आला. भागोजीनेंदेखील तो ऐकतांच त्याच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह सुरू झाला.

" नागू !"

" आस काय करतुयास बायकुवानी ?" नागोजी आपल्या वडील भावास रडत असलेला पाहून म्हणाला. " काय होव तुला ?"

" किस्ना खुट हाय ?"

" किस्ना ! आर ए किस्ना !" नागोजी पुतण्याला हांक मारूं लागला. इटीदाङ्क्चा खेळ अर्ध्यावर टाकून पांच वर्षांचा 'किस्ना' घरांत आला. त्या बाळाला आपला बाबा आजारी असल्याचें ठाऊक होतें. पण प्रत्यक्ष परिस्थितीची जाणीव नव्हती. तो आपल्या बापाकडे जाऊन बसला. कारण त्यानें आपल्या बाबाला रडतांना कधींच पाहिला नव्हता. त्याला तो सारा प्रकार कांहीं निराळाच असा या क्षणीं तरी भासला. त्याचें कोंवळें मन भांबावून गेलें. लंगोटीच्या पुढच्या टोंकास हातांतली दांडूची काठी गुंडाळून तो गुडघ्यांत मान घालून बसला होता. आपल्या भावाची इच्छा ओळखून नागोजीनें त्याला भागोजीच्या जवळ नेऊन बसविलें.

" किस्ना !" मुलाला जवळ ओढून घेऊन त्याला आपल्या कांपऱ्या अशक्त हातानें कुरवाळीत भागोजी म्हणाला.

" काय बाबा ? " किसनानें म्हटलें.

त्याच्या प्रश्नाला कांहीं उत्तर न देतां भागोजीनें घरांतल्या बाजूस नजर वळविली. भिकाबाई दुःखाच्या जड पावलांनीं येऊन नवऱ्याच्या उशापाशीं बसली. तिची छाती उडत होती आणि गळा भरून आला होता.

पाटीलबावांचें ' ओखाद ' तयार झालें होतें. हें ओखाद पोटांत टिकलें तर भागोजी बरा होईल अशी पाटलांनीं हमी घेतली होती. औषध रोग्यास पाजलें. त्यांनीं आपलें कर्तव्य केलें पण रोग्यानें स्वतःचें भवितव्य ओळखलें होतें. प्राण गेला तरी आशा जात नाहीं; ही गोष्ट खरी असली तरी कित्येकदां आशाळभुतास आपल्या आशेची निरर्थकता पटलेली असते. भागोजीला ती पटली होती. आपण आतां ' खिणा ' मराचेच सोबती हें भागोजीला पटलें होतें. पण लोकांच्या समजुतीकरतां म्हणून त्यानें एकदां वर आकाशाकडे नजर केली आणि तोंड पसरलें. पाटलानें औषध रोग्याच्या तोंडांत ओतलें. क्षणार्धांत वान्ती झाली आणि सारें औषध उलटून बाहेर पडलें. तें पोटांत गेलेंच नाहीं, तर टिकणार कोठून ? वान्ती झाल्यावर एकदोन गुचक्या आल्यासारख्या झाल्या. तशांतच भागोजीचे ओंठ बोलण्यासाठीं हालूं लागले.

" नागू ! "

" हूं ! "

" आतां माज्या जागीं तूं माज्या किसनाला—आन्—आन्—"

ओंठ हालले पण शब्द ऐकूं आले नाहींत. पाटीलबावा बाहेर गेले. नागोजी पण उठून बाहेर गेला. ते गेल्यावर भिकाबाईनें पदरानें डोळे पुशीत आपला कान भागोजीच्या तोंडाकडे नेला. तिला कांहीं ऐकूं आलें नाहीं. वेडी आशा !

लगेच त्या मायलेंकरांचा तेथें आकान्त पडला.

—२—

नागोजी आणि भागोजी विभक्तपणें पण एकाच घरांत रहात असत. मात्र त्यांनीं आपल्या जमिनीचीं वांटपें आपसांत एका तिऱ्हाइतामार्फत खासगीरीतीनें करून घेतलीं होतीं. दोघांचीं जोतें, आउतें निरनिराळीं होतीं पण गोठा एकच होता. भिकाबाईला आतां सर्वस्वीं आपल्या दिरावर अवलंबून रहाणें भाग होतें. ती शेतांत काम करावयास जाई आणि नागोजी जें कांहीं देई त्याच्यावर ती आपला उदरनिर्वाह चालवी.

कांहीं वर्षे गेलीं, तशी तिला वर्षाची पुरी बेगमीदेखील नागोजीकडून मिळे-नाशी झाली. आपल्या वांट्याच्या शेतीचा अजमास भिकाबाईला होता. तिनें नवऱ्याबरोबर आपल्या वांट्याच्या जमिनींत शेताची मशागत केली होती आणि दाणेही मळले होते. तेव्हां तिला सारें माहीत होतें, पण दिराबरोबर भांडायला ती तयार नव्हती. इतक्यावरच थांबतें तरी तिनें देवाचे उपकार मानले असते. पण तेवढयावर भागण्यासारखें नव्हतें, जाऊबाईचीं उणीदुणीं कुजकीं नासकीं कुत्सित बोलणीं तिला ऐकून घ्यावीं लागत असत. एवढयातेवढयावरून जाऊबाई तंटा करायला सदासर्वदा तयार असे. भिकाबाईनें मात्र पडती बाजू घेऊन सारें सहन करून गप्प बसावें, असें बरेच दिवस चाललें. तिला स्वतःला कांहीं बोललें तरी ती सहन करीत असे, पण तिच्या मुलाला कोणी कांहीं म्हटलेलें तिला सहन होत नसे. लहान मूलच तें. नागोजीच्या मुलांच्या हातांत एखादी वस्तू दिसली कीं ती त्यानें आपल्या आईकडे मागावी. पण ती बिचारी कुठून देणार ?

गांवांतलीं व शेजारपाजारचीं माणसें भिकाबाईपाशीं सहानुभूति दाखवावयास येत. जाऊबाईचा अन्याय साऱ्या जणींस दिसे. त्यांत कोणी केव्हांतरी सरकार-दरबारच्या गोष्टी बोलत. पण पाटलाचें मन तर नागोजीकडेच असल्याचें तिच्या लक्षांत केव्हांच येऊन चुकलें होतें. मग कुळकर्णी तरी नागोजीच्या मुठींत गेल्याशिवाय कसे रहातील ? पाटील-कुळकर्ण्यांची जोडी हें तर खेडेगांवांतलें पहिलें सरकारदरबार; आणि तेंच जर आपल्या विरुद्ध बाजूला गेलेलें असलें, तर पुढें जायचें तरी कशाला ?

भिकाबाई मुलाला बरोबर घेऊन शेजारच्या गांवीं बाजारच्या दिवशीं बाजा-राला म्हणून गेली, तों तिला तिचा भाचा आलेला दिसला. त्याला तिनें आपली सारी हकीगत सांगून दिराच्या तावडींतून आपली सुटका होण्याचा संभव आहे कीं काय म्हणून विचारलें. त्यानें आपल्या गांवच्या पाटलाच्या मार्फत चौकशी करून कळविण्याचें वचन दिलें.

पण दरम्यान एके दिवशीं नागोजीच्या बायकोनें खणून कुरापत काढल्यामुळें व किस्नास भलत्या शब्दांनीं बोलल्यामुळें भिकाबाईला प्रत्युत्तर द्यावें लागलें आणि भांडण विकोपास गेलें. भिकाबाईच्या वांटणीची गाय व्याली होती. किस्नानें दुधासाठीं हट्ट घेतला होता. नागोजी शेतावर गेलेला परत आला नव्हता. भिकाबाई गोठयांत गेली आणि तिनें पेलाभर दूध काढून किस्नास दिलें. गाईला

चारा घालण्यासवरण्याचें, गोठा झाडण्याचें काम भिकाबाईच करीत असे. पण दूध मात्र जाऊबाईनीं काढून घ्यावयाचें. एक थेंबदेखील किस्नास द्यावयाचा नाहीं असा तिचा ठराव होता. भिकाबाईनें स्वतः दूध काढून किस्नास दिल्याबरोबर जाऊबाईच्या अंगाची काहली झाल्यास नवल कसलें ? तिनें आकाशपाताळ एक करून त्या निरपराधी मायलेकांस शिव्यांची लाखोली मोजली. भिकाबाईनें किस्नास भलत्या शिव्या न देण्याविषयीं जाऊबाईस बजावलें आणि तितक्यांतच नागोजीची स्वारी घरीं आली. त्याला त्याच्या बायकोनें खोट्यानाट्या गोष्टींची कहाणी सांगून अशी चिथावणी दिली कीं त्या आवेशाच्या भरांत त्यानें भिकाबाईस व तिच्या मुलास रातोरात घरांतून बचकुटास धरून बाहेर काढलें आणि दार लावून घेतलें.

— ३ —

त्या रात्रीं भिकाबाई किस्नाला बरोबर घेऊन पाटीलबाबांच्या घरीं गेली. त्या ठिकाणीं पाटीलबाबांना पूर्वकालची आठवण देऊन भिकाबाईनें रडून आकान्त केला. पाटीलबाबा अन्तःकरणाचे दुष्ट नव्हते. नागोजीच्या बायकोनें खोट्या रचीव गोष्टी सांगून पाटलीणबाईचें मन कलुषित करावें आणि पाटलीणबाईनें पाटीलबाबांचें मन वळवावें; असा एकतर्फी प्रकार झाला होता. भिकाबाई आपल्याला शिव्या देते अशी पाटीलबाबांची समजूत करून देण्यांत आली होती. पण प्रत्यक्ष दैन्याच्या मूर्तीला—भिकाबाईला—पहातांच पाटलांना खरा प्रकार कळून चुकला आणि थोडासा पश्चात्तापही झाला. पण झाल्या गोष्टी चुटकीसरशा कांहीं पालटतां येत नाहींत.

“ पाटीलबाबा ! हिस्सा मला मिळायला नको काय ? ह्यो किस्ना आतां थोर झाला, तर त्यानं नांगर खुट बर जुपावा ? सांगा कि. आमची वाटप करून द्येवा, येवढच मला सांगायच हाय.”

“ हूं ! ” सुस्कारा टाकून पाटील म्हणाले.

“ कां पाटीलबाबा ? मुद्रा लय कष्टी का जाली ? म्या काय लोकाच घेयाला बगत न्हाय, माज हाय त्येवडच मला मिळाल मंजी पुरे.”

“ होय, आल माझ्या ध्येनांत; त्ये समद खरं, पर त्ये—” ‘ त्ये ’ शब्दाचा एकार दूरवर ओढीत चिंताग्रस्त मनानें पाटील खालीं मान घालून बसले.

त्याच्या ह्या करणीचा अर्थ भिकाबाईला कांहींच समजेना. तिऱ्हाइतामार्फत वाटपें होऊन निंमे हिस्सा आपणाला मिळावा अशी तिची मागणी होती. ती मागणी रास्त होती, तितकीच सोपी होती. त्याबद्दल पाटलाला विवंचना कां पडावी ? कीं पाटील देखील नागोजीचे पक्षपाती होऊन आपला गळा कापणार? असे विचार भिकाबाईच्या मनांत येऊं लागले.

" का पाटीलदाजी, इतका इचार कशापायी करत्यासा ? " भिकाबाई विनवणीच्या स्वरानें हलक्या आवाजांत म्हणाली.

" त्ये आस होऊन गेलय भिकाबाय,—त्ये तुज्या दादल्याच्या नावावरच खात सार गतसालपुन आपल्या नांवावर नागोजीन चडवुनशेनी घेतलया, " जणुं काय आपलें तोंड भिकाबाईला दिसूं नये म्हणूनच कीं काय चिलमीचा एक लांबच लांब झुरका मारून पाटलानें धुराचा लोट सोडला आणि त्याचा पारदर्शक असा सफेत पडदा आपल्या तोंडासमोर निर्माण केला.

ते शब्द कानांत पडतांच भिकाबाईचा शेवटचा आशातंतु तुटला. बायकोमाणूस ती, सर्वस्वीं परस्वाधीन पडलेली. खात्याची नोंद दिराच्या नांवावर झालेली बदलून घेणें म्हणजे कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. दावा लावला पाहिजे. वकीलाचें घर गांठलें पाहिजे. कोर्टाच्या मंदिरांतून न्यायाधीश देवतेच्या मनांतला न्यायाचा कौल मिळवायला अदालत भक्ताला वकील पुजाऱ्याची मध्यस्थी लागत असते. पण एवढ्यानेंही भागत नाहीं. साक्षीदार पाहिजेतच. पुरावा झाल्याशिवाय वकील आणि न्यायाधीश काय करणार ? खरा प्रकार न्यायाधीशाला स्वतःला पूर्णपणें ठाऊक असला तरीसुद्धां भरपूर पुरावा समोर न आल्यास खरा प्रकार खोटा ठरवून पुरावा ज्यानें उभा केला असेल, त्या खोट्या पक्षाला फैसला देणें भाग पडतें. खरा प्रकार परमेश्वराच्या दरबारांत न्यायी ठरणार. मानवी दरबारांत पुराव्याला फैसला; आणि पैशाच्या जोरावर हवा तेवढा पुरावा उभा करायला मिळतो. भिकाबाईनें यांतल्या कांहीं गोष्टी थोडथोड्या ऐकल्या होत्या. म्हणूनच तिला डोळ्यांना पदर लावून स्फुंदस्फुंदून रडण्यापलीकडे कांहीं उपाय सुचेना.

रडयाचा पहिला ओघ थांबल्यावर कांहीं वेळानें भिकाबाईनें केविलवाण्या मुद्रेनें पाटीलबाबाकडे पाहिलें पाटीलबाबा कसल्याशा विचारांत बसले होते.

" त्या येळची सय पाटीलदाजी तुमास्नी हाय ना ? "

" कसली बर ? "

" माज्या किस्नाचा हात नागुजीदाजीच्या हातांत देऊन काय सांगितल व्हत त्याची सय न्हाइ का ? "

" हूं, आतां जाली सय. ' माज्या जागीं आतां ह्येस्नी तूंच ' आस भागुजी नागुजीला म्हणाला व्हता. "

" त्ये–त्येच. त्येच मींबी सांगत्ये तुमास्नी. त्ये वचन त्यांनीं कस कस पाळल ? "

पाटीलबाबाला मनापासून वाईट वाटलें. त्यांना त्या वेळचा सारा देखावा आठवला. आपण औषध कसे देत होतों; भागोजीनें आपले उपकार कसे मानले होते, नागोजीच्या स्वाधीन बायकोला व मुलाला कसा केला होता आणि मरतांना त्यानें त्याजकडून कसें वचन घेतलें होतें हें सारें त्यास आठवलें. जमिनीच्या आणि इस्टेटीच्या लोभानें नागोजी नीचवृत्तीचा बनला आणि आपणांलादेखील त्यानें भूल घातली अशी पाटलाची खात्री झाली. विवेकानें त्याच्या हृदयांत डोकें वर काढलें. या वेळीं भिकाबाईला कांहीं तरी उपाय काढून मदत करणें आपलें कर्तव्य आहे असें पाटीलबाबास वाटलें.

" भिकाबाय—" तिला नुसती हांक मारून पाटीलबाबा गप बसले.

ते पुढें कांहीं तरी बोलतील म्हणून भिकाबाय ऐकत राहिली होती. पण बराच वेळ वाट पाहूनही ते बोलत ना. तेव्हां तीच बोलूं लागली—

" कस करायच म्होर आता ? "

" त्येचाच इचार करतोय मी मगापास्न, " पाटीलबाबा म्हणाले.

" ह्ये पगा, तुमी गावच पाटील. आमच घर, आमची जिमीन, आमच हिस्स, आमची आवत, आमचे जिमिनीचे लंबर, आमची ढोर, सार सार तुमास्नि म्हाइत हाय. "

" तवा ?—" भिकाबाईच्या मनाचा ठाव काढण्याकरितां पाटलांनीं विचारलें.

" तवा म्होर कस त्ये तुमिच्च सांगा किहो ? " काकुळतीनें भिकाबाई म्हणाली.

" दावा करायचा. "

भिकाबाई उगीच राहिली होती. तिला ऐकूं आलें नसेल अशा समजुतीनें पाटीलबुवा जरा मोठयानें पुन्हां म्हणाले—

" फिर्याद कराया व्होवी. "

" ऐकल त्ये मी. पर त्ये मला कस व्हनार ? " चिंतेनें भिकाबाई म्हणाली.

" त्ये सार सांगतो मी तुला मागनं," पाटीलबाबा म्हणाले.

— ४ —

दानगांवचा बाजारचा दिवस होता. दादाजी सावकाराच्या मोठ्या घरासमोर लोक जमले होते. सावकाराचा कारकून हिशोबाच्या वह्या घेऊन बसला होता. त्याच्या भोंवतालीं वीसपंचवीस लोकांचा समुदाय जमला होता. शिवाय घराबाहेर-देखील बरीच गर्दी होती. दाणेगल्ला राशीराशींनीं ओतला होता. सावकाराचे गडी सवाई दिढीचीं मापें घेत होते. कारकुनाकडे व्याजाचा हिशेब चालला होता. पैशांचा सारखा खणखणाट सुरू होता. कित्येक कुळें बाकीची फेड करीत होतीं. बाकीची फेड करीत होतीं म्हणण्यापेक्षां आपल्या हिशेबानें बाकीची फेड करावयाची ह्या इराद्यानें आलीं होतीं, पण हिशेब कसा चुकला कुणास ठाऊक ! सावकाराच्या हिशेबानें थोडी बाकी शिल्लक राहिलीच होती ! ती थोडीशी बाकी शिल्लक कशी रहाते याची समजूत कारकुनाकडून नीटशी न पटल्याचें दिसल्यावर स्वतः सावकार आपल्या गोड प्रेमळ शब्दांत हाताच्या बोटांनीं हिशेब समजावून देऊन कुळाची समजूत करून देऊन त्यास समाधानानें घराच्या वाटेस लावीत होते. दानगांवच्या सावकाराच्या घरीं असा व्यवहार सारखा सुरू होता.

पण याच घराच्या अलीकडच्या बाजूस एक लहानशी झोंपडी होती. त्या झोंपडीच्या दारांत बाहेर निघण्याच्या तयारीनें एक बारा तेरा वर्षांचा मुलगा उभा होता. त्याचा पोषाख दानगांवच्या रहिवाशांच्यासारखा नव्हता. तो मळकटसें धोतर नेसला होता. अंगांत शर्ट व त्यावर जाकीट असून वरती काळा कोट होता. लहानशा पेटीएवढी एक ट्रंक होती, ती त्यानें आपल्या खांद्यावर घ्यावयाची तयारी केली होती. निघतांना आपल्या आईचा त्याला निरोप घ्यायचा होता.

" बाय ! "

त्याच्या हांकेला फक्त हुंदक्यांनींच उत्तर दिलें.

" बाय, त्यो लक्शा आला बघ. मी जातो बर का. गेल्याबरोबर मी पत्र लिहीन !"

" मुला ! आतां नको र जाऊस. आमच शेत आमच्याकडे ठेवायला सावकार कबूल हाय. सावकाराला खंड घातला मंजी जाल. कुणाला बी भागीला घेऊन कसवट करू."

" बाय, म्होरल्या न्हाय तर त्येच्या म्होरल्या वर्साला मी सावकाराच देन देऊन टाकीन आन मग जिर्मीन नांगरीन. तूं रडूं नकोस. हा बघ लक्या तयारीन आलाय."

इतक्यांत पोषाखानें जवळ जवळ त्याच्याचसारखा पण सतरा-अठरा वर्षे वयाचा दुसरा एक मुलगा तेथें प्रवासाच्या तयारीनें आला. आईनें मुलाला कुरवाळलें, अलाबला केली आणि त्याला मोठ्या मुष्किलीनें परवानगी दिली. डोळ्यांत आलेले अश्रु आईस दिसूं न देतां तो मुलगा आपल्या सोबत्याबरोबर—लक्शाबरोबर—निघाला. तो दिसेनासा होईपर्यंत त्याची आई त्याच्याकडे टक-मक बघत राहिली होती. तिची ती वात्सल्यसमाधी सावकाराच्या घरांतून आलेल्या कर्णकर्कश किंकाळीनें उतरली.

" भिका–अग भिका ! तुझे फुटले कान, ये कुठ ग ×××× पडलीस ?"

त्याबरोबर ती सावकाराच्या घराकडे धांवतच निघाली. डोळ्यांतून आंसवांचा पाऊस सारखा पडतच होता.

ती भिकाबाई होती हें समजल्यानंतर प्रवासाला बाहेर पडलेला तो तिचा मुलगा किस्ना हें निराळें सांगावयास नकोच. किस्ना लक्शाबरोबर दीडवर्षापूर्वी मुंबईला गेला आणि गिरणींत नोकरीस राहिला. त्याची आत व तिचा नवरा मुंबईला नोकरीला होतीं. लक्शा त्याचा आतेभाऊ. किस्ना आपल्या आतेकडे राहून गिरणींत नोकरी करीत राहिला. किस्ना चांगला समजूतदार, हुषार आणि सद्गुणी मुलगा होता. असला हुषार मुलगा सुखवस्तु गृहस्थाचा असता तर त्याच्या हुषारीची वाखाणणी झाली असती. पण तो दारिद्र्यांत जन्मला. दरिद्री मुलाच्या गुणांची किंमत जनतेसमोर कशी होईल ? त्याला समजूत आल्यापासून आपल्या आईला दुःखमुक्त करायचें त्याच्या बालमनानें ठरविलें होतें. योग्य संधि मिळतांच तो मुंबईला गेला. येतांना त्यानें सुमारें ११० रुपये आणले. आणि आईच्या स्वाधीन केले. आईनें ते सावकारास दिले. उरलेल्या बाकीचा नवा कर्जरोखा लिहून दिला आणि किस्नानें मुंबईची वाट धरली.

पूर्वीची हकीगत वाचकांस समजलीच आहे कीं पाटलांनीं भिकाबाईला

फिर्यादीची मसलत दिली होती. त्याप्रमाणें फिर्याद होऊन मुकदमा चालला आणि भिकाबाईची वांटणी भिकाबाईस मिळाली. पण ह्या खटल्याच्या भानगडींत भिकाबाईचे दागदागिने, भांडींकुंडीं वगैरे जाऊन वरती कर्ज झालें. तेव्हां दिराकडचा हिस्सा भिकाबाईला मिळाला. हा मोकदमा कित्येक वर्षे दिवाणी कोर्टांत चालला होता. दिंडीवाडी ही दानगांवचीच एक वाडी होती. कज्जा चालविण्याच्या खर्चासाठीं भिकाबाईला दानगांवच्या दादाजी सावकाराचा उंबरठा पहावा लागला. दुःखांत सुख एवढेंच कीं फैसला मात्र व्हावा तसा होऊन वांटणीची जमीन वगैरे भिकाबाईला मिळाली. पण वहिवाट करायला किस्ना तर लहान होता आणि शिवाय वांटणीच्या ' इष्टकी 'वर सावकाराच्या कर्जाचा बोजा ! तेव्हां वांट्यास आलेली ' इष्टक ' सावकारालाच गहाण लावली आणि तेवढयानें व्याजाची फेड होईना म्हणून ती सावकाराच्या सूचनेवरून पोटावारी सावकाराच्याच घरीं मोलकरीण म्हणून कामास राहिली. बैल, गुरें, आउतें वगैरे सारें तिनें सावकारापाशींच ठेव म्हणून ठेवलें होतें. अजून सावकाराचे दीडशें रुपये फेडावयाचे राहिले होते. ते शक्य तितक्या लवकर फेडून टाकण्याचा किस्नाचा पक्का निर्धार झाला होता. पण—

त्या रात्रीं सावकाराच्या घरीं जेवणीं खाणीं झालीं. कांहीं कामासाठीं कोणी आला म्हणून सावकार त्याला घेऊन आपल्या खासगी खोलींत हलक्या आवाजांत बोलत बसले होते. भिकाबाई उष्ट्याला शेण लावीत होती. तिचें लक्ष मात्र ठिकाणावर नव्हतें. यंत्रासारखी ती काम करीत होती, पण मधून मधून ज्या खोलींत सावकार बसले होते तिकडे तिचें लक्ष होतें. पण हातांतले काम बाजूस ठेवून खोलीकडे लक्ष देणें तिला शक्य नव्हतें. ती मागीलदारास भांडीं घासावयास गेली.

" हें पहा, आतां अवघे पन्नासच रुपये वसूल व्हावयाचे राहिले आहेत; ते आले कीं मी त्याची ज़मीन सोडून देणार."

" जिमीन माझ्या कुळांतली—न्हव माझ्या वयवाटितली. तुम्हि सावकार हायसा. तुमाम्ही पैसा मिळाला कीं झालं, न्हव काय ? त्यो पैसा मी देतो. सगळी रक्कम माज्यापाशीं नसली, तर माजी इष्टक तुमापाशि घाण घी टाकतो, पण ह्या पोराची इष्टक माझ्या नांगराखाल गवसाया व्होवी. ज्या जिमनीत म्या नांगर जुपला त्यांत त्या पोराला जुपायला येनार न्हाय, ही तर माजी परातिज्ञा हाय पगा !"

" तें खरें, नागोजी ! पण किस्नानें जर सारे पैसे फेडले, तर जमीन मी तुला कशी देणार ? "

" फेडून नका घेऊसा. बाकी काढा, मुदत वाढवा, काय वाटेल त्ये करा. खर पर जिमीन माझ्या ताब्यांत द्या. मागल्या खेपेस तुमि सांगीतल म्हनूनशान ह्ये घा रुपये घिउन बी आलोंय संगच," असें म्हणून नागोजीनें दहा रुपये सावकाराच्या हातावर ठेवले. सावकारानें ते उचलून कनवठीला लावले.

" बरं ! किस्नाकडून रकमेची फेड नाहीं झाली तर जमीन आधीं तुला द्यायची, तुझ्याकडे रक्कम नसली तर मग दुसऱ्याला द्यायची."

" छे ! छे ! छे ! त्ये काय न्हव बगा. जिमीन मला मिळायाच व्होवी."

" तर मग तुझी जमीन मला लावून दे. मी तुला रक्कम देतों. ती रक्कम भरून तूं किस्नाची जमीन तुझ्या नांवावर करून घे. त्यांत फरक नाहींच. दोन्ही सारखींच. दोन्ही हिसे सारखेच आहेत. किस्नाचा हिसा तुला मिळाला तर तुझी प्रतिज्ञा खरी होतीच आहे !"

" हा ऽ ऽ ऽ जि हा !" टाळी वाजवून नागोजी म्हणाला. "खर म्हन्त्यासा. तसन्च करून टाकतो. काय पायजे त्ये करीन पण किस्नाला शेतात नांगर जुपायला न्हाय द्येयाचा. त्याच्या जिमनीत मीच नांगरनार."

इतकें बोलून तो उठला. त्यानंतर त्याच विषयावर आणखी किरकोळ बेत व बोलणीं होऊन सावकार उठले; आणि नागोजी इकडे तिकडे बघत बाहेर पडला. त्यानें तडक आपल्या घराची वाट धरली.

भिकाबाई इतक्यांतच घासलेलीं भांडीं घरांत ठेवावयास म्हणून आली होती. तिनें डोकावून हळूच पाहिलें. शेवटचें वाक्य तिच्या कानांत अर्धवट पडलें होतें. नागोजीचा स्वरही तिनें ओळखला होता. प्रत्यक्ष पाहून तिला खात्री करून घ्यावयाची होती. तिला भोंवळ आल्यासारखी झाली.

— ५ —

" बाय ! "

" ओ ! "

" कुपणात ढोर जित्रापात भरली असल्याल. त्यास्नी हाकलून काढलीस व्हय ? "

" ल्येका, कसल रे जित्राप ? "

" कसल मंजी ? जुंदळा न्हाय का पसरलाय ? तुला कि नाय, काय बी समजत न्हाय. माजी शिदोरी बांधलीस ! मीच जातोय बग, " असें म्हणून किस्ना उठण्यासाठीं धडपड करूं लागला. भिकाबाई त्याला सावरून धरीत होती. किस्नाला भ्रम झाला. तापानें आंग सारखें कांपत होतें.

किस्ना मुंबईहून आजारी पडून आला होता. पण त्यानें कर्जाची रक्कम मिळवून आणली होती. तो मागच्या खेपेला आला तेव्हांच फिक्का दिसत होता. त्याला चहाची संवय जडली होती. मुंबईच्या गिरणीमजुराचा जीवितक्रम कसा असतो तें कांहीं कोणाला सांगायला नको. बारा वर्षांचा कोंवळा पोर. त्या तसल्या स्थितींत तीन चार वर्षें घालविल्यानंतर शीरसलामत कसला बचावतो ! आपला शब्द खरा करण्याकरितां व आईचें दुःख निवारण करण्याकरितां त्यानें आपल्या जिवाचे हाल करून, भयंकर परिश्रम करून कर्ज फेडण्यापुरते पैसे सांठविले. पण तेवढ्यांत त्याची प्राणज्योत विझण्याची स्थिती आली. गरीबाला क्षयरोगाला औषध कुठलें मिळणार ? अस्थिपंजर होऊनच तो घरीं आला होता. सावकाराचे पैसे देऊन टाकले. शेत सोडवून घेतलें. पण पुढचा व्यवहार करायची शक्ति त्याला नव्हती. तो दिवसेंदिवस खंगत चालला. पण त्याला आपल्या जमिनीचा सारखा ध्यास लागला होता. सावकाराच्या ऋणांतून आपण मुक्त झालों या गोष्टीबद्दल आनंद वाटावयाचा बाजूस राहिला. उलट मुलगा आपल्या हातचा सुटतो या भीतीनें भिकाबाईची पांचावर धारण बसली. गरीब बिचारी !

" माजे बैल कुठ हाईत ? मीं नांगर जुपणार ! बाबाच्या हातचीच रुमणी मी बी हातांत धरणार ! त्योच कुळव, त्योच गुठा, त्योच नांगर, तीच आवत घेऊन मी शेत नांगरणार, " असें म्हणत असतांच किस्नाचा अवतार आटोपला.

नागोजीची जमीन सावकारानें पूर्वींच गहाण घेतली होती. किस्नाला दिलेलें खत पुन्हां हातांत घेण्यास सावकाराला फारसे श्रम पडले नाहींत.

किस्नाचा प्राण गेल्याबरोबर भिकाबाय जी निश्चेष्ट पडली ती दोन तास त्याच स्थितींत होती ! दोन तासांनंतर ती उठली आणि डोळे गरगर फिरवीत व केसांच्या झिंज्या दोन्ही हातांनीं पसरीत सावकाराच्या दारांत जाऊन उभी राहिली.

" सावकार ! "

सावकार समोरच होते. भिकाबाई भ्रमिष्ट झाली होती.

" माजी जिमीन ! "

सावकार तिच्यापुढें पुतळ्यासारखा पहात उभा होता.

" थू: तुज्या जिनगानीवर ! " असें म्हणून त्याच्यावर तिनें लाथ उगारली. मात्र ती लाथ सावकाराला ओझरती बसली. पण ती मारतांना तीच घसरून खालीं पडली.

" किस्ना ! माज्या ल्योका ! नको र जाऊं म्हमईस; माज्या वासरा ! तुला मारील कुनी तरी. मी न्हाय तुला जाऊ द्येयाची त्या दुवाड म्हमईस ! "

असें म्हणत ती वाऱ्यासारखी नाहींशी झाली.

— ६ —

दुसऱ्या दिवशीं मध्यरात्रीस नागोजीच्या दारावर धक्के बसूं लागले. नागोजी आणि त्याची बायको दिवा घेऊन बाहेर आलीं. भिकाबाई जवळ जवळ नग्नावस्थेंत त्यांच्यासमोर उभी होती.

" दाजी ! "

" नागोजी तोंड वासून पहात होता.

" माजी जिमीन ! "

नागोजीच्या बायकोच्या तोंडचें पाणी पळालें. तिनें आरोळी मारली.

" थू: तुज्या जिनगानीवर, " असें म्हणून नागोजीला लाथ मारून ती काळोखांत कुठल्या कुठें गडप झाली.

* * *

त्या दिवसापासून मध्यरात्रीं किस्नाच्या वांटणीच्या शेतांत भिकाबाईच्या तोंडचें पुढील गाणें गांवच्या साऱ्या रहिवाश्यांना ऐकूं येऊं लागलें:—

काळ्या खडकाच्या खडकाच्या ल्हाया गोडी
ढवळ्या बैलांची बैलांची जुपली जोडी
धाकट्या दीरानं दीरानं कापला गळा !
सावकार गरीबाचा गरीबाचा कापतो मळा !

# " मुलाची आईच ! "

दार वाजल्याचा आवाज ऐकूं आला. कोण बरें असेल ? डॉक्टरकडून औषध घेऊन येणारा माणूस किंवा दूध घालणारा गवळी, किंवा काशी मोलकरीण कोणीका असेना. त्याला त्याचें काय ? तो आपला वाचनांतच गढून गेला होता.

विहारीचा आयुष्यक्रम एकसारखा—त्यांत कसलाही फरक पडल्याशिवाय चालला होता. त्यांत कधींच कसलेंच नाविन्य नाहीं. काल, आज आणि उद्यां यांत कसला फरक नाहीं; असला आयुष्यक्रम नीरसच नाहींतर काय ? आणि असल्या नीरस आयुष्यक्रमाची संवय त्याच्या रोम रोमी भिनल्यामुळें कीं काय आजचा दिवस जरा निराळा असतांही त्याला तो निराळासा–नाविन्यपूर्ण–असा वाटत नव्हता.

रामा गडी औषध घेऊन आला असेल का ? असेना ! आई आहेच खालीं काय हवें नको तें बघायला. थोड्या वेळानें नर्स येईल. कदाचित् डॉक्टरही येतील. पण त्यासाठीं वाचन सोडून माडीवरून खालीं कशाला जायला पाहिजे ? व्हायच्या गोष्टी होणार, घडायचें तें घडणार ! बहुतेक तासा भऱ्यानेंच काय तें व्हायचें होतें. त्या गोष्टीला आतां कांहीं फारसा वेळ नव्हता.

तरी पण त्याच्या मनांत आजच्या प्रसंगानें थोडी चलबिचल झालीच होती. ती घालविण्याकरितां तो वाचनांत गढण्याचा अधिक प्रयत्न करीत होता. त्यानें पान परतलें. त्याचें मन विचारमग्न झालें.

*　　*　　*

बाविसाव्या वर्षीं लग्न झालें. आतां विहारीचें वय सव्वीस वर्षें असावें. दिवसासारखे दिवस, महिन्यासारखे महिने आणि वर्षासारखीं वर्षें अशीं चार वर्षें विहारीच्या वैवाहिक जीवनाचीं मागें पडलीं. त्यांत त्याला फारशी मौज वाटली असें कधीं घडलें नाहीं. आईनें लग्नाचा आग्रह धरला. त्यानें हो म्हटलें. झालें.

नाहीं तर त्याची इच्छा अगदीं निराळी होती. किशोरीची संगत, तिचा सहवास त्याला फार आवडे. तो मामाच्या घरीं जाई तेव्हां किशोरीशीं बोलण्या

चालण्यांत त्याला स्वर्गसुखाचा आनंद होई. पण विहारीची स्थिती मामाच्या इतकी श्रीमंतीची नव्हती. किशोरी विहारीशी अधिक सलगीनें वागतांना पाहून मामी कपाळाला आंठ्या घालून किशोरीला हांक मारून बोलावून नेई. तो प्रकार एकदां तर अगदीं उघड उघड विहारीच्या नजरेस पडला. मानी विहारी मामाच्या घरीं जाईनासा झाला. पण मनांत—?

आणि आईचें टुमणेंही सारखें चालूच असायचें.

" माझा भाऊ झाला म्हणून काय झालें ? तीं माणसं काय आमच्या बरोबरीचीं आहेत ? आम्हीं त्यांच्या तोलाचीं नाहीं, असंच तीं आम्हाला म्हणणार. किशोरी आखीव, रेखीव, नटवी—थटवी आहे म्हणून का तिचाच ध्यास घेऊन बसायचें ? ही शेजारची आपल्या पायानीं चालून आलेली इंदिरा काय वाईट आहे ? तिला अन् तिच्या आईबापांना काय म्हणून बरं नाखूष करायचं ? ती काय वाईट आहे ? शंभरांत उजळून दिसेल. अन् स्वभाव पण किती चांगला ! मला इंदिराच आपली सून बरी दिसते. विहारी तुला नाहीं इंदिरा आवडत ? "

आणि आईच्या शब्दाला नकार देण्याचा विहारीचा स्वभावच नव्हता. इंदिरेबरोबरच विहारीचें लग्न झालें. लग्न झालें आणि एकसारखे दिवस लोटूं लागले.

* * *

पण विहारीला पितृत्व प्राप्त होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं हा मात्र थोडासा निराळेपणा खरा. विहारीला त्याचें विशेष कांहीं वाटत होतें असें त्याच्या मुद्रेवरून कांहीं दिसून आलें नसतें. महिन्या मागून महिने जाऊं लागले. इंदिरा या नव्या स्वरूपांत दृष्टीस पडतांच विहारीला मनांतल्या मनांत कांहीं तरी वाटत असावें. मुलगाच होईल का ? वाः किती छान ! मुलगाच होईल तर बरें होईल; हा विचार येतांच विहारीचा चेहरा प्रफुल्लित होई.

शेवटीं तो दिवस आला आणि घरांत गडबड सुरू झाली. नर्स येऊन गेलीच होती पण पुन्हां आली. तिचा चेहरा प्रफुल्ल नव्हता. लक्षण ठीक दिसत नव्हतें असें नर्सच्या मुद्रेवरून कोणालाही ओळखतां आलें असतें. डॉक्टरच आले पाहिजेत असें नर्सचें म्हणणें पडलें. विहारीची मनःस्थिती पालटली. त्याच्या हृदयांत खळबळ सुरू झाली.

विहारी उठला, त्यानें पुस्तक मेजावर ठेवलें, त्यांत खूण घालायला तो विसरला नाहीं. खालीं त्याच्या आईची कशी घाई उडून राहिली होती. माडीवरून विहारी खालीं जातो तों डॉक्टर उभे !

" वेडा कुठला ! मी असतांना घाबरायला का पाहिजे ? जा वाचीत बस माडीवर नाहींतर फिरायला जा जरासा बाहेर. मी आंत जाऊन बघतों काय आहे तें. त्या चांगल्या नर्स आहेत. घाबरायला नको काहीं ! "

हे डॉक्टर विहारीचे बालमित्र. पण ते जें कांहीं बोलले तें चटदिशीं बोलून गेले. विहारी त्यांच्या शब्दाचा ताळमेळ घालीत बसला. विचार करीत बसण्याचाच त्याचा स्वभाव.

" त्या नर्स चांगल्या आहेत " डॉक्टर म्हणाले नाहीं का ? आणि अशा प्रकारच्या त्या चांगल्या नर्स असून देखील चिंतेंत पडल्या आहेत ! अशातशाच आपल्या असत्या तर गोष्ट निराळी होती. पण इतक्या चांगल्या, इतक्या धात्रीकर्मकुशल, इतक्या अनुभवी असूनही त्या चिंतामग्न कां व्हाव्या बरं ? अन् डॉक्टर म्हणतात काय तर " घाबरायचं कारण नाहीं ! " डॉक्टर लोकांना काय शेकडों पेशंटनां रोज पाहून त्यांचं मन निर्ढावलेलं असतं.

विहारीच्या मनांत अनेक विचारतरंग सुरू झाले. डॉक्टर बाळंतिणीच्या खोलीकडे गेले. विहारी धडधड पायऱ्या चढत पुन्हां माडीवर गेला. खुणेवरून त्यानें पुस्तक उघडलें. वाचनाकडे लक्ष लागेल तर शपथ ! मुलगा—वंशवेलीच्या मुळाला जुनाटपणा आणणारा आणि शेंड्याला कोंवळेपणा आणून सुशोभित करणारा मुलगा ! भविष्यकालच्या रम्य कल्पनांत मन तरंगूं लागतें. विहारीचेंही मन तसेंच तरंगूं लागलें. पण–मुलगा ! इंदिरेशीं लग्न ! किशोरीची निराशा ! अरेरे ! किशोरी ! किशोरी ! विहारीची आवडती किशोरी ! भूतकाळचा चित्रपट विद्युत् वेगानें विहारीच्या डोळ्यासमोरून फिरूं लागला. त्याचें मन फिरून खिन्न झालें.

*　　*　　*

किशोरी अजून अविवाहित राहिली होती. तिचें वय आतां एकवीस बावीस वर्षांच्या आत बाहेर असेल. कॉलेज शिक्षण तिनें मध्येंच सोडलें होतें. कां कुणाला ठाऊक पण मैत्रिणीबरोबर ती दूरच्या शहरीं फिरावयास जाई. " महिलोन्नति समाजाची " ती कार्यवाहिनी झाली होती. तरी मधून मधून कधींतरी ती विहारीच्या घरीं खेप टाकी. इंदिरेशीं तिची जिवाभावाची मैत्री जमली होती. इंदिरेजवळ बसावें, विहारीच्या आईशीं दोन शब्द बोलावेत आणि विहारी दिसलाच तर त्याच्याशीं मोजकेंच बरें, कसें, ठीक, काय ? अशा मासल्याचे

एक दोन शब्द बोलावेत आणि हसऱ्या मुखानें निघून जावें. अशी वागणूक असे आणि मग विहारी तिच्याकडे कधीं पाही तर कधी खालीं पुस्तकांतच मान घालून राही, तर कधीं दुसरीकडेच बघी. पण आई किंवा इंदिरा आसपास नसल्यास ती पाठमोरी झाल्यावर तिच्याकडे पहात राही.

तीच किशोरी आतांही आली होती. कांहीं तरी विशेष भानगड आहे एवढेंच तिला कळलें होते. खालीं बरींच माणसें जमलीं होतीं. गर्दींत घुसावयाचें तिला आवडलें नाहीं. नर्स किंवा डॉक्टर तिला बाहेर कुठें दिसत नव्हते. ती प्रथम माडीवरच चढली. खुद्द विहारीच्या मनाची स्थिती काय झाली असेल. तें पहावें असेंच तिला वाटलें असेल काय ?

पुस्तक उघडून तोंडासमोर धरलेलें ! विहारी वाचनांत निमग्न, निदान बाह्यात्कारी तरी तो तसा दिसत होता. जिन्यावर पावलें वाजलेलीं त्यानें ऐकलीं होतीं. कोणीतरी येत आहे हें त्याला समजलें होतें. आपल्याला कोणीतरी येऊन कांहींतरी सांगणार पण तें शुभवर्तमान असेल काय ? तो भ्याला होता. भीतीला दूर लोटायला जणूं पुस्तक हेंच एक आच्छादन होतें.

× × ×

पण ती किशोरी होती.

" यावं का ? "

" हं "

" खरोखरच वाचन चाललं आहे का ? तोंडावर तर काळजी दिसते आहे. "

एक दीर्घ निश्वास ! विहारीची स्थिती केविलवाणी झाली होती.

" नर्स आंत आहेत मघांपासून. "

" हं "

" आणि डॉक्टर पण आले आहेत आमचे. "

" अस्सं ! " तिनं म्हटलं पण उभ्या उभ्याच.

" बसत कां नाहीं ? " किशोरीला पेंच पडला. इतक्या वर्षांत ती विहारीजवळ इतका वेळ कधींच राहिली नव्हती. विहारी संकटांत होता. त्याला मानवी सहानुभूतीची आवश्यकता होती. आई खालींच होती. विहारीला बाळंतिणीच्या खोलीजवळ जाणें शक्यच नव्हतें. त्याला टाकून खालीं जावें कसें ? किशोरीला

काय करावें हेंच सुचेना. तशाच अनिश्चित मनःस्थितींत ती बसली. पण बोलायचं काय आणि कसं ?

" कांहीं आणून द्यायला पाहिजे कीं काय तुम्हांला खालून ? " इतकेच शब्द तिच्या ओठांतून निसटले पण विहारीचें उत्तर नाहीं. लग्नापूर्वी तीं दोघें एकदां एकत्र बसलीं असतांना विनोदानें केलेल्या गोष्टीची आठवण ताजी होऊन दोघांच्याही मनांत एकदमच सळसळली. त्याचवेळीं विहारीनें प्रश्न टाकला.

पण किशोरीला तो प्रश्न अनपेक्षित होता. विहारीसारखा अतिशय भिडस्त माणूस अशावेळीं असा प्रश्न टाकील अशी तिची मुळींच कल्पना नव्हती. म्हणूनच ती प्रथम बुचकळ्यांत पडली.

" अजून तूं अविवाहित कां बरं राहिलीस, किशोरी ? " हाच तो प्रश्न होता. हा प्रश्न विहारीस यावेळीं कां सुचावा ? विहारी चिंतेंत होता ना ? पण मनाच्या भराऱ्या ब्रह्मदेवाच्या तरी स्पर्धेत कधीं राहतील का ? समोर किशोरी दिसली. तिची कांती आणि शरीरयष्टि रेखीव, बांधीव मुळचीच. तशांत आतां यौवनानें ती फार खुलली होती. इंदिरा बाळंतिणीच्या खोलींत होती. किशोरी विवाहित असती तर कदाचित् तिलाही या सुमारास बाळंतिणीच्या खोलींत जावें लागलें नसतें का ? कल्पनांची ही सांखळी अगदीं सुसंगत आणि सयुक्तिक आहे. पण किशोरी मात्र त्या प्रश्नानें गोंधळली इतकें खरें. नेहमीप्रमाणें तिनें हसरा चेहरा केला. ती कला तिला चांगली साधली होती. मनांतले विचार विकार हाकारून घालायला हास्याचा गोफण गुंडा तिच्या अगदीं हातांतला झाला होता. पण विहारीनें पु हां तोच प्रश्न केला. आणि किशोरीला उत्तर देणें भाग होतें. तिला उठून जावेसें वाटलें सुद्धां. पण शरीरच हालेना !

" कां असं कां विचारतां ? माझ्याशीं कोणी लग्न करायला तयार नाहीं म्हणून मी अविवाहित राहिलें. "

" हं–हं ! " विहारीनें म्हटलें. किशोरी आपणास अलभ्य आहे असें अनेक तरुणांस वाटत होतें ही गोष्ट विहारीला निश्चित ठाऊक होती.

" कोण म्हणतं असं ? "

" तें कशाला पाहिजे ? मी अविवाहित राहायचीच प्रतिज्ञा केली आहे."

" असं का ? पण ती प्रतिज्ञा कधीं केली बरं ? " हा प्रश्न विचारीत असतां विहारी किशोरीकडे निरखून पाहूं लागला. जणूं काय तो तिच्या अंतःपटलावरील

चित्र निरखून पहात होता. अथवा तिच्या मनोघटकांचें सूक्ष्म पृथःकरण करीत होता.

" कधीं बरं ? " ती स्वतःशींच बोलल्यासारखी बोलली, " कधीं बरं ? मला नाहीं नक्की सांगतां यायचं. नक्की आठवत नाहीं. टेबलावरील एक पुस्तक तिनें इतक्या अवधींत हस्तगत गेलें होतें. त्याचीं पानें चाळण्याचा चाळा करीत ती म्हणाली.

" पण मला येईल नक्की सांगतां. सांगूं का ? "

" आतां त्याच्याकडे किशोरी रोंखुन पाहूं लागली. लपवून ठेवलेली वस्तु याला सांपडली कीं काय म्हणून खेळताना जसें एकाद्या मुलानें पहावें तशीच ती पहात होती.

" हुं. कधीं कधीं ? "

" चार वर्षांपूर्वी—" असें म्हणून आपल्या बोलण्याचा परिणाम काय होतो तें विहारी किशोरीच्या मुद्रेवर पाहूं लागला. आपल्या बोलण्याचा झालेला परिणाम विशेष दृढ करण्याकरितां तो आणखी म्हणाला, " माझें लग्न झाल्यानंतर ! खरं ना ? "

" अं–अं–अंहं ! " कांहींच न सुचल्यामुळें कांहींतरी नकारार्थी ध्वनी निघाला झालं. तिनें खालचा ओंठ चावला आणि पुस्तक मिटून तें मेजावर होतें तिथेंच ठेऊन दिलें. नंतर ती उठून जावयाच्या बेतांत होती. पण एकदम निघून जाण्यापेक्षां थोडासा वेळ घालवून जाणं अधिक स्वाभाविक होईल असें वाटल्यामुळें ती भिंतीवरील तसबिरा पाहण्याचें मिष करूं लागली. मात्र तिथें राहाणें आतां तिला असह्य झालें होतें.

" किशोरी मला ठाऊक आहे सारं " अधिक धिटाईनें आतां विहारी बोलूं लागला. माझं लग्न झालं आणि तशीच तूं आजारी पडलीस. तुझ्या आजाराचं कारण कुणाला समजलं नसलं तरी मला कळलं होतं नंतर—पण मला हें स्थळ मागाहून समजलं हो ! " किंचित्सा हंसून तो म्हणाला. " आणि त्यानंतर तूं ही प्रतिज्ञा केलीस. खरं ना ? होय म्हण ना ? "

" बरं आतां मी जातें खालीं. गर्दी कमी झाली आतां. इंदिराबाईंची चौकशी करत्यें. " असें म्हणत पुन्हा स्वतःला नकळत घेतलेलें पुस्तक खालीं ठेवणार होती तोंच त्या पुस्तकाला विहारीनें हात घातला. तिला आवडलेलें

पुस्तक कोणतें हें पाहाण्याचा किंवा कोणत्या पानावरील मजकूर तिला वाचा-वासा वाटला तें पाहण्याचा किंवा दुसरें कांहीं समजून घ्यावयाचा त्याचा हेतु होता नकळे. पण त्यानें पुस्तकाला म्हणून हात घातला. पण किशोरीच्या हाताचा स्पर्श त्याला झाला. विद्युल्लतेसारखी चट्कन् निसटून किशोरी खालीं गेली. विहारी विचारमग्न स्थितींत तेथेंच राहिला.

एकच क्षण ! आणि त्या क्षणीं एकच स्पर्श ! पण त्या स्पर्शानें विहारीला कसेंसेंच वाटलें. केवळ आपल्यासाठीं किशोरी अविवाहित राहिली. तिनें आपल्या आईबापांकडे विहारीच नवरा पाहिजे म्हणून हट्ट कां बरें घेऊं नये ? तसें तिनें केलें असतें तर सर्व गोष्टी सुरळीत जमल्या नसत्या का ? ती गोष्ट तिलाच शक्य होती. गरीब स्थितींतल्या माणसाला श्रीमंताची मुलगी मागण्याचा हक्क काय ? पण संधी गेली.

* + *

इतक्यांतच एक दुःखावेगाची किंकाळी ऐकूं आली ! विहारीची एक विचार-शृंखला तुटली, दुसरी सुरू झाली. एका क्षणाभरांत जगांत एक नवीन मनुष्य जन्माला येणार. तो आपणाला पितृत्व प्राप्त करून देणार, आपल्या अंगाखांद्या-वर खेळणार, आपणाला " बाबा " म्हणणार, बोबडया बोलानीं मन रंजविणार आजपर्यंत घरांत फक्त इनमीन तीनच माणसें. पण आतां घरांत गोकुळींचा कान्हा खेळूं लागणार. काय आनंदाची गोष्ट अशा वेळीं मन प्रसन्न असणें साह-जीकच नाहीं काय ?

पण आतांच किशोरी खालीं गेली होती. किशोरीच्या नजरेस नवें बालक पडेल आणि तिला काय वाटेल ? कदाचित् दैवानें चकविलें नसतें तर त्या बाल-काची आई किशोरीच झाली असती. तसें झालें असतें तर काय बहारीची गोष्ट होती पण.........

" विहारी ! " डॉक्टर घाईघाईनें विहारीच्या समोर येऊन उभे राहिले होते. त्यांच्या चेहऱ्यांत काळजी ओतप्रोत भरलेली होती.

" काय हकिकत आहे डॉक्टर ? कांहीं विशेष आहे वाटतं ? कांहीं वाईट आहे का ? बोला ना ?"

" विहारी, असं काय करतोस रे ?" विहारीचे डोळे डबडबलेले पाहून डॉक्टर म्हणाले " जराशी भानगड झाली आहे खरी. पण अजून चांगली

आशा आहे. सर्जन साहेबांची मदत घ्यावी लागणार हें खास. मला वाटलं खरीखुरी गोष्ट तुला सांगून टाकलेली बरी पण तूं तर एकाद्या गयाळ मुली सारखाच करूं लागलास ? अहारे भागूबाई ”

“ डॉक्टर विहारीला धीर देण्याचा प्रयत्न करीत होते. पण विहारीला भोंवळ यावयाची राहिली नाहीं. बिचाऱ्या इंदिरेची मूर्ति त्याच्यासमोर उभी राहिली. मुलाला जन्म देण्यांत इंदिरेचे प्राण धोक्यांत होते. प्रेमळ इंदिरा ! मानी किशोरी आणि प्रेमळ इंदिरा ! व्रतस्थ किशोरी आणि कर्तव्यदक्ष इंदिरा !

विहारीला डॉक्टरनीं सावरून धरलें. विहारी भानावर आला. डॉक्टरनीं हलक्या आवाजांत विचारलें.

“ हें पहा, विहारी ! जरा धीर धर आणि उत्तर दे. बाळ आणि बाळंतीण दोघानाही सोडविण्याची खटपट मी चालविली आहे. कदाचित् दोघेंही सुटतील. पण ती आमच्या हातांतली गोष्ट नव्हे. केस जरा बिकट आहे. दोघांपैकीं एकाचा जीव वाचवणं अधिक सोपं आहे. समज दोघांपैकीं एकाचा जीव वांचवायचा झाला तर कोणाला वाचवावं असं तुला वाटतं ?”

“ काय ? ” डोळे फाडून आणि विस्कटलेल्या केंसांतून बोटें फिरवीत त्यानें विचारलें, “ काय म्हणतोस डॉक्टर ? ”

“ बोल, बाळ कीं बाळंतीण ? ”

“ म्हणजे ? ”

“ प्रसूतिशास्त्राची मजल असल्या केसींत याच्या पलीकडे जात नाहीं. दोन जीवांपैकीं एकालाच राखायचा असला तर कुठला राखायचा बाळ कीं बाळंतीण ?

हाय हाय ! आणिबाणीचा प्रश्न ! सोन्यासारखा सुंदर, गोंडस, बाळसेदार मुलगा—वंशवेलीचा मनोहर विस्तार. आईला नातू पण किति—किती पण आवडेल ! आणि इंदिरा गेली तर......तर काय ? किशोरी व्रतस्थ राहिलीच आहे ना ? तिचें व्रतोद्यापन झालें तर तो अन्याय होईल काय ? समाज विहारीला स्वार्थी म्हणेल काय ? पण समाजाचें कशाला ? खुद्द विहारीचेंच मन अजूनपर्यंत कशासाठीं धडपडत राहिलें आहे ? त्याच्या मनाची आवड किशोरीवरच होती ना ? आणि तिचा हात सहज पुढें होईल. तळमळणाऱ्या मनाला शांत करतां येईल. खिन्नता निघून जाईल. आयुष्यांतला एकसारखेपणा—नीरसपणा—नाहींसा होईल. नवीन आनंद—नवें चैतन्य ! नवा संसार ! नवी विटी—नवा डाव !...

" अरे परमेश्वरा ! " विहारी कळवळून उद्गारला दोन्हीं हातांनीं त्यानें आपलें तोंड झांकून घेतलें. दोन्हीं सैन्याच्या मध्यभागीं कर्तव्यहत झालेल्या अर्जुनाची स्थिती खात्रीनें इतकी शोचनीय नव्हती.

" विहारी ! विहारी ! " डॉक्टरनां आतां वेळ नव्हता. त्यांची घाई झाली होती. बडे सर्जनसाहेब इतक्यांत येऊनही पोंचतील. म्हणूनच ते तांतडीनें विहारीला बोलता करण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांना कांहींतरी एक उत्तर मिळालें पाहिजे होतें. " विहारी मूर्खा विचार कसला करतोस. एकदां मूर्खपणा केलास आणि गळ्यांत येऊन पडलेल्या बायकोबरोबर संसार आरंभलास. तुझ्या इच्छेविरुद्ध ही गोष्ट घडून गेली. हें मला माहीत आहे. आतां जर इंदिरा ऑपरेशनमधून बचावली—नव्हे बचावेलच—तर मुलगा जाईल. आणि इंदिरेला पुढें मूल होण्याचा मात्र खात्रीनें संभव नाहीं. फक्त तिच्याशींच तुला सारा जन्म नीरस आयुष्य कंठावं लागेल हें सारं स्पष्ट दिसत आहे. विचार कसला करीत आहेस ? एकाच शब्दाची गोष्ट ! बोल, म्हण ना " मूल " असं !

विहारीचा चेहरा पांढरा फटफटीत झाला होता.

त्यानें मान उचलली. डोळे आकाशाकडे लावले. त्याच्या कानांत क्रंदन स्वर येत होता. तो म्हणाला—

" मुलाची आई......इंदिरेला वांचवा ! "

# पुनर्मिलन

"मोटर बाहेर काढली आहे" ड्रायव्हर म्हणाला. व "आलों चल" असें उत्तर ऐकतांच तो जिना उतरून निघून गेला.

कॉफीचा पेला खलास झाल्यावर सुंदर रेशमी रुमालानें तोंड पुसून बाबू अशुतोषनीं उरलेलें शेवटचें कार्ड वाचून, तें वाचून झालेल्या पत्रांच्या ढिगाऱ्यांत ठेवून दिलें. त्या पत्रांत काय होतें कुणास ठाऊक, पण अगोदरच घाईंत असलेल्या अशुतोष बाबूंचा चेहरा विशेष चिंतातुर झाला. घाईघाईनें ते पोषाक चढवूं लागले.

अशुतोष बाबूंचा बांधा उंच, आणि शरीरप्रकृति एकाद्या कसलेल्या पहिलवानाप्रमाणें सशक्त होती, चेहरा रुंद असून त्यांत एक प्रकारचा लालसरपणा दिसत असे, आणि डोळ्याचीं बुबुळें काळीभोर नसून तीं किंचित् घारीं होतीं, त्यांच्या नजरेंत तीव्रता होती पण तींत एक प्रकारचें मार्दवही दृग्गोचर होत असे, पण तें वरवर पहाणाऱ्याच्या ध्यानांत येण्यासारखें नसे.

"छे, फारच उशीर होतो आहे." असें म्हणून ते जिना उतरूं लागणार तोंच मागें वळून म्हणाले, "मी आठ वाजतां येईन."

"पण आज सतीशचंद्राकडे सात वाज—"

"परत आलेंच कुणी बोलवायला तर फार महत्वाच्या कामामुळें सवड झाली नाहीं म्हणून सांगावं झालं" जिन्यांतून उतरत असतां हें उत्तर त्रासिक स्वरानें देऊन बाबू मोटारींत जाऊन बसले. त्यांचा तो त्रासिक स्वर व किंचित् वक्र झालेल्या भुंवया ऐकणाराच्या लक्षांत आल्यावांचून राहिल्या नाहींत.

मोटार 'घर्रर्र र्र—' करीत फाटकांतून बाहेर पडली. ती मुख्य रस्त्यावर जाऊन थोड्याच वेळात 'भों भों' असा आवाज करीत रस्त्यावरच्या अनेक प्रकारच्या गाड्या घोड्यांत मिसळून तेव्हांच दिसेनाशी झाली.

मोटार दिसेनाशी होईपर्यंत दिवाणखान्यांतून बाहेर गच्चीवर येऊन स्नेहलता एकसारखी टक लावून पाहात होती. मोटार दृष्टिपथाच्या पलीकडे गेली. स्नेहल-

तेनें एक सुस्कारा सोडला. ती दिवाणखान्यांत आली तोंच तिची नजर समोरील भिंतीवरच्या फोटोवर गेली. तो फोटो 'स्नेहलते'चा होता. स्नेहलतेचा म्हणजे तिचा स्वतःचा नव्हे, तर जिनें आपली कोमलकाया अग्निनारायणास अर्पण करून —आपल्या नाजूक शरीराच्या इंधनानें प्रज्वलित केलेल्या अग्नीच्या ज्वालांचा प्रकाश, हुंड्याच्या राक्षसी रूढीकडे डोळेझांक करणाऱ्या व आपणांस सुशिक्षित म्हणविणाऱ्या तरुणांच्या डोळ्यावर पाडला होता, त्या स्नेहलतेचा तो फोटो होता. त्याच्याकडे पहात ती स्वतःशींच पुटपुटली—

"बाई स्नेहलते ! तूं किती शहाणी आणि दुरदर्शी ! नाहीं तर माझेंही नांव स्नेहलताच !" तिच्या डोळ्यांत पाणी आलें.

जिच्या फोटोकडे ती पाहात होती तिच्यापेक्षां ती स्वतः कितीतरी सुंदर होती. शरीर प्रकृति कोमल, आंगानें सडपातळ, नाजूक अवयवांची प्रमाणशीर ठेवण आणि गौरवर्ण यांनीं ती फार सुंदर दिसे. पण आतांशा तिचा पूर्वींचा गुलाबी गौरवर्ण जाऊन ती फिकट दिसूं लागली होती.

फोटोच्या संदर्भानें स्नेहलतेचें—कथानकांतील नायिकेचें—वर्णन दिलें खरें, पण आमच्या स्नेहलतेच्या मनांत फोटोंतील स्नेहलतेच्या स्वरूपाशीं आपल्या सौंदर्याची तुलना करावयाचें नव्हतें, तर तिच्या धैर्याविषयीं व अलौकिक निश्चयात्मक बुद्धीविषयींचे विचार तिच्या मनांत त्यावेळीं घोळत होते. इतक्यांत जिन्यांत पावलांचा आवाज तिला ऐकूं आला. त्यासरशीं डोळ्यांतले अश्रु झटकन् पदरानें पुसून तिनें पाहिलें तो सतीशचंद्रांचा माणूस वर येत होता.

× × × ×

बाबू राधाकुमुद हे प्रख्यात जमीनदार होते. ते जरी स्वतः जुन्या काळचे आणि आचारविचारांत वाढलेले म्हणून जुन्या वळणाचे होते तरी आधुनिक सुधारणातील योग्य गोष्टीला सहानुभूति दाखविण्यांत 'ऑर्थाडॉक्सी यांच्या आड येत नसे. अशुतोषाला त्यांनीं शिक्षण देऊन तयार केलें, पण त्याच्या लग्नाचा प्रश्न त्यानीं त्याच्या आवडीनिवडीवरच सोंपविला होता. जोंपर्यंत सदभिरुची नाहींशी झाली नाहीं तोंपर्यंत ताज्या दमाच्या महत्वाकांक्षी तरुणांच्या आवडीच्या आड आपणासारख्या जुन्या लोकांनीं येणें हें त्यांना बिलकूल पसंत नसे. शिक्षणक्रम सुरू असतां मध्यंतरी मिळणाऱ्या रजेंत अशुतोष बहुधा आपल्या मावशीच्या घरीं जात असे. त्याच्या मावशीच्या घराशेजारीं दुसरें एक कुटुंब रहात असे. कुटुंब कसलें ?

दोनच सारीं घरांतलीं माणसें. एक बाप आणि दुसरी मुलगी. आपली मुलगी चांगल्या घरीं पडावी अशी अंबालालजींची मूळपासूनची इच्छा. पण शिकलेल्या तरुणांस अशिक्षित बायका पसंत पडत नाहींत हें त्यांना पक्कें माहीत. बरें सुशिक्षित तरुणांच्या हुंड्याची हांव भागविण्याइतका त्यांच्यापाशीं द्रव्यनिधीही नव्हता; परंतु ईश्वरकृपेनें त्यांची एकुलती एक मुलगी केवळ सौंदर्यनिधीच होती म्हणावयास हरकत नाहीं. आपल्यापाशीं असलेला बहुतेक पैसा, उदरनिर्वाहाचा खर्चवेंच जाऊन जें कांहीं शिल्लक उरलेलें होतें तें सारें तिची हौस भागविण्यांत आणि तिला शिक्षण देण्यांत त्यांनीं खर्च केलें होतें. ही मुलगी अशुतोषाच्या पाहण्यांत आली होती. अंबालालजींची अशुतोषाच्या मावशीला आपल्या मुलीस अनुरूप परंतु साधारण गरीब स्थितींतलाच एखादा वर असल्यास पहाण्याविषयीं सूचना होतीच. पण अशुतोषाच्या मावशीच्या मनांत ती गरीबाची मुलगी आपल्या श्रीमंत भाच्यास करण्याचें नव्हतें. ती मुलगी तिला रूपगुणांनीं पसंत होती, पण गरीबीच काय ती आड येत होती. बाबू राधाकुमुदांच्या तोलास येण्याजोगें तें स्थळ नव्हतें हीच तिच्या मनांतली अट. म्हणून ती कधींच त्याविषयीं बाबू राधाकुमुदाकडे अगर अशुतोषाकडे बोलली नाहीं. अशुतोषाच्या पसंतीसही तें स्थळ येणार नाहीं अशी खात्री असल्यावरूनच एके दिवशीं ती सहज ' अशुतोष, तुला शेजारच्या अंबालालजींची मुलगी मी ठरविली आहे. पसंत आहे ना ? ' असें डोळे मिचकावीत हंसत म्हणाली.

पण अशुतोषला तेवढीच संधि पाहिजे होती, असें दिसलें. कारण तो एकदम म्हणाला—

' हो, हो, एकदम पसंत !'

हें संभाषण चाललें असतां, जिच्याविषयीं वरील बोलणें चाललें होतें तीच कांहीं कामाकरितां अशुतोषाच्या मावशीकडे आली होती, पण आपणासंबंधींच विषय आहे असें जाणून ती निघून गेली. जातां जातां तिनें एकवार मागें वळून पाहिलें तों अशुतोषाची नजर आपल्याकडेच लागलेली तिला दिसली.

अशुतोषाची लग्नाची गोष्ट निघतांच योग्यवेळीं त्यानें आपल्या वडिलांच्या कानावर आपली पसंती घालून ठेवलीच होती. बाबू राधाकुमुदाना आपल्या मुलाची निवड फारच चांगली वाटली. त्यांनीं अशुतोषाचा बाबू अंबालालजींच्या मुलीशीं विवाह लावून दिला. हीच आपली स्नेहलता होय. स्नेहलतेचें लग्न योग्य बरोबर

झाल्याबद्दल अंबालालजींना समाधान व धन्यता वाटली. इतका सुशिक्षित वर व इतकें सुसंपन्न स्थळ आपल्या मुलीला मिळेल अशी त्यांची अटकळ नव्हती. त्याबद्दल त्यांनीं परमेश्वराचे आभार मानले आणि थोडयाच दिवसांत आपला देह ठेवला.

लग्न व्हावयाच्या पूर्वी अशुतोषाचा शिक्षणक्रम संपला होता. अशुतोषाला सायन्स विषयाची फार आवड. त्यानें तोच कोर्स घेतला होता. शिक्षणक्रमांतून बाहेर पडल्यावरही त्याची सायन्सची आवड कमी झाली नव्हती. याच सुमारास युरोपांत लढाई पुकारली जाऊन थोडयाच दिवसांत आपल्या इंग्रज सरकारनेंही अन्यायी व जुलमी जर्मनीविरुद्ध शस्त्र उचललें. त्याबरोबर हिंदुस्थानांतल्या कितीतरी राजनिष्ठ व्यापाऱ्यांनीं जर्मनींतल्या मालावर बहिष्कार घालण्याचें ठरविलें. जर्मनींतून हिंदुस्थानांत रंगाची आयात फार असे, ती नाहींशी करण्याचा कित्येकांनीं निश्चय केला. जर्मनींतून येणारे कांहीं रंग आपल्या देशांत उत्पन्न करतां येतील कीं नाहीं याबद्दलचा विचार अशुतोषाच्या मनांत नेहमी घोळत असे. ज्यांच्यांतून कोणत्या तरी रंगाचा रस उत्पन्न होतो अशीं नानाप्रकारचीं फळें व फुलें तो नेहमीं पारखून पाही. कर्मधर्म संयोगानें कोरफडीसारख्या एका काटेरी फळांतून तांबडा आबाशाई रंग निघालेला त्यानें पाहिला, तो पक्का कसा करतां येईल याच्यावर त्यानें अहोरात्र विचार चालविला. अनेक परिश्रमांच्या प्रयोगाअंतीं त्याला यश येऊन केवळ आबाशाई तांबडाच नव्हे तर आणखीही दोन तीन प्रकारचे रंग निरनिराळ्या औषधाच्या मिश्रणानें तयार होतात असें त्याच्या अनुभवास आलें. त्यानें आपला हा शोध सुप्रसिद्ध डॉ. जगदीशचंद्र बोस यांच्या पुढेंही मांडला व त्यांनाही तो पसंत पडल्यावर त्यानें त्या झाडांची विशेष वाढ कुठें होते हें पाहण्याकरितां प्रवासास सुरुवात केली. इतकें होईतों त्याच्या लग्नास तीन वर्षें होऊन गेलीं होतीं व त्याच सुमारास बाबू राधाकुमुद आपल्या मुलाच्या शोधाच्या आरंभींच परलोकवासी झाले. त्या शोधाचीं गोड फळें पहाण्यापर्यंत ते जगले नाहींत. त्यांची पत्नी पूर्वींच दिवंगत झाली होती. आतां अशुतोषबाबू घरचे एकटे झाले. त्यामुळें त्यांना वारंवार बाहेर फिरावयास मिळेनासें झालें. तरीही त्यांचा उद्योग चाललाच होता. त्यांचा रंगाचा प्रयोग यशस्वी ठरला, पण कारखाना जोरांत चालण्यास, ज्या वनस्पती पाहिजे होत्या त्यांचा पुरवठा भरपूर नव्हता. तेव्हां जेथें त्या वन-

स्पती असतील त्या स्थलांची माहिती काढून तेथून त्या आणविणें, अगर त्यांची आपल्या जमिनींत लागवड करणें, या दोहोंपैकीं एखादा मार्ग अनुसरणें त्यांना प्राप्त होतें. अशा प्रकारच्या शोध चौकशींत व थोड्याशा लागवडींत त्यांचीं आणखी दोन वर्षें लोटलीं. इतक्यांत त्यांच्या शोधाचा सर्वत्र बोलबाला होऊन, अमेरिका, जपान, वगैरे देशांतील तज्ज्ञांनीं त्यांच्याशीं पत्रव्यवहार सुरू केला.

त्यांनीं त्या वनस्पतींच्या शोधासाठीं कांहीं प्रचारकही नेमिले होते. अशा प्रकारच्या व्यवहारांत केव्हां आशा उत्पन्न करणाऱ्या तर केव्हां निराशा दाखविणाऱ्या मजकुरांचीं निरनिराळीं पत्रें येत. ह्या कथानकाच्या आरंभाचा प्रसंगही असाच एक होता.

परंतु ह्या शोधाच्या वेडानें बाबू अशुतोषांचा पूर्वीचा गोड स्वभाव अजीबात बदलून टाकला होता. चिडखोरपणा, तुसडेपणा, एककल्लीपणा, असे कितीतरी 'पणा' त्यांच्या ठिकाणीं एकवटले होते. नेहमीं विचारांत असणें व लहरीनीं वागणें हीं दोन अंगें त्यांच्या वर्तनाचीं मुख्य होऊन बसलीं. शास्त्रीय विषयासारख्या रूक्ष विषयानें डोकें भरल्यामुळें त्यांची आरंभींची थोडीशी रसिकता पार विलयास गेली. अशा स्थितींत त्यांना आपल्या आवडीच्या विषयाव्यतिरिक्त इतर विषयांत मन घालण्यास आवडत नसे आणि कदाचित् लहर आली तर सवडही नसे. मग अशा प्रकारच्या अशुतोषाचें स्नेहलतेशीं वर्तन कसें होत असेल हें काय निराळें सांगावयास पाहिजे ? केव्हातरी यावें, कसेंतरी बोलावें, कांहींतरी करावें, कधींतरी उठावें आणि कुठेंतरी निघून जावें. यावरून त्यांचें स्नेहलतेवर प्रेम नव्हतें असें नाहीं, पण तें उघड करून दाखविण्यास त्यांस मिळत नसे अगर तें आहे असें पटवून देणारीं चिन्हेंही त्यांच्या वागणुकींत दिसून येईनातशीं झालीं होतीं. एखाद्यावेळीं ते खुषींत असले तर येता येतां त्यांनीं एखादी अमोल चीज-एखादा सुंदर दागिना अथवा एकादें उंची वस्त्र-घेऊन यावी आणि ती स्नेहलतेस अर्पण करावी. पण स्नेहलतेच्या मनांतली इच्छा असली देणगी कां पूर्ण करणार होती ? एखाद्यावेळीं त्यांनीं, त्रासलेले असले तर, थोड्याशा खर्चाकरितांसुद्धां उगीच तोंडाचा पट्टा सुरू करावा, असा प्रकार हळुहळु सुरू झाला. यामुळें स्नेहलतेची तनुलता जसजशी वाळून जाऊं लागली तसतसें अंतःकरणही पोळून जाऊं लागलें. तिला आयुष्यांत गोडी वाटेना. अशा स्थितींत तिला वेळ घालविण्यास साधन म्हणजे वाचन हेंच एक होतें. तिनें

उत्तम उत्तम धार्मिक ग्रंथ, सुंदर सुंदर काव्यें, निवडक ऐतिहासिक आणि सामाजिक कादंबऱ्या त्याचप्रमाणें पुराणग्रंथ व नाटकें अशीं पुस्तकें नेहमीं वाचावीं आणि आपल्या मनाची करमणूक करून घ्यावी. तिला तिच्या मैत्रिणीकडून अगर इतर शेजारीपाजाऱ्यांकडून कांहीं उत्सवानिमित्त आमंत्रणें आलीं, तर अशुतोषांना बरोबर घेतल्याशिवाय अथवा त्यांची परवानगी तरी घेतल्याशिवाय बाहेर कुठेंही न जाण्याचा तिचा निश्चय असे. तिच्या मनांत नेहमीं घोळणारी एक गोष्ट ही होती कीं, आपल्या पतीनें आपल्या व्यवहारांतल्या कसल्याच गोष्टीविषयीं कधींसुद्धां एकही शब्द कां बरें बोलूं नये ? पत्नी ही पतीची सुखदुःखाची वांटेकरीण ना ? तर मग आपल्या पतीनें आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी आपणापाशीं कां सांगूं नयेत ? आनंदाच्या प्रसंगीं एखाद्या चालत्या बोलत्या सशरीर फोनोग्राफासारखे चार लडिवाळपणाचे शब्द फेंकावे अथवा कसली तरी सुन्दर वस्तु अर्पण करावी; नाहींतर एखाद्या वाईट प्रसंगीं तुटकपणानें वागावें, विचारलेल्या प्रश्नाचें उत्तरही देऊं नये, आणि आपलें आपणाशींच कुढत बसावें असें कां बरें ? कीं आपणावरील त्यांची खरी प्रीतीच नाहींशी झाली ? छे हेंही तिच्या मनास पटेना. प्रीति असो अगर नसो, पण आपली त्यांना आवश्यकता नाहीं असें तिला वाटूं लागलें. किंवा आपण त्यांच्या मोठमोठ्या शोधांच्या उलाढालींच्या गोष्टी ऐकण्यास लायक नाहीं असें तरी असावें. वास्तविक पाहतां हा तिचा शेवटचा तर्कच खरा होता. अशुतोष बाबूंना आपल्या क्लिष्ट शोधांची माहिती व व्यवहाराच्या बातम्या आपल्या पत्नीस सांगाव्याशा वाटत नसत, याचें कारण त्यांना असें वाटे कीं, ह्या गोष्टी तिला कळणार नाहींत, मग आपल्याला असल्या गोष्टींत सल्ला देण्याची तिला पात्रता कुठून येणार ? शिवाय बायकांना असल्या शुष्क गोष्टी आवडणारही नाहींत अशी त्यांची खात्री होती, व याच्याहीपेक्षां मुख्य गोष्ट ही कीं, त्यांना अशा लांबलचक गोष्टी करण्यास मनःस्वास्थ्य आणि मुबलक वेळ नसे. त्यामुळें संसारांतली अगर व्यवहारांतली कोणतीही गोष्ट ते कधींही स्नेहलतेपाशीं बोलले नाहींत. त्यांचा स्वतःचा स्वभाव मोकळा आणि विसराळू होता. त्यामुळें ते कांहीं तरी तिला बोलून जात व स्वतः तें बोलणें विसरत; पण त्याचा परिणाम स्नेहलतेच्या मनावर किती खोल होत होता याची त्यांना कल्पनाही नव्हती. त्यांच्या असल्या विचित्र वर्तनांत मधून मधून निष्ठुरतेचीही झांक मारीत असल्यास नवल नाहीं.

पण अशा प्रकारच्या जीवितक्रमास कंटाळल्यामुळें प्रेमरसानें थबथबलेलें आणि रसिकतेनें दबदबलेलें तिचें अंतःकरण आटूं लागलें, तसेंच तारुण्यानें मुसमुसलेलें तिचें शरीरही सुकूं लागलें. अशुतोषांच्या सूक्ष्म शास्त्रीय विषयासही तिनें आपल्या मधुरतेनें काव्यमयता प्राप्त करून दिली असती, पण अशुतोषास तिच्या हृदयाची ओळख झाली नाहीं व ते आपल्याच विषयांत गढून गेले तर मग तिचेंही हृदय तशाच प्रकारच्या दुसऱ्या एका अंतःकरणांतून निघालेल्या सुरांचें श्रवण करूं लागल्यास तें मनुष्य स्वभावाच्या विरुद्ध आहे असें म्हणतां येईल काय ?

सतीशचंद्र हे अशुतोषाचे सहाध्यायी होते. अशुतोषाचा कल शास्त्रीय विषयांकडे तर सतीशचंद्राचा कल ' काव्यविषयांकडे. शिक्षणसंपादन करीत असतांनांच ते काव्यसेवा करूं लागले होते, इतकेंच नव्हे तर त्यांचीं काव्यें इतकीं उत्तम असत कीं, शिक्षणक्रमांतून बाहेर पडण्यापूर्वींच ते उत्तम कवी म्हणून ओळखले जात होते. पुढें पुढें तर ते काव्यांबरोबर कादंबऱ्याही लिहूं लागले. ते बोलण्यांत मितभाषणी असत. त्यांचें अशुतोषांकडे विशेष जाणेंयेणें असे. अशुतोषांची आणि सतीशचंद्रांची चांगलीच मैत्री होती. परंतु हल्लीं रंगाच्या कारखान्यांत गुंतल्यापासून पूर्वी सारख्या गप्पागोष्टी मारण्यास, सहल करावयास अथवा मजेनें वेळ घालविण्यास, त्यांस फुरसत सांपडत नसे. हळुहळु स्नेहलतेशीं सतीशचंद्रांची ओळख होत गेली. पण त्यांचें विशेष संघटण फारसें कधींच झालें नाहीं. स्नेहलतेचा नेहमींचा उद्विग्न चेहेरा, म्लान मुख, उदास वर्तन सतीशचंद्राच्या ध्यानांत येई व त्याचें कारण विचारण्याचेंही त्यांचें मनांत येई पण तसें त्यांनीं केलें मात्र नाहीं. ते एखादे वेळीं तिच्याकडे अशा रीतीनें पहात अगर तिच्याशीं अशा रीतीनें बोलत कीं, ज्याच्या अंतःकरणांत निर्मळ, निष्पाप नसेल त्याला तें पहाणें अथवा तें नवीन भाषण चमत्कारिक वाटावें. पण सतीशचंद्राला स्नेहलतेसारखी एखादी नायिका निर्माण करून ती आपल्या काव्यांत किंवा कादंबरींत घालावी असें वाटे, व त्याकरितांच ते तिचें असें निरीक्षण करीत. त्यांच्या मनांत तिच्या मनस्तापाचें कारण जाणण्याचें अनेकवार येई, पण ती इच्छा ते जागच्याजागीं दाबून टाकीत.

सतीशचंद्रांच्या कविता व कादंबऱ्या स्नेहलतेनें वाचल्या होत्या. त्यांची गोड वागणूक नेहमीं तिच्या नजरेसमोर असे. त्यांचा सुबक चेहरा आणि निष्कपट वर्तन तिला वारंवार आठवे आणि केव्हां केव्हां ती अशुतोषांची आणि सतीश-

चंद्राची आपल्या मनांत तुलना करून पाही. त्या तुलनेच्या ताजव्यांत दोन मूर्ति दोन पारडयांत बसविल्या असतां सतीशचंद्रांच्या पारडयाकडे काटा झुकतो आहे असें वाटतांच ती एकदम चटकन् पुढेंमागें पाही. कावरी बावरी होई. एखादें महान पातक केल्यासारखें वाटून तिच्या अंगावर शहारे येत, आणि मनानें तरी आपण भयंकर पाप काय म्हणून करावें असें वाटून ती परमेश्वराची करुणा भाकी त्यावेळीं तिच्या डोळ्यांत अश्रु उभे रहात. तिचें सर्वांग कांपूं लागे. तिची चित्त-वृत्ति भ्रमिष्टासारखी होई. त्यावेळीं मानसापराधाच्या दोषक्षालनाकरितां परमेश्वराचें ती चिंतन करी आणि मग एखादें भक्तिरसाचें, भाविक कथांचें पुस्तक काढून वाची; आणि चित्तवृत्ति ताळयावर आणीत असे. कधीं कधीं ती सतीशचंद्रांकडून वाचावयास पुस्तकें आणीत असे. स्वतः सतीशचंद्रांचीं पुस्तकेंही ती वाचीत असे. एकदां तिनें इच्छा दर्शविल्यावरून सतीशचंद्रांनीं आपल्या कांहीं हस्तलिखित जुन्या मासिकांतून पूर्वी प्रसिद्ध झालेल्या, कविता तिला वाचावयास दिल्या होत्या व त्यांतील एक तिला फारच पसंत पडल्यावरून ती तिनें उतरूनही घेतली होती. तिचें वाचलेल्या पुस्तकांतून उतारे घेण्याचें एक बुक होतें. त्यांत तिच्या आवडीचे वेंचे तिनें ठेवले होते.

सतीशचंद्रांचेंही अशुतोषांच्या घरीं हल्लीं बहुतेक वरचेवर येणें जाणें असे. केव्हां अशुतोष घरीं असत केव्हां नसत. अशुतोष घरीं नाहींत असें ठाऊक असतां जरूरीच्या कामाशिवाय सतीशचंद्र सहसा कधीं त्यांच्या घरीं जात नसत. पण त्यांच्या जाण्यायेण्याचा अलीकडे अलीकडे अशुतोषांस संशय येऊं लागला होता. एखादा पुरुष आणि एखादी स्त्री बरोबर पाहिली कीं मग तीं नवरा बायको असोत; बहीण भाऊ असोत, माता पुत्र असोत अथवा निष्कलंक आचरणाचीं एकमेकांच्या ओळखीचीं असोत, त्यांच्याकडे पाहून कुत्सित बुद्धी पापी जनांत ज्या संबंधाचा प्रथम विचार येतो, त्याशिवाय स्त्रीपुरुषांचे इतर पवित्र संबंधच नाहींत असें मानणाऱ्या दुष्ट निंदकाचें व ग्रामकुटाचें, सतीश-चंद्रांचें अशुतोषबाबूंच्या त्यांच्या गैरहजिरींतही जाणें पाहून, कुठें तरी कुजबुजणें चाले. समाजाच्या नरकांत बुचबुचणारे हे किडे ! यांनीं कित्येकांच्या संसारांत माती कालविली असेल तें एका जगन्नियंत्यासच माहीत, पण कांटेरी झाडांच्या वनस्पतीपासूनच आमच्या अशुतोषांनीं सुंदर रंग निर्माण केला होता. तसाच अशा प्रकारच्या समाज कंटकांपासूनसुद्धां एकाद्याच्या जीवितास रंग चढतो. परंतु हल्लीं

अशुतोष जे स्नेहलतेशीं विशेष चमत्कारिक तऱ्हेनें वागत, त्याला कारण तिचेंही त्यांच्याशीं विशेष बदलत जाणारें वर्तन होय. त्या तिच्या वर्तनाचें मूळ त्यांनीं सतीशचंद्रांबद्दलच्या संशयांत लावलें. व त्या संशयाला पोषक असे आधारही त्यांना पुढें सापडले.

× × ×

सतीशचंद्रांकडून बोलवावयास आलेला माणूस पूर्वी कथानकाच्या आरंभीं सांगितलेला, वाचकांस स्मरत असेलच. तो निघून गेल्यावर, आठांच्या सुमारास स्वतः सतीशचंद्र आले. त्यांना वाटलें स्नेहलतेच्या सांगण्याप्रमाणें इतक्यांत अशुतोषबाबू घरी आले असतील. ते वर येऊन पहातात तों स्नेहलता-विचारमग्नच बसली होती. त्यांनीं पाठमोऱ्या बसलल्या स्नेहलतेच्या हातांत कसलें पुस्तक आहे तें हळूच डोकावून पाहिलें तों त्यांना आपल्याच हस्तलिखित कवितांचें बुक दिसलें. त्या बुकांत त्यांनीं लिहिलेल्या कवितांचेही कागद होते. त्यांच्या मुखावर किंचित् स्मित चमकलें व ते पूर्वीपेक्षां सावधगिरीनें व आवाज न करितां जिन्यांतून उतरून खालीं आले. वर येतांना त्यांच्या पावलाचा आवाज झाला होता, पण स्नेहलतेचें मन विहारांत आणि काव्यवाचनांत इतकें गढून गेलें होतें कीं, त्याचा तिला सुगावा लागला नाहीं. त्यानीं खालीं नोकराकडे, अशुतोष आले कीं नाहीं याबद्दलची चौकशी केली व ते आले नाहींत असें समजतांच निघून गेल. ते फाटकांतून निघून रस्त्याला लागले, तोंच त्यांच्या मागून थोड्याच वेळानें फाटकांत मोटार शिरली.

ती शुक्लपक्षांतील रात्र होती. रात्रीचे सुमार साडे आठ वाजले होते. आपल्या फाटकांतून कोणीतरी बाहेर पडलें असावें असा संशय अशुतोष बाबूंस आला. त्यांनीं वर जाण्यापूर्वीच नोकराला विचारलें ' कायरे, इथें आतां कोणी आलें होतें काय ?

" होय. "

" कोण बरें ? "

" बाबू सतीशचंद्र "

" कशाला आले होते ? "

" तें कांहीं त्यांनीं सांगितलें नाहीं. आल्याबरोबर माडीवर गेले व तेथें थोडा वेळ राहून आपण केव्हां येणार ही चवकशी करून हे असे आतांच इथून निघून गेले. "

अशुतोषांच्या हृदयांत अनेक मनोविकारांची लाट एकदम उसळली. त्यांच्या डोक्यांत परस्पर विरुद्ध विचार विकारांची कालवाकालव माजून राहिली. त्यांचा हात जड खिशाकडे गेला, व त्याबरोबर तोंडातून च्, च्, च्, असाही ध्वनि निघाला. क्षणांत त्यानीं आपला कसलातरी निश्चय ठरविला व ते जिन्याकडे वळले. जिना चढतांना ते स्वतःशींच पुटपुटले "हो. आतां असेंच केलें पाहिजे प्रथम ?"

मोटारीचा आवाज ऐकून स्नेहलता तयार होतीच पण तिनें आपलें वाचन बंद केलें नव्हतें. जिन्यांत पाऊल पडलेलें ऐकल्याबरोबर ती उठून उभी राहिली. तिच्या हातांत कवितांचें पुस्तक होतेंच. अशुतोष बाबू सरळ गेले ते स्नेहलतेच्या समोर जाऊन उभे राहिले व खिशांतून एक नकशीदार चांदीची पेटी त्यांनीं तिला देण्याकरितां बाहेर काढली. पण स्नेहलतेचा हात चटकन् पुढें झाला नाहीं. एक हात पुस्तकानें अडला होता, दुसरा हात तिनें हळू पुढें केला, व अशुतोष बाबूंनीं दिलेली चादीची डबी तिनें जवळच्या एका टेबलावर ठेवून दिली. ह्या कृत्यानें अशुतोषांच्या आनंदाचा—मोटारींतून घराकडे येईपर्यंतच्या खऱ्या आनंदाचा जिना चढतांना आणलेल्या उसन्या आनंदाचा देखील बराच हिरमोड झाला. त्यांनीं टेबलावरची डबी आपणच स्वतः उघडली. ती आंतून मखमलीनें मढविलेली होती तींतील पाणीदार मोत्यांची सुंदर कंठी काढून ती पुन्हा स्नेहलतेसमोर धरिली पण ह्या वेळीं देखील स्नेहलतेनें हात पुढें केला नाहीं.

अशुतोष किंचित काल स्तब्ध राहिले. पण लगेच म्हणाले, "हां. आलें माझ्या ध्यानांत. ही कंठी मीच तुझ्या गळ्यांत घालावी असें तुझ्या मनांत असेल होय ना ! ये तर मीच घालतों" दोन हातांनीं कंठीचीं दोन टोकें धरून तीं स्नेहलतेच्या गळ्याच्या मागें आंकड्यांत अडकावणार तोंच तिनें "मला नको ती कंठी" असें म्हणून मानेस हिसका दिला; त्यासरशी अशुतोषांच्या हातांतली कंठी सुटून ती जमिनीवर पडली. त्याबरोबर अशुतोषांनीं रागानें दोन्ही ओंठ चावले. स्नेहलतेचा पुढा अशुतोषाकडे नव्हता, पण समोरच्या बिलोरी आरशांत त्यांची ती क्रोधमुद्रा तिला दिसल्याशिवाय राहिली नाहीं; ती एकदम चमकली. पण ही गोष्ट अशुतोषांच्या ध्यानांत आली नाहीं. त्यांनीं परत बळेंच सौम्य मुद्रा धारण करून म्हटलें.

'स्नेहलते, त्या कंठीचीं तीं मोत्यें किती पाणीदार, गरगरीत वाटोळीं, आणि मौल्यवान् आहेत पाहिलींस काय ?"

" फारच सुंदर आहेत.' कंठीकडे पाहिल्याशिवाय आपल्या हातांतील पुस्तकाच्या पुठ्याकडे पहातच स्नेहलतेनें उत्तर दिलें.

' मग ती तूं कां घालीत नाहींस ?'

' माझ्या गळ्यांतील सौभाग्य भूषणाचेंच भाग्य मला भरपूर लाभतें तरी पुरेसें होतें, पण तेंच नाहींतर ह्या कंठ्याचें लोढणें आणखी कशाला गळ्यांत ?' स्नेहलतेच्या लांबलचक लाक्षणिक उत्तराचा विचार करण्यांत वेळ न घालवितांच अशुतोष म्हणाले " आतांपर्यंत मी तुला दिलेल्या वस्तु तूं घेऊन तरी ठेवीत होतीस, पण आज ती कंठी स्वीकारण्यास देखील राजी नाहींस. "

" घेतें बापडी ! आतांपर्यंतच्या साऱ्या वस्तू ज्या पेटींत आहेत त्यांतच हीही नेऊन ठेवतें. " असें म्हणून ती उचलण्यास वांकणार तोंच तिला अडवून अशुतोष म्हणाले, " नको, नको. तूं ती उचलूं नकोस. ती जर तूं गळ्यांत घालणार नाहींस तर वर तरी कशाला उचलतेस ?,—स्नेहलते ' तिचा हात आपल्या हातांत घेऊन अशुतोष म्हणाले, ' स्नेहलते, मी दिलेलीं भूषणें तूं कधींच घातलेलीं मी पाहिलीं नाहींत, तूं तीं केव्हांही न घालण्याचा निश्चयच केला आहेस काय ? " " आपल्याच आवडीनें एखाद्या स्त्रीची भार्यास्थानीं स्थापना करून तिला वस्त्रभूषणांनीं निर्जीव पुतळीप्रमाणें सजवावी आणि नटलेल्या बाहुलीला पाहूनच आनंद–वरवरचा आनंद मानून घ्यावा, यापेक्षां पत्नीशीं पतीचा कांहींच संबंध असूं नये काय ? " इतक्या निर्भीडपणें बोलण्याचा स्नेहलतेचा हा प्रथमचाच प्रसंग होता. पण ती बोलत असतां तिची मान खालींच होती. अशुतोष जवळच्या कोचावर बसले. त्यांच्या हातांत स्नेहलतेचा एक हात होताच. त्यांनीं तिलाही जवळ ओढलें. तिचें पाऊल आपोआप उचलत नव्हतें, तर अशुतोषांच्या बाहूंतील शक्ती तिला ओढीत होती. ती आपोआप बसलीही नाहीं तर त्याच बाहुंतील शक्तीनें तिला जवळ बसविलें. निर्जीव वस्तूप्रमाणेंच ती निश्चल होती. तिच्या हातांतील निर्जीव पुस्तक जसें ती ठेवील तसें राहात होतें तशीच अगदीं–तशीच, अशुतोषांच्या हातांतली ती निर्जीव बाहुली बनली होती. अशुतोषांनीं कांहींवेळ तिच्याकडे टक लावून पाहिलें. शेवटीं त्यांनीं तिचा उजवा हात आपल्या गळ्याभोंवतीं ठेवला आणि आपल्या उजव्या हातांत तिचा डावा हात घेणार तोच तिनें तो दूर केला. त्यांचा पुन्हा हिरमोड झाला. ते म्हणाले, " ठेवून देईनास तें पुस्तक क्षणभर एकीकडे. कसलें आहे तें ? "

पुस्तक पाहण्याकरितां म्हणून तिच्या ते हातांतून घेऊं लागले, तोंच त्यांच्या गळ्याभोंवतालचा स्नेहलतेचा हात गळून खालीं पडला. अशुतोषांचा पूर्ण विरस झाला.

" हें काय असें, अगदीं कळसूत्री बाहुलीसारखें ? "

" नाहींतरी ही एक जिवंत स्त्री असून तिला स्वयंचलित शक्ति आहे; तिला पुरुषांप्रमाणेंच विचार, विकार आहेत, असें आपल्याला पूर्वीं आतांपर्यंत कधीं वाटलें आहे ? "

अशुतोषांच्या आयुष्यांतील हा पहिलाच प्रसंग होता. असलीं उत्तरें स्नेहलतेच्या तोंडून ऐकावयास मिळतील अशी त्यांची अटकळच नव्हती. त्यांच्या अंतरांत प्रचंड खळबळ उडत होती. त्यांच्या आत्मसंयमनाचा कडेलोट होत होता.

" बरं तें पुस्तक कसलं तें पाहूं तर खरं. "

" कशाला पाहिजे ? तो आपल्या आवडीचा विषय नव्हे. "

" तुझ्या आवडीचा आहे ना ? "

" माझ्या आवडीचा आहे. "

" तुझी आवड तीच माझी आवड " असें म्हणून त्यांनीं बळजबरीनें तिच्या हातांतलें पुस्तक काढून घेतलें, आणि पहातात तों आंतील पहिल्याच पानावर सतीशचंद्राचें नांव. बाबू अशुतोषांनीं भुंवया वक्र करून विचारलें "काय, स्नेहलते ! यांत तुझ्या आवडीचा विषय आहे म्हणतेस ? "

"मी एकदां होय म्हणून सांगितलें ना ? पुन्हां पुन्हां तोच तोच प्रश्न कशाला ? स्नेहलतेला काव्याशिवाय अधिक प्रिय काय असणार ? " त्यांनीं रागानें तें पुस्तक दूर फेंकून दिलें. आतांपर्यंत दाबून ठेवलेल्या मनोवृत्तींनीं उचल खाल्ली. ते तिच्याकडे भेदक दृष्टीनें पहात म्हणाले " मी गेल्यानंतर इथें कोणी आलें होतें काय ? "

" होय. "

" कोण ? "

" सतीशचंद्रांच्या घरचा गडी बोलवावयास आला होता. "

" कोण कसला होता ? "

" सतीशचंद्रांच्या घरचा गडी "

" केव्हां ? "

" मोटर गेल्यानंतर अर्धा तासाच्या आंत. "

" बरें त्याच्यानंतर ? "

" कोणी नाहीं. "

" कोणी नाहीं ? "

" कोणीच नाहीं. "

" मी आतां इथें येण्याच्यापूर्वी पांच दहा मिनिटांत इथें कोणीच आलें नाहीं ? " अशुतोषांची तीक्ष्ण दृष्टि सारखी तिच्याकडे लागली होती. त्यांचा आवाज चढत जाऊन त्यांत कंप भरला होता.

स्नेहलतेला त्यांच्या दृष्टीला दृष्टी भिडविणें शक्यच नव्हतें. तिचें अंग कांपत होतें. अशुतोष असें पुन्हां पुन्हा कां विचारतात याचा तिला उलगडा होईना. पण सरळ उत्तर दिलेलेंही त्यांना खरें वाटत नाहीं असें पाहून तिनें त्रासून उत्तर दिलें—

" मला नाहीं माहीत ! "

" तुला नाहीं माहीत ? बोल, पुन्हां विचार करून बोल. या प्रश्नाचें उत्तर देण्यास या उप्पर संधि मिळणार नाहीं. " अशुतोषांच्या नेत्रांतून अग्नीच्या ठिणग्या पडत होत्या.

स्नेहलता स्तब्ध राहिली. अशुतोष पुनः म्हणाले.

' बोल. बोल लवकर ! काय बोलत नाहींस ? ' त्यांनीं तिचा हात जोरानें ओढला, त्यासरशी ती दचकली.

" बोलत नाहींस ? नको बोलूं. तुझ्या ह्या मुक्या उत्तराचा अर्थ मला पूर्वीच समजला आहे."

झटक्यासरशीं ते जिन्याच्या पायऱ्या धाडधाड ओलांडीत निघून गेले. स्नेहलतेची नजर जमिनीवर अस्ताव्यस्त पडलेल्या पुस्तकाकडे लागली होती. आणि ती पाणीदार नजर आपल्या आंगच्या पाण्याकडे वेधली नाहीं याबद्दल दुसऱ्या बाजूस पडलेल्या कंठीच्या मोत्यांस विषाद वाटत होता. थोड्याच वेळात त्या पाणीदार नजरेंत पाण्याचें भरतें येऊन सरासर मौक्तिकवर्षाव होऊं लागला, गडगडाटानंतर वृष्टि सुरू झाली. त्या पापण्याखालून निघालेल्या पाण्यांच्या मौक्तिकांपुढें जमिनीवरच्या मौक्तिकांचें पाणी फिकें पडलें. तिला अंधेरी आली व दृष्टीसमोर धुकें पसरल्यासारखें भासूं लागलें. जवळच्याच कोचावर ती आंग टाकून धाडकन् पडली.

* * * *

दुसऱ्याच दिवशींची गोष्ट, स्वच्छ चांदणें पडलें होतें. बंगल्याभोंवतालच्या बगीच्यांत स्नेहलता विचार करीत एकएक पाऊल टाकीत होती. कांहींतरी भयंकर कृत्य करण्याचा तिचा ठाम विचार होत होता. अनेक प्रकारच्या विचारांचें तिच्या मनांत तुमुल युद्ध सुरू झालें होतें. कालच्या रात्रीं निघून गेलेले अशुतोष अद्याप आले नव्हते. कधींकधीं ते आपल्या प्रयोगशाळेंत कित्येक दिवस नुसत्या फलाहारावर देखील रहात. परंतु सध्यांची अशुतोषांची मनःस्थिति प्रयोग करून पहाण्याइतकी ठिकाणावर होती काय ? कुणास ठाऊक. फाटकांतून एक गृहस्थ आंत आले. फिरतां फिरतां स्नेहलतेचीं पाउलें त्याच बाजूकडे पडत होतीं आणि आंत येणाऱ्या इसमाचीही तिकडेच एकदम दृष्टि गेल्यामुळें दोघां-नींही एकमेकांस पाहिलें. स्नेहलता बगीच्यांत एकटीच होती हें त्या इसमास समजलें, आतां कांहींतरी बोलल्याशिवाय निमूटपणें मागच्या पावलीं परत जाणें योग्य नव्हतें. पण ते बोलण्याच्या पूर्वींच स्नेहलता म्हणाली "आपणाला आपलें पुस्तक परत पाहिजे असेल."

"वाचून झालें असेल तर."

"हो. माझें वाचून झालें तें. चला वर तिथेंच देतें."

तीं दोघेंही वर गेलीं. तिनें पुस्तक आणून सतीशचंद्राच्या जवळच ठेविलें. पुस्तक ठेवीत असतां स्नेहलतेचा काळवंडलेला चेहरा सतीशचंद्रांना दिसला. आधल्या दिवशींच्या प्रकरणाचा परिणाम स्नेहलतेच्या मनावर आणि शरीरावर बराच झाला होता. तिच्या मनांत कोणत्या तरी एकाच विषयासंबंधीं विचार घोळत होते. ती आणखी म्हणाली—"आणखी कांहीं आपलें माझ्याकडे राहिलें आहे काय ? तुमचीं सारीं पुस्तकें मी नोकराकडून आजच पोंचतीं केलीं होतीं, पण हेंच एक बूक चुकून राहिलें. तुम्ही दृष्टीस पडल्याबरोबर मला त्याची एकदम आठवण झाली." तिच्या नजरेंतील ती एक प्रकारची पूर्वी कधींही न पाहिलेली चमक, व बोलण्याचा रोख पाहून सतीशबाबू बुचकळ्यांत पडले. तिच्या औदासिन्याचें कारण विचारण्यास ही संधि बरी आहे असें त्यांस वर येतांना वाटलें होतें. पण आतां त्या औदासिन्याची मजल दुःखा-तिरेकाच्याही पुढें गेली आहे असें त्यांस आढळून आलें. ते मधूनमधून तिच्याकडे निरखून पहात होते. ती पुढें म्हणाली—"आपल्या पहाण्याचा उद्देश मला समजला. एकाद्या काव्यांत मला गुंतविण्याचें आपल्या मनांत येत

असेल नाहीं ? कांहीं हरकत नाहीं. तसेंही करा, पण आपल्या प्रियमित्राविषयीं वाचकांचा गैरसमज होईल असें कांहीं लिहूं नका म्हणजे झालें."

"पण असें होण्याचें प्रयोजन ?" सतीश भीत भीत म्हणाले.

"सतीश भावजी ! आपण कवी आहां, आपण कादंबरीकार आहां. प्रख्यात लेखक आहां. आपण सृष्टिनिरीक्षण करितां व मनुष्यस्वभावपरीक्षण करण्यांतही आपण नांव मिळविलें आहे. माझ्या जीविताच्या हकीकतीची आपणास जरूरच असेल असें मला वाटत नाहीं. आपण त्यासंबंधीं कांहीं तरी कल्पना बनविल्याच असतील. आपलीं पुस्तकें वाचून माझी खात्री झाली आहे—"

इतक्यांत घड्याळांत नवाचा ठोका पडलेला ऐकूं आला. त्यासरशीं सतीशबाबू उठले. स्नेहलतेनेंही आपलें वाक्य पुरें केलें नाहीं. सतीशबाबू जातां जातां एवढेंच म्हणाले ' कृपा करून कांहींतरी भलतेंसलतें करूं नका. माझा अशुतोष प्रेमळ अंतःकरणाचा आहे. बोलण्याचालण्यांत धोपटधड्याचा पण एरवीं मोकळ्या मनाचा. तुम्हीं तसें कांहीं करणार नाहीं म्हणा. पण मला हा रागरंग कांहीं ठीक दिसला नाहीं म्हणून इतकें बोललों. तूर्त कांहीं कमजास्त झालें असलें तरी मागाहून सर्व कांहीं ठीक होईल."

इतकें बोलून ते जाऊं लागले. स्नेहलतेनें नुसता हुंकार दिला. पण त्या हुंकाराबरोबर तिच्या मुखावरील विक्षिप्तपणाचें हास्य कोणालाही भेसूरच दिसलें असतें.

सतीशचंद्र निघून गेले, आणि लगेच अशुतोष आंत आले. स्नेहलतेच्या छातींत धडकी भरली. सतीशचंद्रांनीं अशुतोषांस जातांना पाहिलें नव्हतें, पण फाटकांतून आपल्या घराकडच्या रस्त्यास लागलेल्या सतीशचंद्रांना आंत येतांना अशुतोषांनीं पाहिलें होतें. ते स्नेहलतेशीं चकार शब्दही बोलले नाहींत. ते तडक आपल्या लिहिण्याच्या खोलींत गेले. आंत गेल्यावर त्यांचा कसला तरी विचार झाला होता, त्यांची मुद्रा क्षणोक्षणीं पालटत असे. त्यांनीं खिशांतून एक तांबूस कागद बाहेर काढला व त्याच्याकडे न्याहळीत राहिले. भावी ऐश्वर्याच्या आणि कीर्तीच्या कल्पनेचे तरंग उत्पन्न करून त्यांत पोहत असतां त्यांच्या मुखावर किंचित् स्मित चमकलें. त्यांना त्यांच्या एका प्रचारकाकडून लवकर निघून येण्याबद्दल तार आली होती. मध्यप्रांत, बुंदेलखंडाकडच्या बाजूस त्यांची ती वनस्पति विपुल आहे असा तींत मजकूर होता. तिची आणखी लागवड केली तर किती तरी

रंग तयार करतां येईल व वाढतां वाढतां केवळ हिंदुस्थानची नव्हे तर सर्व जगाची मागणी पुरवून आपण जर्मनीवर वरचढ करूं, अशीं सुखमय कल्पना-चित्रें त्यांस दिसूं लागलीं. त्यांनीं तो कागद खिशांत ठेवून दिला आणि दोन्ही हात खिशांत घातले. दुसऱ्या खिशांतील हातास एक लहानसें लागलेलें चिटोरें त्यांनीं दिव्यासमोर धरलें, तों काय, त्यांचा आनंद एकदम ओसरला. त्या कागदा-वर सिसपेन्सिलीनें लिहिलेल्या कांहीं ओळी होत्या. पहिल्या दोन ओळी साधारण पुसट पुसट दिसत होत्या; पण पुढचा मजकूर खोडलेला असून तो ओळखतांही येण्यासारखा नव्हता. खालची सही मात्र स्पष्ट होती. खालची सही पाहूनच त्यांना जिन्यांत सांपडलेलें तें चिटोरें त्यांनीं खिशांत जपून ठेविलें होतें. पण तें वाच-ण्यास त्यांस वेळ मिळाला नव्हता. दोनच ओळी पण त्या अशुतोषाच्या अंतः-करणास जहरासारख्या झोंबल्या. त्या ओळी एका कवितेच्या होत्या—

" सद्गुणसरिते सुशीलचरिते स्नेहलते देवी
तव गुण वानूं मी कैंवी "

ह्या ओळींच्या खालीं सतीशचंद्रांची सही होती. अशुतोषांच्या पूर्वीच्या संशयास याच्याहून दुसरा आणखी आधार कशास पाहिजे होता ? त्यांनीं रागानें दांत ओंठ चावले व तें चिटोरें फाडून तुकडे तुकडे करण्याकरितां वर धरिलें पण, तें न फाडतां तसेंच खिशांत ठेवून दिलें. ते स्वतःशींच म्हणाले, " असूं द्या, त्या कवटाळणीस अखेरच्या वेळीं हा मुद्देमाल दाखववावयास ठीक पडेल. " त्यांच्या मनांत एकदम काय आलें कोणास ठाऊक. ते स्नेहलतेच्या नेहमीं बसण्याच्या खोलीकडे वळले. स्नेहलता आंत नव्हती. पण तिथें तिचें आवडतें नोटबुक पडलें होतें व बुकमार्कही घातलेली दिसत होती. सहजासहजीं त्यांनीं पान उघडून पाहिलें तों त्यांत त्यांना काय दिसलें—

" सद्गुणसरिते सुशीलचरिते स्नेहलते देवी त्वद्गुण वाखाणूं कैंवी ! "

त्यांना पुढच्या ओळींवर नजर घालण्याची आवश्यकता वाटली नाहीं. पण तेवढ्या अवधींत खालीं ठेवलेली बुकमार्कच्या नोटपेपरची ताजी घडी उघडून त्याच्यावर चार दोनच अक्षरें लिहिलेलीं त्यांना दिसलीं. तीं पत्रलेखनाच्या आरंभाचींच अक्षरें होतीं—

" प्रिए प्राणनाथ—

पत्राला नुसता आरंभ करूनच स्नेहलता कुठें निघून गेली होती. बाबूंच्यानें

आतां त्या खोलींत एक क्षणभरही राहावेना. न जाणों यापुढें आणखीही भयंकर कृष्णकारस्थानें आपणास पहावीं लागतील, म्हणून ते परत आपल्या खोलीकडे वळले व स्वतःशींच म्हणाले. " हें त्या काफराच्या पत्रास उत्तर असावें. वाह-वारे मित्र—गळेकापू मित्र ! पण आपलेंच नाणें खोटें असल्यावर दुसऱ्यास दोष काय म्हणून ? " त्यारात्रीं झोपीं जातांना त्यांनीं पहाटेस तीन वाजतां स्टेशनवर गाडी नेण्याकरितां नोकरास तयार रहावयास सांगितलें. तो गेल्यावर " बस्स्ः या प्रकरणाचा आतां कायमचा निकाल लावून टाकलाच पाहिजे, पण एक दोन दिवस जाऊं द्या. मला तिकडून एकदां जाऊन आलें पाहिजे आणि आपलें बाह्य-स्वास्थ्य नाहींसें होऊं देतां नये " असे शब्द त्यांच्या तोंडावाटे हळूच बाहेर आले. त्या रात्रीं त्यांना निरनिराळ्या प्रकारचीं अशुभ व भयंकर स्वप्नें पडत होतीं.

× × ×

पहांटेचे पांच वाजण्याचा सुमार. सवातीन वाजण्याच्या सुमारास अशुतोषांची गाडी स्टेशनवर जावयास निघाली होती. आगगाडी साडेतीन वाजतां निघावयाची होती. बरोबर गेलेल्या गड्यांशिवाय बाकी घरांतलीं नोकर-माणसें परत घोरूं लागलीं होतीं. तळमजल्यावरच्या माजघरांत दिव्याचा उजेड दिसत होता. माजघरांतले कपडेलत्ते बाजूच्या खोलींत ठेवण्यांत स्नेहलता गुंतली होती. आसपासची सर्व जागा तिनें मोकळी केली व ती माजघराच्या मधोमध उभी राहिली. तिनें सभोंवार, वरखालीं निरखून पाहिलें. नंतर आपलें नेसण्याचें उंची वस्त्र सोडून ठेवून दुसरें एक लहानसें वस्त्र नेसली; आणि तिसरें एक फारच जाड असें वस्त्र घेऊन आली. मध्यभागींच तें ठेवल्यावर तुडुंब भरलेलें एक घंगाळ तिनें आणलें. त्या घंगाळांत तें जाडें वस्त्र तिनें हळुहळू भिजविण्यास सुरुवात केली. हें काम चाललें असतां ती आपलें आवडीचें गाणें सारखें गुण-गुणत होती. वस्त्र भिजवून झालें—जवळच आगपेटी असल्याचीही तिनें खात्री करून घेतली. व तें भिजवलेलें वस्त्र नेसण्यापूर्वीं तिनें परमेश्वराची प्रार्थना करा-वयास सुरवात केली. प्रार्थनेच्या शेवटीं तिच्या तोंडून " देवी ! कालिकेमाते, मी तुझ्या चरणापाशीं येत आहे पण त्यांना मात्र तूं पूर्ण सुखांत ठेव. " प्रार्थना संपल्यावर ती परत आपलें गाणें पूर्वीपेक्षां जरा मोठ्यानें म्हणूं लागली—

" सद्गुणसरिते सुशीलचरिते स्नेहलते देवी तवगुण वाखाणूं केंवी. "

हें गाणें म्हणावयास आरंभ करितानांच तिनें भिजविलेल्या जाड्या वस्त्राचा पदर वर उचलून धरिला व तो आतां ती आंगावर घेणार तोंच दारावर धडक बसली. त्याबरोबर तिनें दिवा मालवून टाकला व तें वस्त्र घाईघाईनें नेसण्यास सुरवात केली. इतक्यांत दारावर मोठ्यानें धडका मारून गाडीवाला नोकर स्नेहलतेला हाका मारून ओरडूं लागला.

स्नेहलतेनें तें वस्त्र शरीराभोंवती कसेंबसें गुंडाळून ती आगपेटी घ्यावयास खालीं ओणवली तों तिचाच पाय लागून घंगाळ उपडें होऊन आगपेटी कुठल्या कुठें वाहवली होती हें तिला समजेना. दिवा मालवून टाकल्यामुळें सर्वत्र काळोख झालेला. इतक्यांत बाहेर विशेष गडबड झालेली तिच्या कानीं आली. आतां गड्यानें दारावर थाप मारण्याचें बंद करून नुसतें ओरडण्यास सुरुवात केली होती—" अहो ! बाबूजींना आणलें आहे दार उघडा !"

स्नेहलतेच्या छातींत धस्स झालें. तिनें तात्काळ जाडें वस्त्र फेंकून दिलें, घंगाळ एका बाजूला नेऊन ठेविलें आणि दार उघडलें. " बाबूजींना आणलें आहे," ' आणलें आहे ' याचा अर्थ तिला कळेना. पाहते तर काय ! दोघां चौघांनीं अशुतोषबाबूंना हलुहळू उचलून आणलें असून त्यांना बाहेरील खणांत निजविलें होतें.

अशुतोषबाबू निघाले ते स्टेशनवर अगदीं आयत्यावेळीं जाऊन पोंचले. निघावयासच उशीर झाल्यामुळें त्यांना स्टेशनवर पोंचावयास विलंब लागला. गाडी सुटणार तोंच तिकिट घेऊन गाडीच्या शेवटच्या सेकंडक्लासच्या डब्यांत शिरण्यासाठीं त्यांनीं पाय उचलला. प्रवास फार केल्यामुळें चालू झालेल्या गाडींत ते बिनदिक्कत जाऊन बसत. डब्याचा दरवाजा बंद झाला होता. ते डब्यांत शिरावयास म्हणून पाय ठेवतात तोंच गाडीचा धक्का बसून त्याचा पाय निसटला. ते खालीं पडून गाडी खालीं सांपडून, तेव्हांच चोळा मोळा व्हावयाचा पण तितक्यांत एका रेल्वे शिपायानें धांवत येऊन त्यांच्या कोटास धरून ओढलें तरी त्यांचा तोल गेला होता तो सांवरला नाहींच. पण ते गाडी रूळावरून गेल्यावर खालीं पडले. त्यामुळें पूर्वीच्या तोलाचा जोर बराच कमी झाला होता. पण प्लॅटफॉर्मवरून खालीं पडल्यामुळें कपाळास बरीच जखम होऊन तींतून रक्तस्राव सुरू झाला आणि पाठीसही थोडेंसें लागलें. बाबूजींना बेशुद्ध स्थितींतच घराकडे आणण्यांत आलें.

*　　　*　　　*

वरील हकीगतीस दोन महिने होऊन गेले होते. डॉक्टरच्या कौशल्यामुळें अशुतोषबाबूंची जखम लवकरच भरून आली होती व पाठीची दुखापतही आतां सुधारत होती. पण त्याचें श्रेय आपल्या औषधांपेक्षां स्नेहलताबाईच्या शुश्रूतेस दिलें पाहिजे असें डॉक्टर स्वतःच प्रांजळपणें कबूल करीत. खरोखरच बाबूजींची शुश्रूषा करण्यास स्नेहलता नसती तर कसल्याही डॉक्टराच्या औषधास यश येतें किंवा नाहीं याची वानवाच. तिनें स्वतःची काडीइतकीही पर्वा न करितां आपल्या पतीची सेवा चालविली होती. त्या दिवशीं अशुतोषबाबूंना स्टेशनावरून आणलेलें पाहतांच तिला सारें त्रिभुवन आठवलें. ती मागच्या साऱ्या गोष्टी विसरली. पण या अतिश्रमामुळें तिचा फक्त अस्तिपंजर उरला होता. अहोरात्र पतीसान्निध बसून तिनें शुश्रूषा चालविली होती. कसेंही असो, तिच्या सेवेचें चीज झालें. पण ह्या बाबतींत बाबू सतीशचंद्रांचेंही फारच सहाय्य झालें होतें. ते जेव्हां जेव्हां चौकशीस येत तेव्हां अशुतोष जागे असले तर बाहेरच्याबाहेर चौकशी करून निघून जात, व ते निजलेले असले तर आंत येऊन त्यांस पाहून व त्यांच्या प्रकृतीविषयींची स्नेहलतेकडे हळूच चौकशी करून निघून जात. याचें कारण मात्र तिघांपैकीं कोणासच कळलें नव्हतें.

अशुतोष बाबूंस अझून चांगलेंसें उठून बसतां येत नसे. आपल्या पत्नीस आपली शुश्रूषा करितांना पाहून आपलें जन्मांतर झालें आहे असें त्यांस वाटे. व त्यांचे ते घारे डोळे पाण्यानें भरून येत. तें पाहून स्नेहलतेची देखील तशीच स्थिति होई पण ती ती दिसूं देत नसे; पतीच्या स्वभावांत पडत चाललेला फरक तिला दिसून येऊं लागला.

स्नेहलता आपल्या पतीस झोंप लागलीशी पाहतांच तिथेंच जवळ डुलकी घेई, पण तिथून हलत नसे. मधूनमधून तिचें कवितावाचनही चाले. पण हल्लीं तिची पूर्वींची कविता बदलून दुसरी एक तिला आवडूं लागली होती. ती कविता ती नेहमीं म्हणे. अशुतोष डोळे झांकून पडत, पण नेहमींच त्यांस झोंप लागे असें नाहीं. त्यामुळें तें गाणें कानांत पडून त्यांचेंही थोडेंबहुत पाठ झालें होतें. ते केव्हां केव्हां सतीशचंद्रांची स्नेहलतेजवळ चौकशी करीत, पण ती तेवढ्यापुरतें उत्तर देत नसे.

एक दिवस अशुतोषबाबूंना अशीच झोंपेची गुंगी आली होती, म्हणून ते

डोळे मिटून स्वस्थ पडले होते. त्यांना नीज लागली असें वाटून स्नेहलता आपलें नोट बूक उघडून गाऊं लागली—

'नयनिं लोटल्या किति जलधारा
मुखिं निःश्वास उसासे वारा
भावी काल तमोमय सारा
दिसला भूवरी, पडुनि अभिमानाच्या भरी'—

अशुतोषबाबूंना तें गाणें ऐकण्याची इच्छा झाली. त्यांनीं डोळे उघडले. त्याबरोबर स्नेहलता चपापली व तिनें आपलें गुणगुणणें थांबविलें. बाबूजी म्हणाले—

"हं. बंद करूं नको. म्हण तें गाणं."

'स्नेहलता खालीं पहात स्तब्ध राहिली.' अशुतोष बाबूंनीं नोकरास हांक मारून सतीशबाबूंना बोलवावयास पाठविलें आणि त्यानीं पुन्हा स्नेहलतेला परत तें गाणें म्हणावयास सांगितलें.

स्नेहलता म्हणाली "पण माझें गाणें आवडेल काय ?"

"खरंच मला तें ऐकावेंसें वाटतें"

"तर मग हार्मोनियमवर म्हणतें."

"त्या हार्मोनियमला तूं आज कितीतरी वर्षें स्पर्श केला नाहींस मग आतांच काय त्याचें नडलें आहे ? आणि मलाही पण हार्मोनियम ऐकायचा नसून नुसतें तुझ्या गोड गळ्याचें गाणेंच ऐकावयाचें आहे."

स्नेहलतेच्या त्या चिमटलेल्या चेहऱ्याच्या बसलेल्या गालांवरही किंचित् भासमान् होण्यासारखी थोडीशी रक्तिमा चढली. तिनें सुरुवात केली.

"नयनिं लोटल्या किति जलधारा—"

"अंहं. अगदीं मूळापासून." अशुतोष म्हणाले.

स्नेहलतेनें घसा साफ केला व म्हणूं लागली—

"अजवरिहि अपरिमित जरि करिं घडले दोषां
तरी विसरुनि जाऊं यापरी ॥ ध्रु० ॥
परस्परांचे नच ओळखतां
स्वभाव, स्वमनीं कुढतां कढतां
दिवस लोटले, आतां चित्ता
लागे ही खरी । अविरत झुरणी कीं पुरी ॥ १ ॥

पूर्वीं कांहीं कृती करिं घडतां
मनांत घेउनियां ग्रह भलता
आपआपल्या ठायीं बसतां
रुसुनीयां दुरी । जीवा लागे हुरहुरी ॥ २ ॥
मनें दोनही कलुषित होतां
घेउनि बसलें पूर्ण मौनता
मर्मभेदि वचनें मुखि निघतां
हृदया वचशरीं । विंधुनि चरका तो वरी ॥ ३ ॥
नयनिं लोटल्या किति जलधारा
मुखिं निश्वास उसासे वारा
भावी काल तमोमय सारा
दिसल्या भूवरी । पडुनि अभिमानाच्या भरी ॥ ४ ॥
पूर्वील सारे संशय विरले
वितर्क जालकही शिरशिरलें
परस्परांचें हृदय निवळलें
हट्टाची गुरी । जिरलि प्रेमाच्या अवसरीं ॥ ५ ॥
काढुनि टाकूं मनांतिल अढी
प्रेमजल नदी वाहे दुथडी
मज्जन आपण करूं तिच्या मधिं
संकोचा दुरी । फेंकुनि कवळूं या उरीं ॥ ६ ॥

अशुतोष गाणें डोळे मिटून ऐकत होते. त्यांना तें गाणें ऐकतांना स्वर्गसुखतुल्य आनंद होत होता. परंतु गाण्याच्या अखेरीस स्नेहलतेचा आवाज घोगरा झालासा वाटल्यावरून त्यांनीं डोळे उघडून पाहिलें. तों तिच्या नेत्रांत अश्रूबिंदु चमकत होते.

'ये ये, स्नेहलते ! माझ्याजवळ ये. अथवा नको, थांब मीच उठतों' असें म्हणून ते उठण्याचा प्रयत्न करूं लागलेसे पाहतांच आपोआपच स्नेहलता त्यांच्याजवळ गेली. अशुतोष म्हणाले. 'आणखीही जवळ ये' ती अगदीं जवळ गेली त्याक्षणीं त्यांना अतिशय हुषारी वाटत होती. त्यांनीं स्नेहलतेला अगदीं जवळ घेतली. स्नेहलतेला सर्व सौख्याचा ठेवा लाभल्यासारखा वाटलें. असला

प्रसंग हा तिला प्रथमचाच वाटला. आपला हात तिच्या गळ्याभोंवती घालून आणि तिचा हात आपल्या मानेवर घेऊन अशुतोषांनीं कौतुकानें विचारलें. "स्नेहलते, हें गाणें कुणी रचलें ?"

स्नेहलता लाजत म्हणाली, 'मीच, पण त्यांत सुधारणा सतीशभाऊजींनीं केली.

इतक्यांत दरवाज्यावर चुटकी वाजली. स्नेहलतेनें दार उघडलें आणि बाजूस उभी राहिली. अशुतोष उठन बसलेले पाहून सतीशचंद्रास विस्मय व आनंद वाटत होता. अशुतोष म्हणाले "सतीश ! सतीश ! ये मला तुला हृदयाशीं घट्ट धरूं दे रे !"

सतीश म्हणाले "मी तरी ह्याच प्रसंगाची वाट पहात होतों.

"येइल कधितरि समय असा का
अगणित मजविषयींच्या शंका
फिटुनी, दोषविमुक्ता रंका
धरुनीयां करीं । उठविशि केव्हां मज वरी ?

"नको नको, सतीश, आतां असें बोलूं नको. मला तुझी क्षमा मागावयाची आहे."

"क्षमा ? मी कसली क्षमा करावयाची ?

नको सतीश ! हे आतां डाग देऊं नकोस. तूं आतां आजच हा प्रथम आलास ना ?"

"कां बरें ? मी नेहमीं येत असे. पण तुला त्रास होईल म्हणून तुला झोंप लागली आहे असें समजल्यास मी पुढें येई, नाहींतर खालींच चौकशी करून जात असे. तुझें तुझ्या घरचा उंबरठा न ओलांडण्याचें हें भयंकर पत्र मला मिळाल्यापासून मी असाच क्रम धरला होता, त्याच दिवशीं तुला हा अपघात झाला होता ना ? होय त्याच दिवशीं." सतीश आठवण करीत म्हणाले. अशुतोषाला गहिंवर आला. त्यांनीं सतीशाचा हात आपल्या हातांत घेऊन म्हटलें—

'काढुनि टाकूं मनांतील अढी
स्नेहजल नदी वाहे दुथडी
मज्जन आपण करूं तिच्यामधिं

*　　*　　*

एक दिवस आपल्या प्रयोगशाळेंत जाण्याकरितां अशुतोष घाईघाईनें निघाले होते. त्यांनीं कांहींसें ठेवण्याकरितां टेबलाचा ड्रॉअर उघडला, तो एकदम सगळाच पुढें आला. त्याबरोबर त्यांना त्यांच्या नांवचें लिहून ठेवलेलें एक पाकीट दिसलें. त्यांनीं तें उघडून पाहिलें व समग्र वाचलें. त्यांना पूर्वीच्या एका प्रसंगाची आठवण झाली.

त्या पत्राचा आरंभ 'प्रिय प्राणनाथ–' ह्याच शब्दांनीं होता. तें पत्र वाचून अशुतोषबाबू आश्चर्यचकित झाले. इतक्यांत स्नेहलतेनें येऊन कॉफीचा कप पुढें केला. आज स्नेहलतेचा रंग त्या मोत्यांच्या कंठीनें सुशोभित दिसत होता. अशुतोषनीं विचारलें—

"स्नेहलते! हें काय?—तूं आपल्याला जाळून घेणार होतीस?" अशुतोष घाईघाईनें कॉफी संपवून रुमालानें तोंड पुशीत होते. स्नेहलता मंदस्मित करून म्हणाली. "आतां घाई आहे ना जायची? आल्यावर सांगेन फुरसतीनें."

* * *

एकदां सहज स्नेहलतेचें नोटबुक चाळीत असतां त्यांत त्यांना स्नेहलतेची कविता दिसली. अशुतोषबाबूंनीं ती समग्र वाचून पाहिली ती आईबापांस काळजींतून मुक्त करणाऱ्या व स्वतःचें शरीर दहन करणाऱ्या फोटोंतील स्नेहलतेला उद्देशून सतीशचंद्रांनीं लिहिली होती.

* * *

त्या तरुण जोडप्यांच्या अपूर्व पुनर्मीलनांत पुढें केव्हांही व्यत्यय आला नाहीं, तें मीलन अभंग राहिलें!

# दुसरेपणाची ?

हो, किती झाली तरी ती दुसरेपणाची बायको !
" दुसरेपणाची ! "

" दुसरेपणाची " हा शब्द दुसरेपणाच्या बायकोच्या मनावर कशा प्रकारचा परिणाम करीत असतो, हें एक तिचें तिलाच ठाऊक.

कित्येकांना वाटतें कीं, दुसरेपणाची बायको नवऱ्याची फारच लाडकी असते. कित्येकींना असें देखील वाटत असतें, कीं दुसरेपणाची बायको नवऱ्याला मुठींत ठेवून त्याला आपल्या शब्दाखालीं वागवीत असते, व म्हणून ती फार सुखी असते.

दुसरेपणाच्या बायकोलाहि वाटत असतें, कीं अशाच प्रकारच्या समजुती आपल्याबद्दल इतरांच्याहि असाव्यात. एखादीची प्रत्यक्ष स्थिति अगदीं तंतोतंत अशाच प्रकारची जरी खरोखरीच असली, तरी देखील तिच्या अंतरंगांत ती साशंकच असते. निर्भेळ, निःशंक मनःस्थितीचा सुआस्वाद तिला क्वचितच उपभोगावयास मिळतो.

आणि वनितेचीहि गोष्ट तशीच होती.

विद्याधराचें तिच्यावर अकृत्रिम प्रेम होतें. तिलाहि तें नाकबूल करतां येण्यासारखें नव्हतें. तरीहि पण—ती दुसरेपणाची !

विद्याधराची पहिली बायको पद्मा बाळंत होतांनाच पोटांतल्या बाळासह परलोकीं गेली ! कांहीं दिवस शोकांत गेले. नंतर तिच्या जागीं वनिता आली. परस्परांच्या पूर्ण पसंतीनें विवाह झालेला. आपण दुसरेपणाची बायको होणार, हें ठाऊक असूनहि त्याबद्दल वनितेला अणुमात्र संकोच अथवा शंका वाटली नाहीं पण ती कुठपर्यंत ? विवाहबद्ध होऊन नवीन घरांत पाऊल ठेवीपर्यंत. नवऱ्याच्या घरांत पहिलें पाऊल टाकल्याबरोबर वनितेचें सर्वांग कंपित झालें ! कारणाशिवाय तिच्या हृदयाला-आंत कुठें तरी खरचटल्यासारखें झालें ! बावरलेल्या मुद्रेनें तिनें इकडे तिकडे पाहिलें ! आपल्याकडे कोण पहात नाहीं— आणि विद्याधरानेंहि आपल्याला या क्षणीं पाहिलें नाहीं, असें ध्यानांत आल्या-

वर तिला समाधान वाटलें. पण गृहप्रवेशाच्या पहिल्याच पदार्पणाबरोबर आपण दुसरेपणाची, या नवीन शल्यानें तिच्या हृदयांत पहिलें पदार्पण केलें, आणि घरहि केलें. आणि तें कायमचेंच !

आणि वनितेला तसें वाटणें तरी अगदीं स्वाभाविकच नव्हे का ? लग्नांत झालें तरी तिला घालवयास दिलेले दागिने पूर्वी पद्मेच्या आंगाखांद्यावर रुळले नसतील का ? ते अलंकार आंगावर पडल्याबरोबर पद्मेची आठवण वनितेला कां बरें होऊं नये ? खुद्द विद्याधरास तरी पद्मेची आठवण झाल्याशिवाय राहिली असेल काय ?

ज्या घरांत आपण पदप्रवेश करीत आहोंत, त्याच घरांत पूर्वी पद्मेनें प्रवेश केला होता, व ह्याच त्या घरांत ती मालकपणानें वावरली होती, व नांदली होती. ती हें जग सोडून जातांना स्वेच्छेनें जाणें शक्य तरी आहे का ? विद्याधरासारख्या प्रेमळ पतीच्या सहवासाचें सौख्य तिला सोडून जावेंसें वाटणें तरी शक्य आहे ? तर मग तिचा देह नष्ट झाला असला, तरी वासना ह्या जगांत, ह्या घरांत, ह्या संसारांत गुरफटून राहिल्याशिवाय कशी राहील ?

तर मग तिनें रिकाम्या केलेल्या जागेवर येण्यांत आपण चूक केली कीं काय ? तसें करण्यानें आपल्यावर तिचा रोष तर होणार नाहीं ना ?

का एक, का दोन ? शंभर-हजार प्रश्न तिला भंडावून सोडूं लागले. जसजसे दिवस जास्त लोटूं लागले, तसतशा या कुशंका कमी न होतां वाढूं लागल्या.

ती आरशांत आपलें रूप पहात होती. वनिता सुंदर होती. पद्मादेखील सुंदरच होती. पण वनितेला स्वतःपेक्षां पद्माच जास्त सुंदर वाटे. तिसऱ्यानें कोणी त्या दोघींना पाहिलें असतें, तर त्या दोघींत अधिक सुंदर कोण हें ठरविणें कठीण झालें असतें. पण असें कशाला ? आरशासमोर वनिता उभी आहे, आणि तिच्याच बाजूला पद्मेचा फोटो आहे. वनिता जरी आपल्याला पाठमोरी या वेळीं दिसत असली तरी समोरच्या आरशात पडलेलें तिचें प्रतिबिंब हा तिचा फोटोच—छायाचित्रच नव्हे का ? तीं दोन्हीं चित्रें पाहणारास आपापल्यापरीनें सारखींच सुंदर वाटलीं असतीं. पण पद्मेच्या चेहऱ्यांतील अल्लड भोळसरपणा मात्र वनितेच्या चेहऱ्यांत दिसला नसता.

वनिता खोल शिरणारी, दुसऱ्याच्या हृदयाचा ठाव घेऊं पाहणारी, आणि स्वतः खोल गांठीची अशी होती. सौंदर्याच्या बाबतींत मात्र दोघीहि सरसच होत्या.

त्या दोघीहि एकत्र उभ्या राहत्या, तर एकीनें दुसरीवर नजर कायम ठरूं दिलीच नसती. आणि आतां तरी काय ?

विद्याधर आला, पाय न वाजवितां हलकेच आला. त्याची छाया वनितेला थोडीच दिसल्याशिवाय राहिली असेल आरशांत ? पण आपणाला कांहीं कळलेंच नाहीं, अशा बहाण्यानें ती तशीच हालचाल केल्याशिवाय राहिली होती. तसें राहण्यांत तिचा अंतस्थ हेतु व तो फार खोल हेतु होता. जो बिकट प्रश्न आपणाला पडला आहे त्याचा पडताळा घेतां आल्यास घ्यावा, असा तिचा इरादा होता. विद्याधराची दृष्टी प्रथम कुठें जाते हें तिला पहायचें होतें. निदान या क्षणीं तरी विद्याधराच्या या एकाच लहानशा हालचालीवरून ती कायम स्वरूपाचें अनुपान काढणार होती. आणि शेवटीं तिला काय दिसलें ?

विद्याधरानें पद्मेच्या फोटोकडे ढुंकूनदेखील पाहिलें नाहीं. त्याची नजर वनितेकडे तिच्या प्रतिबिंबाकडेच लागली होती—नव्हे खिळून राहिली होती. वनितेच्या चेहऱ्यावर समाधानाची स्मित छटा चमकली.

पण लगेच तिथें म्लानता आली !

विद्याधरालाहि कसेंसेंच वाटलें !

त्याची नजर वनितेच्या प्रतिबिंबावरून आतां मात्र ढळली. पण पद्मेच्या फोटोकडेहि वळली नाहीं. त्याची मुद्रा कष्टी झाली.

वनितेला तो स्वतःच्याच वागणुकीचा परिणाम असावासा वाटला.

"मला ठाऊक आहे हं, केव्हांचं एक माणूस आलंय तें !" इष्ट परिणाम घडवून आणण्याच्या उद्देशानें तिनें म्हटलें.

"असं का ? मला वाटलं स्वतःचंच स्वरूप पाहण्यांत भान हरपल्यामुळें दुसऱ्यांकडे डोळे वर करून बघण्यास तें जागीं राहिलंच नाहीं."

"दूध आणूं का ?"

"तशीच आरशासमोर थोडा वेळ राहीनास ? उंचावर राहणाऱ्या डोळ्याची तहान निवाल्यावर मग पोटाचीं सगळीं कामं अनुक्रमानंच झालेलीं बरीं."

"अगदीं सगळा असाच अनुक्रम ना ?" पण हा प्रश्न तिच्या तोंडून सुटला कसा, हें तिचें तिलाच न समजल्यामुळें तिची मान खालीं पडली; आणि तिच्यानें तेथें उभें न राहवल्यामुळें दुधाचा पेला आणण्याच्या मिषानें ती आंत गेली.

पेला घेऊन ती आली, पण मान खालींच होती. मान वर करावयाची तर आतां ती दुसऱ्या विषयाकडे लक्ष घालविण्याकरितांच.

"ह्या फोटोंत पद्माबाई किती तरी सुंदर दिसतात नाहीं?" वनितेची शोधक नजर विद्याधराच्या चेहऱ्यावर नुसती खिळून राहिली होती.

"हो." दुधाचा घोट घेत असतांना विद्याधरानें म्हटलें.

"असलं सौंदर्य जगांत जास्त दिवस कां बरं राहूं नये?" वनितेनें तळाचा ठाव येण्यास दगड टाकला.

विद्याधराचें दूध पिऊन संपलें. त्यानें फिरावयास जावयाची तयारी चालविली.

वनितेला वाटलें—पुरुषांचं अंतःकरण किती खोल! समुद्राहून खोल! अथांग!!

पाण्यांत टाकलेला दगड तळाला लागला, तर चार बुडबुडे तरी वर येतात; पण विद्याधराच्या मुखांतून एक शब्दहि नाहीं! चेहऱ्यावर मनोविकार दाखविणारी एक छटा नाहीं! काय याचा अर्थ?

मूल होईपर्यंत—हो, मूल हें प्रेमाच्या परिसीमेचें निदर्शकच नव्हे का? पद्मेला मूल व्हावयाचें होतें. पद्मा कितीतरी सुंदर होती. पद्मेवरील प्रेम तसेंच गाढ असलें पाहिजे. नसलें तरच तें अनैसर्गिक होईल. अर्थात आपण अनुभवित आहोंत हा केवळ प्रेमाचा आभास! पद्मेवर विद्याधराचें प्रेम असलें तर तें दोषास्पद मानतां येईल काय? मग—तर मग—आपण व्यर्थ फसलों मात्र! वनितेची विचार-मालिका नेहमींच शेवटीं तिच्या गळ्याला फांसासारखी बसे, आणि तिला गुदमरून टाकी! आणि अखेरीस मग गंगा—यमुनांचा प्रवाह!

न्हाणीघरांत पाऊल टाकावें तर तिथेंच कुठें तरी तिच्या कपाळाचा न्हातांना वाढविलेल्या कुंकवाचा माग अजूनहि ओलसर असल्यासारखा दिसावा; स्वयंपाकघरांत वावरतांना पद्मेची स्मृति करून देणाऱ्या अनेक चिजा. कपड्यांच्या खोलींत तिची केशप्रसाधनाची-वेणीफणीची पेटी! वॉर्डरोबजवळच्या खुंटीला जुना ब्लाऊझ् अजूनहि लटकत होता-पण वनितेच्या नजरेला दिसे कीं पद्मेची संसार-सुखाशाच त्या ब्लाऊझ्च्या रूपानें लटकत राहून आपला तिरस्कार करीत आहे! त्या ब्लाऊझ्ला तिच्यानें स्पर्श करण्याची गोष्ट दूरच राहो; पण जवळहि तिच्यानें जाववत नसे. ती मनाची सरळ, उदार व सहृदय असल्यामुळें, तो ब्लाऊझ् डोळ्यांआड करावा, अशी दुष्ट वासनाहि तिच्या मनाला कधीं शिवली नाहीं आणि शयनमंदिरांत गेल्यावर—? ऐन सुलक्षणींदेखील ती विद्याधराच्या

प्रतिसूत्राचें मूळ निरखण्यांत गुंतल्यामुळें, तिची दृष्टी केव्हां हृदयभेदक तर, केव्हां स्नेहशून्य असल्यासारखी विद्याधरास दिसे. आणि विद्याधराची मुद्रा तशीच असावी, असा भास वनितेसहि होई !

शयनमंदिर बदलावें असें वनितेस अनेकवार वाटलें होतें, पण तसें उघडपणें बोलण्याचें धैर्य मात्र केव्हांच झालें नाहीं.

विद्याधराचें प्रेम आपल्यावर निर्भेळ आहे कीं नाहीं अशी शंका वनितेस येत असे, हें उघडच आहे, पण तसली शंका वनितेबद्दल विद्याधरास वाटण्याचें कसलेंच कारण नव्हतें. लग्नापूर्वींच त्यानें त्याबद्दलची चर्चा वनितेशीं अगदीं मोकळ्या मनानें केली होती. त्याचा हा दुसरा विवाह होता. पण वनितेचा पहिलाच. वनितेच्या उदासीनतेंत या 'दुसरेपणा'च्या किल्मिषाचाहि थोडासा भाग होताच. पहिलें अद्वितीय–दुसरें द्वितीय. किती झालें तरी दुसरें तें का पहिलें होणार ? दुसरें तें दुसरेंच !

वनितेनें झालें तरी आपल्या शंकेचें समाधान कसें कोणत्या शब्दांनीं करून घ्यावयाचें ? विद्याधराच्या निष्कपट प्रेमांत कृत्रिमपणाचा लेशहि नव्हता. पण एकटा असतांना तो विचारांत गढलेला, औदासिन्यांत बुडलेला, शून्य दृष्टीनें वर पहात असलेला दिसे. तिच्या सूक्ष्म निरीक्षणांत विद्याधराची असली वागणूक आलेली होती; व त्यामुळें तिची शंका जोरावत जाई.

विद्याधर घरीं नव्हता. वनितेचा वेळ जात नव्हता. एका मासिकाचा अंक घेऊन ती वाचावयास बसण्याकरिता म्हणून माडीवर गेली. माडीवरची एक खोली नेहमींच बंद असे. पण आज तिला ती उघडी दिसली. त्या खोलींत तिनें डोकावून पाहिलें. आंत जावेंसें तिला वाटेना. त्या खोलीच्या साऱ्या खिडक्या कायमच्याच बंद असल्यामुळें तिथें शुद्ध हवा खेळत नव्हती. ती जागा काळोखी व कोंदट दिसत होती. म्हणून ती दारांतून डोकावून मागें वळली. खुर्चीवर पडून वाचावेंसें तिला वाटलें. पण बसावयाच्या पूर्वीं ती पुन्हां उठली, व त्या खोलीचें दार तिनें लावून घेतलें. एक दीर्घ श्वास सोडून ती वाचूं लागली.

सूक्ष्म निरीक्षक व मानसशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध असलेल्या एका लेखकाची ती गोष्ट होती. गोष्टीनें तिच्या मनाची पकड घेतली. वाचनांत ती तात्काल दंग होऊन गेली.

एक दोन पानें उलटल्यावर तिनें पुस्तक मिटलें, आणि ती स्वतःशींच

विचार करूं लागली. पुन्हां पुस्तक उघडून तेंच वाक्य वाचावें, आणि पुन्हां विचार करूं लागावें, असें तीन चारदां झालें. ती किंचित् अस्वस्थ झाली. स्वतःच्या हातांनीं बंद केलेल्या खोलीच्या दाराकडे ती वळून पाहूं लागली.

"पडदा दिसला कीं त्याच्या पलीकडे काय आहे तें पाहण्याची बुद्धि मानवी मनास हटकून व्हावयाची—" असें तें वाक्य होतें.

ती झटकन उठली. तो मासिकाचा अंक तिनें तिथेंच ठेवला. त्या काळोख्या खोलींत तिला एक बॅग ओझरती दिसली होती. आतां ती तिला आठवली. दार उघडून ती आंत शिरली. तिचें आंग शहारल्या सारखें झालें.

खोलींत गेल्यावर तिनें आधीं उजेड येण्यापुरती एक खिडकी उघडली. तिची नजर प्रथम बॅगेवर गेली. बॅग वास्तविक बंद असावयाची, पण ती बंद नसून उघडीच होती. बॅग उघडी कशी ? या खोलींत ती याच्यापूर्वी कधींच आली नव्हती. तेव्हां बॅग नेहमींचीच तशी उघडी असे, कीं आजच विद्याधरानें विसरून उघडून टाकली, हें तिच्या लक्षांत येईना. आंत काय असेल बरें ?

आंत कांहीं कां असेना. आपण कशाला पहावें ? कदाचित ती बॅग पद्मेचीच असली तर ? विद्याधराची असली, आणि आपण पाहिली तरी हरकत नाहीं. आपणा दोघांमध्यें इतका अभेद आहे, अशी तिच्या मनाची खात्री होती. पण जर का ती पद्मेची असली, तर मात्र ती उघडून पहाणें योग्य होईल का ?

वनितेच्या मनात अशी शंका आल्यामुळें बॅग पुढयांत उघडी पडली असतांहि ती तशीच टकमक पहात बसली. तिनें आपलें अंतःशोधन सुरू केलें. ही बॅग किंवा त्यांतील वस्तु पहाण्यांत आपला हेतु कांहीं वाईट तर खास नाहीं. मग पाहण्यास काय हरकत ?

तिनें आंत काय आहे, म्हणून पाहिलें, तों तें पत्र होतें. तें पत्र विद्याधरालाच तिनें लिहिलें होतें.

आतां मात्र वनितेचें मन ताब्यांत राहीना. आपल्यावर विद्याधराचें निर्भेळ प्रेम आहे, कीं नाहीं याचा थांग लावण्याचा ध्यास तिला सारखा लागून राहिला होता —कां ? त्या गोष्टींचा तलास लावण्यासाठीं तिचा अट्टाहासच चालला होता. त्या पत्रांत कांहीं तरी महत्त्वाचा मजकूर असलाच पाहिजे. आपणाला हवा असलेला उलगडा त्या पत्रांतील मजकुरांत खात्रीनें असेल, असें वनितेला वाटूं लागलें. पण नको असलेलाच मजकूर असला तर ? पद्मा विद्याधराला आपल्यावरील

प्रेमाच्या चटक्यांत कायमची गुंतवून गेली असली तर ? तर मग आपली गत कशी व्हायची ? यापेक्षां तें पत्र न पाहिलें तर काय वाईट ?

पण असल्या उपदेशानें मन थोडेंच ताब्यांत राहणार ? तिच्या हातानें तें पत्र उचललेंच. डोळे आपलें काम करूं लागले. आरंभींच्या मायन्यावर तिचें तितकेंसे लक्ष नव्हतें. मुख्य मजकुर काय आहे, हेंच जाणून घ्यावयास ती अतिशय अतुर झालेली होती........

मी चाललें म्हणून आपण दुःखी होऊं नये, वनिता आपल्याला सर्वतोपरी अनुरूप आहे तिच्या सहवासांत आपण सुखी व्हायचें. माझी आपणांस कधींच आठवण होऊं नये अशी माझी इच्छा आहे. माझी असलेली हरएक वस्तु नाश करून टाकावी. माझ्या हातास मिळाली तितकी मी नाश करून जाळून टाकलीच आहे. पण जी किंमतवान मालमत्ता आहे, तिच्यावर माझा अधिकार नाहीं.

माझी आठवण आपणास माझ्यामागें होऊं नये, म्हणूनच मी माझ्या पोटीं येणाऱ्या जीवास माझ्याबरोबरच घेऊन चाललें आहें. तुम्हीं उदार आणि दयाळू अंतःकरणाचे कां झालांत ? तुम्हीं मला शिक्षा केलीत नाहीं, म्हणून मी स्वतःला शिक्षा करून घेत आहें. माझा न्याय मलाच करावा लागत आहे. आपण यांतली कोणतीच गोष्ट मनाला न लावून घ्याल तर माझ्या आत्म्याला समाधान होईल.

आपला दोघांचा एकत्र काढलेला फोटो एक तसाच राहिलेला आहे. त्यांत माझ्या देवाचा–तुमचा फोटो नसता, तर मी त्याचाहि नाश केला असता, पण आपली प्रतिमा माझ्या हृदयांत जन्मोजन्मीं स्थिरावेल, इतक्या कायमपणें खोदली गेली आहे. आपली ही साधी प्रतिमा नाहींशी करावयास माझे हात धजत नाहींत.

फाजील आशेनें मी आपल्या चारित्र्यास कलंकित करण्यासाठीं जगूं इच्छित नाहीं. मी घेतलेल्या विषाचा अंमल माझ्यावर होऊं लागला आहे. पोलिसास देण्याकरितां पत्र यासोबत लिहून ठेवलेलेंच आहे.

माझा अपराध अक्षम्य आहे हें दाखविणारीं पत्रें यासोबत ठेविलेलीं आहेत. त्यावरून सर्व गोष्टी आपणास कळून येतील. आपण अतिशय प्रेमळ आहांत, पण माझ्याकरितां जरा कठोर बना; आणि मी करित आहें तें योग्य असें माना. मला विसरा आणि वनितेशीं आनंदानं वागा.

"आपली
असें म्हणण्याची लायकी नसलेली
पद्मा."

१५१८

हें पत्र वाचून झाल्यावर वनिता आपले डोळे घट्ट मिटून बसली. तिच्या अंगाला घाम आणि थरकांप सुटला !

थोडा वेळ तशीच पडून राहिल्यावर ती पुन्हां नीट बसली. आणि त्या पत्राखालीं असलेलीं पत्रें तिनें चाळावयास सुरवात केली.

अगदीं वर असलेल्या पत्रांतील मजकुरावर तिची नजर गेली.

........तशी वेळ येईल तेव्हां काय तें पाहतां येईल.' तथापि तुला योग्य वाटेल तसें तूं कर बापडी.

माझ्या मतें राजरोसपणें होताहेत तशा गोष्टी होऊं देणेंच शहाणपणाचें आहे. त्यांत कांहीं एक वाईट नाहीं. आपण दोघांनीं जरी कांहीं केलें असलें, तरी तें विद्याधराच्या नांवावर खपून जाणारें आहे. म्हणून काळजी करण्यासारखें कांहीं नाहीं.

तूं विनाकारण क्षुल्लक गोष्ट मनाला लावून घेऊन जिवाला त्रास करून घेत बसली आहेस. असल्या गोष्टी शेंकडों घरांतून घडत असतील. हल्लींच्या नवमतवादाच्या युगांत तरी असल्या नैसर्गिक व्यवहारांच्या गोष्टीला कांहीतरी भलतें महत्त्व देऊन शहाण्या माणसानें सुखी जीव दुःखांत लोटूं नये, असें मला वाटतें.

तथापि मला विद्याधराच्या सहनशीलतेच्या परमावधीचें आश्चर्य वाटतें. सर्व कांहीं घडलेलें पाहून सवरून तो तें मुकाट्यानें गिळून बसला आहे; हे त्याचे आपणा दोघांवर केवढे तरी उपकार आहेत.

तुझीं पूर्वीचीं सर्वच पत्रें मी, तूं मागितल्यावरून यासोबत परत पाठविलीं आहेत. माझ्याकडे तरी तीं सुरक्षित राहणें शक्य नाहीं. तूं मागितलींस तें बरेंच झालें. तुझी मनस्थिति बावरलेली दिसते. पण तसें वाटण्याचें मुळींच कारण नाहीं.

तूं पत्रात मला बरेंचसे दोष दिले आहेस. पण हें तुझें लिहिणें योग्य नाहीं. तुला ईश्वरानें इतकें सौंदर्य कां दिलें ? तें माझ्या नजरेस कां पाडलें ? आपणादोघांमध्यें परस्परांविषयीं आकर्षण कां उत्पन्न झालें ? हा सारा माझ्या एकट्याचाच दोष का ?......विचार कर.........लवकरच मी तुझी भेट घेईन.

" मनोहर. "

हें पत्र वाचून झाल्यावर वनितेचें मन अतिशय अस्वस्थ झालें. तिची छाती धडधडूं लागली. पद्मेवर अशा तऱ्हेचा प्रसंग आला होता तर ? आणि यांत

दोष कोणाचा होता ? इतकी सुंदर दिसणारी पद्मा, अशी कशी फसली ? तिचें अंतरंग सुंदर नव्हतें कीं काय तिनें मनोहराला गेलेलें पत्र वाचल्याशिवाय तें कसें कळणार ?

वरील पत्राच्या खालींच असलेलें पद्मेकडून मनोहरला गेलेलें पत्र वनिता उघडून वाचूं लागली.

"......तुम्हाला मी मुळींच दोष देत नाहीं. तुम्हीं आपलं मन कां म्हणून आवराल ? परिणाम तुम्हांला थोडाच भोगावा लागणार ?"

"तुम्हीं माझ्या नजरेस पडूं नका. तुम्हीं मला मोहपाशांत अडकवूं नका, असें माहेरीं असतांना मी तुम्हांला परोपरीनें बजावलें, विनवण्या करून सांगितलें. पण तें मी सांगण्यांत मोठीच चूक केली. तें मी सांगितलें नसतें, तर कदाचित माझा बचाव झाला असता. तें मी सांगितलें म्हणूनच तुम्हांला माझ्या मनाचा कमकुवतपणा कळून चुकला. अतिप्रसंग केल्यास खपून जाण्यासारखा आहे, अशी तुमच्या मनाची खात्री झाली. लहानपणापासूनच्या सहवासामुळें आधींच भीड नाहींशी झालेली. तशांत माझ्या पत्रांतील सरळ व मोकळेपणाच्या लिहिण्यामुळें तुमचा मार्ग सोपा झाला. तुमच्या पुढें सरण्याला मला प्रतिकार करतां कां येऊ नये. हें माझें मलाच कळत नाहीं. माझें कृत्य अयोग्य व अविचाराचें हें ठाऊक असूनसुद्धां तुमचा धिक्कार माझ्यानें करवला नाहीं. हें जें पाप मी केलें, माझ्या प्रिय पतीशीं ही मी प्रतारणा केली, त्यांच्या पुण्य कीर्तीस जो मी कलंक लावला. हें जें मी महत्पाप केलें, त्याचें प्रायश्चित मी तसेंच भयंकर घेणार आहें. मी या जगांत माझ्या पतीच्या सहवासांत राहण्यास नालायक आहें.

......तुम्हीं माझ्यावर दया करावयास पाहिजे होती. तुमच्या सान्निध्यांत माझ्यानें मनोविजय करवत नाहीं, माझा विवेक राहात नाहीं असें मी तुम्हांस प्रांजलपणें कळविलें होतें. असंख्य खेपा मी तुम्हांस टाळलें, पण पूर्वजन्मींचा काय लागाबांधा होता कोणास ठावूक ? तुम्ही जवळ असतांना तुम्हांला धिःकारण्याचें झिडकारण्याचें सामर्थ्य माझें कां व कसें गळून जात असे, तें मात्र मला कळलें नाहीं, व अजूनही कळत नाहीं. पण या गोष्टीचा फायदा तुमच्या जागीं दुसरा कोणी सुज्ञ व पवित्र आचरणाचा माणूस असता तर त्यानें असा घेतला नसता. तुम्हीं जाणून बुजून माझा घात केलात !

...पण तुम्हाला तरी दोष काय म्हणून द्यावा ? सगळा माझाच अपराध तुम्हीं भेट घेण्यापूर्वीच मी यमाची भेट घ्यावयास जाईन...

" पद्मा. "

पत्र वाचून झालें, वनिता विचारांत मग्न झाली. तिच्या मनाची खळबळ उडाली होती. तरीही तिच्या मुखावर थोडीशी समाधानाची छटा दिसत होती. आपण दुसरेपणाची अशी दिसत असलें, तरी वास्तविकपणें पहिलेपणाचीच आहोंत, असें तिच्या मनावर ठसलें असावें काय ?

# असें कां बरें ?

ती फुलवेल तारेची फार आवडती होती.

ती लावल्यापासून तिला आज प्रथमच कळ्या येऊन त्या फुलूं लागल्या होत्या. कळ्या पानांच्यामधून दिसूं लागल्यापासून ती रोज तेथें येऊन पहात असे.

खरें म्हटलें तर ती याच्यापूर्वी पुष्कळ वेळां फसली होती. दोन पानांच्या मधून डोकावणारे अंकुर आणि कोंवळ्या कळ्या यांत फारसा फरक नसतो. त्यामुळें कळ्या आल्या असें तिला वाटावें आणि एकदोन दिवसांतच तीं पानें ठरावींत असें कितीतरी वेळां झालें होतें.

याहि खेपेस कळ्या आल्या, त्या तिला कोंवळ्या पालवीच्या अंकुरांसारख्याच भासल्या. पण दोन चार दिवसांतच तिला समजून आलें, कीं या खेपेस मात्र खरोखरीच कळ्या आल्या. मग तिच्या आनंदास काय तोटा! तिनें सर्वांस ती गोष्ट सांगितली.

त्यांतली सर्वांत मोठी कळी आपला हिरवा रंग पालटून करडा आणि नंतर पांढरा रंग घेऊं लागली होती.

फुलावयाच्या आदल्याच दिवसाची गोष्ट. दहिंवराचा अत्यंत लहानसा थेंब तिच्या टोंकावर बसला होता आणि कलिका त्याच्याशीं गोष्टी करीत होती. ती डुलत होती. ती आपल्याच ठिकाणीं गुंग होऊन गेली होती. कलिकेची टवटवी दृष्ट लागण्यासारखी होती. मधुकर निरनिराळ्या फुलांकडे जातांना तिच्याकडे पाही, नेत्रसंकेत केल्यासारखें करी; आणि जवळ आल्याशिवायच निघून जाई.

" पाहिलं—पाहिलं बरं ! " असेंच तो म्हणत नसेल ना ?

किरण पडले, आजूबाजूच्या भागांतील हिमबिंदु निघूनहि गेले, तरी तो आपला कलिकेच्या मुखावर तसाच होता. तो कां रेंगाळत होता ?

" मीच—मी म्हणजे माझ्यापैकींच ते थेंब. त्या थेंबांनीं ह्या वेलीस वाढविलं. त्या वेळीं आम्हीं वेलीच्या पानांजवळ लोळत असूं. वेल मोठी झाली. त्यावेळीं तूं आली नव्हतीस, पण तुझ्या येण्याची आम्ही वाट पहात होतों."

हिमबिंदु बोलत होता; आणि कलिका ऐकत होती.

“ तूं आलीस. थोर झालीस. तूं लहान असतांना देखील मी तुझ्याजवळ येऊन बसत असें. पण तें कोणाच्या डोळ्यांत भरत नसे. आज मात्र भ्रमर, मधुकर वगैरे सर्व माझ्या–तुझ्याकडे पहात आहेत.”

त्याच्या गोष्टी कलिकेला आवडत होत्या. ती फारच आनंदित झाली होती. ती स्वतः कांहींच बोलत नव्हती. पण बोलतां बोलतां हिमबिंदु निघून गेला. तारेला तें समजलें देखील नाहीं. तारा तेथेंच उभी होती.

* * *

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तारा येऊन पहाते, तर काय ! कलिकाबाई फारच नटल्या होत्या. तिच्या अग्रावर हिमबिंदु होता. पण तो आकारानें कालच्याहून मोठा होता. तशाच प्रकारच्या त्यांच्या गुलगुल गोष्टी चालल्या होत्या. कलिका डुलतच राहिली होती.

संध्याकाळीं तारा आली आणि पहाते, तर कलिकेची एकेक पाकळी नुसती उमलूं लागली होती; आणि मधुर सुवास सुटला होता. तारेनें कलिकेजवळ आपलें नाक नेलें आणि सुवास हुंगला. अहाहा ! काय मधुर सुवास ! तारेच्या फुलवेलीला कलिका आली आणि ती आज फुलली. फुलली आणि तिचा मधुर सुवास आजूबाजूला पसरून दरवळून राहिला. वातावरण सुप्रसन्न झालें. तारेचा हर्ष पोटांत मावेना !

त्या सुवासासाठीं कांहीं भ्रमर तेथें आले होते. जवळ येण्यापूर्वी त्यांनीं दुरूनच पाहिलें. हिमबिंदु तेथें नव्हता. ते जवळ जवळ गेले. कलिकेला धन्यता वाटत होती. इतके भ्रमर आपल्या सुवासावर लुब्ध होऊन सभोंवती फिरताहेत, आणि हें पहावयास हिमबिंदूनें जवळ नसावें ! छे, छे ! कलिकेला वाईट वाटलें. पण हिमबिंदु जवळ नव्हता, आणि तोंपर्यंत तिचा सुवास वाऱ्याच्या झुळकी येऊन येऊन लुटून नेत होत्या.

रात्र संपावयाला आली तेव्हां हिमबिंदु येत असावा असें कलिकेला वाटलें. पण तितक्यांत तिचा सुवास संपायला आला होता. थोडयाच वेळांत हिमबिंदु आला आणि तो फुललेल्या कलिकेबरोबर गोष्टी करूं लागला.

* * *

सकाळीं तारा आली. तिच्या कलिकेचें रूपान्तर फुलांत झालें होतें. फुलावर हिमबिंदु होता, पण तो काल्च्याहून देखील मोठा होता. पाकळ्यांच्या बंधाजवळ मध्यभागींच तो होता. फूल आनंदून गेलें होतें.

एकंदरींत तारेची खात्री होऊन गेली कीं, हिमबिंदूच्या सहवासांत या कलिकेला सुख वाटत होतें. आतां त्या कलिकेचें फूल झालें तरी त्यालाही त्या हिमबिंदूच्या सहवासांतच सुख वाटतें. आपल्या फुलवेलीच्या त्या फुलाला आनंदित पाहून ताराहि आनंदित झाली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून फुलवेलीजवळ तारा आली आणि पहाते, तों काय ! तें फूल फुलवेलीवर नव्हतें; तें जमिनीवर पडलें होतें; आणि त्याच्या पाकळ्या गळून गेल्या होत्या !

" असं काय बरं झालं हें ?" तारेच्या तोंडून शब्द निघाले.

" तोच हिमबिंदु, तीच वाऱ्याची झुळुक ! ताराबाई, कालपर्यंत मला सुखकारक वाटत होती—" कलिका बोलत असल्यासारखें तारेस ऐकूं आलें.

" हिमबिंदु, झुळुक मला अजूनहि सुखकारक वाटतात; पण त्या सुखाचा स्पर्श आज माझ्यानं सहन करवला नाहीं. ज्या गोष्टींनीं माझ्यांत आजपर्यंत जोम यावा, त्याच गोष्टींनीं मी आज गळून पडलें. गोष्टी त्याच, त्यांच्या ठिकाणचे गुणहि तेच, परंतु त्याचा परिणाम मात्र हा असा निरनिराळ्या प्रकारचा !" कलिकेचें बोलणें बंद झालें.

तारा ते विचार, ते त्या कलिकेचे शब्द ऐकून तेथेंच विचारमग्न होऊन राहिली होती. तिची दृष्टि पुन्हां त्या फुलवेलीकडे गेली.

त्या फुलवेलीवर नवीन दोनतीन कलिका तरारत वर उठत होत्या. आपल्या हिरव्या रंगाच्या साड्या बदलीत होत्या. आणि मौज अशी कीं, त्या सर्व कळ्यांच्या अग्रावर हिमबिंदु होतेच !

त्या सगळ्या कळ्या आपल्या आनंदांत निमग्न होत्या. खालीं गळून पडलेल्या फुलाकडे त्यांची दृष्टीहि वळली नव्हती !

तारा विचार करीतच घरांत निघून गेली आणि आपल्या अभ्यासाच्या खोलीकडे वळली.

" हें असं कां व्हावं बरं ? " ती स्वतःशींच पुटपुटली.

# दुर्दैवी शेतकरी

" ....आहा ! गांजलं ! होय ! तो काळाकुट्ट पावसानें भरलेला केवढा तरी ढग आभाळांत आला. तेवढा लागला तरी खूप होईल. पण गळला मात्र पाहिजे. अेररे ! गेला फांकून. विनवण्या किती केल्या तरी कानावर हात ठेवणारा धनकोच जसा ! पण मी ऐकलं तें काय ? हें तर शेजारीं कोण उसनवट मागून आणलेलं भात भरडतंय ! ती गाज नव्हे आणि गडगडही नव्हे ! पाऊस नाहीं नि पाणी नाहीं ! आतां कसं व्हायचं ? जित्रापाच्या मुळ्या सुकून गेल्या. पात पिवळी झाली ! पसवायाच्या पूर्वींच शेताचें भातावांचून गवत होणार काय ? शेताला दीड महिन्यांत पाण्याची भेट नाहीं. जमिनीला तडे पडूं लागले ! बा मेघराया तूं जगाचा पालनवाला असून आजच असलं भयाण रूप कां घेतलेंस बाबा ? पृथ्वींत पाप मातलं त्याचा वचपा तर नाहीं ना घेत ? कीं जगाच्या आरंभापासून जमिनीवर पाणी ओतून ओतून तुझ्याकडचं पाणीच संपून गेलं ? नवं केल्याबरोबर सणाची पहिली पोळी तुला वाढीन म्हणून खंडोबाला नवस करून ठेवला. तरी कांहीं नाहीं. गोठणीच्या देवाला गाऱ्हाणं दिलं. महादेवाच्या देवळांतल्या शिवपिंडिकेला भटांकडून सगळ्या गांवांस जमवून सात प्रहर पाण्यांत बुडवून ठेविली. छट् ! ज्याचं नांव तें ! पाण्याची थेंबोळी देखील पडत नाहीं ! डोळ्यांतून आसवांच्या धारा गळूं लागतात; पण भाताच्या रोपाशेजारीं रडतां रडतां एका तरी रोपाचं मूळ भिजवीन म्हटलं तर डोळ्यांतून निघालेले आंसवांचे पाट खालीं जमिनीवर पडायच्या पूर्वींच, गालावरच्या गालावर, उन्हाळ्याच्या जिवाळीनं सुकून जातात ! देवा ! इतका नकोरे निर्दय होऊं ? ऐन पावसाळ्यांतल्या श्रावण महिन्यांत उन्हाळा—फाल्गुनमास कां करायचा आहे मनांत ?"

*   *   *   *

" शेत करपून जाऊन झालेल्या गवताची राख तरी ढोरांच्या पुढ्यांत ठेवीन म्हटलं, तर कीड लागून अर्धवट ओलं असतांनाच गवत देखील नाहींसं झालं ! पीक नाहीं, चारा नाहीं. निदान पाणी मिळेल म्हटलं तर आतां जित्या जिवांना डोळ्याला लावायला देखील पाणी मिळण्याची मारामार ! ढोरांच्या आणि

पोरांच्या हाडांचे कातडींतले सांगाडे डोळ्यांसमोर बघून बघून काळीज कसं चर्रर होतं ! बाजारची धारण सडकुन कडकली. घरांत असलेली सारी चीजवस्त विकून टाकली; उरली सुरली गहाण टाकली. आतां घरांत तिच्या मंगळसूत्राशिवाय कांहींच राहिलं नाहीं.आतां उपाय काय ? घराच्या आसपास, परसांत, शेतांत झाडं पाडं लावलीं, त्यांच्यावरचीं पानं गळून पडलीं, आणि सारे होळीचे खुंट बनले चोऱ्यामाऱ्यांचा सुळसुळाट उठला, माणसाला माणूस खायला उठलंय. मला तरी कोण खाऊन टाकील तर बरं होईल. सरकारांतून साऱ्याची सूट मिळेल, तर तेवढी एक कांळजी कमी होईल. पण मारवाड्याच्या आणि सावकाराच्या देण्याला काय करायचं ? अरे बाबा ! आतां येईल सावकाराचा वसूलदार. सावकार पैसे लागतील तेवढे द्यायला कबूल; पण शेत जमीन गहाणवट मागतो आहे. कोणी वाडवडिलांनीं मिळवून ठेविलेली जमीन मी कशी गहाण टाकूं आणि मग ती सोडवावयाची कशी ? बरं गहाण टाकली नाहीं तर या पोरांचं आणि माणसाचं पोट भरायचं कसं ? मारवाडी मात्र भारी दयाळू आहे. तो लागतील तेवढे पैसे द्यायला कबल आहे. त्याला जमीन गहाणवट लावण्याची जरूर लागणार नाहीं. पण पन्नास रुपयांचा रोखा घेऊन सारे दहाच रुपये रोख हातावर ठेवणार ! केवळ माझ्यावर दयाळू होऊनच तो दहा रुपयाला दर महिन्यास दोन आणे व्याज आकारावयास कबूल झाला आहे-पण व्याज, स्टांप किरकोळ खर्च मिळून तो कर्जाऊ रकमेंतून आगाऊच वजावाट धरून घेईल आणि फक्त दहा रुपयेच मला पन्नास रुपये म्हणून घ्यावे लागणार ! दहा तर दहा, जीव तर जगले पाहिजेत."

* * * *

"...आतां अगदींच ग्लानि आली. एका भाकरीचे चार तुकडे करून ते एकाएकानें एक एक वांटणीस घ्यावयाचे. पोटांत दुखण्याचें निमित्त करून, हजार ढोंगें करून माझ्या वांटणीचा तुकडा आज एकास तर उद्यां दुसऱ्यास असें करून आठ दिवस नुसत्या पाण्याच्या घोंटावर काढले. पण आतां कसें होणार ! घरांतल्या माणसांचे प्राण वाचावे म्हणून केलेलें हें सोंग आतां यापुढें टिकावयाचें नाहीं. पुतळीलाही हें समजलें आहे. गोप्यालाही समजलें आणि तिलाहि समजलें आहे. आणि माझ्याही हातापायांत आतां त्राण राहिलेलें नाहीं. आयुष्यांतला एक एक दिवस कसा तरी घालवायचा म्हटलं तर बरेपणी निभला

तर बरं. नाहींतर—नाहींतर कांय ? एक दिवस फट्दिशीं राम म्हणण्याची पाळी यायची, तसें झालें तर वाईट काय ? छे ! घरांतल्या तिघां जीवांकरतां तर मला जगलें पाहिजे. आणि जमीन वाडवडिलांची जमीन गहाण टाकलेली सोडवल्याशिवाय मी मरू ? मुळींच नाहीं मरणार !

कोण ? धनीसाहेब ! आपण आलांत, बसा. हा पाठ घ्या. सरकारांनं दयाळू होऊन सारासूट दिली ! आतां यंदां तरी माझ्यावर दया करून आपण खंड मागूं नका. माझ्या पोटाची ही तुमच्या दप्तरांतल्या कागदासारखी झालेली चामडी बघा ! पोरांबाळांचीं वाळलेलीं तोंडें बघा ! थोडी तरी मनांत दया धरा. सरकारनं सारा सोडला म्हणूनच निम्मा खंड मागतां ? पण शेतांत दाण्याचं कैंसर आलेलं आपल्या नजरेस पडलं होतं काय ? जी ? कर्ज काढून देऊं म्हणतां ? कर्ज आतांपर्यंत पोटासाठीं आधींच खूप काढलंय. आतां तुम्हीच मायबाप ! आपणाला खंडाची पोंच थोडीतरी चुकती करीन, पण थोडी मुदत द्या. जमीन सोडून देऊं ? ती आपणाला वाटेल तेव्हां काढून घेतां येईल. पण माझ्या जमनींत माझं पोट भरेना म्हणून तर खंडाला आपली केली. ती आज दोन पिढयांची आमच्या घरांत चालत आली; आणि आज मीच कशी सोडून देऊं ? यंदा नाहीं पुढच्या सालीं तरी पीक येईल आणि तुमचा दिढी दुपटीनं खंड मोजीन, पण यंदा माझ्यावर दया करा. हीं लेंकरं उपाशीं तडफडतात किंहो ! खंड सूट नाहीं ! फक्त मुदत एक महिन्याचीच देतां ? मर्जी तुमची. मुदत निदान सहा महिन्याची तरी द्या. काय उपाय सुचला तर बघतों."

* * *

" गहाण पडलेली जमीन सोडवायला आतां एकही उपाय राहिला नाहीं. जगावं कीं मरावं ? हाच प्रश्न आहे. कर्जाच्या वाढत्या बोजाखालीं दागिने कपडा लत्ता, झाडपेड, शेतजमीन, घर गोठा, खिडूकमिडूक आउतेंसुद्धां गेलीं. आतां काय राहिलें ? पण, पण आतां असं करूं का ? निदान जीव जगवले पाहिजेत ......अरे बापरे ! हा आला मारवाडी ! आला–आला पठाण ! आला राक्षस ! देवा आतां काय करूं ? हा तर मला एक अक्षरही न विचारतां सरळ घरांतच रिघतो आहे ! अरे बाबा ! थांब थांब ! घरांत रिघूं नको रे, तुला काय लागेल तें उचल पण बायकापोरांना माझ्या बाटवूं नको ! तुझा पैसा उद्यांच्या उद्यां देतों........काढलींस भांडीं घरांतलीं बाहेर ? पण मीच

काढून तुझ्या पुढें टाकतों कीं!......नाहीं लपवून ठेवायचा. बापाची, आज्याची शपथ देऊन सांगतों. एकही तांब्या पितळेचं भांडं लपवून ठेवीत नाहीं. नको नको, घराचा उंबरठा ओलांडू नको! हीं घे! ही घे परात, मडकीं, तांब्या, पितळी......होय होय आणतों! हा घे टोप! ही पातेली......आतां आणखीं कांहीं नाहीं राहिलं घरांत. ह्या पोराच्या टाळूवर हात ठेवून देवा शपथ सांगतों. घरांत आतां कांहीं नाहीं. कुऱ्हाड, कोयता, नांगर देऊं म्हणतोस! पण तीं शेताचीं आऊतं. माझं शेतकऱ्याचं सगळं भाग्य तर तेवढंच. तांबं, पितळ घे, पण तेवढं लोखंड ठेव. नको हात घालूं—लोखंड ठेव—आवतं नेऊं नको. बाबा तुझ्या पायां पडतों. हातांत धरायच्या आऊतांस हात घालून मी माझ्या घराबाहेर कशीं काढूं? कुणब्याची लक्षुमी तीच तेवढी. आज तीं आवतें तुझ्या हवालीं करून खंडेनवमीला भाई, पूजा कसली करूं? हें बघ, माझ्या देवाला पूर्वजांना शिव्या शाप देऊं नको. माझ्या धर्माला आणि कुळाला भलभलतें बोलूं नको. आवतेंच तुला न्यायचीं असतील, तर अगोदर हे माझे हात तोड आणि मग आवतें घे! हायरे अधमा, मी तिच्या कुंकवाचा धनी हयात असतांना तिच्या गळ्यातल्या मंगळसूत्राला हात घातलास?......हरामखोर......घे तुझं थोबाडच रंगवू......ओय्-ओय् अरे बापरे! अगाई ग! मेलों मेलों—!! धांवा रे धांवा—! घात झाला......धावा! घात मेलों........."

* * *

...जा! जा हं. सांभाळून वाग. देव तुझें कल्याण करील आपल्या जिवाला सांभाळ. आंग तापल, दुखलं तर तेव्हांच दवा घे आणि इकडे पत्र पाठव. काम जपून कर. पोंचल्याबरोबर पत्र घाल. विसरूं नको......अगबाई!...सगळं आंग कसं ठणकतंय. ओस पडो मेल्याचं तोंड. त्याचा पैसा फेडल्याशिवाय तुझ्या आईबहिणीची अब्रू तो मांग पठाण ठेवायचा नाहीं हें विसरूं नको. भलतंच कांहीं खाऊं पिऊं नको. खाण्यापिण्याचे हाल करूं नको पण आपल्या कुळांत कोणी कधीं केलं नाहीं, असलं कांहीं करूं नको जा...! पण सावध रहा. मुंबई आहे ती. भलत्या सलत्याच्या संगतीला लागूं नको. आपल्या वरिष्ठाच्या मर्जी-बाहेर जाऊं नको. आपल्या घरच्या देवाची आठवण ठेव. कुळाचा लौकिक जाईल असलें कांहीं करूं नको. जा...अरे रे रे रे! कशी कुशींत कळ येते आहे! हाय! ओय्...जा जा आतां पाठीमागें बघशील तर तुझ्यानं पाऊल बाहेर-

काढवणार नाहीं. जिवाला बरें वाटत नाहींसें झालं तर आपला घरीं ये. जा बाळा गोप्या जा, हं. पत्र धाड........"

* * *

" गेला. गोपूबाळ गेला. देवा त्याला तूं सांभाळ. आजपर्यंत त्याला लहानाचा थोर केला. पण थोर तरी कसला ? सारं पंधरा वर्षांचं वय. त्याला अझून शेजारच्या गांवाला देखील कधीं मी एकटा दुकटा जाऊं दिला नाहीं. एक घर, कीं दुसरें शेत. तिसरें त्याला ठाऊक नाहीं. पण आतां त्याला डोळ्याआड करावा लागला आज. अजून पोरवय. बरं काय आणि वाईट काय ही समजूत देखील पुरीशी आली नाहीं. त्याला कपटी, दुष्ट जगाचे लबाडीचे डावपेंच त्या पंधरा वर्षांच्या पोराला कसे कळणार ? पांखा-खालच्या आज इतकीं वर्षं दूर न केलेल्या बचड्याला कर्जदारांच्या जाचाला कंटाळून वारांच्या तीरास घालवावा लागला. शिवाय......कोणी ऐकत तर नाहींना ?......नाहीं देवा ! माझें मन तुझ्यापाशीं उघडें करतों. आतां घरांत रोजची एक भाकरी भाजण्याइतके देखील दाणे मिळण्यासारखे नाहींत. स्वतः उपास काढून देखील चालेनासे झालें. अन्नाशिवाय मरणाच्या दारीं टेंकलेल्या पोराला पाहून अन्नावांचून आयुष्य झुलविणारा बापाचा जीव यापुढें जगांत तग धरूं शकणार नाहीं. म्हणून तर त्याला, देवा, मन मोकळें करून सांगतों, मुंबईला पाठवून दिला. दोन दिवसांनीं जरी भाकर भाजली, तरी त्याच्या वांटणीचा तुकडा उरलेल्यास एक घांस ज्यास्त मिळेल. त्यालाहि मुंबईंत पोटभर जेवायला मिळेल. उरले दोन पैसे तर देईल पाठवून ! या मार्गानं कर्ज फेडण्याची आशा आहे. निदान जीव तरी जगतील......पुतळे गुरांच्या पुढ्यात चार काड्या टाक. पाणी पाज. एक वासरूं तर काल मेलंच. राहिलेल्या शेपट्या तरी जगल्या पाहिजेत. कशाला रडतेस पोरी ? गोप्या गेला म्हणून ? तो गेला तर देईल तुला चोळी लुगडं पाठवून त्याचा कुठें तरी पाय लागला तर ?......रडते आहे ती मी कण्हतों म्हणून ! कोवळ्या मनाची पोर. मला आतां मोठ्यानं विवळतां नये. भारीच पोर मायाळू झाली ! आंथरुणाकडची उठायची नाहीं. गालफडं कशीं बसून गेलीं ! डोळे खोल गेले. पण तोंडांतला घांस काढून पोरीचा जीव जगवून धरला आहे. ............

" अँ ! हे कोण ? पटेवाले आणि शिपाई ! जप्ती ! घ्या मोडका तोडका

माझा देह राहिला आहे तो घ्या. हें बघा सावकार, एक महिन्याच्या आंत कोर्टानं ठरवलेला हप्ता न चुकतां भरतों. पण माझी अब्रू घेऊं नका. मला अंथरुणावरून उठवत नाहीं बघा ! नाहींतर मी तुमच्या पायांवर लोळण घेतली असती. पठाणानं दिलेल्या मारानं माझं अंग खिळखिळं झालं आहे. इथूनच आपणाला कोपरांपासून हात जोडतों. घरांत शिपायाला कशाला घुसवितां ? सारं होतं नव्हतं तें पठाणानं न्हेलं. म्हणूनच आपणाला राग आला म्हणतां ! एका सावकाराला थोडंतरी मिळालं म्हणून दुसऱ्याला राग येतो खरा. पण मी माझ्या गोपूला मुंबईला पाठवला आहे रोजगाराला. पगाराचा पैसा आला कीं तुम्हाला देईन. काय घर गहाण मागतां ? हायरे देवा ! घ्या घर घ्या, पण आतां जा. थोडी मुदत द्या. देव तुमच्या मुलांबाळांचं आणि तुमचं कल्याण करील...गेले ...नाहीं, आतां दुसरा उपाय नाहीं. आता कडेलोट झाला. आतां दया माया धर्म अधर्म, पाप पुण्य सगळें कांहीं गुंडाळून ठेवावंच लागणार. छे ! पण नाहीं. तसा मी नाहीं मी वागणार......"

* * *

...यापुढें विचाराला रजा दिलीच पाहिजे. घरधनिणीची गत माझ्यानं बघवत नाहीं. तिचा विचार असो नसो. मला ही गोष्ट केलीच पाहिजे. कसायासारखं मन कठीण केलं पाहिजे. पोरीच्या गळ्याला फांस लावला पाहिजे. सव्वाशें मैलावरच्या पंचावन वर्षांच्या म्हाताऱ्याला माझी बारा वर्षांची कोंवळी पोर देऊन टाकावी लागणार! नशिबाचे खेळ आहेत सारे ! पोरीला पोसायची जर मला ताकद नाहीं, तर तिचे असे पोटाचे हाल डोळ्यासमोर बघण्यापेक्षां सुखाचे हाल डोळ्याआड ऐकलेले पुरवले. आज तीनशें रुपये रोख हातावर पडताहेत. एका कुठल्यातरी सावकाराला थारावतां येईल. गहाण पडलेलीं शेताचीं आवतें, नाहींतर घर सोडवतां येईल, निदान दोन महिने गुरांढोरांचे प्राण तरी वांचतील, वांचवतां येतील. आजचें मरण उद्यांवर जाईल. एका जिवाच्या दुःखानें अनेक जिवांचें थोडें तरी दुःख टळेल. पण-पोरीला सुख नाहीं !...नको विचारच नको. उत्तर दिलेंच पाहिजे पाहुण्यांना......

* * *

........राणोजीराव, या. आतां तुम्ही आमचे जांवई होणार. घरांत दुसरें कोणी वडीलधारें बायको माणूस एका म्हातारीशिवाय नाहीं म्हणतां. माझी

पोर कोंवळी आहे. अजाण आहे, प्रेमळ आहे, सालस आहे. पोर अगदीं गरीब गाय आहे. पोटच्या गोळ्याची माया कोणालाच सांगून पुरी पडणार नाहीं व ती सांगून समजणारही नाहीं. पण तिला वागवून घ्या. माझी सारी ठेव ती. तुमच्या स्वाधीन करतों. माझ्यावरच्या संकटांमुळें माझ्या कुळांत कोणी केली नाहीं तसली गोष्ट आज मला करावी लागत आहे. तरी त्याचा मनांत राग धरूं नका. तिला प्राणा-सारखी सांभाळा. माझ्या एका शेजारणीला आणि तिच्या मामाला व मावशीला बरोबर देऊन उद्यां मी आपली रवानगी करतों. .........ते किलकिले डोळे कोणाचे त्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा गळत आहेत! दाराआड लपून माझं बोलणं आणि ठराव ऐकला वाटतं? पण आतां लपवून तरी ठेवणार कुठवर?......

*  *  *

"......नको! गाईच्या गळ्यांतल्या दाव्याला हात घालूं नको. रडून रडून डोळ्यांच्या खांचा झाल्या. मला नीटसें दिसत नाहीं. मुंबईच्या गिरणींत, चहांत, दारूंत, वाईट सांगतीमुळें कडकी लागून आलेल्या माझ्या गोप्याला कालच देवांनीं शाळेंत शिकवायला नेला. माझी हातांतली म्हातारपणची काठी गेली; डोळ्यांतली दृष्टीहि अर्धीमुर्धी गेली. पुरा आंधळा झालों असतों, तर कितीतरी बरें झालें असतें. पण तसें कुठलें होणार? तुझा हात गाईच्या गळ्याला लाग-लेला बघून तो बघ कसाई लिलांव मागायला तयार झाला आहे वाटेवर! अल्लाची कसम आहे तुला. तिचें वासरूं दोन महिन्यापूर्वीं मेलं. मुकें जनावर, पण वासराची आठवण तें अजून नाहीं विसरलें. आम्हां माणसांना पोटच्या पोरांची दया वाटत नाहीं. बाकी दयामाया पशुपक्षांना असते. त्यांना आमच्या-सारखी आठवण नसते, म्हणून त्यांची माया दिसत नाहीं. हें बघ, तुझें व्याज आणि पैसे मी सगळेच एकदम देतों. शेत अजीबात विकून टाकून मी तुला पैसे देईन पण गुरांची दावीं तोडूं नको."

*  *  *  *

"अरेरे! गाईनं हांबरडा फोडला! नकोरे नको. त्या गाईला अशी फरफटत ओढूं नको. माझ्याकडे बघून माझी बाई ढळढळां रडते आहे, परवां पोरीचा नवरा अंथुरणावर आजारी असलेलें ऐकून तिला एका कसाबाच्या गळ्यांत अडकविल्याचें दुःख झालें होतें. पण त्याहून देखील हें दुःख अधिक भयंकर वाटतं. ती जाग्यावरून हालत नाहीं, नाहींच हालायची; गाय घरांत

रिघली ! पण तूं नको घरांत घुसूं. अरे बात्रा नको म्हणून मी तुझ्या पायां पडतों ना ? मी स्वतः तिला आणून तुझ्या स्वाधीन करतों. तिला पातेलंभर— पण हो पातेलं तुझ्याच घरीं...मातीच्या थाळ्यांत तिला पोटभर पाणी पाजतों. तिचे डोळे पुसतों, तिला जरासा खाजवतों, तिच्या पाठीवर हात फिरवितों आणि मग तिचें समाधान करून तिला तुझ्या हवालीं करतों. जोताचे दोन बैल त्या खेपेस घेऊन गेलास तेव्हांपासूनच तुझा डोळा तिच्यावर होता. नको—नको तो चाबुक माझ्या पाठीवर मार, तिच्यावर मारूं नको. ती बघ तिनें बसकण मारली. पण तूं अशा किती गाई कापल्या असशील ! मेलेल्या गुराला ओढतात तसा तिला जिवंतपणींच फरफरा ओढूं नकोस रे ! नकोरे चांडाळा......"

* * *

"तो तुझा सुरा कशाला काढलास ? माझ्या मानेवर अगोदर ठेव—मग गाईच्या— पण हें काय सुरा तिच्या, हिच्या घरधनीणीच्या आणि गाईच्या गळ्यावर एकदम फिरला, मग माझ्यावरच कां नको ? मीहि आपटतों तुझ्या पायांवर डोकं!...!"

# मोटारीचा नंबर

विश्राम मॅन्शन्—ठाणा,
ऑगष्ट ३,—

प्रिय रुस्तुम,

शेवटीं तुझ्या म्हणण्याप्रमाणें झालें एकदांचें ! मलाहि घोडयाच्या गाडीचा कंटाळाच आला होता. गेल्या बुधवारीं मुंबईहून माझी मोटार येऊन तर थडकली. मला मोटरीसंबंधीं विशेषशी माहिती नाहीं. येत्या तीस तारखेपर्यंत एकदां तरी येथें येऊन जा, म्हणजे आपण मोटार चालवून पाहूं. मी माझ्या एका ओळखीच्या गृहस्थाकडून मोटारड्रायव्हर आणावयाची तजवीज केली आहेच. इतक्यांत आलास तर फारच बहार होईल. कारण माझी मोटार नवीन आणि मी चालविणाराही नवीनच; म्हणून अपघात होण्याचा संभव फार ! तेव्हां तूं असलास म्हणजे अपघात होण्याची धास्ती अमळ कमी होईल. तरी तुझा या बाबतींत काय विचार आहे, तें कळीव.

तुझा—
दिनशाह

ता. क.—

मोटारीला नंबरप्लेट आवश्यकच आहे काय ? प्रत्येक मोटारीच्या मागच्या बाजूला नंबरप्लेट लावलेली दिसते खरी, पण माझ्या मोटारीला नंबर नव्हता. हा नंबर कोठें विकत मिळतो, तें कळवावें.

---

फोर्ट, मुंबई,
आगष्ट ५,—

प्रिय दिनशा,

माझें म्हणणें अखेरीला तुला पटलें म्हणावयाचें. मी तीस तारखेलाच बहुतकरून येईन. येण्यापूर्वी तुला आगाऊ पत्र पाठवीनच.

मोटारीला नंबर अवश्य पाहिजे, असा कायदा आहे. मोटारीची नंबरप्लेट स्थानिक अधिकाऱ्यांकडूनच मिळते.

तुझा
रुस्तुम.

---

विश्राम मॅन्शन्—ठाणा,
ऑगस्ट २८.–

प्रिय रुस्तुम,

तुझें पत्र पोहोंचलें. तें आल्यापासून गेले पंधरा-वीस दिवस मीं येथल्या निरनिराळ्या अधिकाऱ्यांकडे चौकशी केली, परंतु तीपासून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. तूं आपल्या पत्रांत, कोणत्या ऑफिसांत अथवा कोणत्या स्थानिक अधिकाऱ्याकडे मोटरची नंबरप्लेट मिळते तें कळविलें नाहींस, आणि त्यामुळें मला कितीतरी त्रास सोसावा लागला. मला किती त्रास पडला, त्याचें सविस्तर वर्णन मी या पत्रांत करीत नाहीं. पुढें काय करावें, हें ठाऊक नसल्यामुळें मी मुंबईतल्या बहुतेक मोठमोठ्या सरकारी ऑफिसांत मोटर गाडीच्या नंबर प्लेटीकरितां अर्ज ठोकून दिले आहेत; त्यांतला एकादा तरी लागू पडणार, हें खास. खरें म्हणशील तर मोटर आल्यापासून ती चालवून पहाण्याची मला अत्यंत उत्कंठा लागून राहिली आहे. नंबरप्लेट येईपर्यंत मोटर तशीच डांबून ठेवणें मला कांहीं बिलकूल पसंत नाहीं. तुला मी एक गुप्त गोष्ट सांगतों. तिच्याबद्दल वाच्यता मात्र करूं नको हो ! मीं एक सुरेख नंबर प्लेट तयार करवून घेतली असून ती मोटर मागें लटकावून हळुहळू मोटर फिरविण्यालाहि सुरवात केली आहे. नंबरप्लेटीवर मी १२३४ हा नंबर धडकावून दिला आहे. १, २, ३, ४, हे आंकडे दिले आहेत ओळीनें ठेवून झालें ! माझी नंबरप्लेट खोटी असली, तरी मला कोणींहि मोटर फिरविण्याला आडकाठी करीत नाहीं. तूं लवकर इकडे यावेंस, अशी माझी इच्छा आहे. काय तें जरूर कळव.

तुझा
दिनशा.

---

फोर्ट, मुंबई
आगस्ट २९,–

प्रिय दिनशा,

तुझें पत्र वाचून मी स्तंभितच झालों ! अरे, वाटेल तो नंबर मोटरीवर लावण्यानें केवढा अनर्थ होईल, याची तुला कल्पनाहि नाहीं !

मोटर रजिस्टर करून घेईपर्यंत रस्त्यावर ती बिलकूल फिरवूं नकोस. ‘ स्थानिक अधिकाऱ्यांकडे ’ या माझ्या मागच्या पत्रांतील शब्दाचा अर्थ तुला न कळण्याइतकें तुझें डोकें बथ्थड असेल, अशी माझी कल्पना नव्हती ! स्थानिक जेथें तूं मोटर खरेदी केलीस तेथल्या, म्हणजे मुंबईतल्या. मला अधिक कांहीं लिहिण्यास तूर्त सवड नाहीं. एक अतिशय महत्त्वाचा खटला माझ्या हातीं असून त्याकडेच माझें सारें लक्ष्य सध्यां वेधलें आहे. तूर्त ठाण्याला यावयाला मला सवड होणार नाहीं.

तुझा
**रुस्तुम.**

---

**विश्राम मॅन्शन्—ठाणा,**
सप्टेंबर १,–

प्रिय रुस्तुम,

तुझें पत्र पोहोंचलें. भारी बोवा तूं विचक्षण ! जेव्हां तेव्हां उपदेशाचीं लांबलांब भेंडाळीं तूं माझ्या अंगावर फेंकतोस, याचा अर्थ काय ? माणसांत कांहींतरी धाडस हें पाहिजेच. त्याशिवाय आयुष्यांत काय मजा आहे ? मीं खोटी नंबरप्लेट लावूनच बेलाशक मोटर चालवितों. अजूनपर्यंत तरी पोलिसनें मला कांहीं केलें नाहीं. काल मात्र थोडीशी एक मौज झाली.

काल मी मोटर वेगानें दौडीत असतां—आतां मला ती चांगलीच चालवतां येऊं लागली आहे—समोरून एक इसम गुंगतगुंगत येत होता. मीं एकदोनदां हॉर्न वाजविलें; पण शेवटीं त्याला धक्का देऊन मोटर गेलीच ! कदाचित् तो पडला असेल, पण विशेष काळजी करण्यासारखें कांहीं नाहीं.

तुझा
**दिनशा.**

"**मोटरचा अपघात**—काल रोजीं ठाणें येथील रस्त्यावर एक मनुष्य मोटरीखालीं सांपडून जखमी झाला. मोटर अतिशय वेगांत असल्यामुळें भरधांव निघून गेली. पण जखमी मनुष्यानें मोटरीचा नंबर लक्ष्यांत ठेऊन पोलीसला कळविला आहे. मोटरीचा नंबर १२३४ हा आहे. जखमी इसमाला तेथील हॉस्पिटलांत नेण्यांत आलें आहे."

सुरत,
सप्टेंबर ३,—

प्रिय जरबानू,

परवांच्या 'सांज वर्तमान' मध्यें आलेल्या ठाण्याच्या मोटरीच्या अपघाताची बातमी वाचल्यापासून मला फार काळजी लागून राहिली आहे. १२३४ नंबरची मोटर तुझीच आहे, हें माझ्या पक्कें लक्षांत आहे. तुझा मोटर ड्रायव्हर दारू प्याला होता कीं काय? तूं अगोदर ठाण्याला गेली होतीस कशाला? जखमी इसमानें मोटरीचा नंबरहि पोलिसला कळविल्याचें मी वाचलें. आतां या प्रकरणाचा परिणाम काय होणार, याबद्दल मला अतिशय भीति वाटत आहे. सर्व हकीगतीचें पत्र ताबडतोब पाठीव. वाट पहात आहें.

तुझी मैत्रीण,
**आयमाय परेख.**

**जसमाईन व्हिला, चौपाटी मुंबई,**
सप्टेंबर ६,—

प्रिय आयमाय,

मला तुझें पत्र येण्यापूर्वींच पोलीसचें समन्सहि लागू झालें होतें. गेल्या ३० तारखेला ठाण्याला माझ्या मोटरखालीं एक गृहस्थ जखमी झाल्याची हकीगत सर्वस्वी खोटी आहे. मी गेल्या ३० तारखेला—नव्हे त्या सबंध आठवड्यांत मुंबईच्या बाहेर कोठेंच गेलें नव्हतें. हा खोटा आरोप मजवर पोलीसकडून करण्यांत यावा, हें मला कळत नाहीं. मी माझ्या सॉलिसिटर्सना या बाबतींत कळविलें आहे. माझी तर अक्कल अगदीं गुंग होऊन गेली आहे. कारण, माझ्या मोटरचा नंबर BOM. 1234 हा आहे खरा, आणि मला फार भीति

वाटते ती यामुळें कीं यापूर्वी एकदोन वेळां वाजवीपेक्षां फाजील वेग मोटरीला दिल्याबद्दल मला पोलीसकडून ताकीद देण्यांत आली होती. तो पुरावाहि आतां पोलीसतर्फे पुढें करण्यांत येईल. या संकटांतून सुटण्याचा तुला कांहीं मार्ग सुचत असल्यास मला जरूर कळीव.

तुझी मैत्रीण,
**जरबानू मुल्ला.**

---

**विश्राम मॅन्शन्–ठाणा,**
सप्टेंबर ८,—

प्रिय रुस्तुम,

मुंबईहून माझी नंबरप्लेट आली असून तीवर १२८४ हा नंबर आहे. पूर्वीचा नंबर काढून त्याच्या जागीं मी तो लावला आहे. या रविवारीं तरी येण्याला तुला सवड होईलना.

तुझा
**दिनशा.**

---

**फोर्ट–मुंबई**
सप्टेंबर ११,—

प्रिय दिनशा,

तुझें पत्र पावलें. तूं समजतोस तितका निर्धास्त खास नाहींस. भलताच नंबर लावून अगर रजिस्टर नंबर लाविल्याशिवाय मोटर फिरवूं नकोस, असें मी पहिल्यापासून तुला बजावीत होतों; पण तूं माझ्या सांगण्याकडे लक्ष्य दिलें नाहींस. त्याचा भयंकर परिणाम कोणाकोणाला भोगावा लागत आहे, याची तुला कल्पनाहि नसेल. तूं जो नंबर आपल्या मोटारला लटकाच लटकावला होतास, तो मुंबईतील एक श्रीमंत बाई–मिस जरबानू मुल्ला–यांच्या मोटरीचा रजिस्टर नंबर होता. तुझ्या मोटरीच्या धक्क्यानें जखमी झालेल्या इसमानें तुझ्या मोटरीचा नंबर लक्ष्यांत ठेवला, वगैरे हकीगत तूं वर्तमानपत्रांत वाचली असशीलच. मिस्. जरबानू यांना पोलीसचें समन्सहि लागू झालें असून त्यांच्या सॉलिसिटर्सनीं ती केस माझ्याकडेच आणली होती. परंतु या केसमधील खरा गुन्हेगार कोण

असावा, हें मला पूर्णपणें माहीत असल्यामुळें ती केस मी घेतली नाहीं. माझी ही मोठ्या प्रतीची केस तुझ्यामुळें गेली! आज जरी तुला या प्रकरणासंबंधीं विशेष धास्ती वाटत नसली, तरी तें तुझ्यावर शेकणार हें खास. बिचारी मिस जरबानू तुझ्या मूर्खपणामुळें संकटांत सांपडली, याबद्दल मात्र मला वाईट वाटतें. मी इतक्यांतच कांहीं कारणाकरितां बाहेरगांवीं जाणार आहें, त्यामुळें, मला तुला कांहीं दिवस पत्र पाठवितां येणार नाहीं.

तुझा
**रुस्तुम.**

---

**विश्राम मॅन्शन्—ठाणा,**
सप्टेंबर १२.—

प्रिय रुस्तुम,

मी निर्धास्त होऊन स्वस्थ बसलों होतों, त्याला तसेंच सबळ कारण होतें. ती वर्तमानपत्रांतील बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर माझ्या मोटरची नंबरप्लेट मुंबईहून आली, व ती मीं मोटरला लावलीहि. यामुळें माझ्याविषयीं पोलिसला कांहीं अंदेशा येईल असें मला वाटलें नव्हतें. परंतु तूं मला जी दहशत घालीत आहेस, ती खरीच असेल, तर मात्र मला धडगत दिसत नाहीं. यांतून कसें पार पडावयाचें तें तूंच मला शिकव. आतां मीं सगळा भरिभार तुझ्यावर टाकिला आहे.

तुझा
**दिनशा.**

---

**विश्राम मॅन्शन्—ठाणा.**
सप्टेंबर १६,—

प्रिय जहांगीर,

मी एका मोठ्या अडचणींत सांपडलों आहें. आतांपर्यंतची सर्व हकीगत व रुस्तुमचें पत्र हीं सर्व सोबत तुजकडे पाठविलीं आहेत. रुस्तुमला मी विशेष खुलाशाकरितां पत्र पाठविलें होतें, पण त्याजकडून उत्तर नाहीं. मी स्वतः फोर्टमधील त्याच्या ऑफिसांतहि जाऊन आलों, परंतु तो भेटला नाहीं. अशा आणीबाणीच्या वेळीं मला सोडून तो कोठें गेला आहे, कांहीं कळत नाहीं. रुस्तुमचें हें वर्तन

अगदींच चमत्कारिक दिसतें. केव्हां केव्हां तो लहरी माणसासारखा वागतो तो असा! तूं तरी मला या संकटाच्या वेळीं मदत करशील, अशी मला फार आशा आहे. मी आतां सर्वस्वीं तुझ्यावर अवलंबून आहे. तुझ्या पत्राची वाट पहात आहें.

तुझा

**दिनशा कॉन्ट्रॅक्टर.**

---

**ठाकुरद्वार, मुंबई,**

सप्टेंबर १७—

प्रिय दिनशा,

तुझें पत्र मिळालें. मी देखील वर्तमानपत्रांत ही जाहिरात वाचली होती; पण यांत तुझें कांहीं अंग असेल, असें मला वाटलें नव्हतें. नाहीं तर मी याची तजवीज पूर्वीच केली असती. पुढची हकीकत तुला कदाचित् कळली नसेल. पोलीसांनीं मिस जरबानू मुल्ला यांच्यावर फिर्याद गुदरली आहे. परंतु तिच्या बॅरिस्टरनें मुदत मागून घेतल्यावरून तारीख १ आक्टोबरपर्यंत ती लांबविण्यांत आली आहे. मी स्वतः या प्रकरणाचा बराच विचार करून पाहिला, त्यावरून मला असें वाटतें, कीं, मोटारच्या रजिस्टर नंबराकरितां तूं मुंबईतलि बऱ्याच ऑफिसांत अर्ज केले आहेस, ते जर उघडकीस आले, तर तूं यांतून सुटणें अगदीं अशक्य आहे! फौजदारी खटल्यांत माझी गति विशेष नसल्यामुळें या प्रसंगीं मजकडून तुला फारशी मदत होणें शक्य नाहीं, याबद्दल तूं मला दोष देणार नाहींस, अशी आशा आहे.

याशिवाय माझ्या हातून होईल ती मदत करण्यास मी केव्हांहि कसूर करणार नाहीं, हें तुला ठाऊक आहेच.

तुझा

**जहांगीर डावर,** वकील.

ता. क.—तुला एक अशी सूचना करावीशी वाटते, कीं, तूं जरबानू मुल्ला यांना प्रत्यक्ष अगर पत्रद्वारें मदत करण्याची तयारी दाखविणें, हें तुझें कर्तव्य आहे. तूं चतुर्भुज झाला नाहींस तर तिला शिक्षा होणारच! तिला बचाविणें हें तुझें मनुष्य या नात्यानें कर्तव्य आहे.

या पत्रासोबत मिस् जरबानूला पाठवावयाच्या पत्राचा एक मसुदा पाठवीत आहें. त्या आशयाचें तूं तिला पत्र पाठवावें अशी माझी सल्ला आहे. पोलिस कोर्टांत चतुर्भुज होण्याऐवजीं तिच्या बंगल्यावर चतुर्भुज होण्याचें, मला वाटतें, तुला मनापासून आवडेल. तूंहि श्रीमंत आहेस, तीहि श्रीमंत आहे. तूंहि अविवाहित आहेस, तीहि अविवाहित असून शिवाय तरुण आणि रूपवती आहे.

---

**विश्राम मॅन्शन्—ठाणा,**
सप्टेंबर १८,—

मिस् जरबानूबाई मुल्ला, यांसः—

आपल्यावर पोलिसनें जो आरोप आणला आहे, त्यासंबंधी बातमी नुकतीच मला समजली.

या बाबतींत शक्य ती मदत आपणाला करावयाला मी तयार आहें, आणि हें कळविण्यासाठीं मी हें पत्र मुद्दाम लिहीत आहें.

ज्या दिवशीं आपल्या मोटारीखालीं अपघात झाल्याचा पोलिसनें आपणावर आरोप आणला आहे, त्याच दिवशीं, त्याच रस्त्यावर तसाच अपघात माझ्याही मोटरीखालीं झाला. माझ्या मोटरीचा 1284 हा नंबर असून त्यांतील 8 हा इंग्रजी आंकडा मोटारीच्या वेगामुळें त्या जखमी इसमाला 3 असा वाटला असावा; आणि यामुळेंच विनाकारण हा आरोप आपल्यावर आला असावा, असा माझा तर्क आहे. अन्यायानें दुसऱ्याला संकटाच्या तोंडीं देऊन आपण स्वस्थ बसावें ही गोष्ट माझ्या मनाला लागून राहिली आहे. म्हणून या बाबतींत माझ्याकडून आपणाला कांहीं मदत होण्यासारखी असल्यास ती मी आनंदानें करीन. आपण आज्ञा केल्यास आपल्या सेवेस पाहिजे तेव्हां हजर राहीन.

आपला नम्र सेवक,
**दिनशा पेस्तनजी कान्ट्रॅक्टर.**

---

**ठाकुरद्वार-मुंबई**
सप्टेंबर १८,—

प्रिय रुस्तुम,

तुझें पत्र मिळालें. तूं मला सुचविल्याप्रमाणें मीं दिनशाला पत्र लिहिलें आहे. आतां काय गंमत होते ती पाहूं. तुझ्या ऑफिसांत जाऊन स्वारी हात हलवीत

परत गेल्याचें कळलें. त्याचें पत्र मी या सोबत पाठवीत आहें. तुझ्या कल्पने-प्रमाणें सर्व कांहीं घडून आलें. मी त्याला पाठविलेल्या पत्राची नक्कलहि सोबत पाठविली आहे.

तुझा
**जहांगीर डावर.**

---

**जसमाइन व्हिला, चौपाटी-मुंबई.**
सप्टेंबर १९,—

मि. दिनशा पेस्तनजी कॉन्ट्रॅक्टर, यांसः—

आपलें पत्र मिळालें. अप्रामाणिक लोकांनीं भरलेल्या या दुष्ट जगांत आपल्या-सारखे प्रामाणिक महात्मेहि आहेत, म्हणून हें जग चाललें आहे! आपल्या जागीं दुसरा कोणी असता, तर परस्पर काय होतें आहे तें पहात निमूट बसला असता. परिणाम काय होईल इकडे बिलकूल लक्ष न देतां मला मदत करावयाला परो-पकार बुद्धीनें आपण पुढें सरसावलां, याबद्दल मी आपली फार आभारी आहें. शक्य तितक्या लवकर आपण मला आपल्या दर्शनाचा लाभ देण्याची कृपा करावी, अशी आपणाला माझी नम्र विनंति आहे. म्हणजे आपणां दोघांनांहि यांतून बाहेर पडण्याचा कांहीं इलाज करतां येईल कीं काय तें पाहूं.

आपली उपकारबद्ध,
**जरबानू मुल्ला.**

---

**विश्राम मॅनशन्-ठाणा.**
अक्टोबर ५,—

प्रिय रुस्तुम,

तूं आणि जहांगीरनें मला न कळत बेत करून तो पार पाडला, त्याबद्दल मी तुमचा आभारी आहें. तुमच्या बेताप्रमाणें त्या खटल्यांतून आह्मी दोघेंहि सुटलों, व तेव्हांपासून आमचें विशेष संघटन झालें. आमच्या विवाहाचा वाङ्निश्चय परवां होण्याचें ठरलें आहे. या आनंदाच्या प्रसंगीं आपणा सर्वांना माझी जरबानू पार्टी देणार आहे. तुम्ही माझे स्नेही, असें तिला कळल्यावरून तिनें आपल्या तर्फे

तुम्हांला विनंति करण्यास मलाहि सांगितलें आहे. तरी अवश्य यावें. भेटीअंतीं विशेष बोलूं.

तुझा
**दिनशा.**

---

**फोर्ट–मुंबई.**
अक्टोबर ७,—

प्रिय दिनशा,

मोटरीच्या नंबरानें शेवटीं तुझें हितच होऊन तो तुला लॉटरीचा नंबर झाला, हें पाहून फार समाधान झालें. जरवानूच्या पार्टीला आम्ही उभयतां अगत्य येऊं.

तुझे
रुस्तुम.
जहांगीर.

# टिपकागद

मी आश्चर्यानें म्हणालों " त्यानें पत्र लिहिलें, त्या वेळीं तुम्ही त्या घरांत देखील नव्हतां. खोलीला आंतून कडी लावून घेऊन तें पत्र लिहिल्यावर पाकिटांत बंद करून आणि वर सील करून त्यानें तें स्वतः पोस्टांत टाकिलें होतें. असें असतां त्यानें काय लिहिलें, हें तुम्हाला कसें समजलें ? "

डिटेक्टिव्ह भवानराव जरा स्मित करून म्हणाले " यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं ! थोडेंसें ग्लिसरिन् त्याच्या दौतींत टाकण्याची, अन् एक स्वच्छ टिपकागद जवळ ठेवण्याची तजवीज मीं आगाऊच करून ठेविली होती. माझ्या शोधाची खरी गोम यांतच आहे. तो घाईघाईनें पत्र लिहायला येईल, असें मला वाटलेंच होतें. शाईंत ग्लिसरिन् मिसळल्यामुळें लिहिलेलें पत्र वाळून जाण्यास बराच वेळ लागणार, आणि म्हणूनच तें लवकर सुकविण्याकरितां जवळच्या टिपकागदावर त्यानें तें दाबल्यावर त्याचा ठसा जशाचातसा उमटणार, हें धोरण मी पूर्वींच बांधलें होतें; आणि त्याप्रमाणेंच सारें घडून आलें. हा पहा तो टिपकागद. हा आरशासमोर धरा, कीं तुम्हाला सर्व मजकूर जशाचातसा वाचायला मिळेल. हाच तो त्याचा गुप्तसंदेश ! "

मोठ्या सावधगिरीनें आणि शिताफीनें रचलेल्या भयंकर कारस्थानाचा स्फोट करणारा तो गुप्त संदेश होता; पण अखेरीला त्याला टिपकागद भोंवला !

---

विलासभुवन,
प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई,
ता. २६ सप्टेंबर १९१ .

प्रिय कमलाताई,

'गुप्तसंदेश' ही नवीनच प्रसिद्ध झालेली कादंबरी तूं वाचलीस का ? नसल्यास ती अवश्य वाच. खरोखरच ती फार सुंदर आहे. त्यांत एक गुप्त रहस्य अखेरपर्यंत कायम ठेविलें असून शेवटीं केलेला त्याचा खुलासा इतका साधा आणि

सरळ आहे, कीं, पुस्तक वाचीत असतां तो कोणाच्या ध्यानींमनींहि येत नाहीं. शाईंत ग्लिसरिन् मिसळून, तिनें लिहिलेला मजकूर लवकर वाळणार नाहीं अशी तजवीज करावयाची, व तो मजकूर टिपकागदानें टिपावयाला सहजगत्या लावावयाचें, व त्यावरून गुन्हेगाराचें रहस्य ओळखून काढावयाचें, ही त्या कादंबरींतील अगदीं साधी पण अजब युक्ति आहे.

ताई, तुझ्यासारख्या जिवलग मैत्रिणीला मनांतले गुप्त विचार कळवावयाचे नाहींत, तर कोणाला बरें कळवावयाचे ? 'गुप्तसंदेश' मधल्या नवीन युक्तीचा प्रयोग करण्याचें मी योजिलें आहे. तें कसें तें मी तुला लिहीत आहे.

एका वर्षाच्या अवधींत तिकडच्या स्वभावांत बराच फरक पडलेला दिसतो. एक छानदारशी शाल मला पाहिजे आहे, म्हणून मी कितीतरी दिवस सारखी पाठीला लागलें आहें; पण ती कांहीं अजून मला मिळत नाहीं ! 'जरूर नसलेल्या वस्तु उगीच कशाला घ्याव्या ?' या पुरुषांच्या ठराविक उपदेशाचा मारा मजवर होत आहे. माझ्या एकदोन बऱ्यापैकीं शाली आहेत खऱ्या, पण ताई, सांठ्याला एकादी तरी ठळकशी शाल नको का ? आमच्या शेजारची ती सरोजिनी किती सुंदर सुंदर शालू वापरते ! तिच्या नवऱ्याला कांहीं इकडच्याइतकी प्राप्ति नाहीं. इकडे दवाखान्याचा पगार आणि शिवाय खासगी प्रॅक्टिस असते ती निराळीच ! पण खर्चाची ही अशी सदा भुणभूण ! बरें, ही काटकसर म्हणावी तर–तर–लहान तोंडीं मोठ्या घांसाप्रमाणें दिसणाऱ्या गोष्टी आम्ही नये बोलूं, तरी पण बोलतेंच–कपड्यांवर कपडे त्या कंपनीकडून येतात, आणि पुढें वॉशिंग कंपन्यांचीं इतकीं बिलें भरावीं लागतात त्याचें मात्र कांहींच नाहीं हो ! एरवीं तिकडचा स्वभाव किती प्रेमळ आहे, हें कांहीं तुला मी आतांच नव्यानें सांगितलें पाहिजे असें नाहीं. कालच मी शालीबद्दल पुनः बोलणें काढलें, तर कालपर्यंतचा सारा खर्च मला वाचून दाखविला. पण काय मी शाल मागितली नाहीं म्हणजे सारा खर्च वांचतो आहे ? खरें म्हटलें तर इतकी कांहीं काटकसर करायला नको आहे. शाल ती मेली काय, आणि तिचें एवढें पुराण तें काय ! पण इथें आल्यापासून मी खरेदी केलेल्या साऱ्या वस्तूंची यादी जेव्हां नोटबुकांतून मला वाचून दाखविली, तेव्हां मात्र मला भारी आश्चर्य वाटलें, आणि वाईटहि वाटलें. माझ्याच वस्तूंची इतकी काळजीपूर्वक लिहून ठेवलेली यादी

पाहिल्यापासून मलासुद्धां त्या कपड्यांच्या प्रकरणांत हात घालावा असें वाटूं लागलें आहे.

आजच त्या मेल्या कंपनीचा माणूस गेल्या दोनतीन महिन्यांचें कपड्यांचें बिल घेऊन यावयाचा आहे. त्या वेळीं त्याला दिलेले पैसे नोटबुकांत मांडून ठेवावयाला होईल. ' गुप्तसंदेशां 'तल्याप्रमाणें मी कपाटांतल्या बाटलींतलें थोडेंसें ग्लिसरिन् दौतींतल्या शाईंत घालून ठेवतें, आणि जवळच अगदीं कोरा टिप कागद ठेवून देतें, म्हणजे मजा होईल—मला बिलाचा आंकडा बरोबर कळणारच ! मी आतां लवकरच शालीचा विषय मुद्दाम काढीन. मग जेव्हां खर्चाचा पाढा वाचावयाला होईल, तेव्हां मीहि कपड्यांच्या बिलाचा बरोबर आंकडा चटकन् काढून दाखवीन, आणि स्वारीला चकित करून सोडीन. मला तो आंकडा अचूक कसा कळला, याचें स्वारीला एक कोडेंच वाटेल, आणि त्याचा मी उलगडा केल्यावर स्वारीचा जो आश्चर्यचकित चेहरा होईल, तो मला आतांच दिसत आहे ! असल्या गोष्टींत थोड्याशा युक्तीचा जसा उपयोग होतो, तसा जंगी वादविवादाचा होत नाहीं. उगीच शब्दानें शब्द वाढावयाचा ! म्हणून मी ' गुप्तसंदेशां 'तील ही टिपकागदाची युक्ति करून पहावयाचें ठरविलें आहे. त्याचा परिणाम काय होतो तो तुला लवकरच कळवीन.

तुझी जिवलग मैत्रीण

**मालती.**

---

......' जन्माची गांठ '......अशा पत्नीशीं या ' जन्माच्या गांठी 'नें बद्ध होऊन मला तीनचार वर्षें झालीं...त्याबद्दल मला पश्चात्ताप करण्याचा प्रसंग...आला...सर्व...ठाकठीक असल्याचें कांहीं लोक भासवितात. कांहीं तर अंतर्यामीं दुःखी असूनहि आजूबाजूचे लोक काय म्हणतील या भीतीनें बाहेरून खरें संसारसुख उपभोगीत असल्याचा आव आणतात. ते तसें करोत बिचारे ! पण मीं जें लिहिलें आहे तें अगदीं अक्षरशः खरें आहे. त्यांत असत्याचा लेशहि नाहीं.

आपला

**श्यामकांत.**

---

[ २ ]

**विलासभुवन,**
प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई,
ता० १ ऑक्टोबर १९१

प्रिय कमलाताई,

तुझें पत्र वाचून फार आनंद झाला. तूं विचारलेली हकीगत माझ्या अंदाजाप्रमाणें घडून आली नाहीं. करावयाला गेलें एक, आणि झालें भलतेंच !

त्या दिवशीं कंपनीचा बिलवाला ठरल्याप्रमाणें आला नाहीं. पण स्वारीला एका मित्राचें लग्न ठरल्याची बातमी समजल्यावरून त्याला पत्र लिहिण्याची घाई होती. मीं तयार ठेविलेल्या टिपकागदावर बिलाऐवजीं तें पत्रच उमटलें ! तें पत्र बरेंच लांब असावें. त्याचा आरंभींचा बराचसा भाग सुकून गेला होता, आणि स्वारी निघून गेल्यावर मी आंत जाऊन पाहिलें, तेव्हां टिपकागदावर त्या फक्त अखेरच्या थोडयाशा ओळी उमटलेल्या दिसल्या. परंतु तितक्यावरूनहि आम्हां गरीब अबलांविषयीं पुरुष आपापसांत कसे उद्गार प्रकट करतात, त्याची मला चांगलीच कल्पना आली. त्या पत्रांत लग्न करणें अगदीं चुकीचें आहे, असा आपल्या मित्राला मोठ्या आढयतेनें उपदेश करावयाला झाला आहे. स्वतःविषयींचा खराखरा अनुभव लिहिला आहे. ताई, तो अनुभव काय असावा असें तुला वाटतें ? हाय ! माझ्या बरोबर 'जन्माच्या गांठी'नें बद्ध होऊन गेल्याबद्दल स्वारीला होत असलेला पश्चात्ताप, हाच तो अनुभव !

आतां हें मला कबूल केलें पाहिजे, कीं, पूर्वीपेक्षां हल्लीं कांहीं लहानसहान किरकोळ बाबतींत आमचा दोघांचा मतभेद होतो; पण त्याच्यासाठीं खर्चाची काटकसर करण्याची कुरापत काढणें, किंवा कांहीं कांहीं गोष्टी मला न कळवितां गुपचूपपणें करणें–आणि सध्यां तर तसाच प्रकार चालला आहे–असें कांहीं कांहीं करावयाला नको होतें. आतांशा तर किती रात्रपर्यंत तरी घरीं येणेंच होत नाहीं. माझ्या सगळ्या प्रश्नांना 'रोग्यांची तपासणी' हें आपलें एक ठराविक उत्तर !

हा 'विवाहसौख्याचा बहाणा' इतका बेमालूमपणें आजपर्यंत केला, कीं, त्या टिपकागदानें माझे डोळे उघडले नसते, तर हा विवाहसौख्याचा 'बहाणा' असल्याचें, आणि तिकडे माझ्याशीं 'जन्माची गांठ' पडल्याबद्दल झालेल्या

पश्चात्तापाचें मला स्वप्न देखील पडलें नसतें. स्वतःचें हस्ताक्षर दिसलें नसतें, तर मीं त्या पत्रांतील मजकुरावर—टिप-कागदावर देखील विश्वास ठेवला नसता. अशा गोष्टींवरून इतकेंच सार घ्यावयाचें, कीं, पुरुष विश्वासाला कधींहि पात्र नसतात.

मी याविषयीं तिकडे चकारशब्दहि बोललें नाहीं. त्यापासून कांहीं निष्पन्न होणार नाहीं. मीं विचारलेंच तर मला स्पष्ट नकार मिळेल, आणि फारच झालें तर ' वसंतरावाला तें मी सहज मौजेनें लिहिलें झालें, ' अशी बतावणी होईल.

---

...तिला मी आश्वासन देऊनहि मोकळा...तिच्याकडे जर माझा शब्द गेला नसता....हिची आणि...ची पूर्वींची ओळख तेव्हां तिला...येत नाहीं. एरवीं तुम्हीं लिहितां त्याप्रमाणें ही...चांगली आहे. शिवाय मर्जी कशी सांभाळावी हें तिला चांगलेंच कळतें. ती स्वभावाची गरीब आहे, आणि आतां जर मीं माझा शब्द मोडला तर निराशा झाल्यामुळें तिला फार दुःख होईल. कळावें, लोभ असावा, हे विनंति.

आपला,
**श्यामकांत.**

---

[ ३ ]

**विलासभुवन.**
प्रिन्सेस् स्ट्रीट, मुंबई,
ता. १२ आक्टोबर १९१ .

प्रिय कमलाताई,

तुझें प्रेमळ पत्र मिळालें. मी तुला सारी हकीगत मूळापासून कळवित आलें म्हणून बरें झालें. तूं पूर्वींच्या पत्रांत प्रथमच जी कल्पना केली होतीस तीच अखेरीला खरी ठरली. या सगळ्याच्या मुळाशीं कोणीतरी एक स्त्री आहे. मला प्रथम या गोष्टीचा विश्वास वाटेना. पण त्याला तिकडच्याच एका पत्रानें पुरावा पुरविला. तुझा संशय खरा आहे. ताई, खरेंच या अनर्थाच्या मुळाशीं एक चांडाळीणच आहे !

आतांपर्यंत या टिपकागदानें आपल्या कृतीनें माझ्या मनांत तिकडच्याविषयीं

किल्मिष उत्पन्न केलें, म्हणून मी माझ्या कोत्या मनाची निर्भर्त्सना केली, आणि ग्लिसरिन मिसळलेली शाईची दौत बदलण्याकरितां तिकडच्या लिहिण्याच्या खोलींत गेलें. परंतु मी आंत जाण्याबरोबर टिपकागदावर एका नव्याच पत्राचा ठसा उमटलेला दिसला. नेहमीच्या सवयीला अनुसरून मी तो तत्काळ आरशासमोर धरला. माझा पहिला निश्चय ढळला. मला तो मोहच आवरला नाहीं. मला जें दिसलें, तें माझ्या दृष्टीनें अगदीं अशक्य, पण तुझ्या अंदाजाप्रमाणें मात्र बिनचूक घडून आलेलें आहे. पहिल्याप्रथम तर भ्रमिष्टासारखी माझी स्थिति झाली.

ज्या कोणी चांडाळणीनें आमच्या प्रेमावर बिब्बा घातला आहे, ती फारच दुष्ट आणि कांगावखोर नखरेबाज बाई दिसते. ‘ मर्जी सांभाळावयाला ’ पटाईत; अगदीं ‘ पहिल्या नंबरची ! ’ तिकडचं मनहि मधुनमधून हेलकावे खात असावेंसें दिसतें. पण पाय इतका खोलांत गेला आहे, कीं, तो आतां बाहेर काढणें बरेंच कठीण जात असावें; म्हणूनच स्वारीला वचनभंगाची भीति वाटत आहे ! ताई, पहा ही पुरुषांची नीतिमत्ता ! यांना वचनभंगाची केवढी तरी भीति वाटते ! त्या अवदसेची निराशा झाली, तर तिला फार दुःख होईल, म्हणून स्वारी फिकिरींत पडली आहे ! कदाचित् तुझ्या धोरणी आणि अनुभविक डोक्यांत या साऱ्या प्रकरणाचा अर्थ काय तें येत असल्यास पहा. तुझे विचार ऐकण्यास मी फार उत्सुक झालें आहें.

ही मायावी राक्षशीण कोण आहे, तें शोधून काढल्याशिवाय मला चैन पडणार नाहीं. म्हणूनच मी दौत बदलली नाहीं. उलट त्यांत आणखी थोडेंसें ग्लिसरिन् मिसळून आलें. जवळ दुसरा एक कोरा टिपकागदहि ठेविला आहे. आतां पुढें काय काय घडून येतें, तें पाहूं.

तुझी मैत्रीण

**मालती.**

---

...आंत...बाजूस ठेवावी...नेण्याची तजवीज करीन...त्या रात्रीं... मीं... पाहिलीं ती मनासारखी...मुळें फार पसंत...फार आवडेल...जशी पाहिजे तशीच आहे...छान आहे...सुरेख आहे; आणि पदर तरी किती झोंकदार ! तिचा बुट...हि सुंदर...आहे. तिचा प्रत्येक...देखील...पाहण्यासारखा आणि मनांत भरण्याजोगा आहे. मी येत्या शुक्रवारीं रात्रीं पुनः येईन तेव्हां...विषयीं काय तें ठरवूं. मात्र मला भेटण्याकरितां म्हणून जर आमच्या

घरीं आलांत आणि मी घरीं नसलों, तर यासंबंधीं तिच्याकडे एक अवाक्षरहि काढतां कामा नये! नाहीं तर सर्वच फसावयाचें. आमच्या या गुप्त व्यवहाराचा तिला संशय येत असावा, असें दिसतें. कारण आतांशा तिचें वर्तन फार शंकेखोर-पणाचें झालें आहे. म्हणून कदाचित् तिनें विचारलें, तरी तिला या गोष्टीचा सुगावा न लागूं देण्याबद्दल सावधगिरी ठेवा.

आपला,
**श्यामकांत.**

---

[४]

**विलासभुवन,**
प्रिन्सेस् स्ट्रीट, मुंबई,
ता. १७ आक्टोबर १९१...

प्रिय कमलाताई,

एक एक गोष्टी ज्या उघडकीला येत आहेत, त्या तर बुद्धीला गुंगच करून सोडतात! तिकडच्या हल्लींच्या कारस्थानाचें मूळ कोठें आहे तें आतां मला उमगलें, आणि तें एका पत्रावरूनच. त्या दिवशीं आमच्या रामागड्याला पेटींत टाकावयाला पत्र घेऊन जातांना मीं पाहिलें. त्याच्या हातून पत्र घेऊन वरचा पत्ता पाहिला, आणि मग लागलीच संधि साधून लिहिण्याच्या खोलींत गेलें, तर त्या नवीन पत्राचा ठळक ठसा टिपकागदावर उठला होता.

त्या पत्रांत मला त्या स्त्रीची बरीचशी माहिती मिळाली आहे. त्यावरून ती कोण आणि कशी असावी, याचा साधारणपणें तर्क करितां येईल. ती कोणीतरी नखरेबाज स्त्री आहे. काय पण तिचें वर्णन रसाळ केलें आहे म्हणत्येस त्या पत्रांत! तिचा पदर भारी झोंकदार, तिचा बूट फार सुंदर आहे हो ताई! तिच्या सर्वांगाचें अगदीं पाल्हाळानें वर्णन केलें आहे. तिचा प्रत्येक अवयव मनांत भरण्याजोगा आहे. रस्त्याच्या बाजूनें जातांना बरें-वाईट सर्वच त्यांच्या मनांत भरतें, असें या पुरुषांचें मन तरी कसलें असतें! पुरुषांची दृष्टि इतकी पापिष्ठ असेल, असें मला नव्हतें वाटलें!

मी लहानपणीं कोल्हापुरास माझ्या मावशीच्या घरीं जात असें. शेजारच्या कृष्ण-रावांचा शंकर आमच्या घरीं खेळावयाला येत असे. त्यानें कशीबशी मराठी चारपांच इयत्तांपर्यंत मजल गांठली; आणि पुढें मग सरस्वतीची इतराजी झाली

म्हणूनच कीं काय नकळे, त्याच्यावर लक्ष्मीची मर्जी बसली. शाळेला रामराम ठोकून त्यानें तडक मुंबईची वाट धरली आणि गिरगांवांत एका कापडाच्या दुकानांत तो नोकरीला राहिला. व्यापारांतली पुरी माहिती मिळविल्यावर आणि बऱ्याचशा मंडळीची ओळख झाल्यावर त्यानें लोकांकडून थोडेसे पैसे जमवून भागीनें कापडाचें दुकान उघडलें. दुकानाचा जम हळहळू चांगला बसला. थोडयाच दिवसांत त्यानें लोकांचे पैसे देऊन टाकले, आणि आतां एका टोलेजंग इमारतींत स्वतःचें जंगी दुकान उघडलें आहे. आतां ते मोठे 'शंकरराव क्लॉथ-मर्चंट' झाले आहेत. त्यांच्याशीं माझीच नव्हे तर तिकडची देखील पूर्वीपासूनच चांगली ओळख नव्हे तर गट्टीच आहे म्हणेनास. स्वारी शिक्षणाला पूर्वी आजोळीं कोल्हापुरास होती, आणि शंकररावांचें घर कोल्हापुरासच! त्यांचें आमच्याकडे बरेंच येणें जाणें आहे. त्यांची बायकोसुद्धां कधीं कधीं माझ्याकडे येते. किती गोड स्वभावाची आहे म्हणून सांगूं! हजारांत बायको आहे! पण हे पतिराज काय विचारावे! मुंबईत आल्याबरोबर सर्वच पुरुषांचा स्वभाव बदलतो. कीं काय ईश्वर जाणे! वर लिहिलेलें पत्र या शंकररावांनांच लिहिलें होतें; तेव्हां शंकरराव इतके 'दोस्तमहंमद' कां बनले, हें तुझ्या ध्यानांत येईलच!

परवां हे शंकरराव आमच्या बिऱ्हाडीं आले होते. लिहिण्याच्या खोलींत बराचवेळ दोघांचें कांहींतरी गुप्त खलबत चाललें होतें. मींहि बाहेरून दाराला कान लावला; पण मला कांहींच ऐकूं आलें नाहीं. मग दोघेहि बाहेर यावयाला उठले, तेव्हां मी चटकन् तिथून निघून आंतल्या दरवाज्यांत येऊन उभी राहिलें. मला तेथून निघतांना त्यांनीं पाहिलें कीं काय कोणाला ठाऊक! पण मला पहातांच दोघांचे चेहरे पालटलेले दिसले. शंकररावांपेक्षां स्वारींचीच अधिक चलबिचल उडालेली दिसली. शंकरराव तर नेहमींप्रमाणें 'कसें काय ताई, आतांशा ठीक चाललें आहे ना?' असें विचारल्याशिवायच निघून गेले, आणि तिकडून तर मीं विचारलें नसतांहि आपण होऊन स्वतःच "शंकर-रावाच्या भावाची प्रकृति एकाएकीं जरा अस्वस्थ झाली म्हणून तो मला बोलवा-यला आला होता, त्याला तपासायला जातों," असें सांगून एकदम जाणें झालें. खाई त्याला खवखवे! मी का कुणाला विचारलें होतें? चोराच्या मनांत चांदणें! पत्रांत लिहिल्याप्रमाणें स्वारी शुक्रवारीं रात्रीं झुकली, ती साडेअकरा होऊन गेले तरी परतली नाहीं; आणि मी विचारल्यावर सांगितलें 'रोग्याला तपासायला गेलों होतों.' हा रोगी कोणत्या रोगानें पछाडलेला आहे, हें तूं ताडलें असशीलच!

आम्ही बायका कितीहि भोळ्या असलों, तरी इतक्या दुधखुळ्या असूं, असें या पुरुषांना वाटतें तरी कसें ?

अशा स्थितींत मीं काय करावें, हेंच मला सुचत नाहीं. सगळ्या गोष्टी समजूनउमजूनहि आपल्याला जसें काय कांहींच कळलेलें नाहीं, असें दाखवून रोजच्यासारखें आनंदी रहाण्याचा प्रयत्न करावयाचा ! किती नाजुक स्थिति आहे ही ! मीं पुढें काय करावें तें तूंच मला शिकव. खरें विचारशील तर मी आतां दिवाळी झाल्यावर माहेरींच जाण्याचा निश्चय केला आहे !

तुझी
**मालती.**

---

[ ५ ]

**विलासभुवन.**
प्रिन्सेस स्ट्रीट–मुंबई,
ता. २६ आक्टोबर १९१...

प्रिय कमलाताई,

हें दिपवाळीचें पंचक संपण्यापूर्वी मध्येंच पत्र लिहिण्याची मी घाई कां केली, असें तुला वाटेल, पण घाई करण्यासारखें तसेंच कारण घडलें. ताई, आमची आतांपर्यंतची सारी इमारत संशयाच्या पायावर उभारली होती ! आमच्या साऱ्या कल्पना पोकळच होत्या. दिपवाळीच्या आधल्या दिवशींच एक बाई आमच्या घरीं आली; ती माझ्या ओळखीची होती. असें कशाला ? ती आमच्या घरची पूर्वींची सैंपाकीण राधाकाकू. मर्जी सांभाळणारी आहे खरी. आमची सध्यांची सैंपाकीण जाणार असल्यामुळें दुसऱ्या सैंपाकिणीची जरूरी होती, व त्यासाठीं तिकडून एकदोन ओळखीच्या गृहस्थांना विचारणें झालें होतें. त्याचा मीं तुला लिहिल्याप्रमाणें भलताच अर्थ केला ! केवढी चूक झाली माझी ही !

दुसरी गोष्ट ' जन्माच्या गांठीं'ची. वसंतरावांचें लग्न ठरलें, म्हणून त्यांना अभिनन्दनपर पत्र लिहिलें होतें, त्यांत ' मला लग्न केल्यापासून पश्चात्ताप करण्याचा प्रसंग कधींच आला नाहीं' असें लिहिलें होतें. या वाक्यांतील ' नाहीं ' वगैरे महत्त्वाचीं अक्षरें कशीं सुकून गेलीं, कोणाला ठाऊक ! अक्षरें दोनच, पण केवढा घोटाळा उडाला म्हणतेस ! दिपवाळीच्या दिवशीं, मुंबईचा दीपोत्सव पहाण्याकरितां वसंतराव आले होते, ते आमच्या घरीं आले. दोघांची भेट होऊन कुशलप्रश्न वगैरे झाल्यावर फराळ झाला. फराळ करतांना त्यांचा, विवाह करावा

कीं न करावा, या मुद्द्यावर वाद उपस्थित झाला, व त्यांतच इकडून पाठविलेल्या पत्राचा उल्लेख आला. वादाच्या भरांत 'तुम्हीं आपल्या पत्रांत असा असा मजकूर लिहिला नव्हता काय ?' असें वसंतरावांनीं विचारिलें. फराळ आटोपल्यावर तें पत्र मुद्द्याकरितां घेतलेलें टेबलावर पडलें होतें तें मी वाचून पाहिलें, तों सारा निराळाच मजकूर !

सैंपाकीणबाईच्या बाबतींत जी गोष्ट मी गृहीत धरली, तीच पुढचीं पत्रें टिपकागदावर उमटलेलीं वाचतांना माझ्या मनानें पक्की घेतली. त्यापासून सारा समजुतीचा घोंटाळाच झाला. अखेरच्या पत्रांत लिहिलेली हकीकत कोणाहि स्त्रीबद्दल नसून माझ्या शालीसंबंधींची होती. मी शालीसाठीं हट्ट घेतला होता, म्हणून माझ्या एका पत्रांत लिहिलेलें तुला आठवत असेलच. मला खर्चाचें कारण सांगून माझ्या पसंतीला उतरेल अशी छान उंची शाल गुप्तपणें खरेदी करण्याचा बेत शंकररावांच्या मसलतीनें चालला होता ! शंकररावांच्याच दुकानांत ती खरेदी केली, आणि काल दिपवाळीच्या दिवशीं स्वतःच माझ्या हातांत आणून दिली. मी ती उघडून पहातें, तों मला आंत एक पत्र दिसलें. इकडून शंकररावांना पाठविलेलें तें पत्र होतें. हीं सगळीं पत्रें मी तुला मुद्दाम या पत्रासोबत पाठवीत आहें. तीं वाचल्यावर माझ्या कमकुवत मनाचे कसे भलतेच ग्रह होत गेले, तें तुला कळून येईल. शाल खांद्यावर पडल्यावरोबर मला आनंद झाला खरा; पण तिकडे मीं भलतींच दूषणें दिलीं, याबद्दल माझें मन मला खाऊं लागलें. बिचाऱ्या शंकररावांवर देखील मी भलताच आरोप केला होता. तीं सारीं पत्रें तूं आतां फाडून टाक, आणि मीहि तुझीं फाडून टाकतें. नाहीं तर एकादें स्वारीच्या हाताला लागलें, कीं, भलतेंच व्हावयाचें !

खरोखर आपणां दोघींसारख्याच जर सगळ्याच बायका असतील, तर मनाच्या चंचल म्हणून स्त्री जातीवर जो शिक्का बसला आहे, तो सार्थ आहे, असेंच म्हणावें लागेल. तूंच पहा बरें ताई ! किती थोर स्वभाव तिकडचा ! माझ्यासाठीं सैंपाकीणबाई करितां आणि शालीकरितां इतक्या 'व्हिजिट्स' द्यावयाच्या असूनहि, स्वारीची कोण खटपट चालली होती, आणि इकडे मी कसले कुतर्क करीत बसलें होतें ! आतां ही झालेली सारी हकीगत एका गोष्टींत घालून आणि नांवें बदलून मी 'मनोरंजनां'त पाठविणार आहें. 'मनोरंजन' आमच्याकडे येत असतेंच. स्वारीनें ती वाचली, म्हणजे मोठीच मौज होईल; आणि शालीच्या गौप्याचा मला वचपा काढितां येईल. प्रसिद्ध होईपर्यंत मी मुळींच सांगणार नाहीं.

तुझी,

**मालती.**

# भिकाऱ्यास दान !

( १ )

**" नर नारी बाळें अवघा नारायण**
**ऐसें माझें मन करीं देवा ॥ १ ॥**

वरील अभंग अत्यंत प्रेमळपणें, अत्यंत मधुर सुरांत एकतारीवर म्हणत एक भिकारी भीक मागण्यासाठीं आला होता. संध्याकाळचा वेळ, सरासरी सहा वाजून गेले होते. पण गाणाराच्या गळ्यांतील कारुण्यानें ऐकणाराचें चित्त द्रवून जावें अशीच ती त्याची म्हणण्याची पद्धत होती.

गुणाकर हातांत पेन्सिल व मांडीवर बोर्ड घेऊन बसला. शेजारीं त्याचें स्केचबुकही तयार होतें. गुणाकराच्या मनांत एक सुंदर कल्पना आली होती आणि ती कल्पना त्याला चित्रित करावयाची होती. डाव्या हातावर मान ठेवून उजवीकडच्या खिडकीमधून समोरच्या आकाशांतील सायंकालीन अंतराळांतील सौंदर्यसंपत्तीकडे बघीत बसला असतां त्याच्या कानांत वरील अभंग पडला. त्याच्या चित्ताची एकतानता आधींच झाली होती, तशांत त्याच्या कानावर त्या अभंगांतील दुसरी ओळ आली.—

**" नको काम क्रोध द्वेष निंदा द्वंद्व**
**अवघा गोविंद निःसंदेह " ॥ २ ॥**

त्याची नजर अद्याप आकाशाकडेच लागली होती. पण अभंग–गीत मात्र कर्णावाटे हृदयांत प्रवेश करीत होतें. गुणाकर चित्रकार म्हणून प्रसिद्ध नव्हता. तो चित्रकलेचा अभ्यासक होता, त्या कलेचा त्यानें अभ्यासही केला होता. पण आपल्या चित्रांना त्यानें प्रसिद्धी दिली नव्हती. मात्र कविता व गोष्टी लिही, त्या त्याच्या मित्रांमार्फत निरनिराळ्या नियतकालिकांत प्रसिद्ध होत असत.

**असावें स्या सदा विषयीं विरक्त**
**काया वाचा चित्त तुझे पायीं ॥ ३ ॥**

ही ओळ तर त्या भिकाऱ्यानें अशी कांहीं आळवून आळवून म्हटली कीं

भक्तिरसाचा अंमल आसपासच्या वातावरणावर बसल्याशिवाय राहिला नाहीं; आणि भिकाऱ्याच्या समोर आणा, पैसा पडूं लागला. गुणाकराच्यानें आतां बसून राहवेना, तो उठला. कोटाच्या खिशांतून त्यानें पैशाचें पाकीट काढून उघडलें, पण पावलीच्या खालीं सुटें नाणें किंवा मोकळा पैसाच नव्हता. संध्याकाळची कातरवेळ, सोमवारचा दिवस, गरीब दीन भिकारी अनन्यभावानें पांडुरंगाचें नामसंकीर्तन भक्तिभावानें करीत दारांत उभा. अशा स्थितींत गुणाकरासारखा माणूस कमी अधिक विचार न करतां बाहेर आल्याशिवाय कसचा राहतो ? त्यानें ती पावली भिकाऱ्यासमोर टाकली.

भिकाऱ्याची ती दीन कारुण्यमूर्ति पाहून त्याचें चित्त द्रवलें. त्याच्याबरोबर एक लहानसा आठ नऊ वर्षांचा मुलगा होता. तो त्याला सूर देत होता. म्हाताऱ्याच्या हातांत एकतारी होती. पण ती त्याला कशी तोलतां आली असें पहाणारास वाटण्याइतका तो अशक्त दिसत होता. आंगावर लक्तरें होतीं त्यांनीं तर त्याच्या दारिद्र्याला अधिकच केविलवाणेपणा आणला होता. तो भिकारी आतां आपला अभंग संपवीत आला होता. तो शेवटचा चरण म्हणत होता.—

**" करोनियां साह्य पुरवीं मनोरथ**
**व्हावें कृपावंत तुका म्हणे " ॥ ४ ॥**

गुणाकरानें घाईघाईनें बाहेर येऊन आपल्या स्केचबुकावर त्याचें स्केच घ्यावयास सुरवात केली. आतां तो मुलगा जमिनीवर पडलेले पैसे वेंचून घ्यावयास लागला होता. गुणाकरानें कसें बसें घाईघाईनें स्केच तर पुरें केलें. डिटेल्स मागून सहज भरतां येतील. भिकाऱ्याच्या पदरांत इतक्यांत सहज रुपयाचा खुरदा जमला असावा. भिकारी तोच प्रेमळ अभंग म्हणून तुकोबारायांची आठवण जनसमाजास देत पुढें निघाला.

( २ )

एका गल्लींतील घराच्या आडबाजूस तो भिकारी व त्याचा मुलगा उभे होते.

" नऊ पैसे कमी दिसतात." भिकारी धमकावणीच्या आवाजांत म्हणाला.

" नाहीं बाबा !" लीनपणें डोळ्यांत आंसवें आणून त्या मुलानें म्हटलें.

" मान मुरगाळून टाकीन, × × × !" भिकाऱ्यानें शिवी हांसडून म्हटलें; आणि त्यानें मुलाच्या लंगोटींतून चांचपून कांहीं पैसे काढून घेतले,

" आई उपासांनीं मरायला टेंकली आहे ना ? " मुलानें म्हटलें.

" तर–तर ! ती × × अझून का राहिली मरायची ?" मुलानें रडायला सुरवात केली.

बापानें त्याच्या पाठींत दोन चार बुक्के लगावले !

" चल × × × ! अजून मला थोडे पैसे जमवायचे आहेत, चल नाहींतर इथल्या इथें टाकीन मारून तुला ! "

पोरगा निमूटपणें बापाच्या मागून निघाला. आणि लगेच लोकांच्या कानात एकतारीच्या सुंदर सुराबरोबर पुढील तुकोबांची सुंदर उपदेशवाणी मधुर आवाजांत गायिलेली कानावर आली—

**" नको काम क्रोध द्वेष निंदा द्वंद्व**
**अवघा गोविंद निःसंदेह !"**

किती कळकळीचा उपदेश तो !

( ३ )

रात्रौ नऊ वाजण्याचा सुमार झाला होता. गुणाकर फिरावयास गेला होता. तो फिरून घरीं येत होता. रस्त्यांत त्यास एका बोळापाशीं येतांच थांबावेंसें वाटलें. वास्तविकपणें त्याच्यासारखा माणूस त्या ठिकाणीं थांबला नसता. कारण तेथें दारूचें दुकान होतें. त्या दुकानांत यावेळीं बरीच गर्दी होती. तसल्या दुकानांत याच वेळीं फार गर्दी असावयाची. असल्या निषिद्ध ठिकाणींसुद्धां खरा कलावान् किंचित्काल थांबतोच. कारण त्या ठिकाणीं त्याला विलक्षण देखावे दिसतात आणि त्याच्या डोक्यांत कल्पनांचें थैमान सुरू होतें. गुणाकर मात्र यावेळीं केवळ त्याच हेतूनें थांबला असें म्हणतां यावयाचें नाहीं. त्याच्या मनांत कोणास तरी डोकावून बघावयाचें होतें असें दिसलें. कारण एका विशिष्ट व्यक्तीचा ओळखीचा सूर त्याच्या कानांत पडल्यामुळें तीच व्यक्ति तेथें आहे कीं काय याची त्याला खात्री करून घ्यावयाची होती. म्हणून तो बाहेर राहून पण दोन पावलें जवळ जाऊन डोकावून मान उंचावून पाहूं लागला.

ज्या तोंडांतून अचकट विचकट शिव्या आणि अभद्र भाषणें कानीं पडत होतीं, त्याच तोंडांतून मधून मधून " **असावें म्यां सदा विषयीं विरक्त** " असे शब्द सुरेल आवाजांत येत होते. ते ऐकल्याबरोबर त्याची खात्री पटली. पण अजूनही त्याच्यानें तेथून हालवेना. कारण तो भिकारीच होता खरा. पण त्याचा वेष आतां निराळा होता. त्याच्या आंगावरचीं लक्तरें जाऊन चांगला उंची पोषाख चढला होता व त्या मुलाबरोबर झटापट करीत होता.

" बाबा ! चार पैसे देतों म्हणून सांगून तुम्हीं मला इथें आणलेंत ना ? "

" मग पी तर तो पेला ! "

" मला नको ! "

" तर लेका, उद्यां माझा सूर तुला कसा धरतां येईल ? आवाज सुरेल बनून तो उंच चढायचा तर हें औषध प्यालेंच पाहिजे. "

" हा भिकारी भीक मागतांना आसन्नमरण स्थितींत दिसला, तें सारें खोटेंच म्हणायचें ! रंगाचें रंगकाम आणि अभिनयाचें कौशल्य ! " गुणाकर आपल्याशींच पुटपुटला.

" चल घे ! " असें म्हणून मानगुटी धरून पोराच्या तोंडांत त्यानें तें पेय ओतलें आणि जवळच्या एका घरांत जाऊन दरवाजावर थाप मारूं लागला !

[ ४ ]

गुणाकराला आतां त्याला सोडून जाववेना. त्याची उत्सुकता जागृत झाली. भिकाऱ्याच्या पोराकडे त्याचें लक्ष होतेंच. पण हा रंगेल भिकारी काय करतो तें त्याला बघायचें होतें. ज्या घरांत तो शिरला तो कुंटणखाना होता, हें त्याला माहित होतें. पण तेथें काय घडतें तें त्याला समग्र दिसणें शक्य नव्हतें. एखादा निसटता शब्द कानांत पडेल तेवढयावरूनच त्याला अनुमान बांधतां येणें शक्य आहे कीं काय एवढे प्रयत्न करून पहावयाचें होतें.

" जा घेऊन याला " असें कोणीतरी स्त्री व्यक्तीनें अधिकाराच्या सुरांत नोकराला फर्माविलें. भिकारी डोळ्याआड झाला ! पण थोडयाच वेळानें " रोगी—रोगी ! "—" हरकत नाहीं ! " " तें काहीं नाहीं ! "—" हाकलून घाला ! " अशा प्रकारचे शब्द, पैशांचा आवाज, मारामार, शिवीगाळ असला प्रकार चालू झाला असल्याचें आढळून येतांच गुणाकरानें तेथून पाय काढला. कारण त्या भिकाऱ्याचा मुलगा दारूच्या दुकानांतून निघून गुणाकराच्या दृष्टीआड होण्याच्या बेतांत होता.

[ ५ ]

" आई ! "

" ऊं ! "

" हे घे तुला चणे कुरमुरे आणले आहेत मी दोन पैशांचे. "

" बाळा ! तुला दोन तरी पैसे मिळाले म्हणायचे आज. "

" मी आठ–नऊ पैसे ठेवले होते बाजूस काढून तुझ्यासाठीं–पण ते देखील बाबांनीं मारून घेतले काढून माझ्याजवळून ! "

" मग हे कसे मिळाले आतां ?

" तें नाहीं मी तुला सांगत, माझें कपाळ गरगरत आहे. पेल्यांतून तुला हा चहा पण आणला आहे. मघाशीं बाबांबरोबर जातांनाच भांडें नेलें होतें मी त्यासाठीं ! "

इतकें म्हणून तो आईपाशीं गेला. ती निजली होती. तिच्यानें उठवत नव्हतें आणि बोलवत नव्हतें. कारण नुकताच तिला बेदम मार बसला होता. त्यामुळें तिला ताप भरला होता. मुलानें तिच्या आंगाला हात लावून पाहिला, पण त्यामुळें उलटाच प्रकार घडला.

" इश्श् ! कसलीरे मुला घाण आली तुझ्या तोंडाला ? " तिनें विचारलें.

" तें मग सांगतों पण आधीं हें तर खा ! " असें म्हणून तें कोवळें पोर आईच्याच आंगावर तोल जाऊन बेशुद्ध होऊन पडलें !

तोही देखावा गुणाकरानें पाहिला !

" भिकाऱ्याला दान-धर्म म्हणून केला, पण आज चार आणे माझे अस्थानी खर्च होऊन मी पापाचा धनी मात्र झालों ! " पश्चात्तापानें गुणाकर स्वतःशींच पुटपुटला. तो तेथून तीरासारखा जलद जलद आपल्या घरीं आला. त्यानें दोन्हीं हातांनीं आपलें मस्तक आवळून गच्च धरलें होतें. दोन तासांत घडलेला सारा प्रकार त्याला चलचित्रपटांत पाहिल्याचा भास होत होता, पण ती खरोखरीची वस्तुस्थिति होती.

* * * *

थोडयाच दिवसांनीं ही हकीकत गुणाकरानें एका मासिकाच्या खास अंकांत सचित्र गोष्टीच्या रूपानें प्रसिद्ध करून " अविचारी औदार्या " कडे म्हणा अथवा " आंधळ्या दानधर्मा " कडे म्हणा–समाजाचें लक्ष वेधून घेतलें.

# " तो बुवाजी आला "

" तोऽ बघ बुवाजी आला ! "
" कुथे बुवू–जी ? "

" तोऽऽबघ ! "

" कुथे ? "

" तो झाडाआड लपला. आतां येईल आपली झोळी पसरून. मग त्यांत तुला घालीन. नाहींतर आधीं एवढा घांस घे. धर—जेव—जेव ना ? कां ? आँ ? नाहीं घेत घांस ? बोलवूं बुवाजीला ? येरे बुवाजी. घे याला झोळींत ! मन्या ! घांस घे—घे लवकर.—"

" दाखव मला बुवाजी—कसा—आय् तो ! "

मन्या अधिकच हट्ट करीत म्हणाला.

" तो बघ—आतां येईल. काय त्याची ती दाढी ! हातभर लांब दाढी, आन् तो खुळखुळा दांडा ! ते त्याचे लाल लाल डोळे, पिंजारलेल्या जटा, 'मोठी थोरली झोळी—अन् लोखंडी चिमटा ! अगबाई ग ! पोरांना धरून तो झोळींत घालतो ! "

" कोणाला—?" मन्यानें लक्षपूर्वक ऐकत असतां विचारलें.

" तुझ्यासारख्या हट्टी मुलाला तो झोळींत घालून नेतो—"

" नेतो ?

" होय तर. नेतोच."

" आणि काय कत्तो ?" भित्र्या जिज्ञासेनें मन्यानें विचारलें.

" आणि झोडून मारतो, कडू औषध देतो.—धर आधीं घांस घे लवकर.. तूंच बुवाजीला खाशील ! तुला कसलीच भीति नाहीं मुळीं. मला आहे काम घरांत. जेव नाहींतर मारीन धरून. बुवाजीकडे देईन."

" मला नको घांस—अंऽऽनको म—ला ! "

इतक्यांत खरोखरीच वर वर्णन केलेला बुवाजी भयंकर सोंग केलेला तेथें आला. असले बैरागी केव्हां केव्हां भिक्षेस येतात. तो आलेला पाहून तिला जरासें

बरें वाटलें. त्या मुलानें मात्र बुवाजीला पूर्वी कधींच पाहिलें नव्हतें. त्याला बुवाजीला पहाण्याची उत्सुकता होती.

मन्या सव्वा किंवा दीड वर्षांचा होता. पण जेवतांना तो फार हट्ट करतो असें त्याच्या आईस वाटे. सर्व उपाय खुंटले म्हणजे निरनिराळे भयंकर आवाज काढून बुवाजी आला म्हणून सांगून व भीती दाखवून मुलाला गप्प करावें असा बहुतेक आयांप्रमाणें तिचा क्रम असे. तेवढ्यावरून बुवाजी फारच भयंकर—उंदरापेक्षां भयंकर—मांजरापेक्षां भयंकर—काळ्या सावलीपेक्षांही भयंकर—असला पाहिजे अशी त्या छोट्या मन्याची समजूत होती.

ताटलींत जेवण आणि हातांत ताटली, व कडेवर मन्या अशा राधाबाई उभ्या होत्या. त्याही मन्यावर चिडल्या होत्या. चुलीवर सैंपाक होता. काम करावयाचें बरेंच राहिलें होतें. इतक्यांत सैंपाकघरांत मांजराला जातांना तिनें पाहिलें. मन्याला जेवूं घालून मग ती कामाला लागणार होती. मालन ही तिच्यापेक्षां वयानें लहान अशी नणंद होती. तिला तिनें हांका मारल्या. पण तीही आली नाहीं. पुन्हा तिनें मन्याला जेवूं घालण्याचा आग्रह केला. पण मन्या ऐकेना. ती दारांतच उभी होती पण बाहेरच्या बाजूस तिची पाठ होती. इतक्यांतच विखुरलेले केस, खुळखुळा दांडा, पिंजारलेली दाढी, रंगीबेरंगी व चित्रविचित्र चिंधोट्या आंगावर, तांबड्या पांढऱ्या रंगानें बाहेरून रंगविलेले व गांजाच्या धुंदीनें आंतून आरक्त झालेले भयंकर डोळे, गळ्यांत कवड्यांच्या माळा, दुसऱ्या हातांत लोखंडी चिमटा व काखेंत झोळी व सर्वांगावर भस्माचे पट्टे अशा प्रकारचा अक्राळ विक्राळ दिसणारा बुवाजी दारांत अचानक आला. मन्याच्या आईच्या तो आल्याचें लवकर लक्षांत आलें नाहीं. पण मन्या त्याच्याकडे पहात होता. त्याच्या चिमुकल्या मनाला नुकतेंच वाटूं लागलें होतें कीं ज्याच्या झोळींत आई आपणाला घालणार म्हणून म्हणते तो हाच बुवाजी असावा. तो आई म्हणून हाक मारणार होता.

" अऽऽऽ ईऽऽ—"

'ई' म्हणण्याच्या पूर्वीच बुवाजीनें हातांतला खुळखुळा—दांडा जमिनीवर जोरानें आदळला.

" आऽऽऽ यु—सटक् सैऽऽत्ताराम् ! "

दांडयाच्या खळखळाटाबरोबरच वराल शब्दांची विचित्र व कर्णकठोर

आरोळी अशा भयप्रद आवाजांत उठविली कीं, त्याच्याकडे एक क्षणभरच पाहून मन्या तटस्थ झाला.

त्याच्या आईनें बुवाजीला पाहिल्या बरोबर बरें झालेंसें क्षणभर वाटलें. मन्याच्या हृदयाच्या व शरीराच्या हालचालीकडे तिचें लक्ष नव्हतें.

" हा बघ बुवाजी आला ! मन्या ! " ती म्हणाली.

त्याचबरोबर मन्यानें किंकाळी मारली !

*   *   *

दृष्ट काढली. औषधोपचार केले. पण झोपेंत मन्या किंचाळत असे तो बंद होईना. पौष्टिक सत्वें व अन्नें, देशी व विलायती दोन्ही प्रकारचीं सुरू केलीं; पण मन्यानें आंग सांडलें तें तो फिरून घेईना. तो झिजत खंगत चालला. त्याच्या बापानें पुष्कळ उपचार केले, पण मन्याची प्रकृति दिवसेंदिवस अधिकच बिघडत चालली. बापाच्या मांडीवर बसला तरी तो " बुवाजी आला " असें म्हणून आंग काढी.

आईच्या अगदीं पोटाशीं निजलेला असला तरी तो " बुवाजी आला " असें म्हणून थरथर कांपे. त्याला एकटें ठेवून जाण्याची सोयच नाहींशी झाली. जरा कांहीं सर्रर्, सुर्रर् झालें कीं तो किंचाळत असे. रात्रीं तर त्याला पाळण्यांत घालण्याचा इलाजच नव्हता. पांच मिनिटांत तो दहादां किंचाळूं लागला. आंगारे धुपारे देखील झाले. पण मन्या खंगत चालला.

त्याची आई, बाप किंवा आत्या मालन या तिघांनीं आळीपाळीनें जवळ घेऊन बसण्याचा क्रम सुरू केला. खाणें, खेळणें, गाणें म्हणणें वगैरे अनेक उपायांनीं त्याचें मन रिझविण्याचे प्रयत्न झाले. पण छट् ! तो जरासा हांसे, खेळे, पण पुन्हा मूळ पदावर येई.

त्याला खेळणीं आवडत असत. खेळण्याचा पोपट तो आनंदानें हातांत घेई. तेव्हां त्याच्या आईबापांला क्षणभर बरें वाटे. पण त्या पोपटाच्या चोंचीकडे नजर जातांच तो एकदम किंकाळी मारी ! कां बरें ? पोपटाची चोंच पाहून त्याला त्या बुवाजीच्या डोळ्यांची तर आठवण होत नसेल ना ?

भाजीकरितां घरांत आणलेल्या वस्तूंशींही तो खेळे पण नारळ अथवा न सोललेलें मक्याचें कणस हातांत घेऊन खेळत असतां एकदम ओरडे व थरथर कांपे अगर निचेष्ट पडे ! कां बरें ? बुवाजीचे केंस किंवा दाढी त्याच्या नजरेसमोर येत असेल काय ?

बाप बाहेरून आला कीं त्याला आनंद होई. पण त्याच्या खिशांतील किल्ल्यांचा घोस वाजला कीं तो किंचाळून ओरडे. कां बरें ? बुवाजीच्या खुळखुळ्या सोटयाची तर त्याला आठवण होत नसेल ना ?

शेजारच्या घरीं चार वर्षांचा मधु आणि सात वर्षांची किशी आपल्या आवडत्या नाम्या बोक्याशीं खेळत होती. नाम्या फारच माणसाळलेला होता. मांजराला माणसाच्या आंगाला आंग घासणें आवडतें. नाम्या थोरांच्या तसाच लहान मुलांच्याही आंगाला आंग घांशीत असे. मुलांनीं नाम्याची गंमत करावयाचें ठरविलें. त्याच्या गळ्यांत चकचकीत पण काळ्या कुळकुळीत कागदाच्या माळा घातल्या. त्याच्या आंगाला त्यांनीं खडू फासला. त्याच्या मिशांला कापूस अडकविला. त्याच्या कंबरेंत घागऱ्यांचा पट्टा घातला. त्याच्या कपाळाला तांबड्या शाईचा नाम लावला. आणि त्याच्या शेपटीला काळ्या सुताची नवी शेपटी गुंडाळली.

त्याच्याशीं मुलें खेळूं लागलीं. पण थोडया वेळानें नाम्या कंटाळला. त्यानें मुलांच्या हातावर तुरी देऊन हळूच पोबारा केला.

नाम्याला विसरून थोडया वेळानें मुलें दुसरा खेळ खेळूं लागलीं.

× × × ×

करकरीत तिन्हिसांजा झाल्या होत्या. मन्याला घेऊन मालन बसली होती. तो किरकिरीतच झाला होता. त्याला कसें खेळवावें याचा ती विचार करीत होती. तिच्या नजरेला आसपास कांहीं दिसेना. रबरी चेंडू आणून तो त्याला उडवून दाखवावा असें मालनला वाटलें. तो आणण्याकरितां मन्याला क्षणभर तेथेंच ठेवून ती जराशी घरांत गेली. चेंडू घेऊन परतते तोंच—

इकडे मन्या एकटाच होता. समोरच्या भिंतीवरून नाम्यानें मन्याच्या पुढ्यांत जमिनीवर उडी मारली व "म्यॉऽऽव" केलें. त्याबरोबर मन्यानें किंकाळी मारली.

"आई ! बुवाजी !"

हीच मन्याची शेवटची आरोळी !

मालन रबरी चेंडू घेऊन आली होती; पण आतां तो कोणासाठीं ?

आई हातांतलें काम ठेवून बाहेर आली. पण आतां तिचा हट्टी मन्या कुठें होता ?

बाहेरून येतांना बापानें देखील मन्यासाठीं एक सुंदर स्वदेशी खेळणें आणलें होतें. पण आतां तें कोण घेणार ?

# देवीचा कौल !

( १ )

वंदनगड गांवांतील देवीच्या देवालयांत सारे गांवकरी जमून एका महत्वाच्या प्रश्नाचा खल करीत बसले होते. गांवांतील अस्पृश्य लोकांनीं देवालयांत शिरण्यासाठीं सत्याग्रह करण्याचा आपला निश्चय जाहीर केला होता. गांवांतील सारी जनता आपल्या गांवच्या जनतेस पूज्य मानणारी होती. देवीचा प्रसाद गांवांतील एकूणएकास शिरोधार्य वाटे. देवीचा कौल झाड्रून साऱ्या लोकांस, लहान-थोरांस शिरसावंद्य होता. देवी ही साऱ्या गांवाची रक्षणकर्ती मानली जात असे.

कारण देवीचा दैवी चमत्कार सर्वांच्या अनुभवास आलेला होता. गांवांत सांथ आली, तेव्हां देवीनें सांगितलें कीं, आपण एकही माणूस मरूं देणार नाहीं. मात्र अमूक एक उपासनेची कृति केली पाहिजे. ती कृति केली आणि गांवांत सांथीचा परिणाम झाला नाहीं.

आजूबाजूच्या गांवांतून एका पावसाळ्यांत पटापट गुरें मरूं लागलीं. वंदनगड गांवांतील शेतकरी लोक भयभीत झाले. त्यांनीं देवीकडे नामसप्ताह सुरू केला. देवीनें गुरांच्या सांथीचा शिरकाव आपल्या वंदनगड गांवांत होऊं दिला नाहीं. लोकांना आपल्या देवीच्या प्रभावाची खात्री होऊन चुकली.

आज असंख्य पिढया मागें पडल्या. देवी आपल्या गांवचें संरक्षण करण्यांत किती तत्पर आहे याचें वर्णन निरनिराळ्या गोष्टी सांगून मागची पिढी पुढच्या पिढीस पटवीत असे. एकदां तर एका चोरानें देवीच्या कांहीं दागिन्यांची चोरी केली होती. सरकारी पोलीस खात्यानें चोरीचा तपास लावण्याच्या कामांत हात टेंकले. देवीचा खांब आंगावर घेतल्यानें अवसरानें ज्या ठिकाणीं ते दागिने पुरून ठेवण्यांत आले होते, ती जागा नक्की दाखविली आणि आपला माल हुडकून काढला. आणि त्याच वेळीं सांगितलें कीं चोर सहा महिन्यांच्या आंत वेड लागून मरेल. त्याप्रमाणें बरोबर घडलें आणि त्यावरून चोर कोण तो लोकांस उमगला !

अशा एक ना दोन, हजारों गोष्टी देवीच्या देवकळेच्या सांगण्यांत येत असत. सारे लोक वंदनगडच्या देवीस नवस करीत आणि देवी पण नवसास पावत असे. असा देवीचा साऱ्या मुलखांत लौकिक होता.

इतर गांवांप्रनाणें या गांवांत पूर्वपरंपरेप्रमाणें देवस्कीचीं कामें चालत असत. पण जगाच्या सुधारणेची लाट या गांवांत देखील येऊन पोंचली. परंतु या वंदनगड गांवाचें एक वैशिष्ट्य होतें. देवीचा कौल सगळ्यांस कबूल असे. महत्वाचा असा कोणताही प्रश्न देवीच्या समोर ठेवावयाचा आणि देवी सांगेल त्याप्रमाणें करावयाचें असा त्या गांवच्या लोकांचा बाणा होता. गांवकरी लोकांचे आपसांत कितीही मतभेद, कितीहि तंटे असले तरी देवीचा हुकूम पाळण्यांत कोणीही कुचराई करीत नसे.

याचें प्रमाण एकच सांगितलें असतां पुरे होईल. देवीला नवरात्रांत बळी द्यावयाची पुरातन पद्धति होती. त्या गांवांत कांहीं दिवसापूर्वी कोणीसे गांधींच्या आश्रमांतून प्रचारक आले. त्यांनीं खादी-स्वदेशीवर वगैरे प्रवचन केलें आणि शेवटीं अहिंसेकडे वळले. देवीच्यासमोर बकरे कोंबडीं मारूं नयेत, त्याच्या ऐवजीं कोहळ्यावर काम भागवावें, देवीला आतां हिंसा आवडणार नाहीं, देवीला आपल्या देशाची दैना समजते आहे, पाहिजे तर देवीला कौल लावून विचारा, वगैरे वगैरे सांगितलें.

प्रवचनकार इतकेंच म्हणून थांबले नाहींत. त्यांनीं आपल्या समक्ष देवीला कौल लावावयास सांगितलें, आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं देवीनें प्राणिहत्त्या नको असा कौल दिला. त्यावेळेपासून देवीला कोहळ्याचा बळी देण्यांत येऊं लागला. सारा मुलूख म्हणूं लागला कीं वंदनगडची देवी सुधारली !

आजचाही प्रश्न असाच होता. बाहेरचे वक्ते येऊन त्यांनीं वंदनगडच्या अस्पृश्यांत चळवळ करून सोडली होती. देवालयांत जाण्यास अस्पृश्यांस अधिकार आहे. आणि तो अधिकार अस्पृश्यांनीं बजावला पाहिजे, असें त्यांच्या पुढाऱ्यांनीं त्यांना शिकविलें.

वंदनगडचे अस्पृश्य म्हणाले कीं जेव्हां दरसालची गांवजत्रा भरते तेव्हां आम्ही देवालयांत शिरतों आणि सारे गांवकरी आपणांत मिसळतात.

" पण गांवकरी लोक घरीं गेल्यावर कपडे भिजवून स्नान करतात ना ? " पुढाऱ्यांनीं विचारलें.

वंदनगडच्या अस्पृश्यांना या प्रश्नावर उत्तर देतां आलें नाहीं. कारण वस्तु-स्थिति थेट तशी होती खरी.

म्हणूनच आज सारे गांवकरी—स्पृश्य आणि अस्पृश्य—देवीसमोर जमले होते.

नेसवलेले खांब घेऊन वृत्तिक लोक बाहेर उभे राहिले. सारे गांवकरी दोन रांगांत हात जोडून उभे राहिले. तरंगकरी देवीकडे नजर लावन उभे होते. ढोल, तासे, सूर, सनया, वाजंत्रीं, वाजूं लागलीं. अब्दागिऱ्या, निशाण, मोर्चेलें सारी स्वारी आज पूर्ण वैभवांत सजली होती. सरासरी अर्धापाऊण तास असा आराधनेंत गेला आणि तरंग लडलड हालूं लागले. तरंगांकडे लोकांचें लक्ष वेधलें !

देवीचा संचार झालेला तरंगवाला बोलूं लागला "कायरे कशाला मला बोलावलं ?"

"हे सारे अस्पृश्य लोक देवळांत तुझ्या गाभाऱ्यापर्यंत प्रवेश करणार असा हट्ट धरून बसले आहेत." एक प्रमुख गांवकर म्हणाला.

"बरं. मी आतांच बोलतें. ती समोर मुलगी दिसते ना ? तिला येथें उभी करा. वाद्यें वाजूं द्या."

पुन्हां वाद्यें वाजूं लागलीं. पंधरा वीस मिनिटांनीं ती मुलगी आंग हालवूं लागली. मुलीच्या आंगांत देवी संचारली. साऱ्या लोकांनीं देवीला भक्तिपूर्वक वंदन केलें.

"अरे !" देवी बोलती झाली. "उद्यांपासून मी गांवांत फिरावयास जाईन. पंधरा दिवसांनीं याच ठिकाणीं तुम्हीं सगळे असेच जमा आणि मला हांक मारा. मी त्यावेळीं तुम्हांला काय तें सांगेन. तोंपर्यंत कोणी कांहीं एक गडबड करतां कामा नये."

"जय देवी माउली !" सर्वांनीं घोष केला. देवी अंतर्धान पावली. तरंग देवालयांत गेले. लोक घरोघर निघून गेले.

( २ )

"आंघोळ नाहींना केलीस ?"

"नाहीं."

"हो तर पलीकडे, इकडे जवळ येऊं नकोस पारोशानें. पूजेच्या साहित्याला शिवूं नको—चल हो पलीकडे."

दामू पलीकडे पळाला. तो आईपाशीं जाऊन आपणाला आंघोळ घालवयास सांगूं लागला. नानाभटजींचें देवतार्चन सुरू झालें. इतक्यांत बाहेर देवी आली. ती केव्हांची येऊन बाहेर बसली होती. काशीबाईनीं तिला हळदकुंकू दिलें. देवी पुढें निघाली.

( ३ )

" तुमि झाडयास आला न्हव का ? "

" होय. "

" आन् माझ्या परडीला कसे शिवलांत ? किस्ने ! जा तीं फुलं दे फेकून, आन् दुसरी काडुनशेनी आण. पण तूं आंघोळ केलियास वय् ? "

" केलिया, बाबा. "

" जा तर बिगिबिगि. "

जोतीबा गंध उगाळूं लागला. त्याच्या घरीं आलेला पाहुणा हिरमुसला होऊन बसला. महारवाडयांत पुष्कळ पाहुणे आले होते, त्यांत जोतीबाच्या घरीं कोंडबा म्हणून एक पाहुणा आला होता. जोतीबांकडून वरील सूचना मिळतांच तो आंघोळीला निघून गेला. जोतीबा बाहेर येतो, तो दारांत देवी उभी होती. जोतीबाच्या बायकोनें तिला हळदकुंकू दिलें. देवी पुढें निघून गेली.

( ४ )

देवी चांभारवाडयांत गेली तेथें असाच प्रकार चालला होता. बायकोचा पाय कसल्याशा निषिद्ध वस्तूवर पडल्यामुळें ह्या चांभार तिला स्नान केल्याशिवाय देवघरांत घ्यावयास कबूल नव्हता.

( ५ )

धेडदेखील चांभाराच्या मुलास शुचिर्भूत झाल्याशिवाय ओसरीच्या आंत घेत नव्हता आणि आपल्या मुलास निर्मळ झाल्याशिवाय आपल्या घरांतल्या देवघरांत जावयास देत नव्हता. देवीनें हें पाहिलें; आणि सर्वांनीं देवीस पाहिलें.

( ६ )

होतां होतां पंधरा दिवस गेले. पूर्वीप्रमाणें थाटांत देवीची स्वारी बाहेर पडली. सारे गावकरी जमून आले. वाजंत्रीं वाजूं लागलीं.

तरंग हालत होते आणि त्यांच्यासमोर ती मुलगीदेखील आंग हालवीत होती. त्या मुलीच्या आंगांत देवीचा संचार झाला. थोडया वेळानें देवी बोलूं लागली.

नाना भटजी, जोतीबा महार, चांभार, धेड वगैरे ज्यांच्या ज्यांच्या घराजवळ देवी गेल्या पंधरा दिवसांत गेली होती, त्यांना हांक मारून आपण तिथें गेली असतांना घडलेला प्रकार तिनें उभ्या गांवास सांगावयाचा हुकूम केला.

देवीच्या हुकुमाप्रमाणें प्रत्येकानें आपापली हकीकत सांगितली. जो तो मनांत देवीचा आशय बराचसा उमजला.

देवी म्हणाली, " अरे ! "

" जय देवी, माउली. " सारे जण एका सुरांत म्हणाले.

" अरे ! गांव हें घरकुटुंब आहे. "

" जयदेवी ! "

" गांवचें देऊळ हें गांवघरांचें देवघर आहे. "

" होय, माउली. "

" त्या देवघराचा पवित्रपणा सगळ्यांनींच पाळला पाहिजे. "

" जय, माउली. "

" देवघरांत देवापाशीं जातांना मनाचा आणि शरीराचा शुचिर्भूतपणा, पवित्रपणा असावा लागतो.

" जयदेवी."

" तो सगळ्या माणसांना सर्वच वेळीं सारखा पाळतां येत नाहीं."

" होय देवी ! "

" त्यासाठीं कुटुंबांतल्या एकाच माणसाकडे कुटुंबाच्या देवघराच्या पूजेअर्चेचें काम संपवून दिलेलें असतें, आणि बाकीचीं माणसें दुरून दर्शन घेतात आणि सवडीप्रमाणें शुचिर्भूत होऊन आंत जातात. त्यांना अधिकार असतोच. "

" होय देवी."

" ज्या कुटुंबाच्या एकाच माणसाकडे देवघरांत जाण्याचा हा अधिकार दिलेला असतो त्यानें तरी शुचिर्भूत नसतांना देवघरांत जावयाचें नाहीं, हा नियम पाळावयाचा असतोच. तो अमंगळपणें आंत जाऊं शकणार नाहीं."

" होय, देवी !"

" अरे ! "

" जय देवी !"

" तुम्ही सगळेजण, माझीं लेंकरें आहांत."

" होय, आई."

" तुम्हांला माझ्याजवळ येण्यासाठीं दांडगाई करण्याचें कांहीं कारण आहे काय ?"

" नाहीं, आई !"

" मी सांगतें तसें करा."

" जय देवी !"

" अरे !"

" जय देवी."

" मुख्य गोष्ट आहे ती पवित्रपणाची, निर्मळपणाची, शुचिर्भूतपणाची."

" होय देवी."

" एका भावंडाला खरूज झाली, तर त्याच्या दुसऱ्या भावंडाला त्याच्या जवळ आईबाप जाऊं देत नाहींत, तें कां ?"

" त्याला खरूज होऊं नये म्हणून."

" आईबापांचा त्यांत दोष आहे काय ?"

" नाहीं आई !"

" आईबापाला दोन्ही मुलें सारखींच कीं नाहींत ?"

" होय आई !"

" भावाभावांत तरी द्वेष असतो काय ?"

" नाहीं, आई !"

" दोष कुठें तर ?"

" खरजेंत."

" होय, असेंच ना ?"

" होय आई."

" अशुद्धपणा, गलिच्छपणा ही खरूज आहे."

" आपापले धंदे करा, पण शुद्ध रहा. आचारांत, विचारांत, व्यवहारांत, शरीरानें, मनानें, आचरणानें शुद्ध व्हा."

" होय, देवी"

" असे शुद्ध होऊन माझें ध्यान करा."

" असे शुचिर्भूत होऊन, स्नान करून, पवित्र शरीरानें आणि पवित्र मनानें माझ्या समोर गाभाऱ्याजवळ या आणि माझ्यावर फुलें उधळा. "

" जय देवी ! "

" अपवित्रपणानें याल, तर तुमचें कल्याण होणार नाहीं. "

" होय देवी "

" पवित्र असल्यावर तुम्ही सगळे मला सारखेच. कोणी कोणाचा द्वेष करूं नका. आपसांत लढूं नका. लढायचें शत्रूबरोबर, आपसांत नव्हे. "

" जय आई. "

" आतां मी जातें. "

" जय देवी ! "

देवी अंतर्धान पावली !

# दिनकराचें विश्रांतिस्थान !

" पण अकरा वाजले ना ? "

" खरं, पण विन्याला तोंपर्यंत—निजेपर्यंत—त्याचा जरा पाळणा हलवशील कीं नाहीं ?—तोंपर्यंत माझें जेवणही होईल, तयार."

" आई—अग आई !" आईला हांक मारीत दिनू मागील दारीं तिला शोधीत गेला. त्याची आई भांडीं घांशीत बसली होती. छोटी बनी जवळच मातींत खेळत होती आणि शिवा शिंताफळीच्या झाडावर, आई नको नको म्हणत असतां चढत होता. दिनूच्या मनांत आईला पाळणा हलवावयास सांगावयाचें होतें, पण ती रिकामीच नव्हती. उलट दिनूला पाहतांच त्याच्या आईनें शिवाला झाडावरून उतरून आणावयास सांगितलें.

शिवाला उतरून दिनू पुनः घरांत पुस्तकें घ्यावयास गेला, तो विन्यानें रडून आकांत मांडला होता आणि तो ऐकून व दिनू आपल्या आईबरोबर गुजगोष्टी करीत असेल अशा समजुतीनें दिनूच्या काकीनें दिन्याला आणि त्याच्या आईला शिव्यांचा भडिमार चालविला होता.

सर्वतोपरी चुलत्यावर अवलंबून असलेल्या दिनूला शिव्या घेण्याचा रोजचाच सराव असल्यामुळें त्याच्या मनाला विशेष असें कांहीं वाटलें नाहीं. पण त्या जिण्याला तो कंटाळला होता एवढें मात्र खरें.

" फुकटचें खाऊन आंग माजवायचें, त्यापेक्षां जीव दिलेला काय वाईट ? पण जना-मनाची लाज वाटली पाहिजे ना ! खाण तशी माती ! " असे चुलतीच्या तोंडचे शब्द दिनू हायस्कूलला जाण्यासाठीं बाहेर पाऊल टाकतो तोंच त्याच्या कानावर आले. त्याचें चित्त व्यग्र झालें.

" जीव दिलेला काय वाईट ? " काकीनें उत्तम उपाय सुचविला. पण—पण —आई आणि भावंडें मागें निराधार त्यांचें काय ? त्यांना कोणाचा आधार ? आणि आतां परीक्षेला अवघे दोनच महिने राहिले. परीक्षा पास होऊन कोठें नौकरी लागली तर चार जीवांचा संभाळ करण्याची आपल्यावर परमेश्वरानें घातलेली जबाबदारी पार पाडतां तरी येईल.

अशा प्रकारचे विचार करीत दिनू विषण्ण अंतःकरणानें हायस्कूलला गेला. शाळेची घंटा होऊन वीस मिनिटें झालीं होतीं. दिनू निव्वळ उपाशीं शाळेला आला होता, तरी त्याला उशीर व्हावयाचा तो झालाच.

( २ )

" May I come in, Sir ? "

" Yes, Your Lordship ! "

वर्गांत एकच हंशा पिकला. दिनकर फारच ओशाळला ! खालीं मान घालून मुकाट्यानें दिनू बांकावर जाऊन बसला. आजचा एक्झरसाइझ लिहून आणावयास त्याला वेळ मिळाला नव्हता आणि 'सर' तर वह्याच तपाशीत होते. दिनकरनें आपली वही दिली नाहीं.

वर्गांत पहिल्यानें शिकविलेला विषय दिनूला चुकला आणि वही लिहून आणली नाहीं. त्याच्या अडचणी शिक्षकांना किंवा इतर मुलांना समजण्यासारख्या नव्हत्या आणि त्या समजावून सांगतां येण्यासारख्याही पण नाहींत.

अभ्यासांत झालेली दिरंगाई पाहून मास्तर बरेच चिडले.

" दिनकर," शिक्षक कानउघाडणीच्या स्वरानें म्हणाले, " दीड महिन्यावर परीक्षा आली. चालू सहामाहींत तुझा अनियमितपणा फारच वाढला. विद्यार्थी सहायक मंडळाकडून शिष्यवृत्ति घेणारा तूं विद्यार्थी आहेस. पास नाहीं झालास तर तुला पुन्हां स्कॉलरशिप मिळणें शक्य नाहीं. बुद्धीच नसती, तर इतकें बोलणें भाग पडलें नसतें; पण देवानें तुला बुद्धि दिली असून तिचा तूं योग्य उपयोग करीत नाहींस याबद्दल वाईट वाटतें. बुद्धि असून तिचा उपयोग न करणारा मनुष्य आणि बुद्धिहीन पशु यांच्यांत अंतर तें काय ? आणि मनुष्यानें पशु बनण्यापेक्षां मेलेलें काय वाईट ? "

अध्यापकाचा उपदेश खरा होता. त्यांतील एकही अक्षर खोटें नव्हतें. शालागृहाचें वसतिगृह असलें कीं मुलांची वर्तणूक, त्यांची परिस्थिति, त्यांचा स्वभाव, वगैरे यच्चयावत् गोष्टींचें ज्ञान अध्यापकास होणें शक्य असतें. त्या मुलांच्या अडीअडचणी कोणत्या असतील त्याही समक्ष समजून येतात. परंतु दिनूच्या मार्गांतील अडचणी अध्यापकास कशा समजाव्या ? शिक्षक बोलला तें सद्बुद्धीनेंच बोलला होता. त्याचा हेतु चांगला होता. मुलावर व्यक्तिशः देखरेख ठेवण्याचें महत्त्व फार आहे. परंतु प्रचलित शिक्षणपद्धतींत आपल्या देशांत तें

शक्य नाहीं ही गोष्ट निराळी. तें शक्य नाहीं म्हणून क्लास मास्तर दिनूला वरील शब्द बोलले. चुलतीनें उच्चारलेल्या शब्दांची ही पुनरावृत्तीच होती. दिनूचें लक्ष वर्गांत चाललेल्या अभ्यासाकडे लागणें शक्य होतें काय? पोटांत भुकेनें कालवाकालव उडवून दिलेली होती. चुलतीच्या मुखकर्परांतून उडालेल्या अपशब्दांच्या चुरमुऱ्यांचा आहार घेऊन तो तास चुकतो म्हणून धाईधाईनें शाळेस आला, तों हा प्रकार घडला!

( ३ )

शाळेच्या मुख्याध्यापकांकडून शिष्यवृत्ति घेणाऱ्या मुलांच्या प्रगतिपत्रकांत जरूर असलेली सर्व माहिती भरून तीं पत्रकें नियमितपणें शिष्यवृत्ति देणारांकडे जातातच. तथापि ज्या संस्थेकडून ही शिष्यवृत्ति दिनूला मिळत होती, त्या संस्थेचे कार्यवाह कांहीं कामासाठीं दिनूच्या गांवाशेजारीं असणाऱ्या गांवीं आले होते. साहजिकपणेंच त्यांनीं तेथें दिनूला बोलाविलें आणि प्रगतिपत्रकें समाधानकारक नसल्याबद्दल दिनूची बरीचशी निर्भत्सना केली. दिनूनें आपल्या घरगुती अडचणी त्यांस नम्रपणें पण संकोचानेंच सांगितल्या. पण केवळ नियमांवरच बोट ठेवणाऱ्या त्या सद्‌गृहस्थांना तसल्या 'किरकोळ' खासगी अडचणी लक्षांत घेण्यासारख्या वाटल्या नाहींत. नियम तो नियम आणि तो सर्वांस सारखाच लागू. 'विद्यार्थि–सहाय्यक–मंडळा'चा पैसा म्हणजे तो सार्वजनिक पैसा आहे. त्याचें योग्य चीज विद्यार्थ्यांकडून झालें पाहिजे असा उपदेश ते करीत होते. त्यांत त्यांची काडीमात्रही चूक नव्हती. पण असल्या उपदेशाचे हे घुटके एकावर एक सारखे मिळत गेल्यामुळें दिनूचें मनःस्वास्थ्य पार उडून गेलें. कारण घेतलेल्या वृत्तीबद्दल उपकारांचा बोजा सारखा त्याच्या मस्तकावर वाढत चालला होता. तो आपण न मागतांही फेडणार अशा हिंमतीनेंच त्यानें ती मदत घेतली होती. पण आता मात्र दिवसेंदिवस त्याचें मन कच खाऊं लागलें.

(४)

होतां होतां प्रिलिमिनरी परीक्षा जवळ आली. त्यानें अभ्यास करण्याची शिकस्त केली होती. या परीक्षेंत फॉर्म मिळाला तरच पुढें त्याला युनिव्हर्सिटीच्या परीक्षेस बसावयाला मिळणार होतें. त्यानें फार मेहनत घेतली आणि सर्व विषयांत जेमतेम पास तर झालाच–परंतु इंग्लिशमध्यें मार्क कमी पडले. मुख्याध्यापक परीक्षेस बसावयास परवानगी देईनात. दिनूचें दैव तर याच परीक्षेवर अवलंबून

होतें. त्यानें मुख्याध्यापकांस आपली परिस्थिति कळवून परवानगी द्यावयाविषयीं विनंति केली आणि उरलेल्या मुदतींत कच्चा राहिलेला विषय पक्का करीन अशी खात्री दिली. मुख्याध्यापकांनींही शेवटीं नाइलाजानें दिनूचा फॉर्म भरून पाठविला. दिनूला आनंद झाला.

( ५ )

हें काम कर—तें काम कर—अशा प्रकारच्या काकाकाकीच्या हुकुमांपुढें दिनूचा जीव मेटाकुटीस आला. शिवाय वरती उत्साहभंग करणाऱ्या अपशब्दांचा सारखा मारा चालू ! रात्रौ एक वाजेपर्यंत जागून दिनू अभ्यास करूं लागला. त्याला धड दिवाहि मिळत नव्हता. ग्यासतेलाच्या डबड्यावर त्याचा अभ्यास चालायचा. त्या डबड्याच्या धुराचा आणि जाग्रणाचा परिणाम त्याच्या प्रकृतीवर झाल्याशिवाय कसा राहील ? त्याला थोडथोडा ताप येऊं लागला. पण इंग्लिश विषय त्यानें चांगलाच तयार केला होता. तथापि त्याची धाकटी बनी एकाएकीं आजारी पडल्यामुळें तिच्या शुश्रूषेच्या बाबतींत त्याला आईला मदत करावी लागली. कारण आई चुलत्याच्या घरीं मोलकरणीसारखीच होती. त्याचा धाकटा भाऊ शिवा हा जरा हूड आणि उनाड स्वभावाचा होता. त्यानें सहज खेळतांना आपल्या चुलत्याच्या मुलांची खोडी काढावी, आणि तसें झालें कीं त्याला सांपडेल तेव्हां धरून काका-काकी बेदम मारीत असत आणि वरतीं त्याच्या आईचाही सगोत्र-सपिंड उद्धार करीत असत ! दिनूला या सर्व प्रकारचा वैताग येई !

( ६ )

अंगावर असलेला एकच एक किरकोळसा सोन्याचा नग विकून दिनूच्या आईनें दिनूला परीक्षेस पाठविला होता. परीक्षा आटोपली. प्रश्नांचीं उत्तरें कशीं काय दिलीं याबद्दल दिनूच्या मित्राचीं आपापसांत बोलणीं चाललीं होतीं.

“ आपण बुवा खात्रीनें पास होणार ! ” एकजण म्हणाला.

“ आणि मग रे काय करणार तूं ? ” दुसऱ्यानें विचारलें.

“ वा, काय करणार म्हणजे कॉलेजांत जाणार ! ” पहिल्यानें दिमाखानें उत्तर दिलें.

“ बरं पुढें ? ”

“ पुढें काय पुढें ? ” पहिल्यानें, तोंड वेंगाडीत कुऱ्यांत उत्तर दिलें; “ पुढें मला सरकारी नौकरी मिळेल नव्हे चालत येईल. ”

" आपण बुवा कॉलेजांत नाहीं जाणार ! " तिसऱ्यानें म्हटलें.

" तर मग ? " दुसऱ्यानें विचारलें.

" ही परीक्षा पास झाल्याबरोबरच नोकरी मिळवणार. "

" मिळवणार म्हणजे ? तुझ्यासाठीं राखूनच ठेवली आहे वाटतें सर्विस. दुसऱ्यानें विचारलें.

" सांगितलें आहे एकाला. " त्यानें उत्तर दिलें.

" आपण तर नापास झालें तरी नोकरींतच शिरणार ! " चौथा एकजण म्हणाला.

" भले पठ्ठे ! नापास झालांत, तर रावसाहेब, तुम्हाला नोकरी द्यायला हो कोण भुकेलेला आहे ? "

" आहे तसाच आमचा वशिला. आम्हांला यापूर्वींच नोकरी मिळाली असती, तथापि हायस्कूलच्या शेवटच्या परीक्षेला बसलों एवढें तरी सर्टिफिकेट पाहिजे म्हणून तर परिक्षेस येण्याची ही इतकी यातायात केली. " हा चौथा विद्यार्थी जरासा ऐटींतच म्हणाला.

" नशिबवान् आहेस बाबा ! " याचेवर एकजण म्हणाला, " आम्हांला तरी असलें वशिल्याचें एखादें अवदान सांपडेल—"

" वशिला—वशिला—वशिल्यानें सर्व कांहीं होतें ! " दोघे चौघे एकदम म्हणाले.

आणि दिनकर दिनकर ? हें सर्व संभाषण ऐकत निमूटपणें उभा होता. त्याचें तोंडच उघडच नव्हतें कारण आयत्यावेळीं डोक्यांत थैमान उत्पन्न झाल्यामुळें इंग्रजीचा पेपर त्याला अवघड गेला होता, आणि नौकरी मिळायला परीक्षा पास झाल्याचें सर्टिफिकेट किंवा वशिला या दोहोंपैकीं एक कांहींतरी आवश्यक होतें. पण या दोहोंतून एकही मिळण्याची त्याला आशा नव्हती.

" कारे दिन्या ! तुझे कसे काय पेपर गेले आहेत ? "

" बरे आहेत ! " दिनकरानें हलकेच उत्तर दिलें.

परीक्षेचा निकाल लागेपर्यंत " पेपर बरे आहेत " असेंच विद्यार्थ्यांच्या तोंडचें उत्तर असतें. कारण झांकलेली मूठ आपण होऊन कशाला उघडून दाखवा ? आपोआप उघडेल तेव्हां जगाला दिसेलच !

( ७ )

ती मूठ उघडावयाला अद्याप कांहीं दिवस होते, तथापि निरनिराळ्या खात्यांच्या कचेऱ्यांत ' तुमचा एकनिष्ठ अत्यंत नम्र सेवक ' असें स्वतःच्या सहीच्या वर लिहून दिनकरानें अर्ज पाठविण्याचा सपाटा चालविला होता. बहुधा कोणाकडून उत्तर मिळत नसे आणि मिळालेंच, तर ' सध्या गरज नाहीं ' असेंच मिळूं लागलें; दिनकर दिवसेंदिवस निराश होऊं लागला.

एके दिवशीं संध्याकाळीं तो फिरावयास चालला होता. चार दोन दिवसांनीं थोडी सवड मिळालीच तर विश्रांतिस्थान म्हणून बसण्याची त्यानें एक एकांतीची जागा निवडून काढली होती. या ठिकाणीं तो निसर्गशोभा पहात बसत असे. या ठिकाणीं नदीला वळण मिळालें असून सभोंवतालचीं शेतें, दूरच्या दिसणाऱ्या टोलेजंग इमारती, कांहीं अंतरावरचें देवालय वगैरे देखावा चित्ताल्हादक होता. नदीच्या वळणावर टेंकडी होती. वळणाकडे टेंकडीची जी बाजू होती ती खड-काळ असून तेथें कडयासारखे कडक उंचच उंच बनले होते. दिनकर केव्हां या खडकावर बसे, तर केव्हां टेकडीवर बसे. टेंकडीवरून त्याला सूर्यास्ताचा किंवा सूर्यास्तानंतरचा देखावा नितांत रमणीयतेनें सुशोभित झालेला दिसत असे. नदीतीरावरील वृक्षांवरील पक्षांच्या घरट्यांतून सायंकालीन पक्षांची किलबिल चाले तीही त्याला श्रवणसुभग वाटे.

याच आपल्या विश्रांतिस्थानाकडे तो आज चालला असतां देवालयांत सुरू असलेलें कीर्तन त्याच्या कानावर आलें. कीर्तनास बसावें असें त्याला वाटलें, पण कीर्तन संपेपर्यंत बसण्याइतकी स्वतंत्रता आपणास नाहीं हें लक्षांत येऊन त्यानें दोन्ही हात जोडून देवास वंदन केलें व तो आपल्या विश्रांतिस्थानाकडे निघाला. तथापि नमस्कार करीपर्यंत हरिदासबुवांचें कीर्तनांतलें ध्रुवपद त्याच्या कानावर आलें—

**" भिक्षापात्र अवलंवणें । जळो जिणें लाजिरवाणें ॥ "**

याच वचनावर कथाकारांचें कीर्तन चालू होतें. नोकरी करणें हा भिक्षावृत्ती-चाच एक पर्याय आहे असें कीर्तनकार प्रतिपादित होते. दिनकराचें लक्ष त्या प्रतिपादनाकडे नव्हतें. कांहीं कारणामुळें त्याच्या आईबरोबरच काका-काकीनें भांडून तिला घरांतून बाहेर घालविण्याची त्यांनीं धमकी दिली होती. दिनकर घरांतून निघून न गेल्यास तिला घरांतून ओढून काढण्यांत यावयाचें होतें. याच फिकिरींत दिनू होता.

तो आपल्या रोजच्या जागीं जाऊन बसला. त्याच्या शरीरांतील इच्छानधीन ज्ञानतंतूनें देवालयांतील कीर्तनकाराचें वचन कर्णरंध्रांत नमूद करून घेतलें होतें, त्याची स्मृति मेंदूला करून दिली. आणि दिनूच्या डोक्यांत विचारकल्लोळ सुरू झाला.

"नोकरी म्हणजे भिक्षाच ना? ठीक! पण प्रस्तुत शिक्षणप्रणालिकेंत विद्यार्थ्यांना आर्थिक व्यवहारांत स्वावलंबी बनविण्याची कांहीं सोई आहे काय? जर नाहीं, तर शिक्षण घेतल्यावर नोकरीमार्गेंच जर लागावयाचें नाहीं, तर दुसरें करावयाचें तरी काय? नोकरीचें जिणें लाजिरवाणें हें अक्षरशः खरें, पण दुसरें जिणें कसें प्राप्त करून घ्यावयाचें? प्रतिकूल परिस्थितींतून मार्ग काढून भरभराटीस आलेलीं एका दोघांचीं अपवादात्मक उदाहरणें हीं आधुनिक शिक्षणपद्धतीच्या विफलतेबद्दलचा सर्व साधारण नियम अधिक जोरानें सिद्ध करतात. हें भिक्षापात्राचें जिणें जाळायला येथें तर कांहीं साधन दिसत नाहीं; पण हें भिक्षापात्राचें जिणें या नदीच्या पात्रांत बुडविण्यास मात्र कांहीं हरकत दिसत नाहीं. पण—छे! नको—तो विचारच नको. आत्महत्या हें पाप आहे ना?...आणि आई..."

(८)

"...तेव्हां परलोक हें थोतांड आहे. स्वर्ग आणि नरक हा निव्वळ भ्रम आहे. पाप पुण्य व त्यांच्या फलांचा मरणोत्तर भोग ही कल्पना म्हणजे तर वेडसरपणाची कमाल आहे. मरणोत्तरची स्थिति वर्णन करणारा कोणी मरणोत्तरचे अनुभव पुनः जिवंत होऊनतर सांगत नाहीं ना? मग त्यांत तथ्य आहे असें कां मानावें? आजचा काल हा खरा आहे. इहलोक हाच खरा आहे. इहलोकचे कायदे पाळावे अथवा टाळावे आणि ऋणं कृत्वा घृतं पिबेत् या न्यायानें सुखेनैव रहावें. यांतच साऱ्या आयुष्याची सफलता आहे. भविष्यकाळच्या भीतीचीं भूतें निर्माण करून दचकत वचकत जगणें आणि आयुष्याचें मातेरें करणें यांत कसला पुरुषार्थ आहे?......"

वरील विचार एका व्याख्यानांतील आहेत. एक विलायतेस जाऊन आलेले बडे विद्वान गृहस्थ व्याख्यान देत होते. दिनूनें आपल्या विश्रांतिस्थानाहून घरीं येत असतां वरील विचार स्वस्थपणें उभें राहून ऐकले. त्याच्या मनाची चलबिचल उडाली. त्याचें मन हेलकावे खाऊं लागलें.

* * * *

अखेर एकदांची झांकली मूठ उघडली! बऱ्याच विद्यार्थ्यांची मूठ फुकी

होती; दुर्दैवानें दिनकर नापास झाला. ही गोष्ट समजतांच दिनकर क्षणभर निचेष्टच झाला. सारा गडप–गडप अंधार पडल्यासारखा त्याला जगत् शून्य दिसूं लागलें. आशेचा तंतु तुटला ! प्रयत्नांचा मार्ग खुंटला ! त्याच्या कपाळांत मस्तकशूळ उठला ! आपल्या विश्रांतिस्थानाकडे तो जाऊं लागला.

त्या ठिकाणीं गेल्यावर तर त्याच्या मनाची खळबळ अधिकच वाढली. पण जातांना त्याच्या सभोंवारच्या निष्काळजी रंगेल जीवांचे आलापच त्याच्या मनांतल्या त्या खळबळीला पुष्टि द्यावयास कारण झाले होते.

दिनकर आपल्या विश्रांतिस्थानाकडे चालला असतां एका गल्लींतील एक तरुण हार्मोनियमवर पुढील शारदेंतील पद म्हणत होता—

**सतत शांत मरसी मरणा,**
**भीती तुझी वाटेना ॥ ध्रु० ॥**

आणखी एक फर्लांगभर चालून गेल्यानंतर ग्रामोफोनचें गाणें त्याला ऐकूं आलें. मृच्छकटिक नाटकांतील चारुदत्ताचें "**मरण बरें वाटतें**" हें पद त्या वेळीं लावलेलें होतें. दिनकरानें तेंही ऐकलें. त्याच मस्तक बधिरलें, सर्वांग वेदनाशून्य झालें. तो आपल्या विश्रांतिस्थानावर येतांच क्षणभर डोळे मिटून बसला.

"...परलोक हें जर वेडगळ गबाळांचें बुजगावणें, आणि पापपुण्य ही जर सारी भ्रांति म्हणावयाची, तर मनःपूत समाचरण करण्यास हरकत कोणती ? आणि आत्महत्या करावयास तरी कोणती हरकत ? आयुष्यभर दुःखभार सहन करण्याचा दंड मी काय म्हणून भोगावा ? ही अशा प्रकारची विचित्र परिस्थिति माझ्या भोंवती जन्मापासून कां निर्माण व्हावी ? परमेश्वराचें मी काय असें घोडें मारलें होतें ? आणि हा परमेश्वर तरी कोण ? तो आहे हें आधीं खरें कशावरून ? आणि असला तर तो फार क्रूर, अन्यायी पक्षपाती असला पाहिजे. असल्या दुर्गुणांच्या मूर्तीला श्रेष्ठत्व तरी कां म्हणून द्यावें ? हरे राम ! कोण राम ? मीच राम ! झक् मारतें जग—लाथ मारतों जगा तुझ्यावर ! मी लाथ..."

दिन्यानें आंगांतल्या कपड्यांसहित सायंकाळीं सात वाजतां त्या नदीच्या वळणावरील डोहांत बुडी मारली. डोह खोल होता. थोडेसे बुडबुडे आले आणि

मानवी देहधारी एक बुडबुडा जीवन सागरांत विलीन झाला ! दिनूचा देह काड्यांप्रमाणें कृश झाला असला तरी तो कांहीं पाण्यावर तरंगला नाहीं !

( ९ )

दुसऱ्या दिवशीं वर्तमानपत्रांत नदींत उडी टाकून एका नापास झालेल्या विद्यार्थ्यानें आत्महत्या केल्याबद्दलचा मजकूर प्रसिद्ध झाला.

" काय वेडीं हीं पोरं ! नापास झालीं कीं केली आत्महत्या ! अभ्यास करायचा नाहीं, वर्षोची वर्ष आळसांत चैनींत उधळायचीं, आणि नापास झाल्यावर जीव द्यावयाचा ! " अशा प्रकारचे उद्गार बरेच वाचक काढूं लागले. पण माझे वाचक ही गोष्ट वाचल्यानंतर दिनकराच्या आत्महत्येचीं कारणें लक्षांत घेणार नाहींत काय ? दिनकराला एका तरी मायेच्या पूतानें एक तरी उत्साहाचा शब्द द्यावयाचा होता !

# " पति-विरहित सती ! "

( १ )

" हा गवळी, हा भुसारी, हा भाडेंवाला, ही वॉशिंग कंपनी, ही भाजी, हा कापडवाला, हा डॉक्टर, हा लांकूडवाला, हा धर्मादाय आणि किरकोळ, शिवाय ही मागील बाकी—मिळून पुन्हां कर्जेच !"

" आणि मोलकरीण—? "

" होय ती राहिलीच एक बाब !"

" उधारी पुढच्या महिन्याला तरी फिटेल का ? "

" कशी ती ? यांतला व्यर्थ खर्च कोणताच नाहीं. फक्त एकच बाब. हल्लीं गेल्या महिन्यांत दोनदां बिनपगारी रजा काढावी लागली व दोनदां दूरच्या प्रवासास अंबूला स्थळ पहाण्याकरितां जावें लागलें—"

इतकें म्हणून चिंतोबांनीं जीभ चावली व आजूबाजूला पाहिलें. त्यांच्या सभोंवार पहाण्याचा अर्थ उमाबाईंना समजला.

" घरांत नाहीं अंबू, ती मघांच आपल्या मैत्रिणीकडे—प्रमिलेकडे गेली आहे शेजारीं. "

" आपण सहज म्हणून बोलतों खरें, पण पोर मनाला लावून घेते असें मला हल्लीं दिसून येऊं लागलें आहे, " चिंतोपंत म्हणाले, " कारण केव्हां केव्हां तिचे डोळे सुजलेले दिसतात. "

" तसं होतंय खरं, पण ती इथं नाहीं म्हणून बरं. नाहींतर इतकंच जरी तिच्या कानांत पडलं तरी तिला दुःख होईल. हल्लीं आपली तें "कृष्णाकुमारी" काव्य वाचीत बसते."

" तेव्हां काय म्हणत होतों बरं मी ? " चिंतोपंत आठवण करून म्हणाले—" हं ! बिनपगारी रजा काढल्यामुळें तेवढा पगार कमी मिळाला आणि उलट प्रवासाला बराचसा पैसा खर्च झाला, त्यामुळें मोठी पंचाईत पडणार आहे चालू महिन्याला."

इतक्यांत घरांतील खोलीचें दार वाजल्याचा भास झाला. दोघानींही ऐक-ल्यासारखें केलें. पण त्यांनीं तिकडे दुर्लक्ष केलें.

" मग कसं करायचं ? " विचारमग्न होऊन उमाबाईनीं विचारलें.

" करायचं काय ? आतां तुमची पाळी नाहीं. आतां आमची पाळी आहे." चिंतोपंत जिन्यावरून येणाऱ्या व्यक्तींचीं पावलें ऐकून चाहूल घेत उगी राहिले.

भाडेवाला आणि पोस्ट शिपाई दोघे एकदम लागोपाठ आले. पहिल्यानें बिल दिलें आणि दुसऱ्यानें पत्र टेबलावर ठेवून दिलें. दुसरा निघून गेला, पण पहिला तेथेंच वाट बघत उभा राहिला.

भाडेकऱ्याच्या नांवानें ठेवलेली रक्कम त्याच्या आंगावर चिंतोपंतांनीं टाकतांच त्यानें पावती दिली व तोही निघून गेला.

इतका वेळ विचारमग्न असलेल्या उमाबाई घरांत गेल्या होत्या त्या पुढें आल्या.

" पाळी कसली म्हटली ती मला नाहीं समजली !"

" मागच्या खेपेला तुमच्या बांगड्या गहाण टाकल्या नाहीं का सावकाराकडे? त्या अद्याप सोडवायला मिळाल्याच नाहींत. तेव्हां आतां माझी एक आंगठी सावकाराकडे ठेवावी म्हणतों."

चिंतोपंत नुकत्याच आलेल्या पत्रावरून नजर फिरवीत असताच हे शब्द बोलत होते. चिंतोपंतांचे ते शब्द ऐकून उमाबाईंच्या नेत्रांत अश्रू उभे राहिले.

" मी कधीं म्हटलं तरी का, कीं आपण आपल्या आंगठ्या सावकाराकडे ठेवाव्या म्हणून ? "

" म्हणायला कशाला हवं ? बायकांच्या अंगावरचे दागिने काढावयाचे आणि आपल्या अंगावर सोनें घालून मिरवायचें, याला का माणूसपणा म्हणायचा ?"

" बरं, तें बघूं मग," चिंतोपंतांच्या कपाळावर आंठ्या पडलेल्या पाहून त्यांनीं म्हटलें, " पण त्या पत्रात काय मजकूर आहे ?"

" कसला असायचा मजकूर ? हुंडा कमींत कमी दोन हजार घेऊं ?"

चिंतोपंत शून्य नजरेनें बाहेर बघत होते आणि उमाबाई भिंतीवरील विवेका-नंदांच्या तसबिरीकडे बघत होत्या.

तोंच मधुकर आणि चंपू शाळेंतून भांडतच घरीं येत असलेलीं त्यांना दिसलीं. मधुकराची पाटी फुटली होती आणि चंपूचा फ्रॉक फाटला होता !

" बरं चार दिवसांपूर्वी ते नव-युवक-संघाचे सेक्रेटरी मनोहर अंबूला पाहून गेले, त्यांचें उत्तर कांहीं नाहीं ना अद्याप ? "

"येईल इतक्यांत." असें म्हणून चिंतोपंत पोषाख चढवून बाहेर जाऊं लागले उमाबाई मुलांस खाऊ देऊन त्यांचें शांतवन करण्यास घरांत गेल्या, तों मुलें आपल्या अक्काबरोबर बसलीं आहेत व अंबूआक्का त्यांना गोष्ट सांगून रंजवीत आहे असें त्यांच्या नजरेंत येतांच त्या जराशा चरकल्या.

" केव्हां आलीस तूं अंबू प्रमिलेकडून ? "

" मी तशीच आलें, मला फार वेळ झाला येऊन. "

( २ )

साप्ताहिक पत्राचा अंक वाचीत असतां उमाबाईंना पुढील मजकूर दिसला. त्या तो लक्षपूर्वक वाचूं लागल्या.

" मनोहरपंतांचें भाषण ऐकावयास पुष्कळ लोक जमले होते. मनोहराचें भाषण ऐकून सर्व तरुण शपथ घ्यावयास तयार झाले. मनोहराच्या भाषणाचा परिणाम त्यांच्यावर जादुसारखा झाला. स्वतः मनोहर स्वदेशी व्रत कडकडीत आचरणारे आहेत. त्यांनीं सांगितल्याबरोबर शेंकडों युवकांनीं स्वदेशी व्रताच्या व लग्नसमयीं हुंडा न घेण्याच्या शपथा घेतल्या........."

त्यांचें हें वाचन चाललें असतांच चिंतोपंत आले.

" ऐकलं का हें मनोहरांचं भाषण ? "

" चुलींत घाला तें वर्तमानपत्र ! " चिंतोपंत उद्वेगानें म्हणाले.

कांहीं तरी निराळाच प्रकार असल्याचें उमाबाईंनीं ताडलें. त्या तशाच कांहीं वेळ स्तब्ध राहिल्या.

मनोहराच्या चुलत्याकडून चिंतोपंतांना पत्र आलें होतें. त्यांतला इत्यर्थ इतकाच कीं थोर माणसांनीं पोरांच्या बडबडीकडे लक्ष देणें चांगलें नसतें. १६०० रुपये हुंडा दिल्यास आपण मनोहरचें लग्न करावयास कबूल आहोंत. वगैरे......

" एकुण असें आहे तर—" दीर्घ निश्वास सोडून उमाबाई म्हणाल्या.

" पण आतां हें पहा. जास्त दिवस घालवावयाचे माझ्या मनात नाहीं या बाबतींत. त्या दिवशीं ते प्रभाकर व त्यांचे वडील मुलीला पाहून गेले ना ? ते एक हजार रुपये घेऊन लग्न करावयास कबूल आहेत. त्यांची घरची इस्टेट चांगली आहे. प्रभाकर चांगला शिकलेला आहे—पण—"

" तो पण मला समजला आहे—"

" हं. तोच पण—पण आज हजार रुपये देखील आपल्याकडे नाहींत. म्हणून

एक हजाराच्या खालीं हुंड्याचा भाव उतरेल असें वाटत नाहीं. तेव्हां घरची माझ्या वांटणीची जमीन आहे ती तिथेंच वारसांपैकीं कोणास तरी खरेदी देऊन टाकतों आणि तुझी नथ किंवा दुसरा एखादा डाग भरतीला घालतों. म्हणजे हुंडा, करणी, खर्च, कपडालत्ता भागेल असें वाटतें. याशिवाय कांहीं उपाय सुचत नाहीं."

"पण तुमच्या वडिलांनीं आपली वंशपरंपरागत जमीन राखून ठेवली आणि तुमच्या हवालीं केली. आतां मधुकराला तुम्हीं नवीन कांहीं संपादन करून ठेवीत नाहीं तर नाहीं पण निदान असलेलीही घालवून बसल्यावर त्याला वयांत आल्यावर कसें वाटेल ?"

"तुम्हीं म्हणतां तेंही खरें माझ्या मनांत तें आलें नव्हतें असें नाहीं. पण मला दुसरा इलाजच कांहीं सुचत नाहीं ना ?"

"माझे सारेच दागिने आणि आपलेंही कांहीं असेल नसेल तें घालवलें तर नाहीं भागणार ?"

"तें कांहींच बोलतां येत नाहीं आणि कांहीं सुचत नाहीं. खरं म्हटलं तर आपली अंबू सुस्वरूप, सद्‌गुणी, सद्वर्तनी आणि सच्छील अशी आहे. तिला कांहीं तरी आम्हीं दिलें पाहिजे हें खरें. पण लग्न करतांना मुलीच्या बापाला नाडून पिळून काढण्याची आमच्या समाजाची प्रवृत्ति जोंपर्यंत आहे. तोंपर्यंत आपल्या सारख्यांचें काय चालणार आहे ? अंबूच्या लग्नाची कशी तरी सोय केली असेंही घटकाभर मानून चालूं, पण पुढें प्रभाकर आणि चंपू यांच्याबद्दल खर्च आहेच ना ?"

"मला एकेकदां असं वाटूं लागतं कीं, आपणही चांगलं उसनं फेडून घ्यावं असल्या समाजावर आणि जशास तसं या न्यायानं वागल्यास प्रभाकराच्या लग्नाचा आपणास फायदाच होईल. तेव्हां चंपीच्या लग्नाची आपणाला पुढें तितकीशी अडचण पडणार नाहीं."

"छे ! छे ! तसं करणें मला मुळींच पसंत नाहीं. बरं पण आता विचार नक्की ठरलाच आहे. मी सावकाराला बोलावला होता. येतांना त्याच्याशीं बोलून ठरवून टाकूं;" दुरून सावकाराला येतांना पाहून चिंतोपंत म्हणाले.

उमाबाई आंत गेल्या. पण सावकार वर येण्याच्यापूर्वी अंबू जिन्याखालून घरांत आली. ती बाहेर गेली होती असें पाहूनच दोघांचा वरील संवाद चालला होता. पण अंबू अर्ध्या जिन्यांत तर केव्हांच येऊन राहिली नसेल ना ?

( ३ )

चिंतोपंत ऑफिसला गेले होते. उमाबाई जराशा बाहेर गेल्या होत्या. अंबूकडे शिरा करावयाचें काम होतें. मुलें शाळेंतच होतीं. अंबूनें शिरा लगबगीनें तयार केला. नंतर तिनें पूर्वीच लिहून ठेविलेलें पत्र चिंतोपंतांच्या टेबलावर ठेविलें. श्रीदत्तमहाराजांच्या तसबिरीची पूजा करून ती रोज ध्यान करीत असे. आपलीं नेहमीचीं वस्त्रें सोडून ती दुसरीं चिरगुटें नेसली; आणि देवासमोर बसली.

" परमेश्वरा ! आम्हां गरीब हिंदु कुमारिकांवर जीं अनेक प्रकारचीं संकटें बाहेरून येत आहेत, तीं अपुरीं म्हणुनच ही आणखी हुंड्याची चाल दिवसें दिवस कमी न होतां उलट जोरांतच प्रसार पावत आहे काय ? "

तिनें पुष्कळशी प्रार्थना केली. आईबापांचा फोटो हृदयाशीं धरून त्या फोटोला तिनें नमस्कार केला. देवाला पुन्हां एकवार नमस्कार केला. तिला बाहेर कोणी आल्याची चाहूल भासली, म्हणून ताबडतोब तिनें आपल्या लुगड्याला आगकाडी पेटवून लावली. लगेच तिच्या देहाची होळी झाली !

थोड्याच वेळांत मुलें शाळेंतून आलीं. पण आपल्या अक्काची ती अवस्था पाहून त्यांनीं आक्रोश–मांडला !

मागोमाग उमाबाई आल्या. त्यांना तो प्रकार पाहतांच भोंवळ आली आणि त्या निश्चेष्ट पडल्या !

संध्याकाळीं ऑफिस सुटल्यावर चिंतोपंत घरीं आले. दारांत पाऊल ठेवतांक्षणींच आपल्या घराचें स्मशान झालेलें त्यांना दिसलें !

( ४ )

पोलीसला चिंतोपंतांच्या टेबलावर एक पत्र सांपडलें होतें पत्र कॉरोनरच्या ऑफिसांत हजर करण्यांत आलें होतें. त्यानंतर तें पत्र सर्व वर्तमानपत्रांतही प्रसिद्ध झालें होतें. तें पत्र घाईघाईंत लिहिलें होतें. पण तें पत्र असंख्य कुमारिकांकरितां एकाच कुमारिकेनें–आपल्या जळजळत्या रक्ताच्या शाईनें लिहिलें होतें. तें पत्र लिहिणारे हात लेखणी खालीं ठेवून मोकळे झाले आणि समाजाला आपल्या देहाची आहुती देण्याकरितां त्यांनीं आगकाडी पेटविली ! त्या निर्मळ कुमारिकेच्या निर्मळ व लाल रक्तानें लिहिलेलीं तीं अक्षरें समाजाच्या आंधळ्या डोळ्यांना दिसतील कीं काय तें कोणी सांगावें !

त्या पत्रांत पुढील मजकूर होता—

" प्रिय बाबा !

मी तुमचीं सर्व संभाषणें ऐकलीं आहेत. माझ्या जन्मामुळें तुमच्या साऱ्या संसाराची माती झाली. तुम्हांला आणि आईला सारें सोनेंनाणें सावकाराकडे टाकावें लागलें आणि आतां तर तुम्हीं माझ्या लग्नाकरितां आपली वडिलार्जित मिळकत विकून टाकण्याच्या विचारांत आहांत. माझ्या मनाला हें मुळींच सहन होत नाहीं. मी दुर्गुणी नाहीं. नासकी–कुजकी नाहीं. माझ्या शक्तीप्रमाणें मी कुटुंबसेवा, समाजसेवा आणि ईश्वरसेवा केली असती. पण मला पदरांत घ्यायला कोणीच कबूल नाहीं. हुंडयाची संख्या उतरत उतरत १००० पर्यंत आली ! पण समाजाचे इतकेही उपकार मला नकोत. माझ्या या कृत्यानें तुमच्या कोमल मनाला अत्यंत दुःख होईल हें खरें. पण मी देवाजीकडे जाऊन जर मला तो पुरुषाचा जन्म द्यावयास तयार झाला तर तुमच्याच पोटीं जन्म घेईन. मला पहावयास येणाऱ्या भावी नवऱ्यांची उठाबस करण्यापायींच तुम्हांला अतोनात कर्ज झालें आहे. त्यांचा जाण्यायेण्याचा खर्चच हजारों रुपये द्यावा लागला आहे माझें हें पत्र वाचून एक जरी तरुण सुविचारी बनला तरी मला–माझ्या आत्म्याला आनंद वाटेल. मी माझ्या जिवाचें असें करून घेतलें याचें वाईट वाटून घेऊं नका. माझ्या भावंडांचे हाल माझ्या मृत्युनें कमी होतील अशी मला आशा आहे ! आजपर्यंत नवऱ्याच्या मृत्यूबरोबर स्त्रिया सती जात असत, ती चाल बंद झाली म्हणून समाजाला आनंद वाटतो. पण लग्न होण्यापूर्वी नवऱ्याशिवाय लग्नच होत नाहीं म्हणून–माझ्यासारख्या कुमारी सती जातात, या गोष्टीचें समाजधुरिणांना कांहींच वाटत नाहीं काय ? बाबा, आई, तुम्ही सर्व सुखी रहा. माझ्यासाठीं कोणी–कोणी दुःख करूं नका.

तुमची अज्ञान मुलगी—**अंबू.**"

# —" एकाच हांकेबरोबर ! "—

शनिवारची रात्र म्हणजे "गोल्डन् नाईट्!" आठवड्यांतून रजा मिळायची आणि तीहि दीड दिवस. मग शनिवारीं जागरण करून रविवारीं उशीरां उठावयास हरकत कसली ?

शिवाय सधनपूर शहरांत एक उत्तम नाटकमंडळी आली होती. त्या नाटकमंडळीच्या अभिनयनिपुण नटांच्या अभिनयाचा फार लौकिक होता. " कामविलास " हा या " पंचबाण संगीत नाटक मंडळी " चा सर्वोत्कृष्ट नाट्यप्रयोग होता.

वसंतरावांनीं आजच्या नाटकाचें बॉक्स रिझर्व केलें होतें. ते, त्यांची पत्नी वासंतीबाई व मुलगा मधुकर अशीं तिघें नाटकास जाणार होतीं.

त्या तिघांनीं कपडे चढविले. जातां जातां वासंतीबाई एकवार घरांत गेल्या. ताराबाई घरांतील उष्ट्या-खरकट्याचें काम आवरीत होत्या.

" दूध विरजणाला घातलं ना ? " वासंतीबाईनीं विचारलें.

" हो नुकतेंच घातलें. "

" आणि उद्यांला उसळीला कडदण भिजत टाकायचं तें ? "

" आतां टाकतें. "

" आतां केव्हां ? तुमचं आतांशा कामांकडे लक्ष तरी असतं का ? " जरासा आवाज चढवून वासंतीबाईनीं इकडे तिकडे सुपरव्हिजन्‌ची नजर फिरवीत विचारलें.

उत्तर नाहीं.

" तुम्ही सात वाजतां मारुतीला जाऊन आलांच आहांत ! "

" या प्रश्नाची एरव्हीं गरज कांहींच नव्हती. तथापि आपण नाटकाला आतां बाहेर जाणार तशी ताराही बाहेर जाऊन आली आहे ही गोष्ट तिच्या लक्षांत आणून देण्यासाठीं म्हणजे खरें म्हणायचें तर स्वतःच्या मनाची समजूत घालण्यासाठीं बाईसाहेबांनीं म्हटलें.

“ हो. गेलें होतें. आणि त्यानंतर मघाशीं थोडा वेळ बागेंतहि गेलें होतें ! ” खोंचदारपणें ताराबाईनीं म्हटलें.

“ कुठल्या बागेंत ? ”

“ आपल्या बंगल्याभोंवतालच्या.—पाणी शिंपायला. ”

“ पण तें तुम्हांला कुणी विचारलें ? ”

“ नाहीं आपलं मीच म्हटलं. ”

“ अन्, ती भाजी आतांच चिरलेली बरी. सकाळीं मग घाई होते. ”

“ बरं ! ”

“ आतां साडेआठ वाजून गेले बरं का ! ” वसंतरावांनीं बाहेरून म्हटलेलं ऐकून वासंतीबाई लवकर लवकर बाहेर आल्या. टांग्यांत बसून दोघेंही मधूला घेऊन नाटकाला निघालीं. पण जाण्यापूर्वी निघतांना वासंतीबाई “ पहिल्याच हांकेबरोबर दार उघडायला पाहिजे बरंका ! नाहींतर पडाल घोरत ” असें मोठ्यानें ओरडून बजावून ठेवायला विसरल्या नाहींत.

“ हूं ! पहिल्याच हांकेबरोबर ” त्यांना जबाब ऐकूं आला.

( २ )

घरकाम आटोपल्याबरोबर लहानशी बिछान्याची गुंडाळी व एक पत्र्याची लहानशा ट्रंकेसारखी मोठीशी बॅग इतके नग ताराबाईनें बाहेर दरवाजापाशीं आणून ठेवले.

संग्रहींचा एक फोटो तिनें आपल्या जवळच्या डबींतून बाहेर काढला. तो फोटो तिनें आपल्या समोर ठेवला त्यांत दोन आकृति होत्या. तिच्या आई-बापाचा तो फोटो असावा. तिनें डोळ्यांत पाणी आणून त्या फोटोला नमस्कार केला. आकाशाकडे नजर वळवून, तिनें परमेश्वराचें ध्यान केलें. तिचें वय वीस बावीस वर्षांचें असावें. तिचा बांधा मूळचा दुहेरी असला तरी काबाडकष्टी कामकरीण बाईसारखी ती खंगून कृश झाली होती. व तिच्या मुखावर उदासी-नतेची छटा पसरलेली दिसत होती. कुंकुमरहित मस्तकावर हा उदासीनतेचा छाप फारच केविलवाणेपणा आणीत होता. बाईलबुद्ध्या बंधूच्या घरांत राबून भावजयीचीं वाईट बोलणीं सहन करीत आयुष्य कंठण्याचा तिला कंटाळा आला असल्यास नवल नाहीं. सेवासदन अगर महिलाश्रम सारख्या संस्थांत जाऊन कामकाज करूनच उपयुक्त उच्च शिक्षण घ्यावें असा तिचा विचार होता. पण ही

गोष्ट दुसऱ्यास सांगून जमण्यासारखी नव्हती. उलट त्यांत व्यत्ययच येण्याचा अधिक संभव होता.

बारा वाजून गेले. तोंच दारांत मोटर आल्याचा आवाज आला. क्लीनरनें तिचें सामान आंत ठेवलें. ताराबाईनें दारांत झोंपलेल्या पोऱ्याला जागें केलें. घराच्या दाराला कुलूप करून चावी त्याच्याकडे दिली आणि " दादा आल्यावर मी पुण्यास गेलें म्हणून सांग " असें त्यास तिनें सांगितलें. पोऱ्याला झोंपेनें घेरलें होतें तो तोंड वासून चाललेल्या प्रकाराकडे पहातच राहिला. पण लगेच पुन्हा झोंपला.

ताराबाई मोटारींत बसली. मोटार चालू झाली. सधनपूर स्टेशन फार तर मैल दीडमैल अंतरावर असेल, पण तास झाला तरी स्टेशन येईना. स्टेशनचा रस्ता ताराबाईला अपरिचित नव्हता. पण मोटारड्रायव्हरही तिला अपरिचित नव्हता. त्यानें तिला स्टेशनवर सुरक्षितपणें न्यावयाचें कबूल केलें होतें. सरासरी आठ दिवसांपूर्वीच तिचा हा जाण्याचा बेत ठरला होता. जाफरनें प्रथम नकारच दर्शविला होता. अर्थातच त्याचा कांहीं वाईट हेतु असेल अशी शंकाही तारेला आली नाहीं. कारण वसंतरावांच्या परवानगीशिवाय न्यावयाला नाकबूल असलेला व आपणच पुष्कळ प्रकारें विनवण्या केल्यामुळें कबूल झालेला सरळ वर्तनाचा जाफर आपणाला वांकड्या वाटेस लावील अशी शंका तरी बिचाऱ्या सरळ मनाच्या तारेस कशी कळणार.

आतां तर साराच रस्ता व भोंवतालचा प्रदेश त्या काळोख्या रात्रींत तारेला अनोळखीचा व भयाण दिसूं लागला !

( ३ )

सधनपूरच्या " सौख्यसार " थिएटरांत, " पंचबाण संगीत नाटक मंडळी " च्या " कामविलास " नाटकाचा पांचवा अंक सुरू होता. नाटक संपत आलें होतें. एक वाजून गेला होता. एका देखाव्यांत तरुण विधवांचा होणारा कोंडमारा नाटककारानें दाखवून करुण रसाचा उत्कट परिपोष केला होता. वसंतरावांच्या हृदयांत कालवाकालव होत होती. वासंतीचा चेहरा पाहण्यासारखा झाला होता. नाटक संपण्यापूर्वीच उठण्याचा तिचा विचार होता, पण वसंतराव नाटकाच्या विषयाशीं तादात्म्य पावून गेलेले तिला दिसले. त्यामुळें तिलाही स्वस्थ बसावें लागलें.

नाटक संपून भरतवाक्य झाल्यावर वसंतरावानीं दीर्घ उसासा टाकला. त्यांना काय वाटलें कोणास ठाऊक. नाटक आटोपल्यावर ते नाटक मंडळीच्या मॅनेजरला भेटले व नाटककाराविषयीं चौकशी करूं लागले. पण नाटककार सघनपूरला आले नव्हते.

घरीं येऊन पोंचेपर्यंत वसंत–वासंतीना दोन वाजून गेले.

आंगावर झोंपलेल्या मधुकराला घेऊन बराच वेळ उभें रहावें लागल्यामुळें वासंतीबाईना फार राग आला होता. पहिल्याच हांकेला दार उघडण्याबद्दल सांगून ठेवलें असतांहि तारा दार उघडीत नाहीं म्हणजे काय ?

शेवटीं तिनें दाराला हात लावून पाहिला तों दाराला कुलूप !

पोऱ्याला हालवून वसंतरावांनीं जागें केलें. तो धडपडूनच उठला. त्यानें किल्ली वासंतीबाईकडे दिली व ताराबाई कुठेंतरी जाण्यासाठीं म्हणून मोटारमधून निघून गेल्याची हकीगत डोळे चोळीत चोळीत कळविली !

( ४ )

अत्तराचा नुसता घमघमाट सुटला होता. चंद्र नुकताच उदयाला आला होता. आजूबाजूच्या झाडींतून एका कोगुळीचा " कुहूऽऽ " असा आवाज मधून मधून येत असे.

अत्तराला देखील दडपून टाकणारा दारूचा वास तारेला असह्य झाला. तिची छाती दडपून गेली. संकट कोणतें आलें आहे हें तिनें ओळखलें. पण ज्या घराच्या एका खोलींत तिला एका आरामखुर्चीवर बसविण्यांत आलें होतें, त्याच घराच्या दुसऱ्या एका खोलींत दोघांचा तंटा चाललेला तिला ऐकूं आला. त्यांतील एकाचा आवाज तिच्या ओळखीचा होता. तो आवाज जाफरचाच होता.

त्या घरांत आल्याबरोबर तारेला एका रक्षकाच्या हवालीं करून जाफर बाजूला गेला होता.

विचार करीत तारा खुर्चीवर पडली असतां जाफरच तिच्यासमोर येऊन उभा राहिला. पण तो जाफरच होता हें ओळखायला तिला बराच वेळ लागला. कारण या वेळीं त्यानें चांगला उंची पोषाख केला असून आपला सारा रुबाब नटविला होता.

" जाफर भाई, स्टेशनकडे नेतों म्हणून सांगून आपण मला इकडे कुणीकडे आणलं बरं ? " तारेनें दीनपणें विचारलें.

" हें पहा, ताराबाई, पहिली गाडी चुकली. दुसरी गाडी आतां सहा वाजतां येणार. तोंपर्यंत स्टेशनवर बसून जाग्रण करण्यापेक्षां स्वस्थ झोंप घेतलेली काय वाईट. म्हणून आपणाला मी या घरांत आणलं. शिवाय माझे एक स्नेही त्याच गाडीनें पुण्यासच जाणार आहेत. त्यांची आपणाला चांगली सोबत होईल. पुरुषाच्या सोबतीशिवाय एकटया दुकटया बाईनें दूरचा प्रवास करणें बरें नव्हे. तें बरीक धोक्याचें नाहीं का ?" जाफरनें उलट प्रश्नांतच आपलें बोलणें संपविलें.

जाफरचे शब्द तारेचें हृदय भेदून गेले. " पुरुषाच्या सोबतीशिवाय दूरचा प्रवास धोक्याचा " हे ते शब्द. पण तो भविष्यकाल आद्यवर्तमान स्थितींतच जाफरच्या रूपानें तारेच्या समोर मूर्तिमंत हजर होता ! हाय ! हाय ! स्त्रीला पुरुषाची सोबत ! तारेच्या सोबतीचा पुरुष तारेला कधींच सोडून गेला ! म्हणून तर ही दशा उद्भवली !

" चला आपली झोंपण्याची सोई सर्व करून ठेवली आहे मी ताराबाई !" असें म्हणून जाफर खुर्चीवर ओणवा झाला. तोंच खुर्चीवरून ती धडपडीनें उठली. पण तेवढ्यांत जाफरच्या हातांतल्या रुमालाचा स्पर्श तिच्या नाकांत शिरला. तिला सारा प्रकार कळून चुकल्याशिवाय राहिला नाहीं.

जाफर गैरसावध आहेसें पाहून तिनें कंबरेची सुरी काढून जाफरवर वार केला. जाफर कोलमडत भुईवर पडला. जाफरचा स्नेही आडून हा प्रकार पहात होता. तो पुढें झाला. पण स्वतःच्या छातींत ती सुरी भोसकण्यासाठीं तिनें हात उगारला होता त्याची झळ जाफरच्या मित्राच्या गालाला व डोळ्याला फोडून आली आणि तिनें जाफरच्या छातींत प्रवेश केला.

" परमेश्वरा ! या अभागिनीला आपल्या चरणापाशीं ने." हे तिचे शेवटचे शब्द होते.

" परमेश्वरा ! " या एकाच हाकेसरशीं तिनें आपला प्रवास संपविला.

# ' नशीं 'ची सरशी !

" ता. २ मे १९१—
गिरगांव-मुंबई

प्रिय दिनकर,

तुझें अभिनंदनपर पत्र पोंचलें, ज्यांना माझं टोपण नांव माहीत आहे व जे सुधारणाप्रिय आहेत अशाच लोकांकडून माझ्या विवाहाबद्दल अभिनंदनपर पत्रें आलीं आहेत, आतां माझा विवाह जो वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाला आहे, त्यांत माझें खरें नांव न देतां मी टोपण नांव कां दिलें असा तूं प्रश्न केला आहेस ना ? त्याचें उत्तर खालीलप्रमाणें आहे.

माझें टोपण नांव जरी मी केवळ प्रसिद्धीकरितां दिलें असलें तरी माझें खरें नांव वधूपक्षाला माहीत आहेच. आणि माझें खरें नांव जर प्रसिद्ध झालें असतें तर माझा जन्माचा तोटा होण्याचा संभव होता तो कसा हें आतां सांगतों.

तुला ठाऊकच आहे, कीं, आमचे वडील गरीब असल्यामुळें त्यांच्याकडे विशेषशी कांहीं माया नव्हती. माझा हा बी. ए. पर्यंतचा खर्च माझ्या मामांनीं लावला, परंतु माझ्या मामाला मूलबाळ कांहीं नाहीं. आतां मी जरी सध्या बी. ए. झालों आहे, तरी मला फक्त नौकरीवरच बिऱ्हाडाचा खर्च चांगल्या तऱ्हेनें चालवितां येत नाहीं; कारण मला, माझे मामा फारच काटकसरी असल्यामुळें अगदीं कांटेतोल हिशेबाने पैसे खर्चास देत ते मला पुरत नसत म्हणून मला थोडेंसें कर्ज झालें होतें. आणि विवाहानंतर नवीन बिऱ्हाड थाटतांना पुनः थोडें नवीन कर्ज झालेलें आहेच. माझा पगार महिन्याचा खर्च भागवून हें कर्ज भागविण्यास पुरेसा नाहींच. सरकारी नोकरीस चिकटून राहिलोंच तर पुढें वाढेल ही गोष्ट खरी, पण सध्या पन्नास साठांनीं काय व्हावयाचें आहे ? ते आमचे मामा अर्धांगवायूच्या विकारानें आज कित्येक वर्षें आजारी आहेत, आणि हल्लीं त्यांना कसलासा नेत्ररोग झाला आहे, त्यांचा हा रोग हल्लीं फारच वाढल्याचें कळतें. तेव्हां त्यांचा विचार मृत्युपत्रांत सर्व इस्टेट मला द्यावयाचा

आहे. पण ते अगदीं जुन्या चालीचे व कोणत्याहि सुधारणेस अगदीं विरुद्ध असे आहेत, विशेषतः स्त्रीशिक्षण, विधवाविवाह वगैरे शब्द तर त्यांच्या मस्तकांतच भरतात असें नव्हे, तर त्यांचा अर्धांगवायु देखील चाळवतो ! तेव्हां त्यांना जर माझ्या विवाहाची हकीगत कळेल तर मला एक कवडी देखील मिळणार नाहीं. म्हणून मला टोपण नांव धारण करावें लागलें !

आतां मला जे प्रत्यक्ष ओळखतात त्याना माझें लेखांतलें टोपण नांव ठाऊक आहेच. माझ्या मामांना मासिकें, वर्तमानपत्रें वाचण्याचा पूर्ण कंटाळा. त्यांना माझें टोपण ठाऊक नाहीं इतकेंच नव्हे तर टोपण नांव म्हणजे काय हें देखील त्यांना कळत नसेल. त्यांचेंहि वय आतां जवळ जवळ पासष्ट सत्तरांच्या मानानें होत आलें आहे.

माझी पत्नी पूर्ण सुशिक्षित, सुगृहिणीला आवश्यक असणाऱ्या सर्व सुगुणांनीं युक्त व शीलसौंदर्यसंपन्न अशी आहे. नर्सिंग, ड्रेसिंग, मिड्वाइफ्री वगैरेंत ती निष्णात आहे. तशीच हार्मोनियम—वादन, गायन, कशिदा, शिवणकाम, लेखन-कला वगैरे ललितकलांतहि ती हुषार आहे. अशा प्रकारच्या देखील बाल-विधवांनीं समाजाच्या लाथा खात खितपत पडावें काय ? त्यांचा दोष काय तर बाल्यांतलें वैधव्य हाच ना ? सेवासदनांत शिक्षण घेतलेल्या, कर्व्यांच्या महिला-श्रमांत कांहीं वर्षें काढलेल्या व विधवाश्रमातर्फे माझ्याशीं विवाहबद्ध झालेल्या माझ्या पत्नीस सर्व लक्ष्मीप्रमाणें समजतात.

असो. माझें पत्र बरेंच लांबलें; परंतु तुला हवी असलेली माहिती सांगण्या-करितां मला साद्यंत पुढें आणावें लागलें. आमचें आहे त्यांत ठीक चाललें आहे. उत्तर यावें.

तुझा स्नेहांकित

**माधव**"

"ता. ३ मे १९१—

गिरगांव-मुंबई

प्रिय इंदिरे ,

तुझें पत्र मिळालें. आतां एक सुंदर इमारतीचा अर्धा मजलाच आम्ही घेतला आहे. त्याला भाडें फार द्यावें लागतें. शिवाय आम्हांला एक कायमची मोल-करीण ठेवायची आहेच. तेव्हां पगाराची आणि खर्चाची कांहीं गांठ पडत नाहीं.

तथापि एकंदरींत संसारांत राहून जें समाधानाचें सुख असतें तें आम्हांस पूर्णपणें अनुभवावयास मिळत आहे.

आम्हां बायकांना लग्न झाल्यावर ज्यांच्याबरोबर सर्व आयुष्य कंठावयाचें असतें, त्यांच्या आवडीनिवडी स्वभाव-संवयी वगैरे सर्व ध्यानांत घेऊन त्याप्रमाणें वागावें लागतें. तें एकदां आंगवळणीं पडेपर्यंत फार जपावें लागतें. त्यांतहि त्यांचा स्वभाव उदार असला तर आमच्या प्रथम प्रथम होणाऱ्या अपराधांकडे काणाडोळा होतो. नाहींतर आपलें रोजचें असावयाचें दोघांचें छत्तीसाच्या आंकडयाइतकें समोर!

माझ्या नशिबानें माझें मात्र तसें नाहीं. इकडचा स्वभाव कितीपण प्रेमळ, आणि दिलदार! परंतु अद्याप आमची गरीबी गेलेली नाहीं. लोकांचें देणें बरेंच अंगावर राहिलेलें आहे, त्यामुळें जिवास चैन नसतें. परंतु हेहि दिवस लवकरच जातील असें दिसतें. कारण इकडचे मामा फार श्रीमंत असून ते अगदीं मरणाच्या पंथास लागले आहेत व ते इकडच्याच स्वारीला आपले वारस करणार आहेत म्हणे! तेव्हां मला फारशी टंचाई भासणार नाहीं. म्हणून मी तिकडे नेहमीं म्हणत असतें कीं, आम्हांला सध्यां गरीबी आहे, तीच बरी आहे; कारण गरीबीचा अनुभव घेतल्याशिवाय श्रीमंतीची किंमत कळत नाहीं. आयता पैसा मिळण्याबरोबर उधळपट्टीस सुरवात होते.

चंद्रिकेचें व मालतीचें इतक्यांत लग्न जुळावयाचें होतें, तें कसें काय जमलें तें पुढच्या पत्रांत कळीव. व माझें पत्र सेवासदनांतल्या सर्व मैत्रिणींना वाचून दाखीव.

तुझी,
लक्ष्मी"

"ता. ४ मे. १९१—
नांदगांव—जि. रत्नागिरी,

प्रिय चिरंजीव **माधव**

मोठ्या जिकीरीनें मी हें पत्र लिहावयास बसलों आहें. माझ्यानें उठून देखील बसवत नाहीं, मग लिहावयाचें त्राण कोठून असणार? माझ्यानें आतां अन्न मुळींच खाववत नाहीं. डॉक्टर फक्त फलाहारच युक्त मानतात. तरीहि दुधांत भिजविलेले पोहे, अनरसे, लाडू, शिरा, कॉफी, वडया, खवा, चिरोटे, शंकरपाळे

वगैरे कांहींतरी थोडेंसें खातों झालें. परंतु अन्नमय प्राण, अन्नाशिवाय देहधारण कसचें होणार ? पण अन्नावर कशी ती वासनाच जात नाहीं. फार झालें तर बासुंदी पुरी पेला दोन पेले जाते एवढीच ! असो. माझ्या डॉक्टरच्या मतें मीं मुंबईतील अमेरिकेहून आलेल्या डॉक्टराकडे जावें असें आहे. तेव्हां तिकडे तुझ्याकडे येऊन राहण्याचा माझा मानस आहे. तरी व्यवस्था कर. मी तारीख ११ रोजीं मुंबईस दाखल होईन. परंतु माझ्या भोंवतीं वावरायला कांहीं तुला नोकरीच्या माणसाला वेळ मिळणार नाहीं, आणि शिवाय बारीक सारीक शीक माणसांचीं जीं कामें करावयाचीं असतात. तीं एखाद्या अनुभविक अशा ' नर्स ' कीं काय म्हणतात त्यांनांच तीं चांगलीं करतां येतात. तेव्हां अशी एखादी थंड स्वभावाची पोक्त नर्स असली तर तिला ठरवून ठेव. माझ्या डॉक्टरांनीं हें मुद्दाम सांगितलें आहे. माझ्याबद्दल तुला फार खर्च होणार हें मला ठाऊक आहे; परंतु माझें आहे तें सर्व तुझेंच आहे माझ्या मागें. तेव्हां सर्व बरदास्त उत्तम ठेव, म्हणजे झालें.

कांहीं कमजास्त पैसा लागलाच तर मग पहातां येईल, पुढें मागें.

तुझा मामा

दामू अण्णा "

" ता. ७ मे १९१—

गिरगांव-मुंबई

प्रिय दिनकर

काय तुला लिहूं ? माझें नशीब ? आमचे मामा अत्यवस्थ झाले होते ना ! ते आतां आपली प्रकृती सुधारण्याकरितां मुंबईस येत आहेत. आतां त्यांनीं माझ्यावर इतके उपकार केले आणि मी मात्र त्यांच्या मरणाची वाट पहात आहे असें म्हणून तूं मला बेइमान ठरवशील; पण माझा उद्देश तसा नाहीं. मामा आतां अगदीं म्हातारे झाले आहेत. त्यांचे हाल फार होतात. दुखणें बाणें काढावयास घरीं कोणी माणूस नाहीं. आणि स्वभाव म्हणजे इतका तिरसट, कोणी बाळगलें तरी तीन घटका टिकत नाहीं आजुबाजूचीं कोणी तरी येतात. नात्यापात्यांतलीं, तीं उलट आपलीच तुंबडी भरून जातात ! तेव्हां अशांना आपलें सगळें शरीर स्वाधीन असेपर्यंत सुखाचें मरण आलें तर बरें नव्हे का ! मी त्यांचें पत्र तुला पाठवीत आहें, त्यावरून आमच्या मामांचा आहार तुला

समजेल. त्यांना म्हणे अन्न मुळींच जात नाहीं. अन्नाला रहावयाला त्या पोटांत वाव असेल तर ना ?

आतां यांना रहायला पाहिजे आमच्याच मजल्यावर, आणि मी माझ्या लक्ष्मीला मग कुठें ठेवूं ? बरें यांच्या खर्चाला पाहिजेत पैसे, ते कुठून बुवा आणूं ? यांच्याकडचे पैसे मिळाले म्हणजे मी कर्ज मुक्त होणार म्हणून वाट पहात होतों तो आतां उलटें नवीन कर्ज कोण देतो या विवंचनेंत पडलों आहे ! याला म्हणतात कर्माची गति ! या आमच्या गती बरोबर कर्जाचीहि गति चक्रवाढीनें वाढणारशी दिसते. तो ठेवील तसें राहिलें पाहिजे. ' जगीं सर्व सूखी असा कोण आहे ?' मला गृहसौख्य आहे त्याच्या जोडीला हें दारिद्र्याचें दुःख ! असो. होहि दिवस जातील.

तुझा,
माधव."

ता. ८ मे १९१
गिरगाव–मुंबई

प्रिय इंदू,

कसेंहि करून थोडया दिवसांकरितां तुझे नर्सिंगच्या वेळचे घालावयाचे सर्व कपडे पाठवशील काय ? वापरलेले अथवा जरा जुने असले तरी चालतील. पण ताबडतोब पाठवून दे.

माझी ही एकदम झालेली मागणी पाहून तुला आश्चर्य अथवा भीति वाटेल. पण सध्याचा प्रसंगच तसा आहे. मागच्या पत्रांत ज्या ' मामा'बद्दल मी तुला लिहीलें होतें ते मृत्युपत्र करण्याऐवजीं धडधाकट होण्याकरितां मुंबईस येत आहेत. ईश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो. माझें लिहीणें तुला स्वार्थाचें वाटेल; पण त्यांच्या स्वभावाबद्दल मला जी माहिती मिळाली तीवरून त्यांचा स्वभाव चांगला नसावा असें वाटतें. त्यांच्या स्वभावाचेंच केवळ असें स्वतंत्र वर्णन मी या पत्राच्या दुसऱ्या बाजूस लिहिलें आहे तें वाचून तूं एकटी असलीस तरी पोट धरधरून हांसशील. कदाचित् तिरस्कारहि येईल. ते म्हणे स्त्री जातीचे पक्के द्वेष्टे आहेत. असोत बापडे ! तेव्हां–काय म्हणत होतें बरें मी ? हो. ते इकडे औषधासाठीं आमचेकडे राहणार तेव्हां त्यांना एक ' नर्स ' पाहिजे. आम्ही नर्स कुठून आणणार ? तेव्हां मीच स्वतः नर्स बनणार आहे. कारण आमचें लग्न

झालें तें या स्वारीला कळून उपयोगी नाहीं. म्हणून ही युक्ति आहे. पण ही युक्ति योजायला आम्हां दोघांना मध्यरात्रीपर्यंत विचार करीत बसावें लागलें. मामंजींचें पत्र वीस वेळां वाचलें तेव्हां एकविसाव्या खेपेला ही कल्पना सुचली बाई एकदाची !

तुझी
**लक्ष्मी.**

ता. क. पार्सल पाठवावयाला मात्र विसरूं नकोस हो.

"ता. १२ मे. १९१—
गिरगांव—मुंबई.

**प्रिय इंदू,**

काय बाई सांगू तरी ! आमच्या मामंजींची स्वारी तर येऊन ठेपलीच. पण त्यांचा स्वभाव बराच कीं ग वांकडा आहे. आल्यापासूनची त्यांची कुरकूर, धुसपूस कांहीं कमी होत नाहीं, कशानेंच त्यांचें समाधान होत नाहीं.

स्वारी येऊन धडकल्याबरोबर त्यांनीं जो कांहीं पट्टा सोडला म्हणतेस, कीं त्यानें आम्हीं दोघेंही घाबरूनच गेलों. आम्हीं योजलेली युक्ति फसणारसें वाटूं लागलें. येण्याबरोबर त्यांनीं मला पाहिलें मात्र, आणि लगेच इकडे रागावून म्हणाले कीं, ' असली अननुभवी तरुण पोरगी कशाला ठेवलीस ही ? हिला काय कळणार बनबाव्हलीला ! म्हाताऱ्या माणसांची शुश्रूषा असल्या तरण्या पोरी मन लावून करीत नाहींत.' शेवटीं ' ती तशांतली नाहीं, तुमची शुश्रूषा ही उत्तम प्रकारें ठेवील त्याबद्दलची जबाबदारी मी स्वतः माझ्यावर घेतों.' वगैरे इकडून सांगणें झालें तेव्हां कुठें जमदग्नीचा क्रोध थोडासा शांत झाला ! आणि एवढ्या-तेवढ्यावरून स्त्रीजातीला दूषणें तरी कसलीं देतात म्हणून सांगूं तुला ? माझ्यानं तीं ऐकवत देखील नाहींत. पण करायचं काय ? ऐकून घ्यावं लागतं झालं, इकडचे मामा झाले म्हणून.

पण इतकं झालं तरी ते जसजसे अधिक रागाऊं लागले आहेत तसतसे त्यांना खूष करण्याचे माझे विचार अधिकाधिक दृढ होत चालले आहेत. खरेंच इंदिरे ! आम्हीं शिकलेल्या मुलींनीं जर आपलें वैशिष्ट्य अशाच प्रसंगीं दाखवायचं नाहीं, तर मग दाखवायचं तरी केव्हां ?—सुस्वभावी वडील माणसांना कुणीहि खूष ठेवील, पण ज्यांना कधीं कशांत म्हणून समाधान वाटत नाहीं, अशांना आम्हीं

खूष ठेवूं शकलें तरच आमच्या गृहशिक्षणाचा उपयोग. म्हणून म्हणतें मीहि पण त्यांच्या अर्ध्या वचनांत वागून त्यांना संतुष्ट करण्याचा मनापासून प्रयत्न केला आहे.

यांत माझा दुसराहि एक हेतु आहे. इंदिरे तो कोणता म्हणशील तर, मी त्यांना इतकी प्रिय होईन कीं, त्यांची मी भाचेसून आहें, असें समजल्याबरोबर मजवर रागावतां कामा नये. आणि इतके ते खूष झालेसें मला वाटलें म्हणजे मी हळूच त्यांच्या कानावर माझ्या लग्नाची गोष्ट घालीन. मला वाटतें मी त्यांत हरतऱ्हेनें यश मिळवीन.

तुझी मैत्रीण
लक्ष्मी."

" ता. १४ मे १९१—
गिरगांव–मुंबई

रा. रा. बंडूनाना यांसी—

सा. न. वि. वि. लिहावयाचें कीं, गेल्या शुक्रवारींच मी येथें मुंबईला येऊन पोंचलों. प्रवासाचा त्रास बराच झाला, तो अजून भोंवतो आहे. पण येथें आपल्या गांवासारखा फळफळावळीस तोटा नाहीं. द्राक्षें, संत्रें, मोसंबी, अननस, पपनसें, डाळिंबें, पेरू, चिकू, केळीं, सफरचंद वगैरे फळफळावळ बहुधा दररोज मिळते, त्यामुळें दिवस अगदींच सुना जात नाहीं.

एक मात्र, बंडूनाना, तुम्हांला त्या पत्रांत लिहिल्या सारखें आहे तें हें कीं आमचा भाचा माधव अगदींच भोळसर दिसतो. माझ्या शुश्रूषेला एक नर्शी पाहिजे होती ती बेटयानें कुठली एक रुमझुमक पोरगी आणून ठेविली आहे. पहिल्या प्रथम मला तिचा फार राग आला. कारण स्त्रीजात म्हणजे नादान अशी माझी प्रामाणिक व अनुभविक समजूत; पण ही पोरगी मोठी सालस, भिडस्त, आज्ञाधारक, हुषार, चलाख, चाणाक्ष, आणि आमच्यासारख्या म्हाताऱ्यांच्या सेवेला न कंटाळणारी अशी दिसते ! माझ्या साऱ्या आयुष्यांत स्त्रीजातींत हीच काय ती एक पहिली पोरगी कीं, जिनें माझ्याकडून उघड नाहीं तरी पण मनांतल्या मनांत बरें म्हणून घेतलें ! तिला साबूदाण्याची लापशी, आटीव मसाल्याचें दूध गव्हांचा शिरा वगैरे कशीं छान करता येतात. तिला लिहितां वाचतां येतें,

आणि हीं घरकामेंहि फार उत्तम प्रकारें कशीं करतां येतात याचें मला मोठें आश्चर्य वाटतें. कसें कां असेना ? मला एकदां लवकर बरें वाटून पराधीन-पणांतून माझी मोकळीक होवो म्हणजे झालं; कारण किती झाली तरी ती स्त्रीजात. द्वाडच असावयाची !

आपला

**चिंतू मामा** "

" ता. १६ मे १९१—

गिरगांव-मुंबई.

प्रिय इंदिरे,

आज कांहीं विशेष लिहिण्यासारखें नाहीं. मामंजींची स्वारी कांहीं केल्या खुषींत येत नाहीं. नेहमीं आपलें हिडिस फिडीस करीत रहायची संवयच पडली आहे त्यांना. म्हणजे त्यांना जरी मनापासून समाधान झालें असलें तरी तें त्यांच्यानें बोलून मात्र दाखवत नाहीं हें मी पुष्कळवेळां पाहिलें आहे. कारण तें चेहऱ्यावरून उमगतें. एकदां दोनदां तोंडतून वाईट शब्द गेल्याबद्दल त्यांनीं मजकडे मात्र हंसतमुखानें दिलगिरी दाखविली. माझ्या सैंपाकाचीही ते हल्लीं हल्लीं फार तारीफ करूं लागले आहेत. एकंदरींत मामंजींचा स्वभाव आणि त्यानां समाधानात ठेवावयाचे माझे प्रयत्न ह्यांत माझ्याच प्रयत्नांची सरशी होत आहे !

तुझी **लक्ष्मी** "

" ता. १९ मे १९१—

गिरगांव—मुंबई

रा. रा. **बंडूनाना** यांसी,

सा. न. वि. वि. लिहावयाचें कीं, माझ्या १४ तारखेच्या पत्रांत जें घाईनें आमच्या नर्सीबद्दल लिहिलें तें चुकीचें ठरूं लागलें आहे. म्हणजे ही पोरगी माझा स्त्री जातीबद्दलचा आजपर्यंतचा प्रतिकूल ग्रह अजीबात बदलून टाकते कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे. खरोखर इतकी गुणी स्त्री मुंबई शह-रांत उत्पन्न झाली कशी याचें मला नवल वाटतें. तब्यत संभाळावयास कशी तत्पर, किती धोरणी, किती सुंदर आणि किती तरी नम्र ! हिला मुळींच सोडूं नये असें मला वाटूं लागलें आहे. माझा अर्धांग वायू आतां साफ बरा होत

आला आहे, पण नेत्ररोग मात्र साफ बरा झाला नाहीं. मला पूर्वीपेक्षां आतां अधिक दिसतें, पण बारीक दिसत नाहीं त्यामुळें ही तरुण नर्शी अजून कुमारी आहे, कीं विवाहित आहे, कीं विधवा आहे, हें कांहींच पक्कें समजत नाहीं ती ममताळू तर फारच आहे. बंडूनाना तुम्हांला जिवाच्या दोस्ताला म्हणून सांगतों कीं, वीस बावीस वर्षांपूर्वी जर हिची आणि माझी गांठ पडती तर किती छान झालें असतें ! पण हो त्यावेळीं मी पन्नाशीच्या कांठास असतों खरा, परंतु ती त्यावेळीं कुठें पाळण्यांतच ‘ टॅंवटॅंव ’ करीत असती ! जाऊंदे ! आतां काय त्याचें ? एवढें बरीक खरें कीं, जगांत एक तरी लिहायला, वाचायला, व आधुनिक पोषाख करावयास शिकलेली पोरगी सद्‌गुणी सांपडली ! किती झालें तरी बायकाची जात एक ना एक दोष असावयाचाच. हिच्या बाबतींत तो विलंबानें दिसेल कदाचित् !

आपला

**चिन्तू मामा.**

ता. के.

आपलें सहज शारदा नाटकाची आठवण होतांच सुचलें म्हणून विचारतों, सुमारें पासष्ट सत्तर वयाच्या एकदोनच रोग असलेल्या सशक्त पुरुषानें सुमारें सतरा अठरा वर्षांच्या पोक्त अशा तरुणीस वरलें तर तें आजच्या कालाला अयोग्य होईल काय ? अंहं, आपला एरवींच आहे हा प्रश्न पण तुमचें उत्तर यावें.

“ ता. २० मे १९१—

गिरगांव–मुंबई

प्रिय इंदिरे,

खरोखरच मला यश येत चाललें आहे. हल्लीं मामंजींची स्वारी बरीच मवाळलेली दिसते त्यांची कुरकुर धुसफूस बहुतेक बंद पडलेली आहे. माझ्या कामांत कुठेंही आतां त्यांना दोष दिसूं लागेनासा झाला आहे. मला काम फार पडतें, म्हणून ते हल्लीं काळजीहि पण दाखवितात.

केव्हां केव्हां तर ते कित्येक तासचे तास बसून माझ्याशीं बोलण्यांत घालवितात. एखाद्या बापानें मुलीवर प्रेम करावें तसें ते माझ्यावर प्रेम करितात. पण एखाद्या वेळीं ती त्यांची हंसण्याची पद्धत आणि ते डोळे वगैरे बघितले कीं, चमत्कारिक संशय उत्पन्न होतो. पण तो उगीच. मी जवळ बसून नेहमीं रहावें असेंच म्हणे त्यांना वाटतें.

एकंदरींत माझा बेत लवकरच साधेलसा दिसतो. ते अगदीं ह्याच्याहूनहि खूष झाले म्हणजे मग आमच्या लग्नाची गोष्ट मी त्यांना सांगेन. आणि माझी खात्री आहे कीं, मग कांहीं ते इकडच्या स्वारीवर रागावणार नाहींत. पण ते माझें म्हणणें ऐकतीलच अशी खात्री पटण्याइतके ते माझ्या काबूंत आले पाहिजेत. तोंपर्यंत माझा प्रयत्न मला असाच पुढें चालविला पाहिजे.

तिकडूनही म्हणे कसली एक आणखी नवी युक्ति योजणें झालें आहे. मला कांहीं अजून सांगणें होत नाहीं. समजेल मागेंपुढें.

तुझी
लक्ष्मी.

" ता. २० मे १९१—
गिरगांव-मुंबई.

प्रिय दिनकर,

विशेष लिहिण्यासारखें असें एवढेंच, कीं, आमच्या मामांच्या स्वभावांत हल्लीं जमीन अस्मानाचें अंतर पडलें आहे. त्यांचे बब्रू नाना वगैरे तिकडचे दोस्त त्यांना पाहातील तर त्यांचे " चिंतू मामा " उलट सुलट बदलल्याचें त्यांना दिसून येईल. आतां ते मिठाई, कुलपी मलाई वगैरे जिन्नसांचा देखील उघड उघड स्वीकार करूं लागले आहेत; परंतु अंगावर खेंकसण्याचा स्वभाव पालटून टाकण्याची करामत मात्र एकट्या लक्ष्मीची. आतां आमचे मामा जरासे लघळ पडल्यामुळें कदाचित् घसरण्याचा संभव आहे. परंतु त्या बाबतींत त्यांना सांवरून धरण्याइतकी माझी लक्ष्मी खंदी आहे, अशी माझी खात्री आहे. माझी सर्वांवर नजर असते. तिचा बेत त्यांना राजी करून घेऊन नंतर आमच्या लग्नाची गोष्ट फोडून त्यांच्याकडून त्याला अनुमति घेण्याचा असावा. मी हें ताडलें आहे. आतां माझा दुसरा बेत कळवून माझ्या बेतांत तिला सामील करून घेतली पाहिजे. कारण माझ्या युक्तिला जी पूर्व तयारी पाहिजे होती ती तिनें मामांचा स्वभाव बदलून पुरी करून ठेविली आहे. माझा बेत लवकरच तिला कळवीन; परंतु तुला मात्र तो सफल झाल्याशिवाय कळवणार नाहीं. बहुतेक होईलसें वाटतें.

तुझाच
माधव, "

ता. १३ मे १९१—

रा. रा. बंडूनाना यांसी,

कृ. न. वि. वि. लिहावयाचें कीं, आपलें पत्र पोंचलें. आपण लिहिलेले सल्ल्याचे अथवा उपदेशाचे विचार खरोखरच योग्य आहेत, परंतु ते या पत्रांत अयोग्यसे वाटतात. कारण मी जो तुम्हांला प्रश्न विचारला होता तो माझ्याबद्दल नव्हे. आतां माझ्या मनांत चलबिचल उत्पन्न झाली होती हें खरें आहे; परंतु त्याचें निराकरण मी करूं शकलों. असो इतकें मात्र खरें, कीं ही मुलगी मात्र माझ्याजवळ नेहमीं असावी असें मला वाटूं लागलें आहे. मी तिच्याबद्दल एकदां गोष्ट काढली पण ती अगदीं अप्रत्यक्षपणें ती म्हणाली कीं, आपला एका वराशीं वाङ्निश्चय झाला आहे, व लग्नहि झाल्यासारखेंच आहे. माझ्या मनांत किती तरी येतें, कीं, तिला आपली भाचेसून तरी करून आपल्या घरांत आणावी. पोटच्या मुलीप्रमाणें मला ती आवडूं लागली आहे. पण झाला आहे सगळाच उलटा प्रकार ! मी जुन्या मताचा, म्हणून माझा माधवहि झाला आहे जुन्या मताचा. तेव्हां आतां आपल्याच तोंडानें त्याला मी ह्या सुधारकी मुलीशीं लग्न कर म्हणून कसें सांगू ? तथापि कसेंहि करून संधि पाहून केव्हां तरी त्याच्याकडे गोष्ट काढीन म्हणतों. माझी खात्री आहे कीं तो कांहीं माझ्या म्हणण्याच्या बाहेर जाणार नाहीं. पुढची हकीकत पुढील पत्रीं लिहीन.

आपला
**चिंतू मामा"**

ता. २४ मे १९१—
गिरगांव—मुंबई

प्रिय दिनकर,

मोठी मजा आहे, बाबा. आमचे मामा आतां मला त्या नर्सबरोबर ( लक्ष्मीबरोबर ) लग्न करावयास सांगूं लागले आहेत. केवढा फरक हा ! लक्ष्मीच्या अंगचे गुण इतके फलद्रुप होतील म्हणून मला कालत्रयीं देखील वाटलें नसतें. मी तर साफ सांगितलें, कीं, असल्या सुधारकी थाटाच्या, शिकल्यासवरलेल्या आणि नीटनेटका पोषाख करणाऱ्या मुलीबरोबर मी लग्न करणार नाहीं. तेव्हां करणार काय स्वारी ? नरम पडली ! जिरून गेली म्हणेनास ! आपलेच दांत आणि आपलेच ओंठ; चावणार कसे आणि कोणावर ? आपला दुराग्रह सोडावा तर फसगत होते;· न सोडावा तर लक्ष्मीला भाचेसून करून घेण्याची हौस

अनावर झालेली; परंतु आतां त्यांचा स्वभावहि सर्वच बाजूंनीं निवळलेला आहे. तेव्हां आतां आम्हांलाहि होतां होईल तेवढें ओढून धरलें पाहिजे. मी पढवि. त्याप्रमाणें लक्ष्मी त्यांच्याशीं बोलत असते. मामांचीं स्थिति अगदीं कात्रींत धरल्यासारखी झाली आहे. आता आमचा पुढला कार्यक्रम बहुतेक ठरल्यासारखाच आहे, आणि तो तसाच घडून येणार यांत शंका नाहीं, कारण मामा हातांत धरलेलें खरें केल्याशिवाय सोडावयाचे नाहींत कांहीं झालें तरी.

तुझा
**माधव.**"

"ता. २५ मे १९१—
गिरगांव–मुंबई

प्रिय इंदिरे,

मागें लिहिलेल्या पत्रांत कळविल्याप्रमाणें मी त्यांना माझा वाङ्निश्चय झाला असल्याचें उत्तर दिलें. तेव्हांपासून स्वारी बरीच विचारांत गढून गेल्यासारखी दिसते. इकडे देखील विचारणें झालें असावें. पण आम्ही दोघांनीं ठरविल्याप्रमाणें तिकडून उत्तर देणें झालें असावें. आतांशा मी मामंजींपाशीं जुन्या जुन्या पोथ्या पुराणें वाचीत बसतें. तीं ऐकणें त्यांना फार आवडतें. मीहि त्यांना हवी असलेली खाद्य पेय वस्तु तयार करून देण्यांत मुळींच कसूर करीत नाहीं; त्यामुळें व त्यांना प्रिय असलेल्या तेवढ्या सर्व गोष्टी मी अगदीं मनःपूर्वक करीत असल्यामुळें त्यांना मी त्यांच्याजवळून हलूं नये असें वाटतें. घरांतील कामाचा बोजा माझ्यावर पडतो म्हणून त्यांनीं आणखी एक मोलकरीण ठेवली आहे. हल्लीं तिकडच्या भेटी वारंवार घेऊन मला नकळत कसलीं खलबतें करीत असतात. एकंदरींत जम चांगला बसत चालला आहे. मला आतां आपल्याच घरांत नर्सप्रमाणें वागण्याचा कंटाळा येऊं लागला आहे.

तुझी
**लक्ष्मी**"

"ता. २७ मे १९१—
फोर्ट–मुंबई

प्रिय दिनकर,

शेवटीं काल आमची खडाजंगी उडाली. मामा म्हणत, कीं मी त्या नर्सशीं म्हणजे लक्ष्मीशीं लग्न करण्यास कसेंहि करून तयार व्हावें. व मी तर त्यांच्या पूर्व

ग्रहांची त्यांस आठवण करून देऊन त्यापासून तुझी भ्रष्ट होत असलां तरी मी होणार नाहीं, असें खडसून सांगून टाकलें. अखेरीस जर तूं लग्न तिच्याबरोबर करणार नाहींस तर मी तुला वारस न करतां तिलाच माझी वारस करणार असें त्यांनीं मला अखेरचें सांगून टाकलें, व मी ' कांहीं हरकत नाहीं ' असा जबाब देऊन रागानें ऑफिसांत आलों आणि इकडूनच सर्व ही हकीगत मी तुला कळविली आहे. या सर्व हकीगतीवरून कळून येईल, कीं, आमच्या या गंमतीच्या नाटकाला एक प्रकारचा रंग भरत चालला आहे !

तुझा
**माधव."**

ता, २८ मे १९१—
गिरगांव-मुंबई

प्रिय इंदिरे

आजच्या पत्रांत तुला खूप गंमत वाचावयास मिळणार ! मामंजी माझा वाङ्निश्चय कोणाशीं झाला आहे वगैरे माहिती हळुहळू काढूं लागले, तेव्हां मी सांगितलें, कीं, माझा जरी वाङ्निश्चय झाला असला तरी लग्न होण्यास अद्याप कांहीं वर्षांचा अवधि आहे. कारण त्यांची घरची स्थिति जरा गरिबीची असल्यामुळें व म्हणून एव्हांच कुटुंबाचा भार अंगावर घेतला असतां झेपणार नाहीं असें त्यांस वाटल्यामुळें मला अशाच स्थितींत कांहीं दिवस काढावयाचे आहेत. त्यांना मुंबईतच कोठेंशी नोकरी आह, व इकडचें टोपण नाव सांगून मी म्हटलें कीं, ते एक प्रख्यात कवि व लेखक आहेत ते मलां कधींतरी भेटतात, पण आम्ही परक्याप्रमाणेंच एकमेकांशीं वागतों. त्यांचें तिकडे बोलणें काय झालें होतें कोणास ठाऊक, पण माझी हकीगत ऐकल्यावर ते आपल्याशींच कांहींसे बोलले व तिकडे बरीच दूषणें दिलीं. शेवटीं त्यांनीं आपल्याच नोकरीस आपण हयात असेपर्यंत रहावें असें मला सांगितलें व मीहि तें मान्य केलें. यांचा हेकेखोर व करारी स्वभाव मला तिकडून अगोदरच समजला आहे. त्यांनीं त्यांच्या मृत्यूकाळपर्यंत मी अशीच सेवा केल्यास सर्व इष्टेट मला मृत्युपत्रानें द्यावयाचें ठरविलें आहे, व तें इतक्यांत होईलहि. हल्लींच्या भांडणामुळें दोन दिवस स्वारी संतापून आपल्याशींच विचार करीत बसलेली असते, व औषधपाणी देखील अनेकवार सांगितलें तरी वेळच्या वेळेवर घेत नाहीं. शिवाय रात्रीं एकसारखें विचारांत गढून गेल्यामुळें प्रकृति बिघडेलशी वाटते, असो, पुढील मजकूर पुढें.

तुझी
लक्ष्मी"

" ता. ३० मे १९१—
गिरगांव—मुंबई

रा. रा. बंडू नाना यांस,—

सा. न. वि. वि. लिहावयाचें कीं, या माझ्या भाच्यानें माझ्याविरुद्ध जाण्याचा जसा कांहीं निश्चयच केला आहे. मी त्याला या आमच्या घरीं असलेल्या सोन्या-सारख्या शिकल्यासवरलेल्या परंतु आपलें जुनें बालबोध वळण न सोडलेल्या अशा सुस्वरूप, शीलवान्, सद्गुणी नम्र मुलीशीं लग्न करावयास सांगितलें असतां तो मुळींच कबूल होत नाहीं, माझा स्वभावधर्म असा आहे कीं, एक घाव आणि दोन तुकडे ! बोलल्याप्रमाणें चालावयाचें ! मी त्याला प्रथम बजावून सांगितलें, आणि शेवटीं त्याप्रमाणें केलें. काय केलें तें मागून सांगेन. कारण आतां मला शक्ति नाहीं. माझी प्रकृति पुनः बिघडत आहे. मी चिंतेंतच असतों.

तुमचा
चिंतू मामा

" ता. ३० मे १९१—
गिरगांव-मुंबई

प्रिय दिनकर,

झालें आजचें पत्र म्हणजे आमच्या नाटकाचा शेवटचा अंक...काल मामांना फारच मूर्छा आली, आणि डॉक्टरांना देखील भीति वाटली. त्या भीतीनें त्यांनीं ताबडतोब आपलें मृत्युपत्र करवून रजिस्टर देखील करविलें, मृत्युपत्रांतील मुख्यांचे शब्द असे आहेत..." मी माझ्या इस्टेटीची वारस हल्लीं माझ्या सेवेस असलेली नर्स लक्ष्मीबाई हिला केली आहे. वास्तविक माझा भाचा माधव याला मी वारस करणार होतों; परंतु त्याचें व माझें पटेनासें झाल्यामुळें अखेरच्या वेळेस माझी सेवाचाकरी व खडनड काढावयाची ती सर्व लक्ष्मीनेंच काढल्यामुळें मी माझी स्थावर जंगम सर्व इस्टेट लक्ष्मीबाई...इजला देत आहें. तिचें लग्न झाल्यावर तिनें आपला नवरा 'लक्ष्मीकांत' या टोपण नांवानें प्रसिद्ध असलेला प्रख्यात महाराष्ट्रांतला लेखक व कवि याच्यासह उपभोगावी परंतु लक्ष्मीकांताचा तिच्यावर हक्क नाहीं. माझ्या भाच्यास कांहीं द्यावेंसें वाट-ल्यास लक्ष्मीनें द्यावें. "...वगैरे वगैरे.

तुझा
**माधव** "

" ता. ३१ मे. १९१—
गिरगांव मुंबई

रा. रा. चंडूनाना यांस

अरे, काय मला पोरांनीं चकवलें तरी ! माझी प्रकृति आतां साफ बरी आहे. मी लवकरच माझा भाचा माधव व भाचेसून लक्ष्मी यांच्यासह तिकडे येईन. ह्या त्रोटक मजकूर तुम्हांला कळणार नाहीं. भेटीअंतींच सर्व समजेल. शेवटीं माधवच माझ्या इस्टेटीचा मालक झाला, व आपलें म्हणणें खरें केलें; व माझेंही बोललेलें वाक्य मी खरें केलें. कसें तें मागून समजेल.

तुझा
चिंतू मामा."

ता. १ जून १९१—
गिरगांव-मुंबई

प्रिय दिनकर,

सध्यां चार दिवस रजा घेऊन मला मामांबरोबर त्यांच्या गांवास जावयाचें आहे. लक्ष्मीनें आपला नर्सचा पोषाख जिकडचा तिकडे पाठवून दिला थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे शेवटीं नर्शीची सरशी झाली ! विशेष विवरण पुढील पत्रांत.

तुझा
माधव "

# “ लवकर निघून ये ?”

( १ )

“ कान फुटले तुझे ? बोलत नाहींस तो ? इतका वेळ कुठं बाहेर राहिलास ? ”

“ खेळायला गेलों होतों. ”

“ इतका वेळ—इतका वेळ खेळ ? आणि तंगडीबिंगडी मोडून घेतलीस मग ? मग तुझा खेळ होणार आणि आमचा जीव जागार ? किती म्हणून शोधावं तुला, आणि कुठं म्हणून ? लेका, दोन्ही वेळ जेवतोस आणि गांवभर भटकतोस पोळासारखा ! ”

“ मी एकटाच नव्हतों गेलों, माझ्या वर्गांतलीं सारींच मुलं गेलीं होतीं. ”

“ झक मारतात सारीं मुलं ! साऱ्या मुलांशीं माझं काम नाहीं. सारीं मुलं माझ्या घरांत पंक्तीला बसून गिळायला येत नाहींत. शाळा सुटली कीं सरळ घरीं यायचं सोडून तूं कां उनाडत राहिलास ? ”

“ शाळेच्याच आवारांत आम्ही खेळत होतों, बाबा ! ”

“ अरे शाळेच्याच आवारांत असलांत म्हणून काय झालं ? शाळेच्या आवारांतली जमीन काय निराळी रेशमाची बनवली आहे होय ? तोंड वर करून आणखी निर्लज्जपणें बोलतोस तो ! फाजील कार्टा ! पोरं पोरं जमून खेळूं लागलांत आणि एखाद्याचा प्राणबिण गेला तर कोण आहे तिथं बघायला ? ”

“ मास्तर होते आमचे तेथें बाबा ! त्यांच्याच सांगण्यावरून त्यांच्याच देखरेखीखालीं आम्ही खेळत होतों. ”

“ या हल्लींच्या शाळामास्तरांना आतां अक्कलाच नाहींशा झाल्या आहेत. त्यांना शिकवायच्या ऐवजीं खेळवतील, नाचवतील, काय वाटेल तें त्यांना करायला सांगतील. होय ! त्यांच्या बापाचें काय खरचतें. मुलगा आजारी पडला तर त्याला ते थोडेच औषधपाणी करायला बसले आहेत ? त्याचे कपडे फाटले तर नवे शिवून देणार कोण ? मास्तर कीं मास्तरांचा आजोबा ? तें कांहीं नाहीं. शाळा सुटल्याबरोबर घरीं आलें पाहिजे. समजलास ? ”

" गेल्या दोन महिन्यांची खेळांची फी द्यायची राहिली आहे ! "

" अरे गाढवा ! खेळूं नको म्हणतों तर आणखी उलट खेळाची फी मागतोस ? बेअक्कल कुठला. तूं खेळायलाच जाऊं नकोस म्हणजे झालं. मग फी कशाला पाहिजे ? फी—बी कांहीं मिळणार नाहीं. तूं कपडे खराब करतो आहेस. पण वर्ष पुरें भरल्याशिवाय सदरा मिळणार नाहीं आणि दोन महिन्याशिवाय पैशाचा साबण मिळणार नाहीं. जा—चल. "

पण मोरूचे डोळे पाण्यानें भरून आले होते. दोहींकडचा मार त्याला सोसावा लागत होता. शाळेंतल्या शिस्तीप्रमाणें त्याला शिक्षक सांगत त्याप्रमाणें वर्गातल्या इतर मुलासारखें वागणें भाग होतें. आणि घरांत तर सदोपंतांचा असा छळ. दहा वर्षांचेंच सारें त्याचें वय. पण त्याला बापाचे बोल ऐकून अतिशय वाईट वाटे. उद्यां सकाळीं मास्तरांस काय सांगावें या विचारानें हतबुद्ध होऊन स्फुंदत स्फुंदत तो तेथेंच राहिला. पण सदोबांला पोरानें आपला अपमान केला असें वाटलें.

" रडतोस—रडतोस ? घे ! " असें म्हणून सदोबांनीं मोरूच्या कानशिलांत जोरानें एक भडकावून दिली ! मोरूला तो तडाखा असह्य झाला. तो तिथेंच मट्कन् बसला !

" तिनिसांजांच्या कातरवेळेला काय बरं असं करायचं तें पोराला ? " असें म्हणत घरांतून कावेरीबाई आल्या आणि त्यांनीं मुलाला पोटाशीं धरिलें.

( २ )

" कोणी दिले त्याला पैसे ? "

" पैसे मी दिले ? "

" तेव्हांच—तेव्हांच तो आतांशा मला जुमानीनासा झाला आहे ! " सदोबा गुरगुरत डोक्याला मळकट रुमाल गुंडाळत होते; " तूं त्याला उधळ्या करून टाकणार आहेस. "

" पोराच्या आंगावरील सदऱ्याला पंचवीस भोकें पडलीं, त्याच्या चिंध्या चिंध्या झाल्या. दप्तराचा रुमाल फाटून त्यांत कागद देखील टिकेनातसे झाले. चार पैशांच्या फडक्यांची काटकसर करतांना कागद, पेन्सिली, बुकें, लेखण्या सांडतात त्याची वाट काय ? आणि सारे लोक हंसतील कुणाला बरं ? पोराला कीं पोराच्या वडील माणसांला ? "

" ब्यँ—ब्यँ ! " सदोबा वेडावीत म्हणाले, " मोठी शहाणीच कीं नाहींस तूं पुराणं सांगून दाखवायला मला आलीस ती ? तूं असला आचरटपणा करूं लागलीस, तर माझी शिस्त घरांत राहणार नाहीं; आणि पोर बेताल होऊन भडकेल हें लक्षांत ठेव. तूं देखील बरीच—अं—ही झाली आहेस. आणि बाकीचीं त्याचीं भावंडं मग त्याच्याच वळणावर जातील. मोऱ्या आतां लहान नाहीं. चांगला पंधरा वर्षांचा झालाय. आतां जावं लागेल त्याला मुलकीच्या परीक्षेला. त्याला कांहीं अक्कल तर आली पाहिजे ! बडेजाव कशाला पाहिजेत याला एवढे मोठे ? पंचे नेसावयाचे तें सोडून धोतरजोडया मागतो–कोट मागतो–माझा रुमाल बांधावा डोकीस शाळेंत जातांना ! तर टोपीच मागतो ! भिकारडी बढाई ! "

इतकें बोलेपर्यंत त्यांनीं उपरणें घेऊन हातांत काठीही घेतली होती. सैंपाकघराच्या छपराच्या आंतल्या बाजूस चुलीचा धूर लागून जसा रंग चढतो तसाच रंग सदोबाच्या उपरण्याचा आहे असें कावेरीबाईंच्या डोळ्यांस दिसत होतें !

सदोबा चिडलेले व पिरपिरत असलेले असे घराबाहेर पडले. त्यांच्याकडे पहात कावेरीबाई दारांत बराच वेळ उभ्या होत्या. त्यांच्या मनांत सदोबा व मोरू या दोघांच्याबद्दलचे असंख्य विचार येत होते. त्यांच्या डोळ्यांतून अश्रूबिंदु गळूं लागले. त्यांनीं डोळ्यांना पदर लावला. डोळ्यांवरचा पदर खालीं करतात तों शाळेंतून घरीं आलेला मोरू त्यांच्या नजरेस पडला.

येतांना वाटेंत सदोबांना त्यानें दुरून पाहिलें होतें. आतां आई रडत असलेली त्याच्या नजरेस पडली. जवळ आल्याबरोबर मोरूला आपल्याकडे ओढून त्याच्या मस्तकावरून त्यांनीं हात फिरविला. मोरूला कसेसेंच वाटलें.

" बाळ ! चांगला अभ्यास करून पास हो बरं ! " त्या म्हणाल्या. त्या गहिंवरलेल्या होत्या.

( २ )

" आमचं नाहीं का पत्रबित्र कांहीं ? "

नुसतें मानेनेंच नाहीं म्हणून पोस्टमन् पुढें जाऊं लागला.

" बरं ताजं वर्तमान पत्र तरी ? "

" शेजारच्या दामूअण्णांचं आलं आहे. "

पोस्टमन निघून गेला. कावेरीबाई उत्सुकतेनें बाहेर आल्या. कारण, ' पोष्ट-

वाल्यां 'शीं सदोबाला बोलतांना त्यांनीं ऐकलें होतें. पण सदोबा चिंताक्रांतच बसलेले त्यांना दिसले.

" आहे का कांहीं ? " त्यांनीं विचारलें.

" कांहीं नाहीं ! सदोबानें निराशेनें उत्तर दिलें.

" हूंऽऽ !" कावेरीबाईंनीं श्वास सोडला आणि त्या जड पावलानें घरांत गेल्या.

सदोबा उठून शेजारच्या दामूअण्णांकडे गेले आणि थोडयाच वेळांत धांवत धांवत घराकडे आले.

घरांत येतांक्षणीं त्यांनीं ओरडून म्हटलं—

" ऐकलंस का ? "

त्यांची हांक घरांत ऐकूं गेली नसावी.

" अगऽऽ ! ऐकलंस का ? आपला मोऱ्या मुलकीची परीक्षा पास झाला." घरांत पाऊल टाकीत सदोबा आनंदानें म्हणाले.

" हूंऽऽ ! "

" म्हणजे ? तुला कांहींच का वाटत नाहीं याबद्दल ?"

" होय, पण तो आला आहे का माझा बाळ ?"

" अग आतां येईल तो. जातो कुठं ?"

" पण त्याचं पत्रदेखील नाहीं ना आलं ?"

" परीक्षेंत पास व्हायला होतं कीं नाहीं तें बघायला तो राहिला असेल इतके दिवस पण आतां नाहीं राह्यचा. "

" बरं ! आपली शिस्त आहेच तशी !"

" यावेळीं देखील माझ्या शब्दावर बोलतेस तोंड करून ? वाः ग वाः !"

" हूंऽऽ !"

( ४ )

परीक्षेला म्हणून जिल्ह्याच्या गांवीं मोरू गेला तो परत आलाच नव्हता. परीक्षेला गेलेलीं सारीं मुलं आलीं. परीक्षेचा निकाल देखील लागला. मोरूचें नांव पास झालेल्या मुलांच्या यादींत छापून आलेलें सर्वांनीं वाचलें. सदोबांनीं वाचलें. कावेरीबाईंना वाचून दाखविलें. पण तें मोरूनें पाहिलें असेल काय असा विचार त्या वत्सल व प्रेमळ आईच्या मनांत उभा राहिला. तो निकाल प्रसिद्ध होऊन खप दिवस लोटले तरी मोरू घरीं आला नाहीं. मोरूची आई खंगूं लागली.

सदोबाही विचारांत गर्क झालेले दिसूं लागले. त्यांची कडक शिस्त (?) थोडथोडी कमी होऊं लागली. घरांत औदासीन्य वावरूं लागलें !

( ५ )

कांहीं दिवसांनीं त्यांच्या जिल्ह्याच्या वर्तमानपत्रांत व पुण्याच्या केसरींत पुढील जाहिरात प्रसिद्ध झालेली लोकांच्या वाचनांत आली.

## “ लवकर निघून ये ”

चिरंजीव मोरेश्वर यास—

अनेक आशीर्वाद. तूं परीक्षेसाठीं म्हणून गेलास. तो अजून आला नाहींस. तुझी वाट पाहून पाहून आम्हीं खंगत चाललों आहोंत. तुझी आई तर आंथरुणास टेंकली असून ती तुजसाठीं डोळ्यांत प्राण धरून राहिली आहे. तूं लवकर आला नाहींस, तर तिची काय दशा होईल सांगवत नाहीं. तुझीं सारीं भावंडेंही “ दादा ! कुठें आहे ? ” म्हणून एकसारखीं विचारीत असतात. तूं पत्ता कळवितांच इकडे येण्यासाठीं लागणाऱ्या खर्चाचे तुला पैसे पाठवितों. तरी हा मजकूर वाचतांच सविस्तर उत्तर पाठव.

“ सदोबा चिंतामण ”

( ......मुलाची उंची, बांधा, चेहरा, विशिष्ट खूण वगैरे वर्णन ) अशा वर्णनाचा मुलगा कोणास आढळला असल्यास त्याचा पत्ता आम्हांस कळविल्यास अगर त्याला घेऊन आल्यास खर्च सगळा देऊन आणखी बक्षीसही देऊं.

स. चिं.

# लग्नाच्या मंडपांत—

संपतगांव

१

चिरंजीव हेमंत,

अनेक आशीर्वाद. आम्ही सर्व खुशाल आहों. कॉलेजचा अभ्यास करीत असतांनाहि व्यवहारधंद्यांत लक्ष्य घालीत आहेस त्याबद्दल मला आनंद वाटतो. असें नेहमीं केल्यास कॉलेजशिक्षणाला नांवें ठेवण्याचे प्रसंग यायचे नाहींत. बाकी द्रव्यसंपादनास या कॉलेजशिक्षणाचा कांहींच उपयोग नाहीं हें माझें म्हणणें तुला आस्ते आस्ते पटल्याशिवाय राहणार नाहीं. आम्हांला सावकारीचें दर महिन्यास जितकें व्याज येतें तितका तुझा सबंध वर्षाचा पगार होतो कीं काय एवढेंच मला पहावयाचें आहे. तूं पाठविलेल्या इसमास त्यानें मागितलेली रक्कम दिली आहे. तारण गहाण लिहून घेतलें आहे. मात्र तो गहाण ऐवज तूं स्वतः पाहिल्याची खात्री लिहून पाठविलीस म्हणनच मी रक्कम त्यास दिली आहे. तो रक्कम ती कशास घेतो आहे हें आम्हांला विचारावें लागतें. तोच स्वतः घराचा व्यवस्थापक आहे. शिक्षणासाठीं वगैरे पैसे पाहिजेत म्हणतो. बाकी तो तुला मित्र चांगला शोभेल. स्वतःची जमीन गहाण टाकून शिक्षण घेणारा माणूस दिवसेंदिवस वेडयापीरातच गणला जाईल. उच्च शिक्षण घेणें म्हणजे हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागण्यासारखें आहे. चि. वनलतेचें हल्लीं पत्र नाहीं. तुला ती रोज भेटत असेलच. तिच्या लग्नाची काळजी हिला फार लागली आहे, आणि तेंहीं गैर नाहीं असें वाटतें. एक चांगलें मनपसंत स्थळ आलें आहे पण चि. वनलतेचें मन वळविण्याचें काम मी तुझ्यावर सोंपविणार आहें. ती फार हेकेखोर आहे. वयानें ती थोडीशी जास्त असली तरी तिला समजूत कमी आहे. हें स्थळ श्रीमंत आहे. मुलगा चांगला हुषार आहे. डिग्री नसली तरी त्याला इंग्रजी चागलें येतें. व्यवहार चांगला समजतो. आमच्यासारखीच त्यांचीहि सावकारी आणि जमीनदारी आहे. लतेला मी निराळें पत्र पाठवीत आहे. पण अधिक कामगिरी तुलाच करावी लागणार आहे. विशेष मागाहून. हे आशीर्वाद.

बाबासाहेब देशपांडे

२

मुंबई

प्रिय वनलता,

तुझें पत्र मिळालें. मला इकडे आणखी कांहीं दिवस लागतील. तोंपर्यंत तूं आणि हेमंत काय काय कारस्थानें कराल याचा मला कांहीं पत्ता लागत नाहीं. पण इतके खरें कीं, आपलें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं तुम्हीं जो मार्ग पतकरिला आहे तो मला तितकासा आवडत नाहीं. केवळ तुम्हां दोघांच्या भिडेनें, विशेषतः तुझ्या इच्छेसाठीं मी ती मानहानिकारक गोष्ट केली. तुम्हा दोघांला आपल्या वडिलांना वठणीवर आणावयाचें असेल. पण त्यासाठीं मला नाकदुराई काढाव्या लागतात, त्याची वाट काय ? तुझ्या वडिलांना श्रीमंत जांवई पाहिजे तसा मी श्रीमंत नाहीं. तर तूं आपली आवडनिवड त्यांना स्पष्ट कळवून मोकळी कां होत नाहींस ? आतां तूं म्हणतेस कीं माझ्या घरच्या जुन्या वाड्याची, गाड्यांची वगैरे चांगली डागडुजी, दुरुस्ती केली पाहिजे. मी ती रक्कम हेमंतकडेच देऊन आलें आहे. हेमंतानें सर्व कांहीं पाहिजे असेल तसें करून घ्यावें. जुन्या डामडौलाची मला मुळींच गरज नाहीं. तुझ्यासारखी पत्नी मिळविण्याकरितां कांहींतरी कर्तबगारी करून दाखविलीच पाहिजे असें कोणी म्हटलें तर तें वावगें होणार नाहीं. तशा प्रकारची कठीण कर्तबगारी करून दाखविण्याची मीही शिकस्त करीन. परंतु आपली जमीन गहाण लावून ऋणकोपणा पतकरण्याचें—नाटकी का होईना—काम करावें लागले तें केवळ हेमंतच्या आणि तुझ्या हट्टासाठींच मी केलें. पण तें केल्याबद्दल मला वारंवार पश्चात्ताप होत असतो.

माझ्या ओळखीचे एक प्रोफेसरसाहेब अमेरिकेस जात आहेत. मला त्यांच्याशीं बराच विचारविनिमय करावयाचा आहे. ज्या वनस्पतींपासून रंग बनविण्याचे प्रयोग मी करीत आहें, ते यशस्वी होतील अशी मला खात्री आहे. व ते यशस्वी झाले तर देशी कापडधंद्याला जर्मनीच्या तोंडाकडे पहावें लागणार नाहीं. त्यासाठीं मग मला परदेशींहि जावें लागेल. पण मी पाठविलेला नवीन शोधाचा निबंध तेथील लोकांना कसा काय आवडतो पहावें. मी पुण्यास यावयास निघावयाच्यापूर्वी कळवीनच.

तुझा,

**वसंतराव**

-३-

फर्ग्युसन कॉलेज, पुणें

प्रिय हेमंत,

ती. बाबांचें पत्र वाचल्याबरोबर तुला भेटण्याकरितां म्हणून आलें. पण तुझी खोली बंद पाहून तुझ्या पेटींत हें पत्र टाकून जात आहें. मला कळविल्याशिवाय तूं एकाएकीं कुठें गेलास समजत नाहीं. तीन दिवसांची रजा असल्यामुळें कदाचित् उद्यांहि येणार नस्शील. पण आल्याबरोबर मला भेटायला ये.

घरून बाबासाहेबांचें पत्र यावयाच्या आधीं मुंबईहून वसंतरावांचें पत्र आलें होतें. त्यांतील मजकूर वाचून माझ्याहि मनाला पश्चात्ताप वाटत आहे. आपण त्यांना भलतीच गोष्ट करावयास सांगितली असें राहून राहून मनाला वाटतें तथापि–पण जाऊं दे. बाबासाहेबांनीं म्हणे माझ्याकरितां स्थळ शोधलें आहे ! ज्या कर्माला मी भीत होतें तें आतां आपल्यापुढें अशा प्रकारें उभें राहिलें आहे ! या प्रसंगाला तोंड द्यावयाला मला तुझ्या मदतीची गरज आहे. माझी नापसंती मी पत्रांतून बाबांना कळवीत आहेच. तथापि तूं तें काम अधिक स्पष्ट भाषेंत करशील तर बरें. मला आयती श्रीमंती आवडत नाहीं हें तूं ओळखतोसच. आपण पूर्वी ठरवून ठेवलेल्या प्रयोगास आतां सुरवात करावी लागणार आहे. कुठून आणि कशी करावयाची तें तूं आल्याबरोबर ठरवून टाकूं.

माझी मैत्रिण विमल हिला माझ्या स्थितीची थोडीशी माहिती झाली आहे. तथापि तूं आलास म्हणजे ती कांहींना कांहीं निमित्त काढून माझ्या खोलींत येतेच त्याचें कारण काय असावें समजत नाहीं. तुला सांगतां येईल का ?

तुझी,
ताई

-४-

डेक्कन कॉलेज

प्रिय ताई,

सुभद्रेच्या बाबतींत जी खटपट कृष्णाला करावी लागली त्याच्या किती तरी पटींनीं अधिक मला करावी लागत आहे. वसंतरावाच्या गांवींच मी या सुटींत गेलों होतों. मला पुढें जें कपट करावें लागणार आहे तें आपणा सर्वांच्या बऱ्याकरितां आहे तथापि हेकेखोरपणाला या बाबांच्या कपटाशिवाय दुसरें औषध नाहीं; आणि हीं

जुनीं माणसें सामोपचाराच्या गोष्टीनीं कधींहि वळावयाचीं नाहींत. " आपला पूर्वीचा हट्ट सोडून आमची ताई श्रीमंत व सावकार नवरा पसंत करावयास तयार आहे; आणि त्याप्रमाणें तिनें तसा पसंत करून ठेवलाहि आहे;' तुमच्या म्हणण्याला आतां आम्हीं दोघे कबुली देत असल्यामुळें आमचें म्हणणें तुम्हीं कबूल केलें पाहिजे. तें म्हणणें असें कीं आम्हीं पसंत केलेलें स्थळच तुम्हींहि ठरविलें पाहिजे. " असें मी बाबासाहेबांस कळविलें आहे. यावर ते स्वतः तें स्थळ पहावयास जातील. त्यावेळीं त्यांची खात्री करण्यासाठीं काय करावयाचें त्याचीच व्यवस्था मी करून आलों आहें. बाबासाहेब जें स्थळ म्हणतात, तें इतकेंसें चांगलें नाहीं. शिवाय त्या बाबतींत मध्यस्थामार्फत सांगोवांगीच्या गप्पाच चालल्या आहेत. त्या मोडावयाला कांहीं फारसे अवघड नाहीं. बाबासाहेबांच्याच कलानें घेऊन मी त्यांना खूष राखून ठेविलें आहे. ती. बाबासाहेब फक्त श्रीमंतीबद्दलची तेवढी खात्री करून घेतील. नवरा मुलगा पहावयाचें कसें काय करतात पहावें. पण माझ्या मनाच्या योजनेप्रमाणें साऱ्या गोष्टी घडून येतील असें वाटतें.

या खटपटीसाठीं तिकडे जाण्यांत माझा दुसराहि एक हेतू होता. मी तुझ्या घरची स्थिति व माणसें म्हटलें एकवार नजरेखालून घालावींत. वसंतरावांची आई फारच प्रेमळ आणि सुस्वभावी आहे. त्याचा धाकटा बंधू आहे तोही सद्गुणी असून हायस्कूलमध्यें शिकत आहे. घराणें मूळचें खानदानीचें होतें. संस्थानी दरबारांतून बराच मान होता. वसंतरावांच्या आजोबांनीं आणि वडिलांनीं बहुतेक इस्टेट घालविली. अखेरीस पश्चात्ताप होऊन त्यांनीं कांहीं रक्कम जमा करून मुलाच्या शिक्षणाची तेवढी व्यवस्था आणि कुटुंबाच्या पोटगीची तरतूद करून ठेविली. त्याच्यावर कुटुंबाचा जेमतेम व्यवहार गुजारा चालला आहे.

ताई, तूं म्हणतेस तशा अर्थाचें पत्र वसंतरावांकडून मलाहि एक आलें होतें. पण मी असल्या गोष्टींस भीक न घालतां करावयाचें तें करून जाणारा गडी आहें. तूं निर्धास्त ऐस. ज्यूनियर वर्ष आहे. म्हणून अभ्यासांत टाळाटाळ करूं नकोस. कारण तें वसंतरावांस आवडणार नाहीं. त्यांच्या संस्थानिक यजमानांकडून त्यांना शिष्यवृत्ति मिळत आहे. त्यांचा शोध यशस्वी झाला तर त्यांच्यावर मोठी जबाबदारी पडणार आहे. त्यांना पदवीधर बायको पाहिजे आहे. हें विसरूं नकोस. लग्न झालें तरी बी. ए. होईपर्यंत तुला अभ्यास करावा लागणारच, हें मात्र विसरूं नकोस.

तुझ्या शेवटच्या प्रश्नाचें उत्तर योग्य वेळीं मी देईन. सध्यां फार घाईत आहें; म्हणून हें पत्र रेक्टरसाहेबांकडे देऊन जात आहें.

माझ्या अभ्यासाकडे थोडेंसें दुर्लक्ष होत असतां मी तुला उपदेश करीत असल्याबद्दल तुला राग येईल. परंतु ताईसाहेब, आपण माझ्यावर रागवूं नये, कारण हें सर्व आमच्या ताईसाहेबांकरितांच चाललेलें आहे हें सांगावयास नको ना ?

तुझा,
हेमंत

—५—

संपतगांव

रा. रा. मादण्णा यांसी.

न. वि. वि. लिहावयाचें कीं, आपल्या गांवाजवळच्याच सोनगांवांत आमचे स्नेही आहेत त्यांना भेटून नंतर थेट मी पुण्यास जाणार आहें. चि. हेमंतकुमार तुमच्याकडे आल्यास त्यास मी येईपर्यंत ठेवून घ्यावें. मग आम्ही दोघे व मधुकरराव मिळून एकदमच पुण्यास जाऊं. आम्ही निघाल्यावर आपणास कळेलच. आपल्याकडे थोडा वेळ बसून जावें असा हेतु आहे. क. वि. वि.

आ.
बाबासाहेब देशपांडे

—६—

डेक्कन कॉलेज, पुणें

श्रीयुत वसंतराव,

ओहो ! चुकलेंच. आपण आतां वसंतराव नसून मधुकरराव आहांत. वसंतराव म्हणजे जमीन गहाण टाकून कर्ज घेणारा गरीब माणूस. आणि मधुकरराव म्हणजे बाबासाहेब देशपांडे यांस देखील खालीं पहावयास लावण्याइतका पिढीजाद श्रीमंत गृहस्थ. लग्नघटिका यथासांग पार पडेपर्यंत आपण आतां मधुकरराव कुळकर्णी आहांत, हें विसरायचें नाहीं बरें. तुमच्या नव्हे, मधुकररावाच्या वाड्यावर बाबासाहेब हे मित्राला भेटण्याचें निमित्त करून जाऊन आले. तेथें मादण्णा होतेच. मीही गेलों होतों. घोड्यांच्या दोन नव्या जोड्या, दोन घोड्यांच्या गाड्या, शृंगारलेला वाडा, बगीचा वगैरे पाहून बाबासाहेब खूष झाले असून वनलता मधुकररावांनाच द्यावयाची ठरविलें त्यांनीं आहे. कारण काय ?

तर मधुकररावांची इस्टेट भरपूर आहे. मधुकररावांना मी पाहिलेलें आहेच. तेव्हां त्यांस स्वतः पाहण्याची विशेष आवश्यकता बाबासाहेबांस वाटली नाहीं हें सांगावयास नकोच, मधुकरराव म्हणजे काय मुलगी आहे, तें तिला पहावयाचें ? तेंही एका अर्थी खरेंच. मुलग्यांत पहाण्यासारखें तरी काय असावयाचें ? आपण ताईला पाठविलेल्या पत्रांतील मला कळविण्यासारखा होता तितका भाग तिनें मला कळविला. तथापि प्रेमाच्या बाबतींत स्वाभिमान ही चीजच ओळखली जात नाहीं; या गोष्टीची तुम्हांला वारंवार आठवण करून देणें भाग पडतें. ही गोष्ट अशी वारंवार आपण विसरूं नये. विसरण्याइतकी क्षुल्लक नाहीं ती गोष्ट बरें ! आपण शास्त्रीय संशोधन आणि प्रेमसंशोधन एकदमच चालवून दोंहातीं संशोधक बनलां आहांत. पण प्रेमसंशोधनांत देखील ढिलेपणा उपयोगी पडत नाहीं. आपण डबल संशोधक होणार आहांत.

शास्त्रीय संशोधनाचा निर्बंध पसंत पडून आपणास पदवी व बहुमान मिळाला याबद्दल मी आपलें अभिनंदन करितों. आपल्या संशोधनाचा प्रायोगिक विजय झाल्याचेंहि लवकरच समजेल अशी आशा आहे. सवडीनुसार उत्तर यावें. मुंबईचा मुक्काम बराच वाढत चाललेला दिसतो. प्रकृतीकडे लक्ष असावें. क. लो. अ. वि.

आ.

हेमंत

— ७ —

तारणपूर

अण्णासाहेब यांसी

सा. न. वि. वि. श्रीमंतांच्या सेक्रेटरी साहेबांची भेट झाली होती. त्यावरून समजलें कीं आपणास मिळालेल्या यशानें श्रीमंतांची स्वारी आपणावर खूष झाली आहे. राजधानींतच जंगी प्रयोगशाळेची इमारत बांधावयाचें ठरलें आहे. मुंबई युनिव्हर्सिटीची एम्. एस्. सी. व अमेरिकेंतील युनिव्हर्सिटीची एम्. एस्. ही डिग्री मिळाल्याबद्दल फार आनंद वाटतो. आईसाहेबांचें स्वतंत्र पत्र येईलच. आम्ही सर्व पुढील शुभ मुहूर्ताची वाट पहात आहोंत. आपल्या आज्ञेप्रमाणें सर्व तजवीज ठेवतों. हेमंतराव मधून मधून भेटत असतात. पत्रोत्तर यावें. क. हे. वि.

आ.

माद्‌ण्णा

— ८ —

संपतगांव

चि. वनलता,

अनेक आशिर्वाद. तुझें पत्र हल्लीं वेळोवेळीं येत नाहीं. मला कळवा-वयाच्या गोष्टी सगळ्याच चि. हेमंतमार्फतच कळवावयाचें तूं ठरविलें आहेस कीं काय ? कॉलेजला गेल्या पंधरवड्यांत उन्हाळ्याची सुट्टी होतांक्षणींच चि. हेमंत आणि तूं दोघांनींहि यावें. निदान तूं तरी ताबडतोब ये. विलंब लावूं नकोस. मधुकरराव फार चांगल्या स्वभावाचे आहेत. वगैरे वर्णन हेमंतनें केलेलें आहे. तुलाहि ती माहिती असेलच. वैशाखांतला मुहूर्त धरीत आहें. रा. रा. मादण्णाला पत्रं पाठवीत आहें. बाकीच्या गोष्टींकडे चि. हेमंत लक्ष पुरवीत आहेच. तूं लवकर यावेंस अशी तुझ्या आईची फार इच्छा आहे. क. हे आशिर्वाद.

बाबासाहेब

— ९ —

फर्ग्युसन कॉलेज, पुणें

प्रिय वसंतराव,

आपलीं दोन्ही पत्रें वाचून फार आनंद झाला. पाहिल्या पत्राचें उत्तर लिहीन लिहीन म्हणे तों दुसरें आलेंच. त्यामुळें माझ्या निरुद्योगीपणाच्या दिरंगाईबद्दल माझी मलाच लाज वाटते. आपण क्षमा करावी. आपलें पहिलें पत्र मुंबईहून आलें तें वाचल्यानंतर माझ्या मनांत अनेक विचार येऊं लागले. ती बाबांची गंमत करण्याकरितां हेमंत आणि मी यांनीं वाटेल तें केलें, तरी त्यांत आपल्याला भाग घ्यावयास लावणें जरा चमत्कारिकसे दिसतें खरें. पण आतां सुरवात करून तर बसलोंच. तेव्हां त्या नाटकाचा शेवट हा केलाच पाहिजे. त्याबद्दल आपण सांगाल ती शिक्षा मी स्वतः भोगावयास तयार आहें पण मागावून हं !

खरें म्हटलें तर गेल्या आठवड्यांत मला बरें वाटत नव्हतें. सरदी येऊन डोकेंहि दुखत होतें. शिवाय मनांत अनेक विचारलहरी येऊन कसेंसेंच वाटे. तथापि आपण लिहिल्याप्रमाणें माझा अभ्यास चालूच आहे. त्यांत सैलपणा केलेला नाहीं. माझ्यासाठीं हेमंतला फारच त्रास पडत आहे. माझ्यासाठीं आपण तो सुचवील तसें वागण्यास कांकूं करूं नये अशी विनंति आहे. आपण ती मान्य कराल ना ? मी संपतगांवला जात आहें. आतां आपली गांठ लग्नमंडपांतच.

सर्वस्वी आपलीच,

वनलता

— १० —

डेक्कन कॉलेज

ती० बाबासाहेब यांसी.

वडिलांचे सेवेसीं कृ. सा. न. विज्ञापना. आपलीं पत्रें मिळालीं. वनलतेला पत्र लिहिण्यास मी सुचविलें होतें. गेल्या आठवड्यांत तिला बरें वाटत नव्हतें. आतां बरी आहे. आपल्या पत्राला उत्तर तिच्याकडून गेलें आहेच. आपण लिहिल्या-प्रमाणें कॉलेजला सुटी पडतांच ती तिकडे निघून येईल. मला थोडासा उशीर लागेल. कदाचित् मी मधुकररावांबरोबरच येईन. आमचें तिघांचेंहि म्हणणें असें आहे कीं, आपण लग्नाचा फार मोठा थाटमाट बिलकूल करावयाचा नाहीं. उगाच भलत्या चालीरीती, आणि छानछोकीची गडबड किंवा भलत्या कामांत उधळपट्टी असलें कांहींएक व्हावयास नको. मधुकररावांना तें मुळींच आवडत नाहीं. आणि मलाहि तें पसंत नाहीं.

दुसरी एक गोष्ट अशी कीं मधुकररावांचें एक फार निकडीचें काम आहे. त्यामुळें मुहूर्ताच्या आदल्या दिवशींच त्यांना यावयास सवड होईल. नंतर मात्र फक्त चारच दिवस रहातील.

मी म्हणतों, तसेंच कां होईना? त्यांत काय बिघडलें? आपल्याला तितका कमी खर्च येईल. उशीरां येऊन लवकर जातील तितकें चांगलें. मी सुचविलेल्या गोष्टी तुम्हांला पटतात, हें पाहून मला फार आनंद वाटतो. मी इकडे सर्वांना सांगत असतों कीं आमचे बाबासाहेब जुन्यांतले जुने आणि नव्यांत नवे आहेत. तुमची प्रगतिप्रियता मला वाटतें पुण्याच्या सुधारकांच्या तोडीची आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. लग्नविधीच्या बाबतींत फार अवडंबर माजवावयास हवें कशाला?

मधुकररावांकडून फार माणसें येणार नाहींत. ईनमीन तीनच मुख्य माणसें. बाकीचा लवाजमा घरच्याघरींच राहीना कां! त्यांची सगळीच मंडळी फार तर दहा पंधरा माणसें होतील.

इकडचीं सारीं कामें आटोपून मीही लौकरच येतों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

आपला आज्ञाधारक,

हेमंत

—११—

डेक्कन कॉलेज

प्रिय विमल,

तुझ्या सूचनेप्रमाणें हें पत्र ताईचें नांव पत्त्यावर लिहून पाठविलें आहे. पण त्यामुळें मला शंका वाटूं लागली आहे. पत्र पोंचल्याचें उत्तर तुझ्याकडून आल्याशिवाय मला समाधान वाटणार नाहीं. ताईनें आपलें टपाल घेऊन तिच्याकडे पाठविण्याचा अधिकार तुला देऊन ठेवला आहे हें आपल्या फायद्याचेंच झालें म्हणावयाचें. माझें पत्र बहुधा अचूक तुझ्या हातीं जाईल. रेक्टरना कसलीच शंका येणार नाहीं.

बाकी विमल, आपण कितीहि सावधगिरीनें वागलें तरी ताईला सर्व कांहीं समजलें आहे. उद्यां तूं बंडमध्यें आलीस कीं तिथें मी सर्व कांहीं दाखवीन आणि सांगेन.

खरोखर वसंतरावांचा कित्ता आपण सर्वांनीं घेण्यासारखा आहे असें तुला नाहीं का वाटत ? मी तर निश्चयच केला आहे कीं त्यांच्याप्रमाणेंच आपण देखील स्वतःच्या कर्तबगारीनें मिळविता झाल्याशिवाय लग्न करावयाचेंच नाहीं. विमल ध्यानात ठेव हो ! नाहींतर घाई करायला लागशील. तूं पण कसून अभ्यास केला पाहिजेस. यंदा मी इंटरला खात्रीनं पास होईन. तूं पण प्रीव्हि- असमध्यें फेल होतां कामा नये. स्कॉलर आलीस तर उत्तमच. बाकीचे धंदे संभा- ळून मला स्कॉलर कांहीं होतां येणार नाहीं. पण पास झाल्याशिवाय राहणार नाहीं. मी शेवटची परीक्षा पास होऊन स्वतंत्र कमाई करावयास पात्र होईन, तेव्हांच लग्नाची माळ हातीं घेईन. कारण वडिलांची संपत्तिं कितीहि असली आणि मुलाला ती कितीहि सुखसोईची गोष्ट असली, तरी मुलाला ती **अभिमानास्पद खास नाहीं**, असें माझें मत आहे.

परवां टॉकीला जावयाचें ठरविलें आहे. तुझ्या अभिप्रायावर अवलंबून आहे तो बेत.

तुझाच

हेमंत

– १२ –

संपतगांव

प्रिय विमल,

तुझें पत्र मिळालें, कॉलेजला रजा झाली असून तूं तिथें राहिली आहेस, ती माझ्या टपालाच्या सोयीसाठीं राहिली आहेस, कीं त्यांतल्या त्यांत स्वतःची पुढची कसली तरी सोय लावण्याची कामगिरी करत्ये आहेस हें न समजण्या-इतकी मी अजाण नाहीं बरें ! असो, तें मला पहावयाची जरूर नाहीं माझ्या टपालाची सोय तूं करते आहेस, याबद्दल मी तुझे आभार मानित्यें.

आतां इकडची हकीगत तूं विचारलीस आहेस. पण ती पत्रांत लिहून संपा-वयाचीच नाहीं मुळीं. हेमंत आणि तोतया मधुकरराव उर्फ वसंतराव आले ते ऐन लग्नाच्या दिवशीं फार उशीरां आले. लग्नाची सारी तयारी होतीच. सुमुहू-र्तावर लग्नाची माळ पडली. नंतर थोडया वेळानें बाबांना शंका येऊं लागली. ते वसंतरावांच्या तोंडाकडे निरखून पाहूं लागले तोंपर्यंत सारे विधी त्यांना मुका-टयानें करावे लागतच होते. सारे विधी आटोपल्यावर त्याना मोकळीक मिळ-तांच त्यांनीं मला आणि हेमंतला एकीकडे बोलावून घेतलें. त्यावेळीं ते किती संतापले होते म्हणून सांगू ? क्षणभर आम्हीं दोघें भांबावूनच गेलों.

“ हेमंत ! ” ते रागारागानें बोलत होते.

“ काय बाबा ? ” त्यानें म्हटलें.

“ मधुकरराव हा कोण रे ? ”

“ कां बाबा ? ”

“ ज्यानें माझ्याकडे जमीन गहाण टाकली तोच ना तो भिकारडा ?

हे शब्द ऐकून मला बाबांचा अतिशय राग आला. तथापि तो गिळून आम्हीं दोघांनीं हंसून दिलें. बाबा अधिकच संतापले.

“ होय. तोच तो ! ” हेमंतानें सांगितलें.

“ तेच ते, ” मीही हेमंतला दुजोरा दिला.

“ आणि तुम्हीं दोघांनीं ह्या गोष्टी मुद्दाम केल्या ? ”

“ होय बाबा ! ” आम्हीं दोघांनीं शांतपणें सांगितलें.

“ आणि मला फसवलं ? ”

“ होय बाबा. ”

" मग मला ठार मारून कां नाहीं टाकलंत ? कारट्यांनों ! "

" तुम्हीं आम्हांला नकोसे नाहीं झालांत ! बाबा. "

" पोरांनो ! शिक्षण घेतल्याचा हाच परिणाम वाटतं ? "

" होय बाबा. "

" माझें मस्तक भडकून गेलें आहे ! "

" थोडया वेळानें होईल शांत, बाबा ! "

" अरे पण तीं तुझीं पत्रें–? "

" होय, तुम्हांला चकवण्यासाठीं मी ती मुद्दाम माघार घेतली होती. माझें पूर्वीचेंच मत अजूनही कायम आहे. पिढीजाद श्रीमंती असलेली त्याज्य नाहीं. तथापि पिढीजाद श्रीमंतीलाच घेऊन बसायचं आणि वधूवरांची परस्पर आवड-निवड, त्यांचें शिक्षण, त्यांची वयें, त्यांचे परस्परानुकूल स्वभाव, वराचे सद्गुण त्याची व्यक्तिशः कर्तबगारी इत्यादि गोष्टींकडे अजीबाद डोळेझांक करावयाची, याला काय म्हणावें ? आम्हीं दोघांनीं सांगितलें तरी तुम्हीं ऐकलें नाहीं, म्हणून आम्हांला असें करावें लागलें. माफ करा बाबा " हेमंतानें कैफियत गुदरली.

" अरे, पण जमीन गहाण ठेवणाऱ्या भिकाऱ्याची कर्तबगारी कसली घेऊन बसलों आहेस.

" मी त्यांना गहाण ठेवावयास भाग पाडलें. त्यांना तितकीशी आवश्यकता नव्हती. तुम्हीं त्याचें दार पहावयास जाणार होतां ना ? तेव्हां ती झकपक करावयाला पैसाहि त्यावेळीं हातांत नव्हताच. तेव्हां म्हटलं एखाद्या श्रीमंताला तुम्हीं पुढें लग्नांत तरी वरदक्षणा देणारच होतांच, ती आधींच द्यावयाला लावावी. गहाण दस्तऐवज मग फाडून टाकलंच तुम्हीं आपल्याच हातांनीं ! "

" फाडतों बरं आतांच त्याला विचारतों "—ते जाऊं लागले. तेव्हां त्यांना अडवीत हेमंतनें विचारलें.

" कुठें जातां बाबा, आणि कोणाला काय विचारतां ? "

" त्या भिकारड्याला. "

" बाबा, आपल्या सन्मान्य, राजमान्य आणि जगमान्य जांवयाला असले अपशब्द बोलूं नका. वडिलांनीं ठेवलेल्या हजारों रुपयांचे लाखों रुपये तुम्ही सावकारीच्या धंद्यावर केले असतील. पण त्यांत तुमची स्वतःची कर्तबगारी कसली आहे हो ? आतां वसंतरावांची कर्तबगारी पहाणार आहांत का ? ही पहा " असें

म्हणून हेमंतानें कागदांचीं भेंडोळींचीं भेंडोळीं बाहेर काढलीं. मला तो चमत्कार पाहून मोठा अचंबा वाटला. त्यांत त्यांना मिळालेल्या पदव्या, शिफारसपत्रें वगैरे होतींच. पण इंग्रजी मराठी वर्तमानपत्रांत त्यांच्या अभिनंदनस्तुतिपर आलेले लेख व फोटो होते. शिवाय श्रीमंत महाराजांच्या सेक्रेटरीकडून आलेलें अभिनंदनपर पत्र होतें. त्या पत्रांत त्यांना दरबारांत मानाचे मानकरी करण्यांत येऊन पूर्वीचा इतमाम चालू करून त्यासाठीं नेमणूक तनखा देण्याचा महाराजांचा हेतू कळविलेला होता. संस्थानची भरभराट त्यांच्या शोधानें होण्यासारखी असल्यामुळें त्यांना मोठ्या मासिक वेतनावर नेमावयाचें ठरलें होतें; व त्यासाठीं भरदरबारांत सरकारकडे टाकलेल्या गहाण जमिनी सोडून देण्यांत यावयाच्या होत्या. हा सर्व प्रकार पाहून मी तर चकितच झालें पण बाबांवरही त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं."

विमल, सविस्तर हकीकत लिहावयास गेलें, तर तो मोठा ग्रंथ होईल. मला तितका वेळ आणि एकांतही नाहीं. समक्ष सर्व कांहीं सांगेन.

हेमंत पुण्यास लवकर जाण्याची घाई करीत आहे. तो येईपर्यंत तूं पुण्यास थांबणार कीं काय ? घरीं कधीं जाणार तें कांहींच लिहिलें नाहींस. उत्तर लवकर पाठव.

तुझी
**वनलता**

# गृहिणी-नटी

ती आज नाटकाला आली होती.

नाटक कंपनींतील नटमंडळींनाही हें ठाऊक होतें कीं, मिस् माधुरी ही आपल्या पतीसह नाटकाला आली आहे. मिस माधुरी ही आतां सौभाग्यवती झाली असली तरी नाट्यसृष्टींतलीं माणसें तिला मिस माधुरीच म्हणत असत. अगदीं पुढच्याच रांगेंत बॉक्समध्यें शेठ रतिलाल आपली प्रिय पत्नी माधुरी हिच्यासह नाटक पहात बसले होते. पण तें नाटक पहाणें कसलें ? व्यापारी पद्धतीचेंच तें ! मधून मधून आपल्या खिशांतून कसले तरी कागद काढून पहाण्याची त्यांना हुक्की येईच ! माधुरीनें रंगभूमीवर चाललेल्या प्रसंगांत रंगून जावें आणि त्या मजेदार प्रसंगाची मौज वाटतां क्षणींच त्या आनंदांत भागीदार करण्यासाठीं आपल्या पतिराजाच्या बाहूस जोरानें स्पर्श करावा. आणि तत्क्षणीच एकदम जागे झाल्यासारखें रतिलालनीं कागद खिशांत कोंबून आपण तिच्याशीं समरस झालों आहोंत असें भासविण्यासाठीं व कृत्रिमपणा झांकण्यासाठीं सहास्य मुद्रेनें "वाहवा ! छानछान !" असे उद्गार काढीत असतां पत्नीचा हात दाबावा, अशी गंमत एकसारखी चालू होती.

रंगभूमीवरील नाटक पहात असतां गॅलरींतील स्त्रियांकडे व प्रेक्षकवर्गामधील जोडप्यांकडे चोरट्या डोळ्यांनीं पहाणाऱ्या निरीक्षकांच्या नजरेंत रतिलाल माधुरीचे हे प्रकार आल्याशिवाय राहिले नव्हते. रतिलाल मधूनमधून जेव्हां सभोंवतालीं नजर फेंकीत तेव्हां त्यांच्या दृष्टीस एकादा मिस्किलपणें हंसरा चेहरा पडे व ते जरासे भांबावल्यासारखे होत. त्यांना वाटे हंसणारीं माणसें आपल्यालाच हंसताहेत कीं कदाचित् रंगभूमीवरील पात्रांस किंवा आपापसांत चाललेल्या संभाषणाच्या ओघांत तीं हांसत असतील असेंही ते आपल्या मनाचें समाधान करून घेत असत. बाकी तीं हंसणारीं माणसें खरें म्हणायचें तर रतिलालशेठच्या अरसिकपणाची कींवच करीत होती.

नाटक सुरू झाल्यानंतर सुमारें पंधरावीस मिनिटांनीं रतिलाल—माधुरी आलीं

होतीं. त्यामुळें त्यांनीं साहाजिकपणेंच प्रेक्षकांचें लक्ष वेधून घेतलें होतें. तीं आल्यानंतर त्यांना बसविण्यासाठीं मॅनेजर तेथें अदबीनें येऊन व त्यांच्याशीं हलक्या आवाजांत कांहीं बोलून गेले होते. त्यामुळें पूर्वींपेक्षांही अधिक माणसांचें लक्ष तिकडे वेधलें. तशांत रतिलालचा रुबाबदार चेहरा व माधुरीचें अप्रतिम लावण्य व तिची मनोहर वेषभूषा यांचे योगानें कोणाचीही नजर त्या जोडप्यावर खिळून राहणें अगदीं स्वाभाविक होतें.

ज्या कंपनीचें नाटक आतां रंगभूमीवर चाललें होतें, त्याच प्रसिद्ध कंपनींत माधुरी ही पूर्वीं मुख्य नायिकेचें काम करीत असे. याच ठिकाणीं याच नाटकांतील काम पाहत असतां रतिलाल माधुरीवर आषक्त झाले. याच नाटकांतील नायिकेच्या कामामुळें माधुरीला प्रसिद्ध नटी ही पदवी मिळाली व नंतर ती सौभाग्यवती पदाला पोंचली. ही गोष्ट दोन वर्षांपूर्वीं घडली होती. नाटककंपनींत असतांनाच निरनिराळ्या फिल्म कंपन्यांकडून तिला बोलावणीं आलीं होतीं. पण रतिलाल शेठची धर्मपत्नी झाल्यावर तिला उघडपणीं बोलावणीं येईनात. तथापि अप्रत्यक्ष सूचना येतच असत.

तें नाटक पहात असतांना पूर्वींच्या आठवणी त्या दोघांच्याही मनांत येणें अपरिहार्य होतें. स्टेजवर काम करीत असतांनाच माधुरीची नजर रतिलालवर कशी खिळली, रतिलाल जन्मांत पहिल्यांदाच माधुरीवर कसे मोहित झाले ? दोन अंक संपल्यावर नाटक आटोपण्यापूर्वीं कंपनीला धन्यवाद द्यावयास रतिलालचे पाय रंगभूमीच्या आंत कसे खेंचले गेले, त्यांचें स्वागत कंपनीकडून किती हार्दिकपणें करण्यांत आलें, इतर मंडळी बाहेर गेल्यावर रतिलाल शेठजींना दुधाचा पेला कसा मिळाला, आणि दुधाचा एकेक घोट खालीं उतरत असतां रतिलालशेठ कसे मंत्रमुग्ध बनले, कंपनीला शेठजीकडून भरींव रकमेची गुप्त देणगी कशी मिळाली, आणि शेवटीं त्या गांवांतून मुक्काम उठतांना कंपनीची मुख्य तारका कंपनीच्या आकाशांतून गळून तिचें शीतल चांदणें रतिलाल शेठजींच्या प्रासादांत सदासर्वदा पौर्णिमेचा भास कसा उत्पन्न करूं लागले हा सारा प्रकार अखिल जनतेला तेव्हां कादंबरीसारखा वाटला होता; व आतां त्याच आठवणी त्या उभयतांच्या मनांत उचंबळूं लागल्या होत्या.

नाटक सुरूं असतांना त्या दोघांचें एकमेकांशीं काहीं तरी कुजबुजणें चालूं होतें. नायिकेच्या कामाला टाळ्या पडत, त्या वेळीं माधुरीच्या कपाळाला आंठ्या पडत असत. तिचें काम माधुरीला पसंत पडत नव्हतें, हें खास. रतिलाल

शेठनाही तें नाटक आवडत नव्हतें. पण त्यांना तें न आवडण्याचीं कारणें भिन्न होतीं.

वास्तविक पाहतां आजचें काम पूर्वी जसें माधुरी करीत असे, तसेंच आतांही तिच्या जागीं आलेली नटी करीत होती. पण माधुरीच्या ज्ञानांत कितीतरी भर पडली होती. त्यामुळें त्या कामांत तिला कितीतरी सुधारणा कराव्याशा वाटत होत्या. ती आतां गृहिणी झाली असली तरी तिचें लक्ष कला व त्यांतूनही नाट्यकला या विषयाकडेच जास्त लागलेलें असे. माधुरीला त्यामुळें आजच्या नायिकेचें काम पसंत पडत नव्हतें.

रतिलालचा दृष्टीकोन वेगळा होता. माधुरीचें काम पाहिल्यामुळें त्यांतील मोहक-पणा रतिलालशेठना आजच्या नायिकेच्या कामांत प्रतीत होत नव्हता. शिवाय त्यांच्या मनांतही एकप्रकारची मळमळ उत्पन्न झाली होती. त्यावेळीं माधुरीबरोबर काम करणारा जो नट होता, तोच आजही नायकाचें काम करीत होता व त्याची एकप्रकारची चमत्कारिक नजर माधुरीकडे रंगभूमीवरून मधून मधून लागत असलेली रतिलालशेठच्या दृष्टिपथांत येऊं लागली. त्यापासूनच त्यांनीं खिशांतून कागद काढण्याचें बंद केलें ! ते अनिमिष नेत्रांनीं रंगभूमीकडे व नंतर मध्येंच केव्हां तरी माधुरीकडे पाहूं लागले.

कारणें निरनिराळीं पण नाटक नापसंत असल्याच्या बाबतींत रतिलाल व माधुरी या दोघांचेंही एकमत झालें एवढें बरीक खरें.

" नाटककंपनीच्या मालकाला मला कांहीं सूचना कराव्याशा वाटतात. दुसरा अंक संपल्यावर आंत जाऊन येऊं का ?

रतिलाल शेठच्या छातींत धस्स झालें !

" का ? आपण बंगल्यावर गेल्यावर त्यांना लेखी सूचना पाठवूं, किंवा जरूरच असेल तर आपण त्यांना आपल्या बंगल्यावरही बोलवूं ना ? त्यांत काय !" शेठ म्हणाले.

रतिलालच्या या सरळ उत्तरावर माधुरीला कांहींच बोलतां येणें शक्य नव्हतें. तिला गप्प बसावें लागलें. पण तिचें मन रंगभूमीकडे धांव घेत होतें.

तो रंगभूमीवरचा मादक सुवास, तें तेथील मोहक वातावरण, रसिकांच्या टाळ्या मिळतांक्षणींच अंगावर उठणारे धन्यतेचे रोमांच, आंत मालकांनीं काढ-लेले उत्तेजनाचे उद्गार, वर्तमानपत्रांचे रिपोर्टर, कवि, टीकाकार, व रंगपटाच्या आसपास घोटाळत लुडबुडणारे इतर रसिकब्रुव यांनीं तोंड भरून केलेली स्तुति

यांच्या योगानें मनाला कसें आणि काय वाटतें हें नटाच्या जन्माला यावें तेव्हांच कळावयाचें. त्याची मातब्बरी इतरांना कळावयाची नाहीं. माधुरीला आज दोन वर्षांनीं तें सारें सारें आठवलें. तिचें मन रंगभूमीकडे ओढ घेऊं लागलें. तिच्यानें तेथें स्वस्थ बसवेना.

तिच्या मनांत कांहीं तरी येऊन ती सभोंवार पाहत होती. मॅनेजर आपल्याकडे पाहत असल्याचें तिला दिसलें. तिनें खूण करतांच मॅनेजर आले.

" तुमच्या मालकांना मला आंत भेटायचं आहे. " तिनें म्हटलें.

" पण नाटक चालू असतां आंत कोणाचीही भेट घ्यायची नाहीं, असा मालकांनीं नियम केला आहे. " मॅनेजरनीं अदबीनेंच अगदीं हलक्या आवाजांत सांगितलें.

" ऑं ? अस्सं ? कधींपासून हा नियम झाला ? पूर्वीं नव्हता मी असतांना—"

" बरोबर बाईसाहेब ! आपण आमच्याकडून सुटल्याच्या दुसऱ्या दिवसापासूनच हा नियम नवीनच प्रथम अमलांत आला, आणि तो आतां सक्तपणें पाळण्यांत येत असतो."

" बरं !"

मॅनेजरसाहेब आपल्या जागेवर गेले. पण माधुरीला आपल्या जागेवर बसवेना आणि रतिलालशेठनांही चैन पडेना.

" मला वाटतं; नाटक बस्स झालं. आपण आतां घरीं जावं, अं ? " रतिलालनीं प्रश्न केला.

" हो. मलाही तसंच वाटतं ! " माधुरीनं दुजोरा दिला.

* * *

" खरंच कीं काय ? माझा नाहीं विश्वास बसत आपल्या बोलण्यावर ! " नाटक कंपनीचे मालक बोलत होते.

" हो. मी अगदीं खरं खरं बोलतें आहे. कुलीन स्त्रियांनीं नाटकांत कलेच्या उन्नतीसाठीं काम करायला मुळींच हरकत नाहीं हेंच मत मी आतांपर्यंत प्रतिपादन करीत आलें आहें. आपल्या नाटकांत मी नायिकेची भूमिका करायला तयार आहें. अगदीं मनापासून मी हें सांगत आहें. आपणाला त्यांत असें असंभवनीय एवढें कां वाटावें मला कळत नाहीं, " माधुरी म्हणाली.

मालक विचारांत पडले. त्यांनीं पानसुपारीचें तबक माधुरीच्या समोर सरकविलें. नुकतेंच कॉफीपान झालें होतें. माधुरीनें विडा न घेतां फक्त एक लवंग

दातांत धरली. मालकांचें उत्तर काय येतें तें ऐकण्यास ती उत्सुक झाली होती. मार्केटिंगला म्हणून जात असतां तिनें शोफरला कंपनीच्या बिऱ्हाडावरून मोटर वळवायला सांगितली, आणि अगदीं सहज म्हणून ती कंपनीच्या बिऱ्हाडीं आली होती. कंपनीचे मालक आश्चर्यचकित झाले होते. कंपनीतल्या नाटकांवर, नटांवर व इतर विषयांवर तिनें थोडक्यांत पण बरीचशी चर्चा केली होती, व सध्यांच्या नायिकेच्या कामांत अमुक अमुक सुधारणा केल्यास नाटक जास्त लोकप्रिय होईल, असें मत तिनें दिलें होतें. मालकांनीं तिचीं सर्व मतें शांतपणें ऐकून घेतलीं होतीं. त्यावरून आपली छाप मालकांच्या मनावर चांगलीच बसली असल्याची तिची खात्रीही झाली होती.

मालकांनीं धंद्यांत पैसा मिळत नसल्याचा मुख्य उल्लेख संभाषणांत केलाच होता. पण माधुरीनें विनावेतन काम करण्याचीही कबुली दिली होती.

मिस माधुरी × × × × कंपनीच्या × × × × या नव्या नाटकांत मुख्य नायिका म्हणून पुन्हां चमकणार अशी जाहिरात झाल्यास पुन्हा पैशाचा कसा पाऊस पडेल याची कल्पना मालकांस नव्हती असें नाहीं. आणि माधुरीच्या मस्तकांत या वेळीं असल्याच प्रकारच्या गोड विचारांची धुंदी खेळत होती. दोघेंही लोडास टेकून मऊ गादीवर समोरासमोर बसलीं होतीं व आपापल्या विचारांत गढून गेलीं होतीं. शेवटीं मालकांनीं हलक्याच आवाजांत म्हटलें—

" मी विचार करून कळवितों आपणांला लौकरच. "

*  *  *  *

हातांतील वर्तमान पत्रावरून शेठजींची नजर सहज फिरत असतां एका विशिष्ट स्थलीं त्यांची दृष्टि थबकली. ' नाटयकला ' साप्ताहिकाचा तो अंक होता. नाटय-लोलुपांना अत्यंत आनंदकारक वाटणारी अशी ती वार्ता होती.

### रंगभूमीवर चमकणार

प्रसिद्ध नटी सौ. माधुरी ह्या × × × × नाटक मंडळीच्या रंगभूमीवर ××× नाटकाच्या पहिल्या प्रयोगांत नायिकेच्या वेषांत पुनः चमकणार असल्याचें समजतें. माधुरीचें काम किती मधुर असतें हें महशूरच आहे. माधुरी ह्या विवाहित झाल्यावरही त्यांनीं नाटयकलेच्या व्यवसायाची पुष्कळच माहिती मिळविली आहे. त्यांच्यासारखी कलावती आणि सुविद्य नटी रंगभूमीवर पुनः चमकणार हें आम्हा नाटयरसिकांचें महद्भाग्य समजतों व सौ. माधुरीचें आम्ही अभिनदन

करिता. अशी सुविद्य, कलावंत व कुलवंत माणसें रंगभूमीवर येणें हे नाट्यकलेच्या वाढत्या यशाचें द्योतक आहे.... "

या मजकुरावरून नजर फिरत असतां रतिलालशेठच्या मस्तकांत विचारचक्र सारखें गरगर फिरत होतें. आणि तेवढ्यांतच त्यांच्या कानावर टेलिफोनवरील संभाषणाचे शब्द पडत होते. रतिलालनीं वर्तमानपत्र तसेंच तोंडासमोर धरलें पण वाचण्याऐवजीं ऐकण्याकडेच त्यांचें लक्ष जास्त लागलें होतें. माधुरीच बोलत होती. पण कोणाशीं ? आणि कशाबद्दल ?

"......असं म्हणतां ? ठीक ! दुय्यम नायिकेचें देखील काम करायला माझी तयारी आहे. मुख्य नायिकेच्याच कामांत कांहीं विशेष आहे असं नाहीं.... बरं बरं !—काय ? कास्ट ठरून गेला ? म्हणून कसली हरकत ? अहो ! मी म्हणतें एकाद्या दुसऱ्या प्रयोगांतच काम करायचं आहे, तेव्हां तुमचा ठरलेला कास्ट कांहीं बिघडत नाहीं...असं होय ? कवीच आक्षेप घेताहेत ? तिथं आहेत का ते कवी ? टेलिफोनपाशीं ? मी त्यांच्याशीं बोलतें. आं ? नाहींत ? केव्हां भेटतील ? गांवाला गेलेत ? केव्हां येणार ? सध्यां येणारच नाहींत. बरं, फक्त प्रयोगादिवशींच येणार होय ? शहाणे आहेत खरे हे नवे कवी ! थांबा–थांबा–हं. हें पहा, मी ह्या नाटकांत कोणतीही अगदीं किरकोळ चवथ्या पांचव्या अगदीं शेवटच्याही दर्जाची भूमिका करावयास तयार आहें म्हणतें ना ? प्रश्न तत्त्वाचा आहे. पैशाचा नव्हे. तुमच्या कंपनीचा व माझा पूर्वीचा ऋणानुबंध लक्षांत घेऊन मी हें म्हणत आहें. मला कंपनींतच जावयाचें असलें तर तो प्रश्नच निराळा ! आलं कां लक्षांत ? ऑं ? पत्रच पाठवितां ? बरं, पण केव्हां ? उद्यां. बरं. पत्रच पाठवा..."

* * * *

वरील हकीगतीला चार दिवस झाले. कंपनीच्या मालकांकडून दुसऱ्या दिवशीं पत्र कांहीं आलें नव्हतें. शिवाय माधुरीनें आपणहून इतका उतावीळपणा केला होता कीं, त्यापेक्षां जास्ती पुढें पाऊल टाकणें म्हणजे स्वाभिमानाला तिलांजली देण्यासारखेंच होत होतें. कंपनीच्या मालकांकडून टेलिफोन आला त्याच्या दुसऱ्याच दिवशीं कांहीं जरूरीच्या कामकाजासाठीं रतिलालशेठ बाहेर गावीं गेले होते. पण त्यांचें या खेपेचें जाणें नेहमींच्याहून निराळ्या प्रकारचें झालेलें माधुरीच्या नजरेस आलें होते. आपल्या रंगभूमीवर जाण्याच्या बेताबद्दल त्यांच्या मनांत कांहीं विकल्प येईल असें माधुरीस वाटलें नाहीं. कारण तिनें ती गोष्ट कांहीं लपवालप-

वीनें केली नव्हती. आतां प्रत्यक्ष अशी तिनें त्यांच्याकडे परवानगी मागितली नव्हती. पण अद्याप निश्चितपणा ज्या गोष्टीस आलेला नाहीं. त्याची आगाऊ परवानगी कसली मागावयाची ? आणि परवानगी मागायला वेळ कितीसा लागणार होता ? शिवाय पूर्वी अशा विषयावर एकदां चाललेल्या संभाषणांत कुलीन स्त्रीनें रंगभूमीवर जाण्याच्या विरुद्ध रतिलालनीं मत दिलें नव्हतें. कांहीं असलें तरी आपली रंगभूमीवरील कीर्ति आपल्या पतीला आवडेल असें माधुरीला वाटत होतें. आज ती फारच अस्वस्थ झाली होती. कांहीं एक प्रत्यक्ष पुरावा नसतां वर्तमानपत्रांत तर आपण रंगभूमीवर पुनश्च पदार्पण करणार अशी बातमी फडकली आणि कंपनीच्या मालकांकडून अद्याप उत्तर येईना. त्यामुळें तिला कसेंसेंच वाटूं लागलें. रतिलालशेठ आणि कंपनीचे मालक या दोघांबद्दलच तिच्या मनांत या वेळीं विचारतरंग उठत होते. इतक्यांत तिच्या नांवचीं दोन पत्रें तिला मिळालीं.

त्यांतील एक पत्र रतिलालशेठचें होतें हें तिनें पत्त्याच्या अक्षरावरूनच ओळखलें. पण दुसरें कोणाचें हें तिला उघडल्याशिवाय ओळखतां येईना. म्हणून तिनें तें प्रथम उघडलें व मजकुराच्या शेवटीं सही पाहिली तों नाटक-कंपनीच्या मालकाचीच होती ती ! तेंच पत्र तिनें पहिल्याप्रथम वाचावयास सुरवात केली.

" × × × × × आपण जो विषय सुचविलांत त्याच्यावर मी पुष्कळ पुष्कळ विचार केला. वास्तविकपणें तुमच्यासारखी प्रथितयश व लोकप्रिय नटी लाभणें म्हणजे दैवयोगच. म्हणून तुमच्या इच्छेप्रमाणें होकार देण्याचा मला मोह होतो. पण तें आमच्या नाटकमंडळीच्या शिस्तीस सोडून होणार आहे. पहिली गोष्ट तुम्ही येणार त्या कांहीं १–२ च खेळांकरितां. कायम आला असतां तर गोष्ट निराळी होती. एकदोनदां खेळांत काम करून तुमच्यासारखी प्रसिद्ध नटी गेल्यावर नंतरचीं कामें फिकीं पडतील आणि नवा खेळ तर त्यामुळें कायमचाच पडेल.

दुसरें, नटमंडळी कंपनीच्या शिस्तीच्या बाहेर एकवार जाऊन, निराळ्या शिस्तींत दिवस घालवून पुन्हां कंपनींत आलीं असतां त्यांना योग्य प्रकारें वागविणें चालकांना कठीण जातें. तालमीच्या बाबतींतही पुष्कळ वेळां मतभेद होऊन शिस्त बिघडते. आणखीही अशाच पुष्कळ गोष्टी लिहितां येतील. एकंदरींत तात्पर्य एवढेंच कीं, कंपनीच्या गोटाच्याबाहेर जाऊन संसारसुखांत, निराळ्या वातावरणांत दिवस घालविलेल्या नटीला, अंगसौष्ठव, मुद्राभिनय, वगैरे

हरएक बाबतींत अवघडपणा वाटूं लागत असल्यामुळें कंपनींत तात्पुरतें काम करूं देणें कठीण पडतें असा अनुभव आहे. म्हणून नकार द्यावा लागत आहे, त्याबद्दल क्षमा असावी........"

आपला
×××××

हें पत्र वाचून माधुरीला फारच वाईट वाटलें.दुसरें पत्र वाचण्याचा तिचा विचार नव्हता. पण ती आतां इतकी हताश झाली होती कीं, वाटतील तितक्या अप्रिय गोष्टी असल्या तरी त्या सहन करण्याची जणूं कांहीं तिनें तयारीच केली होती. आज आपणांला अनिष्ट आणि अप्रिय गोष्टीच ऐकाव्या लागणार असें तिचें मन तिला सांगत होतें. किती आढ्यतेनें ती नाटक कंपनीच्या मालकाला भेटली होती, आणि शेवटीं तिचा कसा पाणउतारा झाला ?

नाटक कंपनीच्या मालकाशीं बोलणें करीत असल्यावेळचे सर्व प्रसंग तिला आठवले आणि त्यामुळें ती अतिशयच खजील झाली !

तशाच परिस्थितींत तिनें दुसरें पत्र उघडून वाचावयास सुरवात केली. तें पत्र रतिलालशेठचें होतें.

"××××× म्हणूनच मला इकडे जास्त दिवस मुक्काम वाढवावा असें वाटूं लागलें आहे. रंगभूमीवरील तुझें काम पाहण्याची माझी आतां तयारी नाहीं.

आपण एकमेकांच्या विचारानेंच विवाहबद्ध झालों हें खरें, तथापि झाली ही माझ्या हातून चूक तर झाली नाहीं ना असाही संशय मला आतांशा जाचीत असतो. नटी जर गृहिणी झाली तर तिचें मन संसारांत कितपत रमूं शकेल याची मला शंका वाटते. माझ्यासारखा नाटकी वातावरणाला पारखा असलेला व सदा सर्वकाळ आपल्या उद्योगधंद्याच्या कामकाजांत गुरफटलेला नवरा तुला मनांतून कितपत आवडत असेल ? किंवा थोडे दिवस आवडला तरी तुला माझ्या सहवासांत कायमचें सुख लाभेल काय ? तुझें मन रंगभूमीवर पुनः चढण्याकडे प्रवृत्त होऊं लागलें आहे, हें माझ्या ध्यानांत आलें. तुझ्या आकांक्षेच्या आड मी येऊं इच्छित नाहीं. तुला पाहिजे तशी तूं वाग. मात्र आतां तरी मनाचा एक पक्का आणि कायमचाच निश्चय कर, रंगभूमीवरच चमकावयाचें असेल तर खुशाल जा. पण रतिलालशेठची सौभाग्यवती म्हणून जाऊं नको. पुनश्च कुमारी माधुरी म्हणूनच जा. तुझें उत्तर आल्यावर मी माझा मुक्काम किती दिवस आणि कुठें करावयाचा हें ठरविणार आहे ××××......

रतिलाल शेठ.



---

# रस्ता ओलांडतांना

दुपारच्या सुटीची घंटा झाली. गिरणींतले मजूर जेवायला बाहेर पडले. गिरणीच्या आवारांतला रस्ता कसा दुतर्फा फुलून गेला. पुरुष, स्त्रिया, मुलें खेंचाखेंच करीत बाहेर पडलीं. पण दोन तीन माणसें अद्याप मागें राहिलीं होतीं. गोजरा आणि तिचा शिवू हीं दोघें अद्याप मागें होतीं. बाहेर पडणाऱ्या हजारों माणसांच्या थव्यापैकीं शेवटच्या ज्या कांहीं जणांची नजर त्या दोघांकडे गेली, त्यांची आपापसांत डोळेमोडणी, कुजबूज आणि चर्चा सुरू झाली. कारण कल्लेवाला भिमाजी त्या मायलेकरांच्या मध्यें उभा असलेला त्यांनीं पाहिला होता.

गिरणींतल्या एका बाजूच्या कोपऱ्यांत गोजराला नेऊन कल्लेवाला भिमाजी आपल्या पुंजकेदार मिशांवरून हात फिरवीत म्हणाला,—" गोजरा ! तुला अन्नाला मोताद व्हायचं आहे काय ? विचार कर आणि उत्तर दे. पोटाची दामटी वळलेल्या त्या शिव्याकडे–तुझ्या पोराकडे बघ. आज माझ्या बिऱ्हाडीं येणार कीं नाहीं बोल !"

" माझं प्रेत देखील तुझ्या बिऱ्हाडाकडे वळणार नाहीं. " फाटलेल्या पदराचे धागे लज्जारक्षणासाठीं गळ्याखालीं ओढीत गजरा म्हणाली, " आजपर्यंत केव्हां केव्हां तुझ्याकडे मदत मागितली, पण ती तूं या हेतूनं दिलीस हें मला तेव्हां उमगलं नव्हतं. मी जिवंत राहिलें तर तुझी पैन्‌पै फेडीन, तुला काय वाटेल तें करून घे. जा !" असें म्हणून ती निघून जाणार तोंच तिच्या दंडाला धरून भिमाजीनें खेंचलें. खेंचतांना ज्या दोन चार शेलक्या शिव्या त्यानें हांसडल्या त्यांचा उच्चार करणें अथवा कागदावर लिहिणें अशक्य आहे. पण दंडाला खेंचताक्षणींच दंडावरची त्याच्या मुठीची पकड सुटली आणि क्षणभरच तो स्तिमित झाला ! क्षणभरच तो तिच्या कांपऱ्या देहयष्टीकडे पहात राहिला !

" गोजरे ! तुझ्या आंगाला भयंकर ताप आहे ! तुला लाथा मारून हांकून दिली तर तुझी काळजी कोण करणार ? तुला अन्नपाणी कोण देईल ? मी तुला मुकादमाकडे नेत आहें. बार भरून ठेवलेला आहे. रंजुकीच्या वातीला विस्तवच काय तो लावायचा राहिला आहे; बघ तो बघ–त्या पोराकडे बघ—"

खरोखरच ओक्साबोक्शीं रडत शिवू या वेळीं आपल्या आईजवळ आला होता. भिमाजी आपल्या आईला कां मारतो हें त्या सहा वर्षांच्या अर्भकाला कसें समजणार ? जिवाच्या आटोक्याबाहेर काम करून तें कोवळें पोर उपासमारीनें अर्धमेलें झालें होतें. एकदिवसा आड भाकरी खायची त्यांची स्थिति होती. आज त्याची आई भाकरी करून त्याला देणार होती. कालचा दिवस चण्याकुरमुऱ्यांवर घालवला होता, तसाच उद्यांचा दिवस पुन्हा घालवावा लागणार होता. कारण डॉक्टरची व वाण्याची उधारी बरीच फुगली होती. महिन्यांतून पंधरा दिवस उपाशीं काढल्यावांचून गत्यंतरच नव्हतें.

गोजराचें घर एका खेडेगांवांत होतें. पण तिच्या सौभाग्याचा धनी तिला सोडून गेल्यापासून दिरांनीं तिचा छळ करायला सुरवात केली. तिचा हिस्सा त्यांना मिळवावयाचा होता. पहिल्यानें कांहीं दिवस कोणाची मोलमजुरी करून दिवस काढण्याचा तिनें प्रयत्न करून पाहिला, पण शेवटीं शेजारचा भिमाजी मुंबईस जाऊन चार पैसे मिळवून सुखांत असलेला पाहतांच गिरणींत काम करून चार पैसे जवळ करतां येतात असें तिला त्याच्याकडून समजलें व तें खरें वाटलें. एक दिवस ती कोणालाही न कळवितां भिमाजीबरोबर मुंबईस आली आणि परळच्या एका गिरणींत नोकरीस राहिली. पण भिमाजीचा पापी कावा निराळाच होता, तो आज पुरा बाहेर पडला.

" गोजरे ! तुला आजपासून नोकरीवरून कमी केलें आहे. तूं कामचुकारपणा करतेस आणि बाकीच्या मजुरांनाही फितवतेस याविषयीं माझी खात्री झाल्यावरून मी वरिष्ठांना कळवलें होतें. आजपासून तूं गिरणींत येऊं नकोस. दंडादाखल झालेल्या कामाचा पगारही तुला मिळणार नाहीं जा ! "

" हः हः हाः हाः हाः ! " कल्ल्यांवरून बोटें फिरवीत भिमाजी मोठमोठ्यानें हांसला.

" आणि माझ्या शिवूच्या कामाचा पगार तरी ? "

" तें शेंबडें पोर कसलें काम करतें, आणि त्याचा पगार कसला ? "

" याच महिन्याला त्याला नाहीं पगार ?"

" नाहीं ! या महिन्यांत त्याची हजिरीच मांडलेली नाहीं !"

" असं कसं ? एकही दिवस तो कामावरचा नाहीं रहायला."

" तो सगळा भिमाजीकडे आहे हिशोब."

तिनें एकवार भिमाजीकडे पाहिलें, भिमाजीनें मिशावरून हात फिरवला आणि—

पण त्याची ती पापी विचारांनीं भरलेल्या हृदयांतील विकार बाहेर फेंकणारी चंचल दृष्टि पहातांच तिच्या सर्वांगावर शहारे आले. तिनें एकवार आकाशाकडे पाहिलें आणि मागल्या पावलीं परतली. जणूं तिनें परमेश्वरालाच आपल्याला नेण्याकरितां वर बोलवलें होतें.

भुकेलेला शिवू जमिनीवर मूर्च्छित पडला होता. त्याला उचलून घेण्याची ताकद तिला नव्हती. तापानें तिचें आंग फणफणत होतें, अशक्तपणानें हातपाय लटपटत होते. तिच्या मनांत असंख्य विचाराचें काहूर माजलें होतें, पण पोराकडे जीव घुटमळत होता.

गिरणीच्या फाटकांतून ती बाहेर पडली आणि शिवूला कडेवर घेऊन रस्ता ओलांडूं लागली. इकडून व्हिक्टोरिया आली, दुसरीकडून ट्राम आली. तिला चुकविण्याकरितां ती बाजूस सरते तोंच समोरून मोटर लॉरी रों रों करीत आली; हॉर्न तिनें ऐकलें. चुकविण्याकरितां ती पलीकडे पाऊन टाकते तोंच तोल जाऊन ती शिवूसकट लॉरीच्या मडगार्डला अडकून खालीं पडली आणि लॉरीचें चाक तिच्या व शिवूच्या अंगावरून गेलें !

× × ×

पिवळ्या पगड्या जमा झाल्या. शिट्यांचे आवाज झाले. नोटबुकें व पेन्सिली बाहेर आल्या. कसलासा ' छन्, छन् ' आवाजही झाला. त्याबरोबर एखाद्या नोटबुकांत खोडाखोड होत असल्याचाही भास कोणाकोणास झाला. पुढची हकीगत म्हणजे हॉस्पिटल, कोरोनरचें कोर्ट वगैरे ठिकाणीं घडलेली तुम्हांला उद्यांच्या दैनिकांत वाचावयास मिळेल; आणि ती अगदीं निराळ्याच प्रकारानें लिहिलेली आढळेल. पण खरा प्रकार हा असा आहे.

[illegible]
[illegible] ..१५७६

# जीवन-मरण !

पण या सगळ्या गोष्टी माझ्या जीवनोत्तर व्हावयाच्या आहेत—" क्षीण आवाजांत, शब्द अस्पष्ट उमटत असतां, श्वास लागलेल्या स्थितींत वरील वाक्य आसन्नमरणावस्थेंत पडलेला तो म्हातारा मोठ्या परिश्रमानें उच्चारीत होता.

मुलगा जवळच बसला होता. तोही पुढील प्रसंग ओळखून घाबरून गेला होता. शब्द त्याच्या कानावर पडले. यंत्राप्रमाणें ते तो ऐकत होता. पण अनवधानतेनें त्यानें विचारलें—

" हं ! जीवनोत्तर,—जीवनोत्तर ? "

" हो जीवनोत्तर. जीवनोत्तर म्हणजे मरणोत्तर ! "

" जीवनोत्तर म्हणजे मरणोत्तर ? " मुलानें किंचित् आश्चर्यानें विचारलें.

" हो. जीवनाचा शेवट म्हणजे मरण ना ? जीवनानंतर मरण-जीवनोत्तर म्हणजे मरणोत्तर. " म्हाताऱ्याची वाचा बंद झाली त्याचें जीवन बंद झालें होतें.

" जीवनानंतर मरण; आणि मरणानंतर जीवन नव्हे का ? " मुलगा अर्धवट स्वतःशींच पुटपुटत होता; " जीवनोत्तर म्हणजे मरणोत्तर असें हे बाबा म्हणतात. अर्थात जीवन म्हणजे मरण असें ठरल्यासारखेंच झालें म्हणावयाचें. मरण म्हणजे जीवन आणि जीवन म्हणजे मरण. अगदीं बिनचूक समीकरण आहे हें ! हो ना बाबा ? "

हो ! जीवन म्हणजे मरण " असा ध्वनि आला ! पण तो कांहीं म्हाताऱ्याच्या तोंडून खास आला नव्हता. मुलाला मात्र तसें वाटलें. ओंठ हालल्यासारखे देखील त्याला दिसले. पण तो भासच नव्हे कां ? पण तसें तरी कसें म्हणा ? मरण म्हणजे जीवन ना ?

तो ध्वनि ऐकल्यावर मुलगा खात्रीच्या स्वरानें म्हणाला—होय. जीवन म्हणजे मरण.

त्याची दृष्टि बापाकडे गेली. त्याला तें दृश्य पहावेना. तो एवढेंच म्हणाला—

" जीवन म्हणजे मरण "

# नेरूरकरांचें वाङ्मय

## कथा वाङ्मय

१ शीलाचें मोल ( कादंबरी )
२ दुधारी सुरी ( कादंबरी )
३ तो क्षण ( कादंबरी )
४ देशाचें वैभव ( कादंबरी )
५ अकबराचें वेदसाधन ( कादंबरी )
६ नटीचे नाच ( लघु कादंबरी )
७ साधना ( लवकरच प्रसिद्ध होणारी कादंबरी )

## काव्य वाङ्मय

१ राधा कृष्ण रहस्य ( काव्य )
२ सिंहगड दर्शन
३ पर्वती ( काव्य )
४ श्रीक्षेम राज्याधिरोहण ( काव्य )
५ श्री सयाजी सुवर्ण महोत्सव ( काव्य )
६ उत्कंठा ( कविता संग्रह )

## प्रबंध वाङ्मय

१ मराठीचा संसार
२ टॉलस्टॉयचें तत्त्वज्ञान

## बाल वाङ्मय

१ श्री सरस्वतीचा प्रसाद
२ माणूस आणि पशु
३ पहिलें पुस्तक
४ पाढ्यांचे खेळ
५ गमतीच्या गोष्टी ( लौकरच ४ भागांत प्रसिद्ध होणार )